# मानवी जीवनातील गूढ रहस्ये

## (भाग ६)

स्वामी दत्तावधूत

ॐ वनिता बुक्स
मुंबई - ४०० ०१२.

☯ ॐ वनिता बुक्स

☯ पुष्प तेरावे

प्रथमावृत्ती : २००५
द्वितीयावृत्ती : २००९
तृतीयावृत्ती : २०१२
चतुर्थावृत्ती : २०१४
पंचमावृत्ती : २०१६
षष्ठमावृत्ती : २०१८

☯ © (सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन)

☯ प्रकाशक
ॐ वनिता बुक्स
बी २१३, सात आसरा सहकारी गृहनिर्माण संस्था
डॉ. एस्. एस्. राव मार्ग, लालबाग, मुंबई – ४०० ०१२.
दूरध्वनी : ०२२ –२४१८७३३९

☯ **मूल्य : रु. १९०/–**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सगुणातून–निर्गुणाकडे | ७ |
| २. | आत्मज्ञान | २५ |
| ३. | चित्तवृत्तीचा निरोध म्हणजे योग | ३० |
| ४. | विहंगम मार्ग | ३३ |
| ५. | अक्षर ब्रह्म | ३८ |
| ६. | पंचतत्त्वे | ४६ |
| ७. | शब्दसृष्टी | ५९ |
| ८. | देवयान पंथ | ६४ |
| ९. | देवयान पंथातील समस्या | ८८ |
| १०. | अवस्थात्रय | १०९ |
| ११. | ईश्वर असिद्धे | १२० |

| | | |
|---|---|---|
| १२. | रडविणारी शक्ती–रुद्र | १५५ |
| १३. | समाज व देशाचे प्रारब्ध | १६३ |
| १४. | अदृश्यशक्तीचे जीवनावरील नियंत्रण | १६८ |
| १५. | प्रकाशयुग–अंधारयुग | १९२ |
| १६. | जीवन–मृत्यू | १९९ |
| १७. | चार प्रकारचे भक्त | २०७ |
| १८. | दशावतार रहस्य | २१२ |
| १९. | दैवी जीवनाचे अठरा नियम | २२८ |
| २०. | चमत्काराचे शास्त्र | २३७ |
| २१. | मुक्तीचा मार्ग | २५० |

# मनोगत

**मानवी** जीवनातील गूढ रहस्ये भाग पाच पूर्ण झाल्यानंतर एकांतात राहून निवांतपणे साधना करण्याची इच्छा होती. तसा मी गेली सोळा वर्षे एकांतवासातच राहत आहे. तरीपण ईश्वराच्या आज्ञेने लेखन प्रपंच करीत आहे.

मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग पाच लिहून झाल्यानंतर हा लेखन प्रपंच थांबविण्याचे ठरविले होते. परंतु ईश्वराची तशी इच्छा दिसत नाही, म्हणून त्याने मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग सहा लिहून घेतले व भाग सातचे लिखाण सुरू आहे. कदाचित मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग सात हे शेवटचे पुस्तक ठरेल असे वाटते.

माझ्या पुस्तकांमुळे हजारो लोकांच्या जीवनात परिवर्तन झाले, हजारो लोकांची विचारसरणी बदलली व ते भक्तिमार्गी बनले. श्रीस्वामी समर्थ सप्तशती, संक्षिप्त श्रीगुरुचरित्र, श्रीदुर्गा त्रिशती, श्रीदुर्गा सप्तशती या माझ्या पोथ्या महाराष्ट्रातील पाच लाखाहून अधिक घरांमध्ये वाचल्या जात आहेत व त्याचे लोकांना खूप चांगले अनुभव येत आहेत. अनेकांच्या संकटांचे निवारण झाले आहे, दुःखे दूर झाली आहेत, मनोकामना पूर्ण झाल्याचा अनुभव आला आहे व ध्यानामध्ये देव-देवतांची दर्शने घडत आहेत. अशा प्रकारे माझ्या पुस्तकांनी व पोथ्यांनी असंख्य लोकांना सन्मार्गाला लावले आहे.

आम्हाला श्री स्वामीजींचे दर्शन घडेल का? असे प्रश्न प्रकाशकांना शेकडो लोकांनी विचारले. यावर माझे म्हणणे एवढेच आहे की, सध्यातरी एकांतवासातच राहून मला साधना तपस्या करायची आहे, पुढचे पुढे पाहू ! **– श्री स्वामी दत्तावधूत**

भरो शांतीने विश्व ।

व्हावे आध्यात्मिक विश्व ।

भक्ती, ज्ञान, प्रेमयुक्त ।

व्हावे अखिल विश्व हे ।।

– श्री स्वामी दत्तावधूत

# १. सगुणातून - निर्गुणाकडे

**नाम–रूपाची** उपासना करणे म्हणजे सगुणोपासना ! माणसाचे मन स्थिर नसते म्हणून तो विविध प्रकारच्या उपासना करतो. परंतु परमात्मा निर्गुण निराकार आहे.

या अध्यायामध्ये विविध स्तरातील माणसे विविध मार्गांनी नाम–रूपाची उपासना किंवा सगुणोपासना कशी करतात, त्यांना तशी बुद्धी का होते व निर्गुण निराकार परब्रह्माची साधना कोण करतात, त्यांना तशी बुद्धी का होते या गूढ विषयाची चर्चा आपण करणार आहोत.

बऱ्याच लोकांना असा प्रश्न पडतो की ब्रह्मा, विष्णू, महेश, दुर्गा, दत्त, गणेश इत्यादी देवता खऱ्या आहेत का ? जर त्या खऱ्या आहेत तर इतर धर्मातील विद्वान व सिद्धपुरुष त्यांच्या अस्तित्वाची दखल का घेत नाहीत व जर त्यांना काल्पनिक

म्हणावे तर आमच्या अनेक पुराणांमध्ये त्यांच्याविषयी इत्थंभूत माहिती दिलेली आहे, ती खोटी समजायची का ?

याचे उत्तर दोन-तीन प्रकाराने देता येईल.

नाम व रूप या दोन्ही गोष्टी माया आहेत. अर्थात जे जे काही नाम आहे व जे जे काही रूप मानले गेले आहे या सर्व गोष्टी काल्पनिक आहेत, कारण नाम-रूप म्हणजेच माया. त्यामुळे नाम-रूपाच्या अंतर्गत जे जे काही येते उदाहरणार्थ ब्रह्मा, विष्णू, महेशापासून देवी-देवतांपर्यंत या सर्व गोष्टी मायिक म्हणजे काल्पनिक आहेत. हिंदू लोकांच्या मनावर लहानपणापासून नाम-रूपाचे इतके काही संस्कार होतात की नाम-रूपाच्या पलीकडे काही आहे याची कल्पनाही ते करू शकत नाहीत व परब्रह्माची धारणा करण्याची पात्रता लाखातील एखाद्यामध्येच असते.

परब्रह्माची धारणा करणारा लाखातील एखादा साधक परब्रह्माची धारणा करून सिद्ध होतो, जीवनमुक्त होतो व आपल्याला ज्ञात झालेले परब्रह्माचे रहस्य तो सत्पात्र सद्भक्तांना सांगतो. परंतु  आम जनतेला तो सगुण भक्तीचा म्हणजेच नाम-रूपाचा उपदेश करतो. यामुळेच नाम-रूपाच्या भक्तीचा प्रसार जास्त झाला आहे व जनता विविध रूपांनी जनार्दनाची उपासना

करत आहे.

सूर्यप्रकाशामध्ये अल्फा, बीटा, गामा, एक्स-रे, अल्ट्राव्हॉयलेट अशी किरणे असतात. सहस्त्रावधी वर्षांपासून भगवान् सूर्यनारायण आपल्याला प्रकाश देत आहेत; परंतु या प्रकाशामध्ये असणाऱ्या अल्फा, बीटा, गामा इत्यादी सूर्यकिरणांचा शोध सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी लागला. तेव्हापासून या किरणांचा आपण उपयोग करीत आहोत.

देव या शब्दाचा अर्थ चमकणारा प्रकाश ! देव-देवता म्हणजे तेजाने तळपणारे प्रकाशमय आत्मे ! सूर्याच्या किरणातून प्रकाशमय देव-देवता साकार होतात हे सत्य आहे व यामुळेच देव-देवतांना सत्य मानावे लागते. अशा प्रकारे सूर्यप्रकाशामध्ये, वायुमंडलामध्ये, आकाशामध्ये, ग्रहनक्षत्रांच्या किरणांमध्ये अनेक प्रकारच्या देव-देवतांचे अस्तित्व असते. या सर्व तेजोमय असतात व उपासना करणाऱ्या साधकाला दर्शनही देतात. यांच्या दर्शनासाठी ध्यानाची व कल्पनेची गरज असते. जोपर्यंत कल्पनेचे अस्तित्व आहे; तोपर्यंत देव-देवतांचे अस्तित्व आहे. कल्पनेचे अस्तित्व संपले की देव-देवतांचे अस्तित्वही संपते. मग उरते ते परब्रह्म !

ध्यानाला कल्पनेची गरज असते असे वर सांगितले आहे.

याचे कारण एखादा अमेरिकन साधक किंवा एखादा इराण-इराक मधील मुस्लीम साधक यांना गणपती किंवा महालक्ष्मी दिसणारच नाहीत. कारण गणपती किंवा महालक्ष्मीची संकल्पना ते करूच शकत नाही. परंतु परब्रह्माचा अनुभव हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, ज्यू किंवा कुठल्याही धर्मातील साधकाला सारखाच येत असतो.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की देव-देवतांचे अस्तित्व जरूर आहे. परंतु त्या देव-देवतांना ओळखण्याची मानवाची संकल्पना वेगवेगळी असते. हिंदू मनुष्य जेव्हा महालक्ष्मी असे म्हणतो तेव्हा तो कमळात उभी असलेल्या चार हातांच्या महालक्ष्मीची कल्पना करतो. तर ख्रिश्चन व मुस्लीम माणसे मला विचारतात, ''तुमच्या देवांना चार हात गैरसोयीचे वाटत नाहीत का?'' एका मुस्लीम साधकाने मला विचारले, ''हत्तीचे शिर कापून जर माणसाला लावले तर माणसाच्या धडावर ते बसेलच कसे ? कारण हत्तीच्या मानेचा आकार जवळजवळ ३ फूट व्यासाचा व माणसाच्या मानेचा आकार ३ इंच व्यासाचा असे असताना माणसाच्या धडावर हत्तीचे शिर बसवलेच कसे ?''

उत्तरादाखल मी त्याला उलटा ॐ काढून दाखविला. ॐ उलटा काढला असता गणपतीचे रूप तयार होते हे पटवून दिले.

निर्गुण निराकार परब्रह्माचे ध्यान करणे सामान्य माणसाला अशक्य असल्या कारणाने ज्याचे मन थोडेफार एकाग्र होते त्याने ॐ चे ध्यान करावे व चंचल मनाच्या सामान्य माणसाने गणपतीची पूजा करावी असे आमच्या पूर्वजांनी आम्हाला वळण लावले आहे. असे त्या मुस्लीम गृहस्थास सांगितले. यावर त्याने मला विचारले, ''ब्रह्मदेवाला चार शिरे दाखविली याचा अर्थ काय?''

मी उत्तर दिले, ''आमचे सर्व देव सत्य आहेत, परंतु त्यांची रूपे शैक्षणिक आहेत. एक चित्र दहा पानांमध्ये मावणाऱ्या मजकुराइतके ज्ञान व्यक्त करते. ब्रह्मदेवाला चार शिरे आहेत. याचा अर्थ असा की ब्रह्माच्या प्रांतात आत्म्याचा प्रवेश होताच आत्मा चतुर्मुखी होतो. म्हणजे त्याला विविध प्रकारचे ज्ञान आपोआप होते. ही **सामान्य अवस्था !** व एकाच वेळेला त्याला लांबचे व जवळचे असा भेद न राहता दिसते; एकाच वेळी चारही दिशांचे दिसते, ही **समाधी अवस्था !** या चतुर्मुखी अवस्थेमध्ये पुढचे, मागचे, उजवीकडचे, डावीकडचे, वरचे, खालचे, एका फुटावरचे व हजारो मैलांवरचे एकाच वेळेला दिसते. म्हणून ब्रह्मदेवाच्या चित्रामध्ये चार शिरे दाखविलेली आहेत.''

चतुर्मुखी ब्रह्मदेवाच्या चित्रावरुन योग्य तो बोध घेऊन अभ्यास करण्याचे सोडून आम्ही ब्रह्मदेवावर पुराणे लिहित बसलो ही चूक

आमची आहे. आमच्या इतिहासामध्ये चार तोंडाचा कोणीही ब्रह्मदेव नावाचा मनुष्य होऊन गेलेला नाही. माझ्या उत्तराने त्या विद्वान मुस्लीम साधकाचे समाधान झाले.

प्रकाशाच्या प्रांतामध्ये असंख्य देव- देवतांचे अस्तित्व असते. हिंदू माणूस जशी कल्पना करेल त्या रूपामध्ये त्याला दर्शन होते, अमेरिकन माणूस जशी कल्पना करेल त्या रूपामध्ये अमेरिकन माणसाला दर्शन होते. कल्पना न करणाऱ्या साधकाला देवता त्यांच्या मूळ स्वरूपात दर्शन देतात.

कल्पनेचे अस्तित्व संपल्यानंतर साधकाचा परब्रह्माच्या प्रांतात प्रवेश होतो व येथे साधक जीवनमुक्त होतो.

प्रकाशाच्या प्रांतात जशा देव-देवता आहेत, तशाच अंधाराच्या प्रांतात भूत-प्रेत, असुर, राक्षस, वेताळ, सैतान, भैरव इत्यादींचे अस्तित्व आहे. थोड्याफार उपासनेने या अंध:कारमय लोकातील आत्मे प्रकट होतात व साधकाला विविध प्रकारच्या चमत्कार करणाऱ्या शक्ती देतात. म्हणून यांचेही अस्तित्व मान्य करावे लागते. या प्रांतामध्ये ज्यांच्या देहावर शिर नाही अशा आत्म्यांपासून ते अनेक शिरे व अनेक हात असलेले विविध प्रकारचे आत्मे राहतात किंवा माणसाचे धड व प्राण्याचे शिर किंवा प्राण्याचे धड व माणसाचे शिर असेही आत्मे राहतात.

यांची गुलामी केली असता धन व राजसत्ता प्राप्त होते. परंतु अधोगती होते. अर्थात या सर्व अनुभवाच्या गोष्टी आहेत.

भारतातील ग्रंथकारांनी प्रकाशमय विश्व व अंध:कारमय विश्व यांची भेसळ केल्याकारणाने भारतामध्ये उपासनेच्या पद्धतींमध्ये खूप मोठा गोंधळ आहे व हा गोंधळ निस्तरणे कोणालाच शक्य नाही. एकंदरीत जोपर्यंत कल्पनेचे अस्तित्व आहे, तोपर्यंत सगुण मार्गाने भक्ती करणे योग्य ! व कल्पनेचे अस्तित्व संपले, मन निर्विकल्प होऊ लागले की निर्गुणमय प्रांत सुरू होतो.

प्रकाशमय विश्व व अंध:कारमय विश्व ही दोन्ही विश्वे मिळून सगुण आराधना केली जाते. ही सगुण आराधना करताना साधक कुठल्या स्टेजमध्ये आहे हे समजण्यास सगुणाच्या विविध रूपांना दिलेली नावे उपयोगी पडतात. साधक कुठल्या स्टेजमध्ये आहे हे समजून येते; व त्यानुसार त्याला मार्गदर्शन करणे सोपे जाते. अशा प्रकारे सगुण हे साधकांसाठी आराध्य आहे, तर सिद्धांसाठी स्टेज ओळखण्याचे साधन आहे.

पुरुष भक्तांसाठी गणपतीपासून दत्तापर्यंत स्टेजेस प्रकाशमय मार्गात आहेत. हा प्रकाशमय मार्ग जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत सर्व पुरुष वेताळ, भैरव, महाकाल यांच्या अंध:कारमय साम्राज्यात कुठेतरी पिशाच्च म्हणून रहात असतात. पुरुषांनी जर काळ्यामार्गाने

उपासना केली तर भूतापासून भैरवापर्यंत अवस्था त्यांना प्राप्त होते.

स्त्रियांसाठी प्रकाशमय मार्गामध्ये सरस्वतीपासून लक्ष्मी, षोडषीत्रिपुरसुन्दरी, दुर्गा, जगदंबा अशा अवस्था (स्टेजेस) आहेत. हा प्रकाशमयमार्ग जोपर्यंत स्त्रियांना मिळत नाही तोपर्यंत सर्व स्त्रिया अंध:काराच्या साम्राज्यात म्हणजे पिशाच्च सृष्टीत वावरत असतात. या मार्गानेच त्या पुढे जात राहिल्यास शाकिनी, डाकिनी, हाकिनी, काकिनी, स्मशानकाली, भद्रकाली, भैरवी अशा अवस्था त्यांना प्राप्त होतात.

सगुणाचा प्रांत किती व्यापक आहे, याची आपण थोडक्यात ओळख करून घेतली. हिंदुधर्मामध्ये त्रिमूर्ती (ब्रह्मा, विष्णू, महेश) या शब्दाला जितके महत्त्व आहे, तितकेच महत्त्व ख्रिश्चन धर्मामध्ये त्रिनिटी या शब्दाला आहे व त्रिनिटी या शब्दाचा अर्थही त्रिमूर्ती असाच होतो. फक्त ते ब्रह्मा, विष्णू, महेश असे न म्हणता होली घोस्ट (पवित्र आत्मा), सन ऑफ गॉड (ईश्वराचा पुत्र) व गॉड (परमेश्वर) अशा त्रिमुर्तीला मानतात. या शिवाय अपोलो (सूर्य देवता), लूना (चंद्र देवता), ज्युपिटर (गुरु देवता) अशा विविध देवतांना ते लोकही मानतात. अशा प्रकारे सगुणाचा प्रांत म्हणजे दृश्य विश्व व अदृश्य विश्व व निर्गुणाचा प्रांत म्हणजे या दोन्ही

विश्वापलीकडील **अनुभव !**

**निर्गुण परब्रह्म**

परब्रह्म हे निर्गुण निराकार आहे, परंतु प्रारब्ध पूर्णपणे शुद्ध झाल्याशिवाय, सूक्ष्मशरीर पूर्णपणे शुद्ध झाल्याशिवाय, परब्रह्माचा अनुभव येत नाही.

सूक्ष्मशरीर पूर्णपणे शुद्ध झाल्यानंतर देव-देवतांचे साक्षात्कार होतात. ध्यानामध्ये परमानंददायक दृश्ये दिसतात. अधून-मधून चिदाकाशाचे दर्शनही होते. परंतु परब्रह्माचे दर्शन व परब्रह्माचा अनुभव येण्यास खूप कष्ट करावे लागतात.

येथे परब्रह्म प्राप्तीच्या काही साधना देत आहे. या साधनांद्वारा परब्रह्माच्या प्रांतात प्रवेश होऊ शकतो. परंतु साधकाचे प्रारब्ध जर शुद्ध नसेल, पिशाच्च लोकाशी साधकाचा जर संपर्क असेल, किंवा पूर्वज पिशाच्च लोकात असतील तर कितीही साधना केली तरी परब्रह्माच्या प्रांतात प्रवेश होणार नाही. म्हणून ईश्वराची आराधना व सेवा करून प्रथम सर्व श्रृँखलातून मुक्त व्हावे व मगच परब्रह्म प्राप्तीच्या मार्गाला लागावे.

**साधना क्र. १**

मनात येणाऱ्या प्रत्येक विचाराकडे प्रथम काही दिवस लक्ष

द्यावे. काही दिवस असे केल्यानंतर मनात येणाऱ्या विचारांकडे पाहणे जमू लागले तद्नंतर एकच विचार मनात घोळविण्याचा अभ्यास करावा. कुठल्यातरी एकाच विचारावर मन केंद्रित करावे. एकाच विचारावर मन केंद्रित करणे जमू लागल्यानंतर एखाद्या मंत्रावर मन केंद्रित करावे. त्या मंत्राशिवाय अन्य कुठलाही विचार मनात येणार नाही याची दक्षता घ्यावी. त्याच्यानंतर एखाद्या बीजाक्षरावर मन केंद्रित करावे. तद्नंतर फक्त ॐ वर मन केंद्रित करावे. ॐ वर मन केंद्रित असताना ॐ शिवाय काही मनात येणार नाही याची दक्षता घ्यावी. अनेक वर्षे असा अभ्यास केल्यानंतर मन पूर्णपणे निर्विचार होते.

एकदा का मन निर्विचार होऊ लागले की मनात कुठलीही वृत्ती उठणार नाही याची दक्षता घ्यावी.

मनाला निर्विचार स्थितीत राहण्याची सवय लागली की पुढील अनुभव येतात.

जीवनातील सर्व व्यवहार आपण निर्विचार मनाने करू शकतो. आपल्या जीवनाची सूत्रे ईश्वराच्या हातात जातात व तो ईश्वरच आपल्या मुखाने बोलतो, हाताने लिहितो, भाषण करतो. सर्व व्यवहार यंत्रवत होत राहतात. मन पूर्ण रिकामे झाल्याचा अनुभव येतो. ध्यानामध्ये कधी चित्ताकाशाचे दर्शन होते तर कधी

चिदाकाशाचे दर्शन होते. पुष्कळवेळा निरनिराळ्या देव-देवता, ऋषी यांची दर्शने होतात. मेंदू एखाद्या कॉम्प्युटर प्रमाणे होतो. एका सेकंदामध्ये दोन-तीनशे पानांमध्ये मावेल असे ज्ञान होते. साधक ज्ञानाचा सागर होतो; हे ज्ञान अंतरंगामध्ये जिरून जाते.

येथे साधकाची फसगत होण्याची शक्यता असते. ज्ञान होऊ लागले की साधक भाषणबाजी करू लागतो. व्याख्याने देऊ लागतो किंवा पुस्तके लिहू लागतो. यापैकी कुठलीही गोष्ट केल्यास साधक विचार समुद्राच्या श्रृँखलांमध्ये पुन्हा अडकतो. यासाठी ज्ञान होऊ लागल्यानंतर त्या ज्ञानाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करावे. ज्ञानाकडे दुर्लक्ष करून आपली निर्विचार स्थिती कायम ठेवावी. अशाप्रकारे निर्विचार स्थिती कायम ठेवल्यानंतर जो अनुभव येतो त्या अनुभवाला **अमृतानुभव** असेच म्हणावे लागेल !

अमृताचा अनुभव आल्यानंतर ईश्वर किंवा महागुरु लेखन करण्याची किंवा भाषण करण्याची आज्ञा देतात. त्यांनी अनेक वेळा आज्ञा केल्यानंतरच लेखन किंवा भाषण करावे. अशाप्रकारे लेखन अथवा भाषण केले असता निर्विचार स्थिती कायम राहून यंत्रवत लेखन (automatic writting), यंत्रवत भाषण (automatic speech) होते. लिहिताना अथवा भाषण करताना

साधक एका अक्षराचाही विचार करत नाही.

मन निर्विचार करणे जमू लागल्यानंतर ते आपोआप निर्विकल्प होऊ लागते व निर्विकल्प समाधी साध्य होते. चिदाकाशात प्रवेश होतो. निर्गुण निराकार परब्रह्म दृश्यमान होते.

आपल्या डोळ्यांना जे आकाश दिसते त्या आकाशापेक्षा अनेक पटीने सुंदर, अप्रतिम अशा चिदाकाशाचे दर्शन होते. सुरुवातीला हे दर्शन अधून-मधून होते. नंतर एका सेकंदामध्ये चिदाकाशात प्रवेश होणे शक्य होऊ लागते. हळूहळू साधक चिदाकाशात विहार करू लागतो. या चिदाकाशातच त्याला परब्रह्माचे दर्शन होते.

परब्रह्माचे दर्शन झाल्यानंतर साधक जीवनमुक्त होतो. माया त्याला सतावू शकत नाही. हळूहळू परब्रह्म दर्शनाचा नित्य अभ्यास करता करता साधक परब्रह्माशी तादात्म्य पावतो. परब्रह्माशी तादात्म्यता पावल्यानंतर सर्व विश्वामध्ये परब्रह्मच भरून राहिले आहे, असा त्याला अनुभव येतो.

**साधना क्र. २**

शुद्धात्मा व अनेक सद्गुणांनी मंडित असा साधक आपले सर्व लक्ष श्वासावर केंद्रित करतो व अतिशय खोल खोल असा

श्वास घेतो. श्वास आज्ञाचक्रातून सहस्त्रारचक्राकडे नेण्याचा तो प्रयत्न करतो. काहीकाळ असा प्रयत्न केल्यानंतर त्याला हे जमू लागते.

श्वास आज्ञाचक्रातून सहस्त्रारचक्राकडे नेणे जमू लागले की श्वास आतल्या आत चालत राहतो. म्हणजे श्वास चालू आहे हे सर्वांना कळते परंतु श्वास नाकातून बाहेर पडत नाही. हा श्वास सशब्द अथवा नि:शब्द दोन्ही प्रकारे घेता येतो. या साधनेला **सो ऽ हम्** साधना असे म्हणतात.

दररोज सुमारे सकाळी तीन तास व संध्याकाळी तीन तास अशाप्रकारे काही वर्षे साधना केल्यानंतर डोळ्यासमोर लाल रंगाचा एक गोल दिसू लागतो. हा गोल मिटलेल्या डोळ्यांना दिसतो. तसेच उघड्या डोळ्यांनाही दिसतो. हा रक्तवर्ण दिसू लागल्यानंतर आपले सर्व लक्ष त्यावर केंद्रित करायचे असते. कालांतराने रक्तवर्ण दिसणे बंद होते व धुरकट राखाडी रंग दिसू लागतो. बराच काळ हा राखाडी वर्ण दिसू लागतो बरीच वर्षे अशी साधना केल्यानंतर नीलबिंदू दिसू लागतो.

नीलबिंदू दिसू लागल्यानंतर साधकाला जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करावे लागत नाही. तो नीलबिंदू त्याचे लक्ष खेचून घेत

असतो. बराच काळ नीलबिंदू ध्यान केल्यानंतर त्या नीलबिंदूतून उच्चकोटीच्या देवता, प्राचीनकालीन ऋषी, सिद्ध महात्मे बाहेर येऊन दर्शन देतात. कालांतराने साधकाचा महाशून्यात म्हणजे चिदाकाशात प्रवेश होतो व यापूर्वी म्हणजे साधना क्र. १ मध्ये चिदाकाशाच्या संदर्भाने जे अनुभव सांगितले आहेत ते सर्व अनुभव येऊ लागतात.

चिदाकाशामध्ये शून्य, महाशून्य असे मुख्य दोन भेद असून याच्यामध्ये अनेक स्तर आहेत. विविध स्तरांवर विविध प्रकारचे ज्ञान होते. विविध प्रकारचे अनुभव येतात. चिदाकाश, शून्य, महाशून्य यांना मिळून परब्रह्म हा एकच शब्द वापरला जातो. असे असले तरी योगी ज्या स्तरावरती असेल तेथपर्यंतच्या स्तराचे ज्ञान त्याला होते. त्याच्या पलीकडचे ज्ञान त्याला होत नाही. यासाठी परब्रह्माच्या प्रांतामध्येही सतत पुढे जात राहावे लागते. मात्र यासाठी स्थूलदेहाने साधना करावी लागत नाही. योगी सूक्ष्मदेहाने, कारणदेहाने व महाकारणदेहाने विविध स्तरांवरच्या साधना करतात.

प्रारब्ध जर शुद्ध असेल तर या सोऽहम् साधनेमध्ये साधकाची प्रगती होऊन त्याला ध्यानामध्ये विविध प्रकारची दृश्ये वर्षा-दीड वर्षांतच दिसू लागतात. पण प्रारब्ध शुद्ध नसेल तर अनेक

वर्षे साधना करूनही काही उपयोग होत नाही.

निर्गुण परब्रह्माच्या साधना करताना आणखी एक दक्षता घ्यावी लागते ती म्हणजे ज्या जागी साधक साधना करतो ती जागाही शुद्ध असावी लागते. जमिनीतून वाहणारे प्रवाह व पिशाच्चसृष्टी यांचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

**साधना क्र. ३**

ध्यान साधना करताना दृश्ये दिसतात. देव-देवतांची दर्शने होतात, असे मी अनेक ठिकाणी लिहिले आहे. परंतु असेही घडते की काही साधकांना कुठलीही दृश्ये दिसत नाहीत. ज्या साधकांना दृश्ये दिसत नाहीत त्यांनी निराश होण्याचे कारण नाही. मन निर्विचार होणे, निर्विकल्प होणे व चिदाकाशात विलीन होणे हेच प्रत्येक साधकाचे अंतिम ध्येय असते.

पूर्वेकडे तोंड करून डोळे मिटून बसावे व आपले सर्व लक्ष सहस्त्रारचक्राकडे केंद्रित करावे. काही काळ असे केल्यानंतर मस्तकामध्ये सुईच्या टोकाएवढे (पीन पॉइन्ट) एक छिद्र दिसते. या छिद्रातून वर गेल्यानंतर अप्रतिम सुंदर अशा चिदाकाशात प्रवेश प्राप्त होतो. हे चिदाकाश आपल्याला दिसणाऱ्या आकाशापेक्षा अप्रतिम सुंदर असते. चिदाकाशाच्या दर्शनाने अतिशय आनंद होतो. या आनंदाला परमानंद म्हणतात. यालाच ईश्वराचे दर्शन

म्हणतात. हळूहळू चिदाकाशात साधक विहार करू लागतो. त्याला परमानंद पद प्राप्त होते. या चिदाकाशात विलीन होणे म्हणजेच परमात्म्याशी एकरुपता ! येथे साधक परमात्मस्वरूप होतो, सिद्ध होतो.

या चिदाकाशालाच राम, कृष्ण, शिव, अल्ला, देवी, दुर्गा अशी विविध नावे आहेत. या सगुण नावांचा आधार घेऊन साधक शेवटी निर्गुणात पोहोचतो. ज्या माणसांची मने एकाग्र होत नाहीत अशा माणसांनी सगुणाचा आधार घेऊन मन एकाग्र करावे व मन एकाग्र झाल्यानंतर निर्गुण परब्रह्माच्या साधना कराव्या.

निर्गुण परब्रह्माच्या अनेक साधना आहेत. त्यातील तीन साधना आपण सविस्तररीत्या पाहिल्या. आणखी काही साधना थोडक्यात पाहू !

दररोज दोन-तीन तास आकाशाकडे बघत बसावे. हळूहळू लययोग साध्य होतो व चिदाकाशात प्रवेश प्राप्त होतो.

उगवत्या सूर्याकडे पाहावे, दोन तीन मिनिटे एकटक पाहिल्यानंतर डोळे मिटून घ्यावेत व एक तास ध्यान करावे. सर्व लक्ष भ्रूमध्यामध्ये केंद्रित करावे. अनेक वर्षे अशाप्रकारे अभ्यास केल्यानंतर भ्रूमध्यामध्ये ज्योति दिसू लागते व या ज्योतिद्वारा

चिदाकाशात प्रवेश करण्याचा मार्ग सापडतो.

एखादा पारदर्शक स्फटिकाचा गोल घ्यावा. या पारदर्शक गोलावर त्राटक करावे, हळूहळू मन निर्विचार होऊ लागेल. अनेक वर्षे साधना केल्यानंतर चिदाकाशात प्रवेश करण्याचा मार्ग सापडेल. या साधनेमध्ये कालांतराने वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ यातील दृश्ये साधकांना दिसतात. हरवलेल्या वस्तूचा शोधही या साधनेने घेता येतो. स्फटिकाचा गोल न मिळाल्यास काचेचा अथवा ॲक्रॅलीकचा गोल घेतला तरी चालतो.

तुपाचा दिवा लावावा व या दिव्याच्या ज्योतिवर त्राटक करावे. दररोज एक तास याप्रमाणे दोन-तीन वर्षे त्राटक केले असता खूप दिव्य अनुभव येतात. कालांतराने ही ज्योति मिटलेल्या डोळ्यांना दिसू लागते. ज्योति मिटलेल्या डोळ्यांना दिसू लागली की तुपाचा दिवा लावण्याची आवश्यकता नाही. मिटलेल्या डोळ्यासमोर जी ज्योति दिसते त्या ज्योतिचे सतत ध्यान करावे. कालांतराने ही ज्योति सतत दिसू लागते. ज्योतितून देव-देवता बाहेर येऊन दर्शन देतात किंवा एखादा सिद्धपुरुष ज्योतितून प्रगट होतो व पुढील मार्ग सांगतो.

काही साधक ॐ वर त्राटक करतात व ॐ चे ध्यान करतात व अखंड ॐ चा जप, चिंतन करत राहतात. ॐ च्या

ध्यानाने निर्गुण परब्रह्माकडे जाणारा मार्ग साधकाला सापडतो. कुंडलिनी जागृत होते. चिदाकाशामध्ये ॐ चे दर्शन होते. परब्रह्मामध्ये साधकाचा प्रवेश होतो. साधक सिद्ध होतो.

निर्गुण परब्रह्माच्या साधनेने साधक जीवनमुक्त होतो; परमेश्वर स्वरूप होतो, सिद्ध होतो, अनेकांचे कल्याण करण्यास समर्थ होतो. अशा या निर्गुण परब्रह्माच्या अनेक साधना आपण येथे पाहिल्या. या साधना जरी सोप्या वाटल्या तरी या मुळीच सोप्या नाहीत. जोपर्यंत प्रारब्ध पूर्णपणे शुद्ध होत नाही तोपर्यंत या साधना करणे साधकाला जमत नाही. जन्मोजन्मींची पापकर्मे जोपर्यंत जळून जात नाहीत तोपर्यंत या साधना करणे साधकाला शक्य होत नाही. दुर्गुण व दुष्प्रवृत्ती ज्यांच्यामध्ये भरलेल्या आहेत अशा लोकांना या साधना करणे प्रयत्न करूनही शक्य होत नाही. यामुळे सामान्य लोकांनी प्रथम सगुण मार्गाने ईश्वरभक्ती करावी, दान-धर्म, सेवा, परोपकार इत्यादी सन्मार्गांचे आचरण करावे; कारण एक जरी दुष्प्रवृत्ती अंगी राहिली तरी निर्गुण परब्रह्माच्या मार्गात प्रगती होत नाही. अनेकांना खोटं बोलण्याची सवय असते. बाहेरून निरुपद्रवी दिसणारी ही प्रवृत्ती माणसाची आध्यात्मात प्रगती होऊ देत नाही म्हणून म्हणतात, **चित्तवृत्तीचा निरोध करणे म्हणजे योग!**

# २. आत्मज्ञान

**कल्पना करा !** एक प्रचंड विस्तीर्ण पटांगण असून या पटांगणामध्ये भरपूर बर्फ पडलेला आहे. अनेक रंगांच्या प्लास्टिकच्या तसेच धातूंच्या भांड्यांमध्ये हा बर्फ भरलेला आहे. काही भांडी, जी प्लास्टिकची व काचेची पारदर्शक आहेत ती भांडी बर्फाच्या त्या ढिगाऱ्यात आहेत पण जणूकाही ती त्या बर्फाशी एकरूप होऊन गेलेली आहेत. कारण सर्वत्र बर्फच बर्फ आहे. काही प्लास्टिकच्या पारदर्शक पिशव्यांमध्ये बर्फ भरलेला आहे. बर्फामध्ये त्या पिशव्या अशा काही खोलवर रुतलेल्या आहेत की त्यांना वेगळे करणेही शक्य नाही. वेगळेपणाने ओळखणेही शक्य नाही. अतिशय पातळ प्लास्टिकची पिशवीच अंतर्बाह्य भरलेल्या बर्फामध्ये किंचितसे वेगळेपण दाखवत आहे.

येथे बर्फ म्हणजे परमात्मा, पारदर्शक पिशव्या, भांडी म्हणजे परमात्मस्वरुप योगी, मौल्यवान भांडी म्हणजे पवित्र आत्मे,

लोखंडाची भांडी म्हणजे दुष्ट माणसे व माती, दगडाची भांडी म्हणजे जड, मूढ, अज्ञानी व सामान्य माणसे.

सर्वव्यापी परमात्मा सर्वांना कसा व्यापून असतो, हे बर्फामध्ये भांडी या रूपकाने समजावून दिले आहे. मनुष्यजन्म हा परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी झालेला असतो. म्हणून दया, करुणा, प्रेम व परोपकार या गोष्टींचे आचरण केले असता आपल्या आत्म्यावर जी जड आवरणे पडलेली आहेत ती आवरणे पातळ होऊ लागतात म्हणून मानवी जीवनामध्ये सद्‌गुणांना महत्त्व दिले जाते. दया, करुणा, प्रेम, अहिंसा इत्यादी सद्‌गुणांनी मानवाच्या मन बुद्धीवर पडलेली आवरणे वितळू लागतात व परमात्म्याची प्रकाश किरणे मन व बुद्धीवर पडू लागतात. जसजशी ही आवरणे पातळ होऊ लागतात तसतसा परमात्मा अंत:करणामध्ये प्रगट होऊ लागतो व परमात्मा पूर्णपणे अंत:करणात प्रगट झाला की, लक्षात येते '**मीच परमात्मा आहे**' व या विश्वात परमात्म्याव्यतिरिक्त काही नाही. याला **आत्मज्ञान** असे म्हणतात.

मनुष्यजन्म ही अतिशय दुर्लभ गोष्ट आहे. या मनुष्य जन्मातच आत्मा–परमात्मा होऊ शकतो. परमात्मा होणे जमले नाही तरी परमात्म्याच्या दिशेने चार पावले जरी चालले म्हणजे एक – दोन सद्‌गुण अंगी बाणले तरी पुनश्च मनुष्यजन्म प्राप्त होतो व

पुढील प्रवास सुरू होतो व पाच-दहा जन्मात मनुष्य परमात्म्याच्या चरणापाशी जाऊन पोहोचतो.

दुष्टपणा, हिंसा, आतंकवादासारखी भयंकर कृत्ये कधीही करू नयेत. याने मन, बुद्धी व आत्मा यावरील आवरणे इतकी घट्ट होतात की लाखो वर्षे पुन्हा मनुष्यजन्म मिळत नाही. लाखो वर्षे यातना भोगाव्या लागतात.

गर्व, ताठा, अहंकार, हट्टीपणा, इतरांवर हुकमत गाजविण्याची प्रवृत्ती, धनलोभ, सत्तालोभ, स्वार्थ, कंजूषपणा या प्रवृत्ती माणसाच्या मन, बुद्धीवरील आवरणे अधिक घट्ट करतात. हे दुर्गुण मृत्युनंतर आत्म्याला पिशाच्च लोकात घेऊन जातात व हजारो वर्षे यातना भोगाव्या लागतात. म्हणून या दुर्गुणांवर विजय मिळविण्याचा माणसांनी प्रयत्न करायला हवा. असे प्रयत्न माणसांकडून झाले नाहीत तर विविध प्रकारच्या शिक्षांना तोंड द्यावे लागते.

बुद्धीचा दुरुपयोग करणे, लोकांना फसविणे, चोरी करणे, भूत-प्रेतांच्या साधना करणे या गोष्टी मानवाची अधोगती करतात. या सर्व गोष्टींपासून आपण जास्तीत जास्त दूर राहण्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे.

ईश्वराचे नियम किती कठोर आहेत व मोठमोठ्या साधूसंतांचीही

यातून कशी सुटका होत नाही याचे एक उदाहरण पुढे देत आहे.

सुमारे दिडशे वर्षांपूर्वी खूप सामर्थ्यवान असे एक साधू होते. अतिशय नि:स्वार्थ व फकीरी वृत्तीने ते रहात असत. आपल्यातील सामर्थ्याने त्यांनी हजारो लोकांचे कल्याण केले. त्यांचा एक भक्त होता. या भक्तावर त्यांचे विशेष प्रेम होते. कारण हा भक्त अतिशय नि:स्वार्थी होता. या भक्ताला एक मुलगा होता. या मुलाच्या नशिबात लग्न नव्हते. आपल्या मुलाचे लग्न व्हावे, असे त्या भक्ताला वाटत असे. शेवटी त्याने आपल्या गुरुला प्रार्थना केली व गुरुने स्वसामर्थ्याचा उपयोग करून न होणारे लग्न घडवून आणले.

बाह्यात्कारी, येथे त्या महात्म्याचे काहीच चुकले नाही असे आपल्याला वाटेल. परंतु त्या मुलाची कर्मगती या महात्म्याने 'तपासली' नव्हती व इच्छाशक्तीचा दुरुपयोग करून लग्न घडवून आणले होते. वृद्धापकाळात या साधूचे खूप हाल झाले व यातनामय मृत्यू याच्या नशिबी आला. मृत्युनंतर सुमारे शंभर सव्वाशे वर्षे पिशाच्च लोकामध्ये त्यांना यातना भोगाव्या लागल्या. तद्नंतर त्यांना जन्म मिळाला व सुमारे सत्तर वर्षे त्यांना अपमान, दारिद्र्य व छळवाद यांना तोंड द्यावे लागले. परंतु ते ज्ञानी असल्याकारणाने त्यांनी सर्व त्रास निमुटपणे सहन केला. या जन्मीही त्यांनी लक्षावधी

पिशाच्च्यांनी दिलेला त्रासही सहन केला. अशा सर्व प्रकारच्या यातना सहन करत त्यांनी साधना केली व १९६६ साली त्यांनी देह ठेवला. या जन्मीही त्यांना मृत्युसमयी बरेच हाल वनवास भोगावे लागले. ही सर्व हकिकत त्यांनी स्वत:च मला मृत्युपूर्वी सांगितली.

विचार करा ! नि:स्वार्थ बुद्धीच्या साधूला जर एवढी कडक शिक्षा होऊ शकते तर दररोज लांड्यालबाड्या करत जगणाऱ्या व सत्पुरुषांनाही फसविणाऱ्या लोकांचे काय होत असेल !

पिशाच्च लोकामध्ये कोट्यावधी आत्मे आपल्याला मनुष्यजन्म प्राप्त व्हावा म्हणून आक्रोश करत असतात. मनुष्य जन्माची महती त्यांना कळलेली असते परंतु वेळ टळून गेलेली असते. त्यांनी मनुष्यजन्माचा दुरुपयोग केलेला असतो. त्यांच्या आक्रोशाकडे लक्ष देणारे कोणीही नसते व पुढे हजारो वर्षे मनुष्यजन्म मिळण्याची शक्यता नसते. शिक्षणाचा एक भाग म्हणून साधक योग्यांना विविध लोकांतून फिरावे लागते. अशा वेळी अनेक मनोरंजक गोष्टींचे ज्ञान होते. माझ्या पुस्तकात लिहिलेल्या सर्व गोष्टी साधनेच्या अनुभवावर आधारित आहेत.

# ३. चित्तवृत्तीचा निरोध म्हणजे योग

**योग म्हणजे** स्वत:च्या मनामध्ये उठणाऱ्या प्रत्येक विचाराचा निरोध करणे. स्वत:च्या मनामध्ये उठणाऱ्या प्रत्येक विचारावर नियंत्रण करणे. असे केले असता आध्यात्मात प्रगती होते, मनुष्य पवित्र होतो, देवासमान होतो. आत्म्याचा प्रकाश पहायला मिळतो. आत्मज्योति प्रकट होते. श्री संत सोहिरोबानाथ आपल्या अभंगात म्हणतात–

**सोहिरा म्हणे ज्ञानज्योति । तिथेचि राही दिवस राती ।।**
**तयाविण नेत्र पाती । हालवू नको रे ।।**

मनामध्ये सात्त्विक, राजस, तामस अशा विविध प्रकारचे विचार थैमान घालत असतात. सामान्य मनुष्य एकतर अशा विचारांनी हैराण होतो किंवा त्या विचारांच्यामागे धावत राहतो. खरा योगसाधक या विचारांना दाद देत नाही. तो मनावर असा

सक्त पहारा ठेवतो की मनामध्ये विचार उठूच देत नाही. एखादा विचार अथवा कल्पना मनात उठू लागली की तो तिला तात्काळ नष्ट करतो.

या गोष्टी साध्य करण्यासाठी एकांतात राहणे अतिशय आवश्यक असते. हळूहळू मन बर्फासारखे शांत व स्थिर होते. मनाचा लय होऊ लागतो. दोन-तीन दिवस मनोलय झाल्यानंतर अंत:करणामध्ये ज्योति दिसू लागते. चिदाकाशाचे दर्शन होते व नंतर चैतन्याचा अनुभव येतो. अनेक प्रकारच्या देवतांचे दर्शन होते व त्या विविध प्रकारचे ज्ञान देतात. साधनेत असे अनुभव येऊ लागल्यानंतर साधना अर्ध्यावर सोडून चालत नाही. चित्त, चिदाकाश व चैतन्य या तिन्ही गोष्टींचे तादात्म्य व्हावे लागते व हे होण्यासाठी अनेक वर्षे साधना करावी लागते. या साधनेने आत्मसाक्षात्कार होतो, ब्रह्मज्ञान प्राप्त होते, मनुष्य जीवनमुक्त होतो, देवस्वरूप अथवा ईश्वरस्वरूप होतो. जन्म-मरणरूपी चक्रातून त्याची सुटका होते. सिद्धांच्या पंगतीमध्ये तो जाऊन बसतो.

योगाचे रहस्य मी जरी तुम्हाला काही शब्दात सांगितले असले तरी दररोज चार-चार तास साधना करणाऱ्या साधकांना अनेक वर्षे साधना करूनसुद्धा ही गोष्ट साध्य होत नाही.

मी एक असा साधक बघितला की, जो सलग बारा वर्षे साधना करत होता परंतु काहीही प्रगती झालेली नव्हती. याचे कारण जन्मोजन्मींचे प्रारब्ध त्याची पाठ सोडत नव्हते व प्रारब्ध शुद्धीसाठी त्याने काहीही प्रयत्न केलेला नव्हता. सत्प्रवृत्तीची जोपासना कशी करावी हे त्याला माहीत नव्हते. याशिवाय तो सतत खोटे बोलत असे. त्याच्यातील दुष्टप्रवृत्ती त्याच्या प्रगतीच्या आड येत होत्या व त्याला हे काही सांगण्यात अर्थ नव्हता कारण तो स्वत:ला खूप शहाणा समजत होता.

मला असे वाटते की, परमेश्वराची कृपा झाल्यानंतरच किंवा अनेक सद्गुण अंगी बाणल्यानंतरच योगाचे खरे रहस्य ज्ञात होऊ लागते व सर्व गोष्टी कशा करायच्या त्या आपोआप कळू लागतात. तरीसुद्धा मानवाने चित्तवृत्तीचा निरोध करण्याचा अभ्यास दररोज थोडावेळ तरी करावा. हा अभ्यास सात मिनिटे करणे जमल्यास अतिशय गाढ झोप येते व दररोज पंचेचाळीस मिनिटे याचा अभ्यास केल्यास सहा महिन्यांत कुंडलिनी शक्ती जागृत होऊन मूलाधारचक्राला धक्के मारू लागते. अशा प्रकारे हळूहळू अभ्यास वाढवत जावे म्हणजे दिव्य अशा ब्रह्मानंदाचा अनुभव येतो.

# ४. विहंगम मार्ग

**ईश्वर दिसत** नाही तसेच आपला श्वासही आपल्याला दिसत नाही. आपल्या शरीरातील परमेश्वराचे अस्तित्व म्हणजे आपला श्वास ! या श्वासावर लक्ष ठेवणे; श्वास कोठे जातो व काय करतो हे पाहणे, श्वास आत येताना व बाहेर जाताना जो ध्वनी होतो तो ध्वनी ऐकणे, या ध्वनीशी तादात्म्य पावण्याचा प्रयत्न करणे या सर्व गोष्टींना **विहंगम मार्ग** किंवा ईश्वरप्राप्तीच्या साधना असे म्हणतात.

हे वाचल्यानंतर ईश्वरप्राप्ती अतिशय सोपी गोष्ट आहे, असे कोणालाही वाटेल; परंतु ही श्वासाची साधना करताना आपली जन्मोजन्मींची कर्मे आडवी येतात व साधना होत नाही, साधनेत यश येत नाही, वातावरणातील अदृश्यशक्ती, आपल्या घराण्यातील अदृश्यशक्ती, आपल्या पाठीमागे असणाऱ्या अदृश्यशक्ती साधनेमध्ये विघ्ने निर्माण करतात. साधनमार्गात

आपण पुढे जाऊ नये असे अदृश्यसृष्टीतील अनेक शक्तींना वाटत असते. तसेच साधकाचे मन जर स्वच्छ नसेल, मनात स्वार्थ, संकुचितपणा, अहंकार, आत एक बाहेर एक अशी वृत्ती, ईर्षा, द्वेष, मत्सर इत्यादी दुर्गुण, आपले तेच खरे करण्याची वृत्ती, इतरांवर अधिकार गाजविण्याची प्रवृत्ती यामुळे विहंगम मार्गात प्रगती होत नाही.

साधकाच्या घराण्यात पिशाच्चशक्तींचे उपद्रव असतील, पूर्वजांनी पिशाच्चशक्तींची उपासना केलेली असेल, पिशाच्चशक्तींच्या साधना करणाऱ्या साधकांच्या सहवासात पूर्वज राहिलेले असतील किंवा साधक राहिला असेल तरीही विहंगम मार्गात प्रगती होण्यास अडथळे निर्माण होतात. इतकेच नव्हे तर आपण ज्या परिसरात साधना करतो तेथे जवळपास स्मशान असेल, जमिनीमध्ये दुष्ट शक्ती असतील तरीसुद्धा विहंगम मार्गाची साधना करताना अडथळे निर्माण होतात. या सर्व गोष्टींचा विचार करून मगच साधनेस सुरुवात करावी लागते.

या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी एखाद्या सिद्ध गुरुची कृपा मिळविणे अतिशय आवश्यक असते. गुरुच्या सेवेने बरेचसे अडथळे दूर होतात. म्हणून प्रथम गुरुची सेवा करून आपले प्रारब्ध शुद्ध करावे. खऱ्या सद्‌गुरुची कृपा प्राप्त करणे ही अतिशय

दुर्लभ गोष्ट असते. त्यासाठी स्वत:तील सर्व चित्तवृत्तींचा त्याग करून समर्पण बुद्धीची कास धरावी लागते.

सध्या भारतामध्ये खऱ्या सत्पुरुषांचे दर्शन होणे दुर्लभ झालेले आहे. पुस्तकी पांडित्याच्या आधाराने पैसा व प्रसिद्धीच्या मागे लागलेल्या लोकांचाच भरणा जास्त दिसून येतो. शंभरापैकी नव्वद लोक आध्यात्माचा काडीचाही अनुभव नसताना केवळ पुस्तकी पांडित्याच्या आधाराने आपली दुकानदारी चालवत असतात. साधना व तपस्येचा यांना गंधही नसतो व यांनी जे ग्रंथ वाचलेले असतात त्याचे गूढार्थ यांना माहीत नसतात. यांच्यामुळे समाज श्रद्धावान व ज्ञानी बनण्याऐवजी अंधश्रद्धाळू व भोळसट बनतो. खरे समाज प्रबोधन यांच्याद्वारे होत नाही. उरलेल्या दहा टक्क्यांमध्ये एखादा खरा सत्पुरुष असतो व राहिलेले नऊ भोंदू तरी असतात किंवा पिशाच्च साधक असतात.

खऱ्या सत्पुरुषाची भेट होईपर्यंत साधकाने सात्त्विक देवी-देवतांच्या स्तोत्रांचे हजारो पाठ करावेत व परमेश्वराचे अखंड नामस्मरण करावे व त्याच बरोबर विहंगम मार्गाची साधना करत राहावी. दररोज एक-दोन तास विहंगम मार्गाची साधना केली असता शुद्ध मनाच्या साधकाची खूप चांगली प्रगती होते, तर अशुद्ध मनाच्या साधकाला भूत पिशाच्चेही दिसू लागतात. यात

साधनेचा दोष नसून हा सर्व साधकाच्या अशुद्ध मनाचा, कुविचारांचा व संकुचित बुद्धीचा प्रभाव असतो.

जे साधक मनाने शुद्ध असतात व भक्तिमान असतात त्यांची या मार्गात प्रगती होते. ही प्रगती चालू असताना ऋद्धी-सिद्धी प्राप्त होतात. विविध प्रकारचे सामर्थ्य अंगी प्रकट होऊ लागते. लोकांमध्ये मान सन्मान प्राप्त होतो. विविध प्रकारचे चमत्कार आपोआप होऊ लागतात. भूत, भविष्य, वर्तमान जाणण्याची कला प्राप्त होते. अंगी सर्वज्ञता येते. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणता येतात. एका जागी राहून अनेक ठिकाणी प्रकट होऊन विविध प्रकारची कार्ये करता येतात. पशु, पक्षी, वनस्पती यांच्या मनांत काय चालले आहे हे कळू लागते. ज्या जागी साधक बसतो, राहतो तेथे अनेक लोकांचा उद्धार करणाऱ्या दैवी शक्ती राहू लागतात व हजारो लोकांचे कल्याण होऊ लागते. देवतांचाही उद्धार करण्याची योग्यता साधकाला प्राप्त होते. साधक एका जागी बसून विश्वभर कार्य करू शकतो. अतिशय जलद चालण्याची किंवा जमिनीला स्पर्श न करता चालण्याची शक्ती त्याला प्राप्त होते. दूरदर्शन, दूरश्रवण, परकायाप्रवेश, अणिमा, गरीमा, महिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशत्वम्, वशीत्वम् अशा असंख्य सिद्धी साधकामध्ये प्रकट होऊ लागतात. साधकाला आकाश ठेंगणे वाटू लागते कारण पृथ्वीतलावरील लाखो लोक

त्याला देव म्हणून मान देऊ लागतात. त्याच्या नुसत्या स्मरणानेच लोकांची कामे होऊ लागतात. लोकांच्या मनोकामना पूर्ण होऊ लागतात, लोकांच्या आधीव्याधी त्याच्या स्मरणाने दूर होऊ लागतात. सिद्धावस्थेची लक्षणे अंगी प्रकट होऊ लागतात. खरे पाहता हे सर्व अडथळे असतात. साधकाने इकडे दुर्लक्ष करायचे असते.

अशा वेळी साधकाने एकांतवासाचा आश्रय करणे आवश्यक असते. ज्या सिद्धसाधकांना एकांतवासाचा आश्रय करणे शक्य नसते, असे सिद्धसाधक वेड्याचे सोंग घेऊन राहतात. तर काही साधक जनसंपर्कापासून दूर निघून जातात व एकांतवासाचा आश्रय करतात. एकांतवासात राहून साधना करणाऱ्या सिद्धसाधकांना कुठले अनुभव येतात व परमात्म्याशी कसे तादात्म्य पावतात हा विषय अतिशय गूढ, गहन व अनुभवगम्य असल्याने त्याविषयी काही लिहिणे योग्य ठरणार नाही. त्याचा दुरुपयोग होईल.

उदात्त अंत:करणाच्या, मोठ्या मनाच्या, परोपकारी स्वभावाच्या साधकांनी कुठल्याही साधूच्या नादाला न लागता भगवान् दत्तात्रेयांवर श्रद्धा ठेवून श्वासावर लक्ष ठेवण्याची सोऽहम् साधना करावी. कूटस्थावर मन एकाग्र करावे व परमेश्वराचे अखंड नामस्मरण करावे म्हणजे हमखास प्रगती होईल.

# ५. अक्षर ब्रह्म

**सोळा स्वर** छत्तीस व्यंजने मिळून बावन्न अक्षरे तयार होतात. या बावन्न अक्षरांना बावन्न मातृका असे म्हटले जाते. या बावन्न मातृका संपूर्ण मंत्र शास्त्राचे मूळ आहे.

आपल्या मुखामध्ये असणारे वायू योग्य प्रकारे वळविल्यानंतरच या बावन्न मातृकांचा उच्चार करता येतो. आमच्या बालपणामध्ये **ऌ** या अक्षराचा उच्चार कसा करायचा हे आम्हाला शिकविले गेले नाही व आजकालच्या मुलांना **ङ** या अक्षराचा उच्चार करता येत नाही. तसेच **ञ** या अक्षराचाही उच्चार करता येत नाही.

शरीरातील वायुला योग्य प्रकारे वळवून स्वरयंत्राद्वारे बाहेर आणल्यानंतरच मातृकांचा योग्य प्रकारे उच्चार होतो. आमच्या अक्षरांचे आकारही विशिष्ट पद्धतीने ठरविण्यात आलेले आहेत.

उदाहरणार्थ **ऐं** हे सरस्वती बीज आहे. मोर हे सरस्वतीचे वाहन आहे व **ऐं** हा आकार मोरासारखा आहे. **लं** हे पृथ्वीतत्त्वाचे बीज आहे. मनुष्य मांडी घालून बसल्यानंतर त्या मांडीचा आकार या **लं** प्रमाणे होतो. ॐ हे ब्रह्मा, विष्णू, महेश व सर्व देवी-देवता यांचे मूळ आहे. आपल्या शरीराचे जाणीवपूर्वक निरीक्षण केल्यास बऱ्याच ठिकाणी ॐ चा आकार दिसून येईल व **ॐ** हे सर्व देवी-देवतांचे आदिबीज असे का म्हटले जाते हे लक्षात येईल. राम म्हणाल्याने राम प्रसन्न होईल विष्णू म्हणाल्याने विष्णू प्रसन्न होईल. शिव म्हणाल्याने शिव प्रसन्न होईल. ॐ म्हणाल्याने सर्वच देवता एकदम प्रसन्न होतील. परंतु ही ॐ कार साधना प्रारब्धशुद्धी पूर्ण झाल्याशिवाय प्राप्त होत नाही. दुष्प्रवृत्तींचा समूळ नाश झाल्याशिवाय ॐकार साधनेचे रहस्य प्राप्त होत नाही. म्हणून प्रत्येक मंत्राच्या अगोदर ॐ लावावा असे सांगितले जाते. यात उद्देश असा की कुठल्या ना कुठल्या रूपाने **ॐ**चे उच्चारण होत राहावे म्हणजे एक ना एक दिवस खऱ्या **ॐ** चा लाभ होईल.

मातृकांच्या वरती अनुस्वार दिला की त्या मातृकेला शक्ती रूप प्राप्त होते उदा: **र** हे अक्षर आहे. तर **रं** हे अग्निबीज आहे. या अग्निबीजाचा जप केला असता अग्नि निर्माण करता येतो. या

करिता हे बीज सिद्ध करावे लागते. या बीजमंत्राच्या जपाने सूक्ष्मदेह शुद्ध होतो. जे लोक खूपच अपवित्र असतात दुष्ट विचारांनी भरलेले असतात त्यांनी या बीजाक्षराचा जप केला असता त्यांच्या अंगाची आग होऊ लागते व जवळजवळ सर्व समाजच अशुद्ध व दुष्ट विचारांनी भरलेला असल्याकारणाने **रं** या बीजमंत्राला सौम्य करून त्याचे **राम** या नाममंत्रात रूपांतर करण्यात आले व रामनाम समाजाला दिले गेले.

अशा प्रकारे प्रत्येक अक्षरामध्ये प्रचंड शक्ती दडलेली आहे. जप करून या शक्तीला स्वत:च्या अंगात निर्माण करावी लागते. प्रत्येक बीजाक्षराची एक एक देवता असून या देवता विशिष्ट प्रकारच्या मर्यादित सामर्थ्याने युक्त असतात. दोन अक्षरे एकत्र जोडल्यानंतर आणखी एक वेगळ्याच प्रकारची शक्ती निर्माण होते. ही शक्ती एक अक्षरी बीजापेक्षा जास्त शक्तिशाली असते. उदा. **ऱ्हीं** हे भुवनेश्वरी बीज असून या बीजाक्षराच्या जपाने ज्ञान व सामर्थ्य प्राप्त होते. शिव, विष्णू व भुवनेश्वरी देवी अशा तिनही देवता या एकाच बीजाक्षरात राहतात. **श्रीं** हे महालक्ष्मीचे बीज असून या बीजमंत्राच्या जपाने महालक्ष्मीची प्रसन्नता प्राप्त होते.

**क्लीं** हे काली बीज आहे. या बीजाक्षराच्या जपाने अनेक

विद्या प्राप्त होतात. **क्लीं** या बीजाचे सौम्य रूपांतर कृष्ण असे केले गेले व सामान्य लोकांना कृष्णभक्ती करण्यास सांगितले गेले. अशाप्रकारे बीजाक्षरे व बीजाक्षराची सौम्य रूपे निर्माण करण्यात आली. **गं** हे गणपतीचे बीज आहे तर **द्राम्** हे दत्तात्रेयांचे बीज आहे.

ज्याप्रमाणे एखाद्या छोट्याशा गोळीमध्ये अद्‌भुत सामर्थ्य असते, झोपेची गोळी घेतल्यानंतर झोप येते. त्याप्रमाणे छोट्याशा बीजाक्षरामध्ये अद्‌भुत सामर्थ्य असते. बीजाक्षरे व त्याचा परिणाम यांचा अभ्यास करून दोन-दोन, तीन-तीन बीजाक्षरे एकत्र करून साधक जप करतात व अद्‌भुत सामर्थ्य प्राप्त करतात. काही काही मंत्रांमध्ये तर दहा-दहा, वीस-वीस बीजाक्षरे असतात व प्रत्येक बीज शरीरामध्ये विशिष्ट प्रकारचे सामर्थ्य तयार करते.

**ऐं ऱ्हीं श्रीं** या बीजाक्षरांमध्ये सरस्वती, भुवनेश्वरी व लक्ष्मी अशा तीन देवतांचे तेज आहे.

**ऐं ॐ ऐं** या मंत्रामध्ये सरस्वतीचे तेज असून, या मंत्राच्या जपाने बुद्धी तेजस्वी होते.

**ऐं क्लीं सौः** हा बाला त्रिपूरा देवीचा मंत्र असून, या मंत्राच्या जपाने समृद्धी व सफलता प्राप्त होते.

**ऐं ऱ्हीं श्रीं क्लीं** या मंत्रामध्ये चार देवतांचे तेज असून, या मंत्राच्या जपाने आर्थिक सुबत्ता प्राप्त होते.

**ॐ द्राम् ॐ** हा दत्तात्रेयांचा बीज मंत्र असून, या मंत्राच्या जपाने दत्तात्रेयांची कृपा प्राप्त होते. तसेच योगातील रहस्यांचे ज्ञान प्राप्त होते व संकटे दूर होतात, तेजस्विता प्राप्त होते.

अपवित्र, स्वार्थी किंवा संकुचित बुद्धीच्या साधकाने बीजाक्षरांचा जप केला असता त्याला खूप त्रास होतो. बीजाक्षरांचा जप करणारा साधक नि:स्वार्थ बुद्धीचा, परोपकारी व मोठ्या मनाचा असावा लागतो. तरच बीजाक्षरांमध्ये असलेली शक्ती तो ग्रहण करू शकतो.

एक अपात्र साधक एका बीजाक्षराचा अखंड जप करत असे. त्याचे मन अशुद्ध होते. २५-३० लाख जप झाल्यानंतर त्याला जिकडे-तिकडे आगीचे लोळ दिसू लागले. आकाश लाल दिसू लागले व त्याला पराकोटीची भीती वाटू लागली व त्याने मंत्रजप करणे सोडून दिले.

असे प्रकार घडू नयेत म्हणून बीजाक्षराच्या जोडीला देवतेच्या नावाचे संपुट लावून जप करणे चांगले असते. उदाहरणार्थ -

**ॐ द्राम् दत्तात्रेयाय नम:**

**ॐ ऐं ऱ्हीं श्रीं क्लीं परमेश्वरी स्वाहा**

**ॐ दुम् दुर्गायै नम:**

**ॐ श्रीं महालक्ष्म्यै नम:**

**ॐ ऐं सरस्वत्यै नम:**

**ॐ ऱ्हीं भुवनेश्वरी नम:**

अशा प्रकारे देवतांच्या नावाने संपुट लावून व शेवटी नम: किंवा स्वाहा पल्लव लाविले असता बीजमंत्राचे तेज सौम्य व सुखकर होते. याशिवाय देवतेची कृपा होते. परंतु काही माणसे अशा जपातील तेजही ग्रहण करू शकत नाहीत. अशा लोकांनी फक्त नाममंत्राचा जप करावा. नाम जपाने कसलेही नुकसान होत नाही. चित्त शुद्ध होते. मन बलवान होते. अंगी सात्त्विकता वाढू लागते, सद्गुण निर्माण होतात व मंत्रजप करण्याची योग्यता प्राप्त होते.

**श्री दत्त जय दत्त, ॐ नमो नारायणाय, ॐ दत्त दुर्गा ॐ** अशा विविध नाममंत्रांनी परमेश्वराचे अखंड नामस्मरण केले असता अनेक वर्षांनंतर अंगी सात्त्विकता वाढू लागते. सद्प्रवृत्ती वाढू लागतात व साधना करण्याची पात्रता निर्माण होते.

अक्षर ब्रह्माच्या सहाय्याने असंख्य देव-देवतांची निर्मिती

करता येते, इतकेच नव्हे तर असंख्य प्रकारच्या शस्त्रास्त्रांची निर्मितीही करता येते. या अस्त्र विद्येच्या द्वारा प्रचंड संहार घडवून आणता येतो. एकंदरीत असे म्हणावे लागते की, अक्षरांनी काय होत नाही ?

प्राचीन काळामध्ये मंत्राच्या सहाय्याने पाऊस पाडला जात असे. वादळे निर्माण केली जात असत, अग्निचा वर्षाव केला जात असे, अशा प्रकारे विविध प्रकारच्या अस्त्रांची निर्मिती केवळ मंत्रांद्वारे केली जात असे. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी अशा प्रकारच्या विद्या अस्तित्वात होत्या. परंतु या विद्यांचा प्रचंड प्रमाणात दुरुपयोग झाल्या कारणाने या विद्या लोप पावल्या.

आजही असे साधक आहेत की, जे मंत्राने अग्नि निर्माण करतात, मंत्राने पाऊस पाडतात किंवा मंत्राने वादळे निर्माण करू शकतात. अशा प्रकारे शब्द ब्रह्मामध्ये विविध प्रकारचे सामर्थ्य आहे. त्याचा सदुपयोग केला असता मनुष्य देव होऊ शकतो व दुरुपयोग केला असता माणसाचा राक्षस होतो.

सर्व देवतांचे व सर्व अक्षरांचे मूळ ॐ आहे. ॐ च्या ध्वनीमध्ये बावन्न मातृका सामावलेल्या आहेत. सर्व देव-देवता सामावलेल्या आहेत, सर्व विद्या सामावलेल्या आहेत, सर्व ज्ञान सामावलेले आहे, सर्व कला सामावलेल्या आहेत. फक्त या

अक्षर ब्रह्माची साधना करण्याकरिता आवश्यक असणारी पवित्रता व योग्यता आपल्या अंगी असावी लागते. नि:स्वार्थ बुद्धीच्या साधकांना ॐ काराच्या साधनेने कुंडलिनी जागृतीचा अनुभव येतो. षड्चक्रे जागृत होतात. विविध प्रकारचे ज्ञान होते. वातावरणातील देव-देवता व सिद्धपुरुष यांची दर्शने होतात, त्यांच्याकडून मार्गदर्शन प्राप्त होते. ध्यानामध्ये विविध प्रकारची दृश्ये दिसू लागतात. चिदाकाशात प्रवेश प्राप्त होतो. जन्म-मरणाच्या चक्रातून सुटका होते.

अक्षर ब्रह्माच्या उपासनेने साधक जीवनमुक्त होतो, सिद्ध होतो, परमेश्वराशी एकरूप होतो. फक्त सद्बुद्धीने अक्षर ब्रह्माचा सदुपयोग करायला हवा. रावण, कुंभकर्णादी राक्षसांनी अक्षर ब्रह्माचा दुरुपयोग करून कुल संहार घडवून आणला होता. असे हे अक्षर ब्रह्म. सदुपयोग केला तर ब्रह्म पद प्राप्त करून देते व दुरुपयोग केला तर भ्रमात भरकटवीत राहते.

# ६. पंचतत्त्वे

**माणसाचे शरीर** हे पंचतत्त्वांपासून बनलेले असते. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचतत्त्वांचे शरीर बनते. इतर असंख्य गोष्टी या शरीरात असतात. परंतु आपण येथे फक्त या पंचतत्त्वांच्या आधाराने माणसांच्या वर्तनाचा विचार करू !

## पृथ्वीतत्त्व

ज्याची जाणीव शंभरटक्के पृथ्वीतत्त्वामध्ये अडकलेली आहे, अशी माणसे पराकोटीची जड, मूढ असतात. जेवणे व झोपणे या पलीकडे त्यांना काहीही करता येत नाही. बरीचशी अशी माणसे आपल्याला जंगलामध्ये आढळतात. जंगलातील आदिवासी लोकांमध्ये बरीच माणसे शंभरटक्के पृथ्वीतत्त्वात असलेली आढळतात. असे लोक भूत-प्रेतांची उपासना करतात. बळी देऊन भूत-प्रेतांना संतुष्ट करतात. पृथ्वीतत्त्वातील लोकांना सद्बुद्धी होणे कठीण असते.

चोर, दरोडेखोर, डाकू, खूनी, आतंकवादी, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक हे पृथ्वीतत्त्वात येतात. बुद्धीचा प्रचंड प्रमाणात दुरुपयोग करणारे, खोटे बोलणारे, देव-देवतांच्या नावाने बळी देणारे, सुशिक्षित परंतु स्वार्थी, स्वार्थापलीकडे ज्यांची बुद्धी काहीच काम करत नाही असे लोक, कंजूष, पैसा व सत्ता यांच्यापाठी लागलेले लोक, द्वेष-मत्सर करणारे लोक पृथ्वीतत्त्वात येतात. समाजाची फसवणूक करणारे लोक, अघोरी साधना करणारे साधू, भूत-प्रेतांच्या साधना करणारे साधक, दुसऱ्याचे वाईट व्हावे म्हणून करणी करणारे लोक, ईर्षा, द्वेष, मत्सर करणारी माणसे, सत्तापिपासू, कपटी राज्यकर्ते, पैसा खाणारे लोक, विविध प्रकारच्या वाईट मार्गांनी पैसा मिळविणारे स्त्री-पुरुष पृथ्वीतत्त्वामध्ये अडकलेले असतात. जारण-मारण इत्यादी मंत्रांचा जप करणारे साधक, पिशाच्चांना वश करून त्यांच्याद्वारे चमत्कार करणारे साधक पृथ्वीतत्त्वातील असतात. असे लोक धूर्त व अहंकारी असतात.

भारतात अशाप्रकारचे लोक सुमारे एक हजार वर्षांपूर्वी प्रचंड प्रमाणात होते. यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी तत्कालीन सत्पुरुषांनी समाजातील असंख्य लोकांना पंढरपूरच्या वाऱ्या करणे, काशीची कावड रामेश्वरला नेणे, पायी तीर्थयात्रा करणे अशा साधना सांगितल्या.

पृथ्वीतत्त्वामध्येसुद्धा काही लोक सज्जन असतात. पूर्वजन्मातील काही पापकर्मांमुळे त्यांची जाणीव पृथ्वीतत्त्वामध्ये अडकलेली असते. सज्जन व नि:स्वार्थ असूनही त्यांची आध्यात्मात प्रगती होत नाही. अशा लोकांनी पायी तीर्थयात्रा केल्यास त्यांच्यामध्ये थोडीफार प्रगती होण्याची शक्यता असते. अर्थात याविषयी निश्चित असे काही सांगता येत नाही. कारण मी असे लोक पाहिले आहेत की, जे पन्नास वर्षे पायी तीर्थयात्रा करत होते. परंतु त्यांच्यात काहीही प्रगती झालेली नव्हती. त्यांच्यातील गर्व, ताठा, अहंकार या गोष्टी जराही कमी झालेल्या नव्हत्या. अशा लोकांना आपण जी काही भक्ती, उपासना, तीर्थयात्रा करतो त्याचाच अंहकार होतो. वातावरणातील दुष्टशक्तींचा पगडा पृथ्वीतत्त्वातील लोकांवर जास्त असतो.

पृथ्वीतत्त्वातील सज्जन लोकांनी जर नम्रतेने एखाद्या सत्पुरुषाची सेवा केली व काया, वाचा, मनाने त्याच्याशी प्रामाणिक राहिले तर पुढील दोन चार जन्मांमध्ये त्यांची प्रगती होऊन त्यांना आध्यात्मिक मार्ग मिळू शकतो. परंतु जोपर्यंत एखादा सत्पुरुष भेटत नाही तोपर्यंत अशा लोकांनी तीर्थयात्रा, दान करत रहायचे असते कारण हेच सत्कर्म त्यांना पुढील मार्ग दाखवू शकते.

### आपतत्त्व

ज्याची जाणीव आपतत्त्वामध्ये जागृत आहे, असे लोक

व्यवहारी, धंदा उद्योगात प्रवीण असे असतात. त्यांचे मन व बुद्धी व्यावहारीक असते. आपतत्त्वातील स्त्रिया प्रेमळ व भक्तिमान असतात. ध्यानमार्गात त्यांची चांगली प्रगती होते. त्यांना ध्यानमार्गात बरीच दृश्ये दिसू शकतात. योग्य गुरु मिळाल्यास आपतत्त्वातील स्त्रिया देवता लोकात प्रवेश प्राप्त करू शकतात.

आपतत्त्वातील पुरुष व्यवहारी, उद्योगी, खूप शिकणारे, मोठमोठे उद्योगधंदे करणारे, खूप पैसा कमविणारे, यशस्वी असतात. अशा पुरुषांनी जर दान, ईश्वरभक्ती व नम्रतेने एखाद्या सत्पुरुषाची सेवा केल्यास आध्यात्म मार्गात त्यांची प्रगती होऊ शकते. परंतु जर आपतत्त्वातील पुरुषांनी दान, नम्रता, परोपकार, ईश्वरभक्ती या गोष्टी केल्या नाहीत तर वातावरणातील पृथ्वीतत्त्व म्हणजे पिशाच्चशक्ती त्यांच्या बुद्धीवर प्रभाव गाजवू लागतात व त्यांना पृथ्वीतत्त्वात खेचून नेतात व त्यांचा पुढील जन्म पृथ्वीतत्त्वात होतो. म्हणून आपतत्त्वातील लोकांनी केवळ पैसा कमावणे, कीर्ती मिळविणे इत्यादी गोष्टीत रमून न जाता आपली आध्यात्मिक प्रगती कशी होईल, याकडे लक्ष देणे आवश्यक असते.

आपतत्त्वातील स्त्री पुरुषांमध्ये जर पाच-दहा टक्के पृथ्वीतत्त्व मिसळलेले असेल तर स्त्रिया अहंकारी होतात, हट्टी होतात व पिशाच्चशक्तीच्या संपर्कात येतात व पुरुष मूढ होतात. त्यांच्या हातून परोपकार घडत नाही. पण असे लोक ईश्वरभक्ती करू

शकतात व अशा लोकांची ईश्वरभक्ती त्यांना पुढच्या जन्मी प्रगती साध्य करून देते. दोन-चार जन्मानंतर ते आपतत्त्वात स्थिर होऊ लागतात.

आपतत्त्वातील काही पुरुषांना मोठेपणाची अतिशय आवड असते. आपल्या समोर खूप गर्दी असावी व आपण त्यांच्यासमोर भाषण करावे असे त्यांना वाटते. ज्या साधूच्या दर्शनाला हजारो लोक जातात असा साधू आपतत्त्वातील स्त्री-पुरुषांना आवडतो. परंतु आपतत्त्वातील स्त्री-पुरुषांची ही लोकेषणा वृत्ती त्यांना मृत्यूनंतर भूतयोनीत म्हणजे पृथ्वीतत्त्वात घेऊन जाते. म्हणून आपतत्त्वातील लोकांनी येथे सावध राहाणे अतिशय आवश्यक असते. कीर्तीचा लोभ आपतत्त्वातील लोकांची अधोगती करतो. आपतत्त्वातील काही लोकांना खोटे बोलण्याची अतिशय वाईट खोड असते. तसेच आपतत्त्वातील काही लोक आळशी असतात. तर काही लोक डॉमिनेटींग (हट्टी प्रवृत्तीचे, इतरांनी आपले ऐकावे असा आग्रह धरणारे, आपलं तेच खरं करणारे) स्वभावाचे असतात. त्यांच्यातील या प्रवृत्ती त्यांची अधोगती करू शकतात. म्हणून आपतत्त्वातील लोकांनी येथे सावध राहून एखाद्या चांगल्या सत्पुरुषाची सेवा करावी व स्वत:चा उद्धार करून घ्यावा.

आपतत्त्वातील साधू हे छानछोकी प्रवृत्तीचे असतात. हजारो लोकांनी आपल्या समोर बसावे, मोठा सभामंडप असावा,

चांगल्यापैकी डेकोरेशन असावे, अशा डेकोरेशन (सजावट) मध्ये बसून रामायण, महाभारत, भागवत इत्यादी ग्रंथांवर तासन्तास प्रवचन द्यावे, असे त्यांना वाटत असते. असे साधू म्हातारे झाले तरी त्यांच्यातील या प्रवृत्ती जात नाही व ही गोष्ट साध्य व्हावी म्हणून क्षुद्र सिद्धींच्या साधना करण्यासही ते मागेपुढे पहात नाहीत. परंतु अशा साधूंची येथेच अधोगती होते.

**वस्तुत: आपतत्त्वामध्ये जन्म होणे म्हणजे उद्धाराची एक पायरी चढलेली असणे. परंतु या पृथ्वीतलावरील मायाजाळात सामान्य माणसे तर फसतातच पण मोठमोठे साधूही फसतात.**

लोकांनी आपल्याला मानावे, आपल्यासमोर गर्दी व्हावी, हजारो लोकांनी आपल्या पाया पडावे, या अतिक्षुद्र वासनेपोटी क्षुद्र मंत्र-तंत्राच्या साधना साधू लोक करतात व स्वत:ची अधोगती करून घेतात व न पाहिलेल्या देवांचे वर्णन करत बसतात.

आपतत्त्वातील स्त्री पुरुषांना ईश्वरभक्तीची आवड असते असे वर लिहिले आहेच. जर आपतत्त्वातील स्त्री पुरुषांनी बुद्धीचा दुरुपयोग केला नाही, नम्रतेने वागले व दान केले; खोटे बोलणे, फसविणे अशा कुप्रवृत्तींचा त्याग केला तर आपतत्त्वातील लोकांची आध्यात्म मार्गात नक्कीच प्रगती होऊ शकेल.

आपतत्त्वातील स्त्री पुरुषांनी एखाद्या स्तोत्राचे हजारो पाठ करणे व सतत नामस्मरण करणे, एखाद्या ग्रंथाचे नित्यनियमाने

वाचन करणे, हवन करणे, एकाच जागेवर बसून जप करणे, ध्यान करणे, त्राटक करणे, मन निर्विचार बनविण्याचा प्रयत्न करणे अशा साधना कराव्यात, या साधने बरोबरच दान व परोपकार करणे स्वत:शी व ईश्वराशी प्रामाणिक राहणे याही गोष्टी करायला हव्यात. या गोष्टींचे तंतोतंत आचरण केल्यास आध्यात्म मार्गात प्रगती होऊ शकते व ईश्वर कृपा झाल्यास योग्य गुरु भेटतो. गुरु भेटल्यानंतर काया, वाचा, मनाने भक्तिभावाने त्याची सेवा करावी. सिद्ध गुरुसमोर खोटे बोलणे, लबाडी करणे, फसवणूक करणे, अशा गोष्टी पुण्याईचा नाश करतात व मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जावे लागते. खऱ्या गुरुला आपल्या भक्तातील सर्व प्रवृत्तींचे ज्ञान असते. परंतु तो तसे कधीही दाखवित नाही. तो आपल्या भक्तांना जास्तीत जास्त सांभाळून घेण्याचा प्रयत्न करतो. परंतु एखाद्या सिद्धपुरुषाबरोबर खोटे बोलल्याने, त्याची फसवणूक केल्याने, अथवा सिद्ध पुरुषाशी युक्तीने वागल्याने, सिद्ध पुरुषाच्या आसपास राहणाऱ्या देव-देवतांना याचा राग येतो व अशा भक्ताला पिशाच्च लोकामध्ये ढकलले जाते. कठोर शिक्षांना तोंड द्यावे लागते व पुढे अनेक जन्म चांगला गुरु न भेटता पिशाच्च साधना केलेले तांत्रिक-मांत्रिक भेटतात.

आपतत्त्वामध्ये जन्म होणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु येथे जपून वागावे लागते. जपून न वागल्यास पिशाच्च, राक्षस लोकांपर्यंत

अधोगती होऊ शकते. आपतत्त्वातील काही लोकांना गूढ गोष्टींची आवड असते. असे लोक प्लँचेट, आत्म्यांशी संभाषण करण्याचा प्रयत्न करणे अशा गोष्टी करतात. अशा गोष्टी करणे अत्यंत धोक्याचे असते. माझ्या माहितीतील एक स्त्री प्लॅन्चेट करत असे. ती मला म्हणाली, 'अष्टमीच्या दिवशी माझ्याशी देवी बोलते !' ती खूप अहंकारी होती म्हणून मी तिला काहीच बोललो नाही. खरी स्थिती अशी होती की, पिशाच्च लोकाशी तिचा संपर्क झालेला होता व ती स्वत:च जिवंत पिशाच्च बनलेली होती. तिच्या अवतीभोवती हजारो पिशाच्चे होती व ही स्त्री स्वत: डॉक्टर होती. परंतु अहंकारी स्वभावामुळे तिने स्वत:च्या आयुष्याचे नुकसान करून घेतले होते.

आपतत्त्वातील लोकांनी प्रामाणिकपणे राहून कुणालाही न फसविता ईश्वरसेवा, भक्ती केल्यास, त्यांना पुढील मार्ग मिळू शकतो. आपतत्त्वातील सज्जन लोकांना स्तोत्रांचे पाठ करणे, ग्रंथ वाचणे, जप करणे अशाप्रकारे ईश्वरभक्ती करणे आवडते. हवनाने आपतत्त्वाकडून तेजतत्त्वाकडे जाण्याचा मार्ग सुकर होतो.

### तेजतत्त्व

तेजतत्त्वातील लोक मनाने मोठे असतात व परोपकारी असतात. स्वभावाने थोडे रागीट असले, तरी त्यांचा राग दुसऱ्याच्या कल्याणासाठी असतो. पृथ्वीतत्त्वातील सज्जन माणसे यांच्या

वाऱ्यालाही उभे राहू शकत नाही. कारण यांच्याजवळ अमाप दैवीतेज असते. प्रारब्ध शुद्ध झाल्याशिवाय तेजतत्त्वात प्रवेश प्राप्त होत नाही. तेजतत्त्वातील लोक हे देवता लोकातून पृथ्वीतलावर काही विशिष्ट कार्यासाठी जन्माला आलेले असतात. अशा लोकांना जन्मापासून दैवी शक्तीचे संरक्षण असते.

तेजतत्त्वातील स्त्री पुरुष कोठेही राहिले, कसेही राहिले तरी त्यांची आध्यात्मिक प्रगती होत राहते. देव-देवतांचे संरक्षण यांना प्राप्त असते. संकुचित मनाची माणसे यांच्याजवळ टिकू शकत नाहीत. त्यामुळे तेजतत्त्वातील माणसांना नावे ठेवणारी माणसे खूप असतात. परंतु ईश्वराच्या दरबारात यांना खूप मानाचे स्थान असते. तेजतत्त्वातील लोक जेव्हा पृथ्वीतलावर समाजात वावरत असतात तेव्हा त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था ईश्वराने केलेली असते. ईश्वर अशा स्त्री पुरुषांच्या हातून काही विशिष्ट कार्य करवून घेतो व मृत्यूनंतर शून्यलोकामध्ये त्यांचा प्रवेश करवून देतो.

तेजतत्त्वातील लोक निर्गुणाचे ध्यान करतात. अशा लोकांना संजीवन समाधी आपोआप लागत असते. अदृश्यसृष्टीतून अशा लोकांना मार्गदर्शन मिळत असते. तेजतत्त्वातील लोकांना मानवी गुरुची गरज नसते, कारण हे सर्व ईश्वराचे प्रेषित असतात.

## वायुतत्त्व

वायुतत्त्वाच्या अधीन जे राहतात त्यांना  योगी म्हणले जाते. असे लोक एकांतवासात राहतात. सहसा समाजात येत नाहीत. समाजापासून दूर राहतात. तेजतत्त्वातील लोकांशी संबंध ठेवतात. इतर लोकांशी सहसा संबंध ठेवत नाहीत. इतर लोकांशी थोडा जरी संबंध ठेवला तरी वायुतत्त्वातील लोकांना त्यांचा त्रास होतो. कारण वायुतत्त्वातील लोकांचे देह अत्यंत पवित्र असतात व म्हणून ते जास्तीत जास्त एकांतवासात राहतात.

तेजतत्त्वातील लोकांना वायुतत्त्वामध्ये प्रवेश प्राप्त करून देण्यासाठी वायुतत्त्वातील योगी प्रयत्न करतात. अशा योग्यांचे अस्तित्वच पृथ्वीला तारुन नेत असते. अशा योग्यांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात.

**देखे साधक निघोनी जाये । मागा पाऊलांची ओळ राहे ।**

**तेथे ठाई ठाई होये । अणिमादिक ।।**

योग्याचे वर्णन करताना ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरीमध्ये श्रीकृष्ण मुखाने म्हणतात,

अर्जुना बघ ! योगी सहज चालत जर निघून गेला तर वाटेवर त्याच्या पाऊलांचे ठसे उमटतात. त्या प्रत्येक पावलांच्या ठशांच्या ठिकाणी अष्टमहासिद्धींचा निवास असतो.

वायुतत्त्वातील योग्यांचा महिमा हा असा असतो. असा एखादा योगी भेटला तरी त्याच्यावर श्रद्धा बसणे कठीण असते व श्रद्धा बसली तरी टिकणे कठीण असते. असे योगी पृथ्वीवरील पाप पुण्याचा तोल सांभाळत असतात.

**आकाशतत्त्व**

आकाशतत्त्वातील योग्यांचे देह चिन्मय असतात. असे योगी हिमालयासारख्या पर्वतांमधून गुप्तपणे राहतात. एखाद्या भाग्यवंतालाच त्यांचे दर्शन होते. काही विशिष्ट कार्य असेल तरच आपले गुप्तस्थान सोडून एखादा योगी पृथ्वीतलावर प्रगट होतो व आपले कार्य पूर्ण करून पुन्हा निघून जातो. अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, श्री अल्लम प्रभू, श्री महाअवतार बाबाजी, श्री हेडाखान बाबा असे काही महासिद्ध योगी विशिष्ट कार्याकरताच भूतलावर प्रगट झाले. हे गुप्त रूपाने निवास करणाऱ्या चिन्मय योग्यांपैकी होते.

हिमालय, कौशिक पर्वत, गिरनार, अबू, सह्याद्री, श्रीशैल, निलगिरी अशा पर्वतांमध्ये आजही आकाशतत्त्वातील योगी रहात आहेत व पृथ्वीतलावरील समस्त समाजाला आध्यात्मिक प्रगतीच्या दिशेने पुढे पुढे नेत आहेत. तेजतत्त्वातील स्त्री-पुरुषांना यांच्या कृपेचा खूप फायदा होतो. तेजतत्त्वातील स्त्री-पुरुषांची आध्यात्मिक प्रगती या महायोग्यांच्या कृपेने वेगाने होते, तर

वायुतत्त्वातील योग्यांना शून्य महाशून्यातील गुप्त मार्गांचे ज्ञान यांच्या कृपेने होते.

पृथ्वीतलावर वावरणारे सिद्धपुरुष आकाशतत्त्वातील महासिद्धांच्या संकेतानुसार कार्य करतात. त्यामुळे चांगल्या चांगल्या सद्भक्तांनासुद्धा पृथ्वीतलावर वावरणाऱ्या सत्पुरुषांच्या वागण्याचा अर्थ कळत नाही. म्हणून सत्पुरुषांबरोबर भक्तांनी नेहमी नम्रतेने, मोकळ्या मनाने व सरळ मनाने वागायचे असते. असे जे कोणी वागतात फक्त त्यांनाच आकाशतत्त्वातील महायोग्यांचे आशीर्वाद प्राप्त होतात. कारण सत्पुरुषाजवळ राहणे किंवा सत्पुरुषाची सेवा करणे म्हणजे अप्रत्यक्षरित्या आकाशतत्त्वातील महासिद्ध, महायोग्यांच्या नजरेखाली असणे. प्रत्यक्ष परमेश्वराच्या नजरेखाली असणे. म्हणून म्हणतात, ''तुम्ही कसे वागता इकडे परमेश्वराचे लक्ष आहे याची जाणीव ठेवा !''

पृथ्वीतलावर वावरणारे सिद्धपुरुष, सत्पुरुष, अवतारी पुरुष हे सर्व आकाशतत्त्वातील महायोग्यांचे अंश असतात. एका विशिष्ट कार्यासाठी यांना खाली पाठविले जाते. कार्य पूर्ण झाल्यानंतर पृथ्वीतलावर वावरणारा सिद्धपुरुषाचा आत्मा आपल्या मूळ स्वरूपात विलीन होतो.

पृथ्वीतलावर वावरणारे सत्पुरुष असा शब्द जरी वर वापरला असला तरी येथे पुरुष या शब्दाचा अर्थ आत्मा असा आहे.

कारण पुष्कळवेळा असे दिव्य आत्मे स्त्री देहात राहूनसुद्धा कार्य करतात. आकाशतत्त्वामध्ये पुरुष रूपाने राहणारे जसे महायोगी आहेत तसेच स्त्री रूपाने राहणाऱ्या महायोगिनी आहेत. त्यांचे अंशही पृथ्वीतलावर वावरत असतात व आपल्याला दिलेले कार्य करत असतात.

या सर्व गोष्टी सामान्य माणसाच्या बुद्धीच्या पलीकडल्या असल्या कारणाने सर्वसामान्य माणसाचा हा विषय नव्हे. परंतु जी माणसे सरळ मनाची असतात, निर्मळ अंत:करणाची असतात त्यांना ईश्वरीकृपेचा लाभ होतो व ज्यांची अंत:करणे निर्मळ नसतात, असे लोक सतपुरुषाच्या सहवासात आल्यानंतर त्यांचा थोडाफार व्यावहारीक फायदा होतो, परंतु आध्यात्मिक प्रगती होत नाही. आध्यात्मिक प्रगतीसाठी निर्मळ अंत:करण, चित्ताची शुद्धी व मनाचा सरळपणा या गोष्टींची अत्यंत आवश्यकता असते. ज्यांच्या जवळ या गोष्टी आहेत त्यांच्यावर हे आकाशातील देव कृपा करतात.

# ७. शब्दसृष्टी

**या विश्वामध्ये** अनेक रहस्ये दडलेली आहेत. या अनेक रहस्यांपैकी एक रहस्य म्हणजे शब्दसृष्टी ! ध्वनी व प्रकाशाचा खेळ म्हणजे शब्दसृष्टी किंवा देवतासृष्टी ! **देव म्हणजे प्रकाश** व देवता म्हणजे प्रकाशाच्या द्वारा साकार होणारे अस्तित्व ! (The Luminous being)

या दिव्य नयनमनोहर भव्य प्रकाशामध्ये कोट्यावधी देवी-देवतांचे अस्तित्व असते. आध्यात्मात जसजशी प्रगती होऊ लागते तसतशी प्रकाशमय विश्वाची दालने उघडू लागतात. साधकांना विशिष्ट शब्द (मंत्र) प्राप्त होतात. या शब्दांचा उच्चार करताच प्रकाशमय देवता साकार होते व साधकाची मनोकामना पूर्ण करते. साधक निरिच्छ व आत्मज्ञान संपन्न असेल तर **मंत्रमहेश्वर** अशी स्टेज (योग्यता) त्याला प्राप्त होते. नंतर तो बोलेल तो शब्द मंत्र होतो व या मंत्रातून प्रकाशमय देवता साकार

होते. ही साकार झालेली देवता प्रकाशमय विश्वामध्ये चिरंतनकालपर्यंत राहते व त्या मंत्राचा जप करणाऱ्या साधकाला दर्शन देते, मार्गदर्शन करते व संरक्षणही करते.

मंत्रमहेश्वर योग्यता प्राप्त झालेले सिद्धयोगी असंख्य मंत्र निर्माण करतात. अनेक स्तोत्रे, काव्य, गद्य, पद्यादी लेखन करतात व समाजाला सन्मार्गाने नेण्याचा प्रयत्न करतात. यांच्या लेखनामध्ये त्यांच्या तपश्चर्येचे तेज असते व त्यामुळे अशा ग्रंथांचे वाचन करणाऱ्यांचे कल्याण होते.

शब्दामध्ये इतके सामर्थ्य असते की, शब्दाने समस्त सृष्टीची उत्पत्ती करता येते. तसेच शब्दाने समस्त सृष्टीचा नाशही करता येतो. ज्याप्रमाणे प्रकाशामध्ये देवता निर्माण होतात त्याचप्रमाणे अंध:कारमय मार्गामध्ये मंत्रांच्या आधाराने वाईट शक्तीही निर्माण करता येतात. अर्थात आपला तो विषय नव्हे ! मी माझ्या भारतीय गूढ विद्या या पुस्तकात तामस मार्गाविषयी किंवा अंध:कार मार्गाविषयी बरेच काही लिहिले आहे. येथे आपल्याला फक्त शब्दसृष्टीविषयी माहिती घ्यायची आहे.

गायत्रीमंत्र सिद्ध केला असता समस्त सृष्टीची रचना करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. हाच गायत्री मंत्र जर उलटा म्हटला व सिद्ध केला तर समस्त सृष्टीचा संहार करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

**'रम्'** या मंत्रामध्ये अग्नि निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे.

त्याचा मानसिक जप केला असता सूक्ष्मशरीर शुद्ध होण्यास मदत होते.

फार पूर्वी अनेक लोकांनी **रम्** या मंत्राचा जप करून अनेक शक्ती प्राप्त केल्या. कालांतराने मंत्रातील तेज व शक्ती ग्रहण करण्यासाठी जे मनोबल लागते ते मनोबल कमी झाले. माणसे मानसिकरीत्या दुर्बल होऊ लागली. माणसांची मने दुर्बल झाली. रम् या बीजाक्षराची साधना केल्यानंतर माणसांना सगळीकडे अग्नि ज्वाला दिसू लागल्या. यामुळे तात्कालीन ऋषींनी **रम्** या बीजाक्षराचे रूपांतर **राम** असे केले व राम मंत्राचा जप करण्यास जनतेला सांगितले. अशा प्रकारे राम नामाचा प्रसार सर्वत्र झाला.

**लं** हे बीजाक्षर पृथ्वीतत्त्वाचे द्योतक आहे. या बीजाक्षराचा जप केल्याने पृथ्वीतत्त्वातून आपतत्त्वाकडे जाणारा मार्ग मिळतो.

**वं** हे बीजाक्षर आपतत्त्वाचे कारक आहे. या बीजाक्षराचा जप केल्याने आपतत्त्वातून तेजतत्त्वाकडे जाण्याचा मार्ग मिळतो.

**रम्** हे बीजाक्षर तेजतत्त्वाचे कारक आहे. या बीजाक्षराच्या जपाने तेजतत्त्व सिद्ध होते. सूक्ष्म शरीर शुद्ध होते. प्रकाशमय मार्गात प्रवेश प्राप्त होतो.

**यं** हे बीजाक्षर वायुतत्त्वाचे कारक आहे. या बीजाक्षराच्या साधनेने विहंगम मार्गाचे ज्ञान होते.

**'हं'** हे बीजाक्षर आकाशतत्त्वाचे कारक आहे. या बीजाक्षराच्या साधनेने आकाशतत्त्वाचे ज्ञान होते.

अशा प्रकारे शब्दसृष्टीमध्ये असंख्य बीजाक्षरे असून या बीजाक्षरांच्या अनुष्ठानाने विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त करता येते. विविध प्रकारच्या विद्या प्राप्त करता येतात. ज्याप्रमाणे विशिष्ट पद्धतीच्या बीजाक्षरांचा जप करून प्रकाशमय देवता प्रसन्न करता येतात, त्याचप्रमाणे विशिष्ट प्रकारच्या बीजाक्षरांचा जप करून भयानक अंध:कारमय विश्वातील भूत-भैरवांनाही प्रकट करता येते व त्यांचेकडूनही विविध प्रकारच्या विद्या प्राप्त करता येतात. भूत, भैरव, शाकिनी, डाकिनी लवकर प्रकट होतात किंवा एक दोन दिवस साधना करून बळी दिल्याने एखादी विद्या देतात. यामुळे अंध:कारमय मार्गाच्या साधना करणारे साधक बरेच असतात. क्वचित एखादा साधक प्रकाशमय मार्गाने जातो व आपल्या सूक्ष्मदेहाला प्रकाशमय बनवितो. अंध:कारमय विश्वाची माहिती वाचकांना देणे योग्य नाही. म्हणून प्रकाशमय विश्वाचीच माहिती देण्याचा या पुस्तकात प्रयत्न केलेला आहे. सगुण भक्ती, निर्गुण ब्रह्म, भक्तिमार्ग, योगमार्ग या सर्व गोष्टी प्रकाशमय विश्वात येतात. सद्‌गुणांचे आचरण, दान, नम्रता, परोपकार या गोष्टी प्रकाशमय मार्गात येतात.

नि:स्वार्थ प्रेम करणे, प्रेमाने वागणे व इतरांना मदत करणे हे

प्रकाशमय मार्गात येते.

स्वार्थीपणा, कुढत राहण्याची प्रवृत्ती, संकुचित वृत्ती, ईर्षा, द्वेष, मत्सर करणे हे दुर्गुण म्हणजे अंध:कारमय विश्व.

शब्द ब्रह्माचा म्हणजे नामजपाचा, मंत्रजपाचा आधार घेऊन आपण या अंध:कारमय विश्वाच्या पलीकडे जाऊ शकतो.

**ऐं** या बीजाक्षराचा जप केला असता सरस्वतीची प्रसन्नता प्राप्त होते व ज्ञान प्राप्त होते.

**श्रीम्** या बीजाक्षराचा जप केला असता महालक्ष्मीची प्रसन्नता प्राप्त होते.

**र्‍हीम्** या बीजाक्षराचा जप केला असता अनेक प्रकारचे ज्ञान होते, भुवनेश्वरी देवी प्रसन्न होते.

अशा प्रकारे शब्दसृष्टीमध्ये असंख्य बीजाक्षरे असून या बीजाक्षरांचा जप केला असता अनेक देवता प्रकट होतात व भक्तांना सन्मार्ग दाखवितात. हिंदू धर्मामध्ये प्रकाशमय मार्गातील देवता म्हणून गणेशापासून दत्तापर्यंत, सरस्वती पासून दुर्गापर्यंत अनेक देवी-देवता प्रसिद्ध आहेत. यापैकी कुठल्याही एखाद्या देवतेची आराधना करून प्रकाशमय मार्गाचे आपण अनुसरण करू शकतो.

# ८. देवयान पंथ

**ज्याचे प्रारब्ध** पूर्णपणे शुद्ध झालेले आहे, परमेश्वराची सेवा करून सिद्ध पुरुषांची सेवा करून ज्याने आपली अनेक जन्मांची सर्व कर्मे धुवून काढली आहेत, जाणीवपूर्वक परोपकार करून नम्रतेने वागून ज्याने अनेक सद्गुण प्राप्त केले आहेत अशा शुद्ध आत्म्याला देवयान पंथाचा लाभ होतो. या देवयान पंथामध्ये कोणत्या अधिकार पदांची प्राप्ती होते हे आपण पाहू !

**ऋद्धी – सिद्धी**

प्रकाशमय मार्गामध्ये साधकाची प्रगती होऊन तो थोडाफार पुढे गेला असता देवयान पंथाची सुरुवात होण्याच्या अगोदर किंवा देवता लोकाची सुरुवात होण्याच्या अगोदर ऋद्धी–सिद्धी प्राप्त होतात. अनेक प्रकारचे सुख व वैभव प्राप्त होते. या वैभवाला अथवा या सुखाला भुलून साधकाने आपली साधना करणे सोडून

दिल्यास तो तेथेच थांबतो व एकदा का तो तेथे थांबला की त्याचेवर मायेचे आवरण पडू लागते. आयुष्य संपून जाते व आयुष्य संपण्याच्या अगोदर अनेक संकटांना तोंड देण्याची पाळी येते. सुख व वैभव निघून जाते. अंती जवळ काही रहात नाही यासाठी ऋद्धी-सिद्धींच्याकडे दुर्लक्ष करून साधकाने आपला साधन मार्ग सतत पुढे चालू ठेवावा लागतो. जो साधक आपला साधनमार्ग, आपली साधना, तपस्या तशीच पुढे चालू ठेवतो, त्याला खऱ्या अर्थाने देवयान पंथ सापडतो. देवता लोकात त्याचा प्रवेश होतो. एकदा का देवता लोकात प्रवेश झाला की, मग साधकाची कधीही अधोगती होत नाही तो सतत पुढेच जात राहतो. यासाठी साधकाला समर्थ अशा सद्‌गुरुंच्या कृपेची अतिशय आवश्यकता असते. समर्थ सद्‌गुरु आपल्या सद्‌गुणी भक्ताला देवता लोकात प्रवेश प्राप्त करून देतो व एकदा का देवता लोकात साधकाचा प्रवेश झाला की, मग पुढील मार्ग साधकाने स्वत:च क्रमण करायचा असतो. पुढची वाटचाल स्वत:च करायची असते. हा प्रवास करताना मध्येच काही अडचण निर्माण झाली तर सर्वव्यापी सद्‌गुरु अगदी हाकेच्या अंतरावर असतो, तो तात्काळ धावून येतो व आपल्या भक्ताचा मार्ग सुकर करून देतो.

## गणपती–सरस्वती

देवयान पंथाची वाटचाल करताना ऋद्धी–सिद्धींचे जंगल ओलांडल्यानंतर जो प्रांत लागतो त्या प्रांताला निर्गुणाचे साधक ओंकाराचा प्रांत म्हणतात. पुरुष साधक गणपतीचा प्रांत म्हणतात. तर स्त्री साधक सरस्वतीचा प्रांत म्हणतात. येथे पुरुष साधकास गणपती अवस्था प्राप्त होते. याच अवस्थेला स्त्री साधक सरस्वती अवस्था असे म्हणतात. तत्त्वज्ञानी या अवस्थेला ॐ कार स्वरुप अवस्था असे म्हणतात. ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर साधक ज्ञानी होतो. अनेक विषयांचे ज्ञान त्याला आपोआप होते. ध्यानमार्गाने तो विविध विषयांचे ज्ञान मिळवू शकतो. साधकाची काळजी घेणाऱ्या सद्‌गुरुला जर आपल्या भक्ताने ज्ञानाकडे दुर्लक्ष करून पुढे जावे असे वाटले तर आपल्या भक्ताला आनंदाचा अनुभव देऊन श्री गुरु सरळ त्याला पुढे नेत राहतो. अशा भक्ताला ज्ञान होत नाही. परंतु प्रगती होत राहते. पण एखाद्या भक्ताला ज्ञान व्हावे व ते ज्ञान जगाला मिळावे अशी सद्‌गुरुची इच्छा असेल तर तो आपल्या भक्ताला या गणपती, सरस्वतीच्या प्रांतात रमवून ठेवतो व विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त करायला लावतो. यासाठी या गणपती, सरस्वती प्रांतातले अनेक कानेकोपरे त्याला फिरायला लावतो. याच प्रांतातील नील सरस्वती म्हणजे

काय, उच्चिष्ट गणपती म्हणजे काय, दक्षिणामूर्ती म्हणजे काय, अशा विविध विषयांचे ज्ञान त्याला घेण्यास भाग पाडतो. अशा प्रकारे गणपती, सरस्वतीचा प्रांत येथे संपतो व साधकाचा ब्रह्मलोकात प्रवेश होतो.

**ब्रह्मा–गायत्री**

ॐकार स्वरुप गणपती ही अवस्था ओलांडल्यानंतर साधक ब्रह्मदेवाच्या प्रांतात येतो म्हणजे येथे साधकाला ब्रह्मा स्टेज प्राप्त होते. या अवस्थेला काही लोक ब्रह्मदेव असेही म्हणतात. स्त्री साधकांना गायत्री, ब्रह्माणी असे म्हटले जाते. तत्त्वज्ञानी या प्रांताला '**अहं ब्रह्मास्मि**' असे म्हणतात. येथे साधकाला मी ब्रह्म आहे असा अनुभव येतो. सर्व विश्वामध्ये मीच एक व्यापून राहिलो आहे असा अनुभव येतो. या '**अहं ब्रह्मास्मि**' भावामध्ये अहं म्हणजे अहंकाराचे सूक्ष्म अस्तित्व व मी ब्रह्म आहे या भावनेमध्ये मी ब्रह्म आहे परंतु माझ्याशिवाय जे इतर आहे ते काही ब्रह्म नाही असा भाव ध्वनीत होत असतो. सद्गुरु येथे सूक्ष्म अहंचे अस्तित्व कसे नष्ट करायचे ते शिकवितो. अर्थात हा गुरु साधकाच्या हृदयातच रहात असतो व तो साधकाला व्यवस्थित प्रेरणा देऊन या ब्रह्मा स्टेजमधून पुढे कसे जायचे तो मार्ग दाखवून देतो.

ब्रह्मा ही अवस्था चतुर्मुखी आहे. येथे तुर्या अवस्था प्राप्त होते. एका सेकंदामध्ये शेकडो पाने भरतील इतके ज्ञान साधक ग्रहण करू लागतो. येथे श्रीगुरु काही साधकांना चतुर्मुखी म्हणजे विविध ज्ञानाने संपन्न असा बनवितो. तर काही साधकांना देह अहंतेचे दान मला द्या व पुढे चला असे सांगतो. देह अहंतेचे दान घेऊन श्रीगुरु आपल्या काही साधकांना सहजावस्थेत नेऊन सोडतो. अशा साधकांना आपण कोठे येऊन पोहोचलो ते कळत नाही. पण आपल्या भक्ताला आपण कोठे नेऊन ठेवले आहे हे श्रीगुरुला चांगले कळत असते. देह अहंतेचे दान ज्यांनी श्रीगुरुला दिले त्या स्त्री पुरुषांच्या देहात देव-देवता निवास करू लागतात. निरनिराळ्या प्रकाशांच्या रूपाने, निरनिराळ्या देवी-देवतांच्या रूपाने किंवा मोत्यांची झुंबरे, मोत्यांच्या माळा, विविध प्रकारची तेजस्वी चक्रे, कमळे, दिवाळीतील फुलबाज्या किंवा अनाराचा पाऊस, तेजस्वी लखलखणारे आकाश, चिदाकाश, साध्या स्वरूपातील प्रकाशमय देवी-देवता, हंस, सालंकृत प्रकाशमान देवी-देवता, अस्तित्वशून्य ध्यान इत्यादी रूपांनी परब्रह्म या श्रीगुरुच्या लाडक्या भक्तांसमोर प्रकट होत राहते व त्यांना विविध प्रकारचे आनंद देत राहते. सर्व बाजूने त्यांचे जीवन सुखी करते. त्यांचे जीवन सच्चिदानंदमय होऊन जाते, त्यांच्या हृदयात चित्कला प्रकट होते, सो ऽ हम्

भावात ते रंगून जातात, स्वत:चे अस्तित्व विसरून जगू लागतात. जीवनातील सर्व कार्ये ते स्वत:चे अस्तित्व विसरून करत असतात, आपल्या हृदयात राहणाऱ्या ईश्वराला आनंद होईल, आपल्या श्रीगुरुला आनंद होईल अशा प्रकारचे आचरण त्यांच्या हातून आपोआप घडत असते. जग आपल्याला काय म्हणेल? आपले नातेवाईक आपल्याला काय म्हणतील याचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. हळूहळू त्यांच्या हृदयामध्ये विश्वप्रेमाचा उदय होऊ लागतो. दया, करुणा इत्यादी सद्‌गुणांनी त्यांचे अंत:करण भरून जाऊ लागते. अशा वेळी पुनश्च हृदयस्थ सद्‌गुरु या आपल्या सद्‌गुणांनी मंडित अशा सद्‌भक्ताला सांगतो की, तुझ्या अंत:करणात निर्माण होणारी ही वैश्विक करुणा, वैश्विक मानवता पचवून तुला पुढे जायचे आहे व हे सद्‌गुण सद्‌भक्ताला पचून जावेत म्हणून दोन-चार चापट्या मारण्यासही सद्‌गुरु कमी करत नाही. अर्थात या चापट्या सद्‌गुरु हाताने मारत नाही तर तो जीवनामध्ये असे प्रसंग निर्माण करतो की, त्यातून सद्‌भक्ताच्या बुद्धीमध्ये प्रकाश पडतो व त्याला योग्य तो बोध प्राप्त होतो. अशा प्रकारचा सद्‌गुरु ज्यांना भेटतो ते सद्‌भक्त अतिशय भाग्यवान म्हटले पाहिजेत. परंतु त्याच बरोबर शेकडो जन्मांची पुण्याई गाठीशी असल्याशिवाय किंवा उच्च कोटीच्या देवता लोकातून पृथ्वीतलावर जन्म घेतल्याशिवाय देह

अहंतेचे सद्‌गुरुला दान देणे कोणासही शक्य होत नाही.

ज्या साधकांना सद्‌गुरु चतुर्मुखी बनवितो म्हणजे तुर्या अवस्था प्रदान करतो त्यांना विविध प्रकारचे ज्ञान कसे पचवावे हे सद्‌गुरु शिकवितो. अशा साधकांना तो ज्ञानाचा समुद्र बनवितो व या समुद्रातील ज्ञानाचे काही अमृतबिंदू जनता जनार्दनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्याच्या हातून करवून घेतो. हे कार्य करण्याकरिता तो शिष्याचे अस्तित्व नष्ट करून टाकतो व श्रीगुरु पूर्णरुपाने त्याच्या देहात प्रवेश करून राहतो. येथे शिष्य व श्रीगुरु हा भेद संपतो, शिष्याचे अस्तित्व संपते व श्रीगुरुचे अस्तित्व शिल्लक राहते. अर्थात हे अस्तित्व सूक्ष्म सृष्टी द्वारा सर्व विश्वामध्ये कार्य करण्यासाठी असते. शिष्यांचा देवयान पंथावरील प्रवास सुरूच असतो.

असा साधक पृथ्वीवर लोकांच्या कल्याणाकरिता रहात असतो. अशा साधकाच्या कृपेने अनेकांचे कल्याण होते. अनेकांना देवयान पंथाची प्राप्ती होते. आध्यात्म मार्गात अनेकांची प्रगती होते. ईश्वरीकृपेचे दान करण्याचे कार्य असे साधक करतात. प्रसिद्धीपासून असे साधक दूर राहतात व गुप्तपणे आपले कार्य करत असतात. त्यांचे कार्य विश्वभर चालते परंतु त्याची कधीही प्रसिद्धी होत नाही. कारण असे साधक अदृश्यसृष्टीतून वैश्विक कार्य करत

असतात. अशाप्रकारे ब्रह्मा-गायत्री या अवस्थेचा प्रांत येथे संपतो. ईश्वराची इच्छा असेल तर साधक पुढील प्रांतात प्रवेश करतो.

## महाविष्णू – महालक्ष्मी

महाविष्णू अथवा महालक्ष्मीचा प्रांत अत्यंत विशाल आहे. येथे साधकाला अनेक स्टेजेस (अर्हता) प्राप्त होतात. ब्रह्मा स्टेज कडून विष्णू स्टेजकडे जाण्यापूर्वी नारायण सरोवर नामक एक प्रांत लागतो. या नारायण सरोवर नामक प्रांतात भगवान् शेषनारायण निद्रिस्थ अवस्थेत असतात. यांना जागृत करण्याची आवश्यकता नसते. हे एक गूढ रहस्य आहे. धवलमार्गाची चर्चा करताना निद्रिस्थ शेषनारायणाविषयी चर्चा करणे योग्य नाही. निद्रिस्थ शेषनारायणाला बगल देऊन सिद्धसाधक पुढे जातो. व सूर्यनारायणाच्या प्रांतात प्रवेश करतो. येथे हिरण्यमय सोनेरी प्रकाश दिसतो. हा सोनेरी प्रकाश आध्यात्मिक सूर्याचा असतो. येथे सिद्धसाधकाचा चित्ताकाशात बराच दूरवर विहार झालेला असतो. सोनेरी प्रकाशातील अनेक देव-देवतांची दर्शने सिद्धसाधकाला येथे होतात. अत्यंत शुभ्र असे आकाश दिसते. या धवल आकाशात सोनेरी देवता दिसतात. कधी-कधी खळखळ वाहणाऱ्या नद्या दिसतात. नद्यांमध्ये कमळे दिसतात. कमळामध्ये उभी असलेली अथवा बसलेली महालक्ष्मी दिसते. महाविष्णूचेही

दर्शन होते. असंख्य देव-देवतांची दर्शने होतात. अनेक सिद्धमहात्म्यांची दर्शने होतात. सिद्धसाधक सोऽहम् भावात रंगून जाऊ लागतो. येथे त्याला परमहंस स्टेज प्राप्त होते. सविकल्प समाधीचा लाभ होतो. निर्विकल्प समाधीची ओढ मनाला लागते. निर्गुण परब्रह्माची साधना करावी असे त्याला वाटू लागते. अदृश्य सृष्टीतील अनेक गोष्टींचे ज्ञान होते. अदृश्य सृष्टीतून लाखो आत्मे येतात व दर्शन घेऊन जातात. त्या सर्व आत्म्यांना केवळ या योग्याच्या दर्शनाने सद्‌गती प्राप्त होते. अनेक सिद्धी प्राप्त होतात परंतु सिद्धसाधक निरिच्छ असल्याकारणाने अशा गोष्टींकडे तो दुर्लक्ष करतो. येथे सिद्ध साधकाला सूर्य देवतेचेही दर्शन होते. सावित्री, गरुड, हनुमान अशा देवतांची दर्शने होतात. हजारो लोकांना मुक्ती देण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. लाखो लोकांना ईश्वराच्या दिशेने पुढे नेण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त होते. या सर्व गोष्टी तो करतो. परंतु प्रसिद्धीपासून दूर राहून केवळ इच्छाशक्तीच्या जोरावर तो या सर्व गोष्टी करत असतो. त्याचे सगळे कार्य अदृश्य सृष्टीतून चालते. तो प्रचंड कार्य करतो. परंतु प्रसिद्धीपासून दूर राहतो. अशा महात्म्याच्या महासमाधीनंतर हजारो वर्षे त्याची कीर्ती होत राहते.

महाविष्णू ही स्टेज (अर्हता) प्राप्त झाल्यानंतर अदृश्य सृष्टीतील

असंख्य नियम समजू लागतात. अदृश्य सृष्टीतील विविध स्तरांचा परिचय होतो. अदृश्य सृष्टीतील हजारो आत्मे मुक्तीसाठी या सिद्धसाधकाच्या दर्शनाला येतात. आत्महत्या केलेले आत्मे, अपघातात मृत्यू पावलेले आत्मे, सती गेलेल्या स्त्रिया, युद्धात मरण पावलेले आत्मे असे विविध प्रकारचे आत्मे सिद्धसाधकाजवळ सद्‍गती मागण्याकरिता येतात. इतकेच नव्हे तर क्षुद्र देवता व अर्धदेवताही महाविष्णू ही योग्यता प्राप्त झालेल्या सिद्ध-साधकाजवळ आपली प्रगती व्हावी, म्हणून प्रार्थना करण्यासाठी येतात.

महाविष्णू स्टेज प्राप्त झालेला योगी किंवा सिद्धसाधक देशात ठिकठिकाणी फिरून लोककल्याणार्थ आपली शक्ती ठेवतो तसेच जुन्या देवस्थानांना शुद्ध करतो, पवित्र करतो व तेथे आपली शक्ती ठेवून देतो. लोककल्याणार्थ ही शक्ती उपयोगी येते. सूर्याच्या प्रकाशातून अशा सिद्धसाधकाला विविध प्रकारचे ज्ञान प्राप्त होते. प्रत्येक वस्तूतील स्पंदने कशी ओळखावी हे त्याला समजू लागते. त्याचा देह अतिशय शुद्ध असतो. यामुळे त्याला समाजापासून थोडे दूर रहावे लागते. समाजातील अपवित्र माणसांमुळे त्याचा देह अशुद्ध होतो व अशुद्ध झालेला देह पुन्हा शुद्ध करण्यासाठी साधना करावी लागते. म्हणून महाविष्णू स्टेजचा

सिद्धसाधक समाजापासून दूर राहणे पसंत करतो.

प्रत्येक व्यक्तीच्या आत व बाहेर असणाऱ्या चांगल्या वाईट शक्ती त्याला ओळखता येतात. प्रत्येक व्यक्तीच्या अवती-भवती वावरणारे आत्मे त्याला दिसतात. इतकेच नव्हे तर एखादा सिद्धसाधक जर फोनवर बोलला तर पलीकडील व्यक्ती पवित्र आहे की अपवित्र आहे हे त्याला तात्काळ समजते. पलीकडील व्यक्ती जर अशुद्ध असेल तर फोनद्वारा अशुद्ध स्पंदने सिद्ध साधकाच्या देहात प्रवेश करतात व सिद्धसाधकाला याचा त्रास होऊ लागतो. पलीकडील व्यक्ती जर भूत-पिशाच्चांनी भरलेली असेल तर फोनवर बोलल्याने पलीकडील व्यक्तीच्या आसपास राहणारी पिशाच्चे फोनच्याद्वारा सिद्धसाधकाच्या देहात प्रवेश करतात व त्याला खूप त्रास देतात. येथे सिद्ध साधकाने फार जपावे लागते. मी स्वत: या सर्व गोष्टींचा अनुभव घेतला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे फोनवर बोलणारी पलीकडील व्यक्ती पवित्र आहे व ती सिद्धसाधकाबरोबर बोलत आहे त्याच वेळी त्या पवित्र व्यक्तीच्या घरामध्ये एखाद्या अपवित्र व्यक्तीने प्रवेश केला तर अपवित्र व्यक्तीची स्पंदने पवित्र व्यक्तीच्या देहात शिरून तेथून फोनद्वारा सिद्धसाधकापर्यंत जाऊन पोहोचतात व सिद्धसाधकाच्या तात्काळ लक्षात येते की फोनवर बोलणाऱ्या

पवित्र व्यक्तीच्या घरामध्ये अपवित्र व्यक्तीने प्रवेश केला आहे. हे सर्व सांगण्याचा उद्देश इतकाच की, आध्यात्मामध्ये जसजशी योग्यता  वाढू लागते तसतसे लोकांपासून समाजापासून दूर जाणे क्रमप्राप्त होते किंवा पिशाच्च सृष्टीशी संपर्क स्थापित झालेल्या लोकांना दूर ठेवणे भाग पडते. कारण अशा लोकांच्या संगतीने सिद्धसाधकाचे नुकसान होण्याची शक्यता असते. अशा वेळी सिद्धसाधक अदृश्य सृष्टीतील महायोग्यांचा सल्ला घेतो व तद्नुसार वर्तन करतो व त्यांच्या सल्ल्यानुसार पिशाच्च सृष्टीशी संबंध स्थापित झालेल्या लोकांना दूर करून टाकतो. हा कठोर निर्णय त्याला नाईलाजाने घ्यावा लागतो. परंतु त्याची कृपा व करुणा अशा वाट चुकलेल्या भक्तांवरही कायम राहते.

या अध्यायाचा हा विषय नव्हे. परंतु ओघाओघाने हे लिखाण झाले आहे म्हणून या मुद्यावर थोडा अधिक प्रकाश टाकतो.

ईश्वरभक्तीने, साधनेने, एखाद्या सिद्धसाधकाच्या सहवासाने भक्तांचे देह शुद्ध होऊ लागतात. देह शुद्ध होऊ लागल्याबरोबर दान व परोपकार करून सद्गुणांचे आचरण करणे अत्यंत आवश्यक असते. असे न करता भक्त वेगळेच वागू लागतात. सत्पुरुषाला मुठीत ठेवण्यासाठी प्रयत्न करणे, स्वत:च्या स्वार्थासाठी सत्पुरुषाचा वापर करणे, आध्यात्मिक प्रगतीसाठी काहीही प्रयत्न न करणे,

कुसंगतीत राहणे, सत्पुरुषासमोर अहंकाराने वागणे असे प्रकार भक्तलोक करतात. काही भक्त लोक ईर्षा, द्वेष व मत्सरही करतात. अशा भक्तांना देवयान पंथाचा लाभ होत नाही. त्यांची देह, मन, बुद्धी अशुद्ध होतात, अपवित्र होतात व पिशाच्चशक्ती त्यांना आपल्या लोकात घेऊन जातात.

आध्यात्माचा मार्ग हा एव्हरेस्टचे शिखर चढण्यासारखा आहे व अतिशय निसरडा आहे. थोडा जरी पाय घसरला तरी साधक एकदम तळापर्यंत घसरतो. एकदा का साधक तळापर्यंत घसरला की वातावरणातील दुष्टशक्ती त्याच्यावर अंमल गाजवू लागतात. त्याला पुन्हा आध्यात्माचा पर्वत चढू देत नाहीत. आजकालचे सद्भक्त तर टी. व्ही. सिरीयल बघून आपल्या गुरुने त्या सिरीयल प्रमाणे वागावे असे म्हणणारे असतात. खरी श्रद्धा व खरी भक्ती असणारे भक्त सध्याच्या काळात दुर्मिळ आहेत.

महाविष्णू ही स्टेज प्राप्त झालेल्या योग्याला किंवा महालक्ष्मी ही स्टेज प्राप्त झालेल्या योगिनीला असंख्य विषयांचे ज्ञान होते. परंतु या पूर्वी ब्रह्मा स्टेजचे वर्णन करताना दोन प्रकारच्या साधकांच्या विषयी लिहिलेले आहे. यापैकी एका साधकाला गुरु ज्ञानमार्गाने नेतो तर दुसऱ्या साधकाला ज्ञानाच्या मार्गाने न नेता कसलाही अनुभव न देता मुक्कामाच्या ठिकाणावर नेऊन पोहोचवितो, असे

लिहिले आहे. देवयान पंथाचे वर्णन करताना ज्ञानमार्गामध्ये जे काही अनुभव येतात त्यातील पाच टक्क्यांचे वर्णन केले गेले आहे. इतर पंच्याण्णव टक्के अनुभव हे समाजासमोर प्रकट करण्याची वेळ आलेली नाही. त्यामुळे ज्या साधकांना असे काही अनुभव येत नाहीत त्यांनी निराश होण्याचे कारण नाही. जर श्रीगुरुने तुमचा अंगिकार केला असेल व तुम्ही जर काया, वाचा, मनाने, बुद्धीने श्रीगुरुशी प्रामाणिक असाल व कसलीही लपवालपवी न करता सेवा करत असाल तर श्रीगुरु नक्कीच तुम्हाला मुक्कामापर्यंत नेऊन पोहोचवेल. पण श्रीगुरुशी लबाडी करणाऱ्या भक्तांचे पुण्य वातावरणातील भूत-भैरव हरण करतात व त्यांना पिशाच्चलोकात ढकलून देतात हेही तितकेच खरे आहे. काही लोक आपल्या श्रीगुरुशी किती भयानक पद्धतीने वागतात हे मी स्वत: पाहिलेले आहे व त्यांच्या होणाऱ्या दुर्गतीची जाणीव असल्या कारणाने नाईलाजाने हे लिहावे लागत आहे.

महाविष्णू स्टेज (अर्हता) प्राप्त झालेला सिद्धसाधक समाजापासून दूर राहून एकांतात आपली पुढील योगसाधना चालू ठेवतो. वीस-पंचवीस फुटावरून माणसाची स्पंदने त्याला कळत असतात. त्यामुळे एखाद्या पवित्र आत्म्याला जवळ ठेवून तो सर्वांपासून दूर जातो व साधना करतो.

## शंकर – पार्वती

आत्तापर्यंत गणपतीपासून विष्णूपर्यंत अवस्थांचे वर्णन करून झाले. ही सर्व रूपकात्मक पदे आहेत.

**कलेक्टर** हा माणूस असतो. त्याला भेटून आल्यानंतर आपण **कलेक्टरला** भेटून आलो असे म्हणतो. त्या माणसाचे नाव गौण ठरते व पद महत्त्वाचे ठरते.

साधक कुठल्या पायरीवर आहे. हे समजण्यासाठी पुरुषांसाठी गणपती, ब्रह्मा, विष्णू, शंकर इत्यादी पदवाचक नामे आहेत. तर स्त्रियांसाठी सरस्वती, गायत्री, महालक्ष्मी व पार्वती इत्यादी नामे आहेत. या सर्व चढत्या पायऱ्या असून, आपण कोठपर्यंत येऊन पोहोचलो हे समजण्यासाठी या प्रांतांना किंवा या अवस्थांना ही नावे दिलेली आहेत.

तत्त्वज्ञानाच्या भाषेमध्ये **ब्रह्मा** या शब्दाचा अर्थ उत्पत्ती करणारा. **विष्णू** या शब्दाचा अर्थ पालन करणारा व **महेश** (रुद्र) या शब्दाचा अर्थ संहार करणारा असा आहे. इंग्रजांनी या तिघांना एकत्र करून एकच शब्द बनविला **GOD.**

| | | |
|---|---|---|
| G. | Generator (Creator) | **ब्रह्मा** |
| O. | Organiser (Sustainer) | **विष्णू** |
| D. | Destroyer (Destroyer) | **महेश** |

यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, ज्याप्रमाणे आपल्या तत्त्वज्ञानी लोकांनी देव-देवतांना विशिष्ट पदे बहाल केलेली आहेत तशीच पाश्चात्य तत्त्वज्ञानी लोकांनी पण बहाल केलेली आहेत. उत्पत्ती, स्थिती, लय करणाऱ्या शक्ती एकत्र झाल्या की परमेश्वर म्हणतात. इंग्रजीत G, O, D एकत्र झाल्यानंतर गॉड शब्द तयार होतो. गॉड म्हणजे परमेश्वर! साधना करणाऱ्या साधकांना आपण कोठपर्यंत येऊन पोहोचलो हे समजावे म्हणून विविध नावे विविध अवस्थांना दिलेली आहेत. भक्त ज्यांना देव-देवी समजतात, योग्यांसाठी त्याच गोष्टी अवस्था, प्रांत किंवा शक्तीचा एक प्रकार असतो. ज्या देवांना पुरुष ब्रह्मा, विष्णू, महेश म्हणतात, ज्यांना स्त्रिया सरस्वती, लक्ष्मी, महाकाली म्हणतात, त्यांनाच योगी इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, क्रियाशक्ती असे म्हणतात.

महाविष्णूचा प्रांत ओलांडून सिद्धसाधक जसजसा पुढे जाऊ लागतो तसतसा त्याला निळा रंग दिसू लागतो व निळ्या रंगाचे आकाश दिसू लागते. या प्रांताला शंकर-पार्वतीचा प्रांत असे म्हणतात. येथे सिद्धसाधकाला शंकर किंवा रुद्र अशी अवस्था प्राप्त होते. तर स्त्री सिद्धसाधकाला पार्वती, उमा, ललिता, षोड्षी त्रिपुरसुंदरी, राजराजेश्वरी अशा विविध नावांनी ओळखले जाते. येथील निळा प्रकाश अत्यंत चमकदार असतो. या निळ्या

प्रकाशातून असंख्य देव-देवता प्रकट होऊन साधकाला दर्शन देतात. येथून पुढे तीन मार्ग जातात. सिद्धसाधकाने कुठल्या मार्गाने जायचे हे त्याचा गुरु ठरवितो. येथे गुरु साक्षात् परमेश्वर किंवा भगवान् दत्तात्रेय असतात. देवयान पंथाच्या मार्गावर ठिकठिकाणी महायोगी, महासिद्ध मार्गदर्शन करण्याकरिता बसलेले असतात; ते सिद्ध साधकांना मार्ग दाखवून देतात. सद्‌गुणी, अहंकार रहित व निर्मळ मनाचा सिद्धसाधक देवयान मार्गामध्ये अतिशय वेगाने प्रगती करतो.

येथून जे तीन मार्ग जातात या तीन मार्गांपैकी कुठल्या मार्गाने जायचे हे सिद्ध साधकाचा गुरु ठरवित असतो. कारण प्रत्येक भक्ताच्या वृत्ती भिन्न असतात व श्रीगुरुला आपल्या भक्तामध्ये असणाऱ्या प्रत्येक प्रवृत्तीची चांगली माहिती असते. आपल्या भक्तातील कुठली प्रवृत्ती भक्ताचे आध्यात्मिक नुकसान करेल याची जाण असल्या कारणाने गुरु आपल्या भक्ताला नेहमी एका विशिष्ट प्रकारच्या शिस्तीमध्ये ठेवत असतो. श्रीगुरुची ही शिस्त कधीही कोणाला कळत नाही व म्हणून श्रीगुरुच्या इच्छेविरुद्ध कधी वागू नये म्हणतात ते अक्षरश: खरे आहे. या प्रकरणामध्ये जरी गुरु हा शब्द अनेक वेळा आलेला असला तरी वाचकांनी श्रीगुरु म्हणजे कोणीतरी हाडामांसाचा देहधारी मनुष्य असा घेऊ नये. येथे

श्रीगुरु म्हणजे आपल्याच अंत:करणात राहणारा परमात्मा असा अर्थ घ्यावा.

शिव-पार्वती प्रांतातून जे तीन मार्ग निघतात त्याची आता माहिती घेऊ.

**एक**

या मार्गाने जाणाऱ्या सिद्धसाधकाला निळ्या रंगाचा प्रकाश, चिदाकाश व असंख्य देव-देवतांची दर्शने होतात. त्या देवता व आपण एकच आहोत, असा भाव त्याच्या मनात निर्माण होतो. पुष्कळवेळा या देवता बोलतातही व मार्गदर्शनही करतात. दूरची दृश्ये दाखवितात, चालू घटना व भविष्यकालीन घटनाही दाखवितात, प्रगाढ ध्यान लागते व सविकल्प समाधीही लागते. निर्गुणाच्या उपासनेमध्ये प्रगती होते. निरनिराळ्या प्रकारचे आनंद प्राप्त होतात. संकल्प पूर्ण होऊ लागतात. जीवनमुक्तीचा मार्ग प्रशस्त होऊ लागतो.

**दोन**

या दुसऱ्या मार्गामध्ये विविध प्रकारच्या वनस्पतींचे ज्ञान सिद्धसाधकांना होते. औषधी वनस्पती, किमया, जादूच्या विद्या अशा अनेक गोष्टी साध्य होतात. रसायन विद्या, वेगाने चालण्याची विद्या, अदृश्यकरणी, किमयागिरी अशा विविध प्रकारच्या विद्या

साधकाला साध्य होतात; येथे साधक फसण्याची दाट शक्यता असते. म्हणून कृपाळू गुरु या रस्त्याने सिद्धसाधकाला जाऊ देत नाहीत. कारण इतक्या उंचीवर पोहोचलेल्या सिद्धसाधकाचे नुकसान होऊ नये असा श्रीगुरुचा हेतू असतो.

**तीन**

तिसऱ्या मार्गामध्ये कुठलाच अनुभव येत नाही. परंतु आनंद, शांती, समाधान या गोष्टींची प्राप्ती होते. सद्गुण वाढतात. देव-देवता अशा साधकाचे संरक्षण करू लागतात व कुठलाही अडथळा न येता या मार्गाने जाणारा साधक शेवटच्या मुक्कामापर्यंत सुखरूप पोहोचतो.

असे हे तीन मार्ग आहेत. यापैकी तिसरा मार्ग हा समाधान व शांतीचा आहे. जे लोक -

**ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ।।**

या वृत्तीने वागतात व साधना करतात त्यांचा शिव पार्वतीच्या प्रांतात प्रवेश लवकर होतो. यासाठी निरपेक्ष वृत्तीची कास धरावी लागते. निरपेक्षवृत्ती जेवढी वाढेल तेवढी या मार्गात प्रगती होते.

या तीन पैकी कुठल्याही मार्गाने सिद्धसाधक पुढे जात राहतो. तेजस्वी निळ्या प्रकाशाचे वातावरण संपू लागते व दूधाप्रमाणे शुभ्र धवल प्रकाश दिसू लागतो. ही चिदाकाशाची सुरुवात असते.

शून्याची सुरुवात असते. सगुण ब्रह्माच्या अंतिम टप्प्यापर्यंत साधक पोहोचलेला असतो.

## दत्त-दुर्गा

सिद्धसाधक दत्त या स्टेजच्या जवळपास पोहोचेपर्यंत त्याने नऊ मिती पार केलेल्या असतात. एखादी सिद्ध योगिनी जेव्हा या स्टेजला पोहोचते, तेव्हा तिला दुर्गा म्हटले जाते. ही शेवटची स्टेज आहे, येथे अक्षर ब्रह्माचा प्रांत संपतो. येथे साधक स्वयंभू होतो. कुठलीही देवी, देवता, सिद्ध, महासिद्ध त्याच्या उपयोगी पडू शकत नाहीत. त्याला मार्गदर्शन करू शकत नाहीत. ती पूर्णावस्था असते. परिपक्वावस्था असते, सिद्धावस्था असते. अद्वैत अवस्था असते. मात्र अशा योग्याची जे कोणी निर्मळ मनाने, शुद्ध भावनेने सेवा करतात त्यांचे प्रारब्ध शुद्ध होते. ही सर्वतोपरी पूर्णावस्था आहे. येथून पुढे काही जाणायचे बाकी रहात नाही. हा सर्व प्रांत दूधाप्रमाणे धवल किंवा बर्फाप्रमाणे धवल दिसतो. या प्रांताला चिदाकाश असे म्हणतात. दत्त-दुर्गा अवस्थेतील योगिनींची देव-देवताही सेवा करतात. देवतांचा उद्धार करण्याचे सामर्थ्य यांच्यामध्ये असते. शुद्ध भावनेने सेवा करणारे लोक यांच्या जवळ टिकतात व अशुद्ध भावनेचे लोक यांच्यापाशी टिकू शकत नाहीत.

या अवस्थेतील लोक चार प्रकाराने समाजात वावरतात. हे प्रकार पुढील प्रमाणे -

**बाल**

या अवस्थेत राहणारा योगी लहान मुलाप्रमाणे पडून राहतो किंवा बसून राहतो. तो जेथे राहतो तेथेच मलमूत्र करतो. त्याला काहीही कळत नाही. त्याचे वागणे दीड-दोन वर्षाच्या मुलासारखे असते. शरीर साठ-सत्तर वर्षांचे होते पण याचे बालपण संपलेले नसते. अशाच अवस्थेत शरीराचा मृत्यू होतो.

**उन्मत्त**

या अवस्थेत राहणारे योगी हे दारू पितात, चिलीम ओढतात, विड्या-सिगरेट पितात, चिडतात, रागावतात, कधी-कधी दगड मारतात, आपल्या भक्ताला चोपून काढतात. यांच्या चिडण्याने रागावण्याने भक्तांची पातके धुतली जातात. त्यांच्या दगड मारण्याने भक्तांच्या प्रारब्धाचा क्षय होतो. हे लोक खूप शिव्या घालतात. यांच्या सर्व कृती या आपल्या भक्तांच्या प्रारब्धाच्या शुद्धीसाठी असतात.

**पिशाच्च**

येथे पिशाच्च या शब्दाचा अर्थ वेडा. दत्त अवस्थेला

पोहोचलेला सिद्धपुरुष वेड्यासारखा राहतो. लोकांना शिव्या घालतो, दगड मारतो, कोणी काही दिले तर खातो.

बाल, उन्मत्त, पिशाच्च या अवस्थेत राहणारे योगीपुरुष हिमालयात बरेच दिसून येतात. महाराष्ट्रात शंभर दिडशे वर्षांपूर्वी अशा अवस्थेत राहणारे योगी खूप होते. गोंदवलेकर महाराज आपल्या भक्तांना खडावाने चोपून काढीत असत. शिर्डीच्या साईबाबांजवळ सतत सटका (काठी) असे. या जाडजूड काठीने ते भक्तांना चोपून काढीत असत. एकदा का ते रागावले की दोनशे माणसांची पळता भुई थोडी होत असे. पुण्याचे काळबुवांकडे जो कोणी येई त्याच्यावर ते दगड फेकून मारत असत. ज्याला दगड लागे त्याचे भाग्य उदयाला येत असे. अशा या सिद्धांच्या सिद्धकळा !

## सहजावस्था

काळाच्या व समाजाच्या गरजेनुसार एखादा सिद्ध सहजावस्थेत राहतो. सहजावस्थेत म्हणजे सर्वसामान्य माणसासारखा राहतो. अज्ञानाचे पांघरूण त्याने असे काही ओढलेले असते की सर्वांनाच असे वाटते की, याला काहीच कळत नाही. स्वार्थी, संधीसाधू, फसवे, लबाड असे लोक त्याचा फायदा घेतात, त्याला फसवतात परंतु अशा सिद्धाच्या भोवती त्याचे संरक्षण करण्याकरिता काही देव-देवता रहात

असतात व या सिद्धपुरुषाला वेळोवेळी कोण कसे आहे, लोक सिद्धपुरुषाच्या समोर कसे वागतात व मागे कसे वागतात याची जाणीव देत असतात. सिद्धपुरुष क्षमाशील असल्याने अनेक वेळा ते अशा लबाड, स्वार्थी भक्तांना क्षमा करतात. परंतु दहा-वीस वर्षे सांभाळून सुद्धा जर भक्तातील दोष, दुर्गुण गेले नाहीत तर ते भक्ताशी संबंध तोडून टाकतात. अशा भक्ताला मग देव-देवतांनी केलेल्या शिक्षा भोगाव्या लागतात.

ज्यांची मने निर्मळ आहेत, अशी माणसे सहजावस्थेमध्ये राहणाऱ्या सिद्धयोग्याच्या अथवा योगिनीच्या संपर्कात येताचक्षणी त्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन होते. प्रचंड वेगाने आध्यात्मिक प्रगती होऊ लागते. ध्यान लागू लागते, देव-देवतांची दर्शने होऊ लागतात, सविकल्प, निर्विकल्प समाधी लागू लागते. परमानंदाची प्राप्ती होते, जीवन धन्य होते. असे सद्‌भक्त हळूहळू सिद्धावस्थेला जाऊन पोहोचतात व आपल्या श्रीगुरुचे कार्य आणि परंपरा पुढे चालवत राहतात. अर्थात वातावरणातील देव-देवता अशा सद्‌भक्तांच्याही परीक्षा घेत असतात. या परीक्षांमध्ये टिकल्यास पुढील मार्ग मिळतो अन्यथा प्रगती खुंटते.

देवयान पंथामध्ये कोठकोठले टप्पे येतात हे आपण पाहिले व त्यातील शेवटची अवस्था कुठली हेही पाहिले. हा सर्व धवल

मार्गाचा म्हणजे शुद्ध मार्गाचा प्रवास झाला हेही पाहिले. याच्या विरुद्ध सुद्धा एक मार्ग आहे. तो भयानक असा अंध:कारमय मार्ग आहे. त्यासाठी काहीच कष्ट करावे लागत नाही. तो मार्ग काळ्याकुट्ट कृष्ण विवराकडे जातो. हजारातील नऊशे नव्याण्णव माणसे काळ्याकुट्ट अंध:कारमय लोकात जाऊन पडत असतात, त्याची चर्चा न केलेली बरी.

देवयानपंथाचे वर्णन संपले. देवयान पंथाचे सार सांगायचे झाल्यास मनाचा सरळपणा, सद्गुण, ईश्वरभक्ती, साधना व गणपती पासून दत्तापर्यंतचे सर्व टप्पे, क्वचित एखाद्यालाच हा देवयानपंथ मिळतो. ज्याला मिळाला तो **भाग्यवान**.

देवयान पंथाद्वारे निर्मळ मनाचा आत्मा परमात्मा पदापर्यंत पोहोचू शकतो. परंतु त्याला जर परमेश्वर व्हायचे असेल तर त्याला आणखी दोन टप्पे पार करावे लागतात. बरेच योगी त्या खटपटीत पडत नाहीत. म्हणून त्या विषयींची चर्चा येथे करणे योग्य नाही.

# ९. देवयान पंथातील समस्या

**ईश्वरभक्तीने, साधनेने,** सत्पुरुषाच्या सेवेने आपले सूक्ष्म शरीर शुद्ध व तेजस्वी होऊ लागते. सूक्ष्म शरीर तेजस्वी व शुद्ध झाल्यानंतर  काही नवीन समस्या निर्माण होतात. या नवीन समस्यांविषयींचे माझे स्वत:चे काही अनुभव पुढे देत आहे.

अपवित्र व्यक्ती समोर आल्यानंतर आपले सूक्ष्म शरीर अशुद्ध होऊ लागते व खूप त्रास होऊ लागतो. आध्यात्मिक दिव्य आनंद कमी होतो अथवा नष्ट होतो. वाईट स्वप्ने पडू लागतात. आजारपण येते, अशावेळी पुन्हा साधना करून सर्व सूक्ष्म शरीर शुद्ध व तेजस्वी करावे लागते. हा एकच उपाय असतो. जर हा उपाय केला नाही तर हळूहळू सूक्ष्म शरीर जड होऊ लागते. त्रासाची जाणीव होणे बंद होते व आपणही सर्वसामान्य माणूस बनतो. हजारातील नऊशे नव्याण्णव लोक अपवित्र व अशुद्ध असतात. आपणही त्यांच्यातील एक बनतो. यावर एकच उपाय

असतो तो म्हणजे समाजापासून थोडे दूर राहणे, एकांतवासात राहणे व ठराविक लोकांच्या गाठीभेटी घेणे.

अपवित्र माणसांच्या सहवासाने संगतीने अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होऊ शकतात. कोणाला कशा समस्या होतील हे सांगता येत नाही.

चेहरा निस्तेज होणे, सर्वांगाला सूज येणे, डोळे खोल जाणे, पोटऱ्या दुखणे, भयंकर डोकेदुखी, ब्रह्मरंध्राच्या जागी दुखणे, घसा दुखणे, सतत कफ व सर्दी होणे, ॲसिडीटी होणे, उलट्या होणे, खूप गॅस होणे अशा विविध प्रकारच्या समस्या सूक्ष्म शरीर अशुद्ध झाल्याने निर्माण होऊ शकतात. झोपेमध्ये हात पाय अचानक वर उडून आपटणे असेही प्रकार घडतात.

सूक्ष्म शरीर आणखी शुद्ध झाल्यानंतर अपवित्र माणसाचा आवाज फोनवर ऐकल्यानंतर भयंकर त्रास होऊ लागतो. इतकेच नव्हे तर साधकाच्या पवित्र सूक्ष्मदेहामध्ये फोनवर बोलणाऱ्या माणसाच्या पाठीमागे असणारे असंख्य आत्मे साधकाकडे येतात व साधकाला त्रास देऊ लागतात. सूक्ष्मदेह अतिशय तेजस्वी झाल्यास २५-३० फुटांवरील अशुद्धता तो खेचू लागतो. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. जागेतील अशुद्ध स्पंदने, खुर्चीतील स्पंदने, गाडीच्या सीटमधील स्पंदने, इतकेच नव्हे तर कागदातील

स्पंदनेही समजू लागतात व जे अशुद्ध असेल त्या सर्वांपासून दूर राहणे हा एकच उपाय करणे योग्य ठरते.

एकदा एका ज्योतिष्याने मला भेट म्हणून एक ग्रहाचा खडा पाठविला. त्याने प्रेमाने दिलेली भेट म्हणून मी ती खड्याची पुडी माझ्यापासून दोन-तीन फूट अंतरावर ठेवली व ध्यान करू लागलो. थोड्या वेळातच मला त्या ज्योतिष्याचे पूर्वजन्म, पूर्वजन्मातील कर्मे व पुढील जन्म असे सर्वकाही दिसू लागले. या शिवाय मृत्यूनंतर तो कुठल्या लोकात जाणार हे ही दिसले व त्या खालच्या दर्जाच्या लोकाशी माझा कॉन्टॅक्ट होऊ लागला व खूप त्रास होऊ लागला. मी ध्यान विसर्जन केले व खडा दूर फेकून दिला. लगेच सर्व त्रास बंद झाले.

एकदा एका पंच्याऐंशी वर्षांच्या वृद्ध गृहस्थाने मला एका साधूचा फोटो दिला. हे साधू सुमारे शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले. मी तो फोटो माझ्या ध्यानाच्या जागी मोठ्या आदराने व भक्ती भावाने लावला. त्या दिवशी ध्यान करताना मला खूप त्रास होऊ लागला. त्या साधूने काही तंत्र साधना केली होती व भयंकर अशा पिशाच्च लोकात तो यातना भोगत होता. त्याचा फोटो माझ्या पासून फक्त पाच फुटावर असल्याकारणाने तो साधू मृत्यूनंतर ज्या लोकात यातना भोगत होता त्या लोकाशी माझा संपर्क होऊ

लागला. मी तात्काळ ध्यान विसर्जन केले व तो फोटो उचलून दूर नेऊन ठेवला. तद्नंतर परत ध्यानाला बसलो. काहीही त्रास झाला नाही व ध्यानही व्यवस्थित झाले.

एकदा कारने प्रवास करत होतो. प्रवासात वाचण्यासाठी एक पुस्तक घेतले होते. ते पुस्तक माझ्याजवळ होते. पुस्तक वाचायचा विचार करत होतो. परंतु माझे डोळे जड होऊ लागले. म्हणून उशाशी पुस्तक घेऊन सीटवर आडवा पडलो. झोप लागलीच नाही. परंतु माझ्यातील त्राण नाहीसे झाले. आपली सर्व शक्ती कोणीतरी खेचून घेत आहे असा अनुभव येऊ लागला. हात हालविण्याचे, डोळे उघडण्याचे त्राण अंगात राहिले नाही. शेवटी जोराने मनातल्या मनात **गुरुदेव दत्त** असे म्हटले व जोर लावून उठलो. बरेच थकल्यासारखे वाटत होते, अशक्तपणा जाणवत होता. या पुस्तकात असे काय आहे म्हणून पुस्तक उघडून पाहिले तर पुस्तकात नवमुंडी सिद्धासनाचा फोटो होता. नवमुंडी सिद्धासन म्हणजे नऊ प्राण्यांची मुंडकी जमिनीत पुरून तयार केलेले सिद्धासन.

पिशाच्च शक्तींनी भारलेल्या एखाद्या शक्तिपीठाच्या फोटोत साधकातील दैवीशक्ती खेचून घेण्याचे जर सामर्थ्य असेल तर प्रत्यक्ष त्या पिशाच्च शक्तीच्या पीठामध्ये किती भयंकर सामर्थ्य

असू शकते याची कल्पना वाचकांनीच करावी. अशाप्रकारे पिशाच्च शक्तींनी भारलेली शक्तिपीठे तेथे दर्शनास येणाऱ्या सर्वांची शक्ती खेचून घेतात व स्वत: पुष्ट होत राहतात. दर्शनास जाण्याऱ्या लोकांना मात्र आपले काहीतरी काम झाल्याचा भ्रम निर्माण होतो व या शक्तीपीठांमध्ये असते काय, तर प्राण्यांची भुते व या पिशाच्च्यांच्या अनुषंगाने तेथे गोळा झालेली कोट्यावधी पिशाच्चे !

लोक अशा जागी जातात, 'मूल होऊ दे' म्हणून प्रार्थना करतात. अशा जागी प्रार्थना केल्यानंतर मूल हमखास होते. कारण तेथे असणाऱ्या कोट्यावधी पिशाच्चांना जन्म घेण्याची, दारू पिण्याची व गुंडगिरी करण्याची अतिशय इच्छा असते. असे सर्व आत्मे तेथे जाऊन प्रार्थना करणाऱ्या लोकांच्या पोटी जन्माला येतात. इतकेच नव्हे तर अशा जागी जाणाऱ्या लोकांच्या मागून शेकडो पिशाच्चे लोकांच्या घरात शिरतात व घरामध्ये अशांती निर्माण करतात. अशा स्थानांचे आणखी एक वैशिष्ट्य असते. अशा जागी जाऊन एखाद्याचे वाईट व्हावे म्हणून प्रार्थना केली तर ही प्रार्थना लगेच फलद्रूप होते म्हणून अशा जागी ईर्षा, द्वेष, मत्सर करणाऱ्या अतिसामान्य माणसांची गर्दी होत असते.

ज्या नवमुंडी शक्तिपीठाचा फोटो पुस्तकात छापलेला होता

ते नवमुंडी शक्तिपीठ शंभर वर्षांपूर्वी एका साधूने निर्माण केले. हा साधू असंख्य चमत्कार करत असे. अनेक सुशिक्षित लोक या शक्तिपीठाचे भक्त होते. त्यातील एक व्यक्ती तर आध्यात्मावर असंख्य पुस्तके लिहिलेली व संस्कृतची पंडित होती. वेद, उपनिषदे व पुराणग्रंथ त्यांना जवळजवळ तोंडपाठ होते. अनेक युनिव्हर्सिटींनी अनेक वेळा विद्वान पंडित म्हणून त्यांचा गौरव केला होता. अनेक डॉक्टरेट त्यांना दिलेल्या होत्या. अनेक साधू संतांच्या भेटीही त्यांनी घेतल्या होत्या व ब्रह्मज्ञानावर चर्चाही केली होती. अशी ही महान व्यक्ती या नवमुंडी शक्तिपीठाची भक्त होती व हे शक्तिपीठ निर्माण करण्यासाठी त्या साधूला त्यांनी भरपूर सहकार्य केले होते. **यावरून विद्वत्तेने सत्य ज्ञानाचा प्रकाश प्राप्त होत नाही हे सिद्ध होते.**

एकदा एका पवित्र व्यक्तीबरोबर फोनवर बोलत होतो. तेवढ्यात अचानक तेथे एक अपवित्र व्यक्ती आली व माझ्याशी फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीपासून सात-आठ फुटावर उभी राहिली. त्या अपवित्र व्यक्तीची अपवित्र स्पंदने पवित्र व्यक्तीच्या देहात शिरून फोनद्वारा माझ्यापर्यंत पोहोचली व मला त्रास होऊ लागला. मी तात्काळ विचारले, ''आत्ता तुझ्याकडे कोणी आले आहे का ? कारण खूप अपवित्र स्पंदने माझ्याकडे येत आहेत.''त्या

पवित्र व्यक्तीने उत्तर दिले - ''हो !'' एक व्यक्ती आत्ताच माझ्याकडे आली असून ती माझ्यापासून आठ-दहा फुटावर उभी आहे, असे सांगून त्या पवित्र व्यक्तीने फोन ठेवून दिला.

अपवित्र व्यक्तीबरोबर जेव्हा फोनवर बोलण्याचा प्रसंग येतो तेव्हा भयंकर त्रासाला तोंड द्यावे लागते. व्यक्ती जितकी अपवित्र असेल तितका त्रास जास्त! सर्वसाधारणपणे हे त्रास दोन प्रकारचे असतात.

१) अपवित्र व्यक्तीबरोबर फोनवर बोलल्याने आपले सूक्ष्म शरीर अपवित्र होते व ते शुद्ध करण्यासाठी अनेक तास साधना करावी लागते. यामुळे आपल्या आध्यात्मिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात.

२) खूप-खूप अपवित्र व्यक्तीबरोबर फोनवर बोलल्याने त्या व्यक्तीच्या अवती भोवती असणारी पिशाच्चे आपल्याकडे येतात व आलेल्या सर्व पिशाच्चांना सद्‌गती देण्यासाठी आपल्याला अनेक दिवस साधना करावी लागते. आपल्यातील पावित्र्य खूप कमी होते, पुन्हा मूळपदावर यायला अनेक दिवस लागतात.

मी असे अनेक लोक पाहिले आहेत जे बऱ्याच प्रमाणात पवित्र झाले. परंतु स्वत:तील पावित्र्य त्यांना सांभाळता आले नाही. देवलोकाच्या जवळपास पोहोचलेले हे लोक पुन्हा अगदी

पिशाच्च लोकापर्यंत खाली घसरले. अशा घसरत गेलेल्या लोकांविषयी काही न बोलणे हेच बरे !

अनेक पवित्र व्यक्ती माझ्याकडे येतात व अपवित्र व्यक्तींमुळे कसे-कसे त्रास त्यांना होतात याविषयी मला सांगतात. यातून विविध प्रकारचे ज्ञान होते.

काही महाभाग असेही असतात स्वत: अतिशय अपवित्र असतात. पवित्रता म्हणजे काय, अपवित्रता म्हणजे काय हे त्यांना कळतही नसते. परंतु माझी पुस्तके वाचून अथवा साधक लोकांच्या चर्चा ऐकून आपण कसे पवित्र आहोत याचे सोंग करायला जातात पण हे सोंग फार काळ टिकत नाही. तर काही माणसे स्वत:तील दूषित स्पंदने समजून घेऊन ती घालविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करतात.

एका पती-पत्नीचे माझ्यावर खूप प्रेम होते व माझेही त्यांच्यावर खूप प्रेम होते. ज्या ज्या वेळी मी त्यांच्याशी फोनवर बोलत असे त्या त्या वेळी त्यांच्याकडून येणाऱ्या पिशाच्च स्पंदनांचा मला अतिशय त्रास होत असे. मी त्यांना स्पष्टपणे सांगत असे; उपासना, भक्ती वाढवा नाहीतर मृत्यूनंतर पिशाच्च लोकात जाल. तेही भरपूर साधना करून स्वत:तील स्पंदने शुद्ध करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत. त्यांच्या स्वभावात काही किरकोळ

दोष होते. या दोषांमुळे उपासनेने थोडे फार शुद्ध झालेले त्यांचे शरीर पुन्हा-पुन्हा अशुद्ध होत असे.

अनेकदा या भक्ताबरोबर बोलल्यानंतर हजारो पिशाच्च आत्म्यांनी मला सतावले व खूप त्रास दिला. ज्या ज्या वेळी या पती-पत्नीकडून माझ्याकडे काही कागद किंवा वस्तू येत असे त्या त्या वेळी त्या कागदांबरोबर, पुस्तकांबरोबर किंवा वस्तूंबरोबर खूप अशुद्ध स्पंदने येत असत. या सर्व वस्तू शुद्ध करून मगच मी त्या हाताळीत असे.

त्यांनी स्वत:ला शुद्ध करावे, पवित्र करावे म्हणून माझे प्रयत्न चालू होते व त्यांच्या आसपास असणारी पिशाच्चशक्ती त्यांना दुर्बुद्धी देत होती. हळूहळू ते माझ्याशी खोटे बोलू लागले. मला उल्लू बनवू लागले. यामुळे वातावरणातील देव-देवताही त्यांच्यावर रुष्ट झाल्या. वातावरणातील देव-देवता रुष्ट झाल्याकारणाने पिशाच्च शक्तीने त्यांना पूर्ण घेरून टाकले व माझ्यापासून दूर केले. अशाप्रकारच्या अनेक घटना घडल्या. यावरून मी एकच निष्कर्ष काढला की, पूर्वज जर पिशाच्च लोकात अडकले असतील तर पृथ्वीतलावरील त्यांचे वंशज देवयान पंथात टिकू शकत नाहीत.

पूर्वजांना सद्गती मिळावी व आपला परमार्थाचा मार्ग सुकर व्हावा म्हणून खूप-खूप ईश्वरसेवा करावी लागते किंवा पायी

तीर्थयात्रा कराव्या लागतात व या दोन्ही गोष्टी करताना स्वभाव सरळ व साधा असावा लागतो तरच त्याचा फायदा पूर्वजांना होतो.

**''ज्याप्रमाणे आपण परोपकार, दान-धर्म, ईश्वरभक्ती केली असता त्याचा फायदा पूर्वजांना सद्गती देण्यासाठी होतो व त्याने आपली ऐहिक व पारमार्थिक उन्नती होते. त्याचप्रमाणे आपण जर धूर्ततेने, कपटाने, ईर्षा, द्वेष, मत्सराने वागलो तर आपल्या पूर्वजांच्या शिक्षेत वाढ होत असते.''**

एक पती-पत्नी मनापासून सेवा, भक्ती व साधना तिनही गोष्टी व्यवस्थित करत होते. त्यामुळे ते सर्व बाजूंनी सुखी झाले. सर्व समस्या व अडचणी दूर निघून गेल्या. जीवनात आनंद निर्माण झाला. पत्नीमध्ये काही दोष होते. त्यामुळे मी तिला सारखा ओरडत रहायचो व तिच्यातील दोष घालविण्यासाठी प्रयत्न करायचो. आपली आध्यात्मात खूप प्रगती व्हावी व आपल्या प्रगतीने स्वामीजी चकीत व्हावे असे तिला वाटायचे. म्हणून तिने एका तथाकथित साधूचे मार्गदर्शन घ्यायला सुरुवात केली व त्या साधूच्या मार्गदर्शनानुसार साधना करू लागली. परिणाम उलटा झाला. तो साधू पिशाच्च साधना करणारा होता व यामुळे ही स्त्रीही पिशाच्च लोकात खेचली जाऊ लागली. घरातील

आनंदाचे वातावरण नष्ट झाले, घरात राहणे ही कठीण होऊन बसले.

मी एकांतवासातील साधना आटोपून आश्रमात आलो. त्या स्त्रीचा फोन आला. ती फोनवर म्हणाली ''हॅलो !'' तिचा हॅलो ऐकताच मला गरगरु लागले. मी जोराने ओरडलो, ''फोन ठेवून दे !''

फोन ठेवून मी बेडवर आडवा पडलो. तिची अधोगती मला दिसून आली. ती इतक्या खालच्या पातळीवर गेली होती की, मृत्युनंतर तिला शेकडो वर्षे पिशाच्च लोकात रहावे लागले असते व तद्नंतर अनेक जन्म मगरीचे आले असते. ध्यानामध्ये या सर्व गोष्टी मला दिसल्या. त्यानंतर मी तिला दुसऱ्या एका व्यक्तीमार्फत निरोप दिला. ज्या साधूच्या संगतीने तू स्वत:ची अधोगती केली आहेस त्या साधूची संगत सोडून दे ! व '**श्री दत्त जय दत्त**' या मंत्राचा तीन लाख जप कर ! श्रीदत्त स्तोत्राचे सोळा हजार पाठ कर ! देवीसूक्ताचे चौदा हजार पाठ कर ! देवी कवचाचे चौदाशे पाठ कर ! नारायणी स्तुतीचे दहा हजार पाठ कर ! एक लाख हवनयुक्त मंत्राचे अनुष्ठान कर इतक्या सर्व गोष्टी केल्यानंतरच मला फोन कर ! याशिवाय घरातील प्रत्येक कोपऱ्यात पाण्यामध्ये नारळ ठेव ! झोपण्याच्या बेडवर, चादर व उशीवर नारळ ओला

करून ठेव. सोफासेटवर नारळ ओले करून ठेव असा निरोप तिला दिला.

तिला पश्चात्ताप झाला. तिने त्या साधूची संगत सोडली. सांगितलेल्या सर्व गोष्टी केल्या. हळूहळू तिची आध्यात्मात प्रगती होऊ लागली. स्वभावात परिवर्तन झाले. हट्टीपणा, ईर्षा, आग्रहीपणा या वृत्ती निघून गेल्या. तद्नंतर सुमारे बारा वर्षे साधना केल्यानंतर तिला प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार झाला. जीवन सर्व बाजूने सुखी झाले. सध्या ती देवयान पंथाच्या मार्गाने अतिशय वेगाने पुढे जात आहे.

या स्त्रीला प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार होण्याच्या काही दिवस अगोदर मी तिला म्हणालो, -

'तुझी सेवा, भक्ती, श्रद्धा या सर्व गोष्टी व्यवस्थित आहेत. आता काही चुकत नाही फक्त तुझ्या वडिलांना सद्गती न मिळाल्याकारणाने ते अद्याप अडकलेले आहेत. जर त्यांना सद्गती मिळाली तरच तुझा मार्ग मोकळा होईल. यासाठी तिला मी सेवा करण्यास सांगितले. तिने तिच्या वडिलांच्या नावाने सेवा केली. काही काळ सेवा केल्यानंतर तिच्या वडिलांना सद्गती मिळाली व नंतर तिला प्रकाशब्रह्माचा साक्षात्कार झाला व देवयान पंथ मिळाला. अशाप्रकारे धैर्य, चिकाटी व एखाद्या खऱ्याखुऱ्या

सत्पुरुषावर खरीखुरी श्रद्धा ठेवली तर देवयान पंथाचा मार्ग नक्कीच मिळू शकतो. परंतु या मार्गात टिकण्यासाठीही अनेक नियम पाळावे लागतात. म्हणून म्हणतात,

**जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी । तेणे पथ्ये सांभाळावी ।।**

अनिल हा अतिशय सज्जन व चांगल्या स्वभावाचा एक सद्‌भक्त ! त्याच्याशी फोनवर बोलल्याने मला फारसा त्रास होत नसे. कधी कधी दहा–वीस आत्मे त्याच्याशी फोनवर बोलण्याने माझ्या देहात शिरत. पण या गोष्टी माझ्यासाठी किरकोळ होत्या. त्याच्या पत्नीशी बोलण्याने मला भयंकर त्रास व्हायचा. प्रकाशमार्गाचे नियम ती मुळीच पाळत नसे. अनेकदा सांगूनही तिने माझे ऐकले नाही. शेवटी मी तिला भेटणे बंद केले व तिच्याशी फोनवर बोलणेसुद्धा बंद केले. अनिलबरोबर मात्र मी केव्हातरी फोनवर बोलत असे.

**नियम पाळावे । जरी म्हणशील योगी व्हावे ।।**

देवयान पंथाचा मार्ग अथवा प्रकाश मार्ग अतिशय खडतर असून या मार्गाने वाटचाल करताना अनेक नियम पाळावे लागतात. त्यामुळे जे लोक नियम पाळत नाहीत ते लोक आपोआप अंध:कारमय मार्गाकडे खेचले जातात. अंध:कारमय मार्गात कुठलेच नियम नसून मनाला मोहीत करणारी स्थाने मात्र पावलोपावली असतात.

एका रात्री साडे नऊ-दहाच्या सुमारास अनिल आपल्या पत्नी व मुली समवेत रस्त्यावरील एका सॅन्डविच कॉर्नरवर सॅन्डविच खात होता. इतक्यात माझा त्याला फोन गेला. एक-दोन मिनिटे मी त्याच्याशी बोललो व फोन ठेवला. त्यादिवशी मला ध्यानामध्ये भयंकर त्रास होऊ लागला. सॅन्डविच कॉर्नरवर ते ज्या जागी उभे होते तेथे जमिनीच्या आत काही भयंकर आकाराच्या शक्ती होत्या. याशिवाय जमिनीच्या वरती वातावरणामध्ये जवळजवळ दीड-दोनशे अतृप्त आत्मे होते. माझा फोन गेल्याबरोबर त्या जमिनीखालील शक्ती व जमिनीवरील दीड-दोनशे आत्मे माझ्याकडे आले व मला भयंकर त्रास देऊ लागले. शेवटी विशेष दैवीशक्तीचा वापर करून मी त्या सर्वांना सद्‌गती दिली व स्वत:ची सुटका करून घेतली.

मी समाजापासून व लोकांपासून दूर राहतो. त्याचे मुख्य कारण हेच आहे. सर्वसामान्य लोकांना देवयान पंथातील किंवा प्रकाशमार्गातील पथ्ये सांभाळणे जमत नाही व त्याचा त्रास साधकाला होतो. यावर एकच उपाय तो म्हणजे अपवित्र लोकांपासून दूर राहणे व त्यांच्याशी फोनवर बोलण्याचे टाळणे.

देवयान पंथ अथवा प्रकाशमार्ग सर्वसामान्य माणसाला प्राप्त होणे कठीण गोष्ट आहे व हा मार्ग प्राप्त झाल्यास त्या मार्गात

टिकणे त्याहून कठीण गोष्ट आहे. समजा एक हजार लोकांना हा मार्ग मिळाला तर त्यातील नऊशे नव्वद लोक हा मार्ग सोडून पुन्हा अंध:कारमय मार्गाने जाऊ लागतात. हा मार्ग पैशाने विकत घेता येत नाही. श्रद्धा व सद्‍गुण असतील, आत एक व बाहेर एक अशी वृत्ती नसेल तर या मार्गावरून वाटचाल करणे सोपे जाते.

देवयान पंथ किंवा प्रकाशमार्गाचे आचरण केल्यानंतर सूक्ष्मदेह शुद्ध होतो व सूक्ष्मदेह शुद्ध झाल्यानंतर ज्या समस्या निर्माण होतात त्या समस्यांविषयी आपण या प्रकरणात पाहिले. हे लिहित असतानाच काही गोष्टी आठवल्या. या गोष्टींचा व देवयान पंथाचा काहीही संबंध नाही परंतु वाचकांना यातून बराच बोध होईल, म्हणून त्यातील काही गोष्टी पुढे देत आहे. विशेष म्हणजे ज्यांच्याविषयी मी पुढे लिहीत आहे ती सर्व अतिसामान्य माणसे नि:स्वार्थ, मनाने अतिशय सरळ व सज्जन होती, श्रद्धावान होती. परंतु अयोग्य साधूची संगत केल्याने सामान्य, सज्जन माणसाच्या जीवनामध्ये किती गंभीर समस्या निर्माण होतात याची वाचकांना कल्पना येईल.

उमरग्याजवळ सिद्धेश्वर भोजनालय नावाचा एक ढाबा आहे. काही कारणाने या ढाब्याजवळ थांबलो होतो. एक लिंगायत

पती–पत्नी हा ढाबा चालवत होती. त्यांना दोन मुले होती. मला बघून ते माझ्याजवळ आले व आपला ढाबा चांगला चालावा म्हणून प्रार्थना केली. त्यांच्या ढाब्यावर झुणका भाकर खाऊन मी पुढे निघून गेलो.

सहा महिन्यानंतर पुन्हा त्याच रस्त्याने जाण्याचा योग आला. त्या पती–पत्नीने श्रद्धेने दिलेल्या झुणका भाकरीची आठवण झाली. त्या ढाब्यावर मी थांबलो. दोघेही पती–पत्नी पुढे आली. ती दोघेही म्हणाली, ''स्वामीजी आपण येऊन गेल्यापासून आमचा धंदा खूपच चांगला चालला आहे. अगदी आमच्या अपेक्षेपेक्षा खूपच चांगला चालला आहे. !'' मी म्हणालो, ''ही सर्व ईश्वराची कृपा आहे. तुम्ही श्रीदत्त महाराजांवर श्रद्धा ठेवा, श्री स्वामी समर्थांवर श्रद्धा ठेवा, गाणगापूर, अक्कलकोटला जात रहा, म्हणजे सर्व काही ठीक होत राहील.''

''स्वामीजी तुमच्यामुळे आमचे खूप चांगले झाले. असे सांगणारे अनेक लोक मला आत्तापर्यंत भेटले. त्या सर्वांना मी कुठल्याही साधूच्या नादी लागू नका. ईश्वरावर श्रद्धा ठेवा, असे सांगतो. याचा अर्थ असा नव्हे की जगात चांगले साधू नाहीत. परंतु चांगल्या साधूंची गाठभेट होणे अतिशय कठीण गोष्ट झाली आहे !''

माझ्याही नादी लागू नका असे मी लोकांना सांगतो व कोणालाही आपला भक्त बनवत नाही. कारण एखाद्या व्यक्तीला आपला भक्त बनविणे म्हणजे त्याने जन्मोजन्मी केलेल्या चांगल्या वाईट कर्मांची जबाबदारी घेऊन त्या सर्व कर्मबंधनातून त्याला मोकळे करून त्याला मोक्ष देणे, जन्म मरणाच्या चक्रातून त्याला सोडविणे व हे करणे साधी गोष्ट नाही असो !

सुमारे दोन वर्षांनंतर पुन्हा त्या रस्त्याने जाण्याचा योग आला. त्या पती-पत्नीला भेटण्यासाठी मी गाडी थांबविली. त्यांच्या ढाब्यापासून सुमारे शंभरफूट दूर असतानाच मी माझ्या ड्रायव्हरला म्हणालो, ''काहीतरी खूप गडबड झालेली दिसत आहे. ढाब्यावरती पिशाच्चशक्ती दिसून येत आहे.'' मी ड्रायव्हर बरोबर असे बोलत असतानाच गाडी ढाब्यावर पोहोचली.

आमची गाडी बघून उत्साहाने व लगबगीने धावत येणारे पती-पत्नी पुढे आले नाहीत. मुले पुढे आली. आई आजारी आहे, असे सांगितले. दोन-तीन मिनिटांनी मुलांची आई आली.

मी विचारले, ''आक्का काय झाले ?''

माझ्या प्रश्नावर काही उत्तर न देता तिने आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. थोड्यावेळाने स्वत:ला सावरून ती म्हणाली, ''स्वामीजी असे कसे झाले हो. तुमच्या आशीर्वादाने

धंदा अतिशय चांगला चालत होता. परंतु अचानक कोणाची तरी नजर लागावी तसा धंदा अचानक जवळजवळ बंद पडला. डोक्यावर खूप कर्ज झाले आहे. परंतु त्याही पेक्षा वाईट गोष्ट म्हणजे माझा नवरा हल्ली खूप दारू पितो व मला व मुलांना मारतो. त्याच्या माराने मी आजारी पडले आहे. अन्यथा मला काही आजार नाही. तुम्ही माझ्या नवऱ्याला दारू पिण्यास बंदी करा तो तुमचे ऐकेल. मला व मुलांना मारु नको असे सांगा ! आमच्या लिंगायत धर्मात दारूला स्पर्शसुद्धा करायचा नसतो. पण हल्ली माझ्या नवऱ्याची दारूशिवाय एकही रात्र जात नाही. कसेही करा व माझ्या नवऱ्याला दारूतून सोडवा !''

मी म्हणालो, ''हे बघ आक्का, मी तुझ्या नवऱ्याला सगळं व्यवस्थित समजावून सांगतो. पण तू इथे उभी राहू नकोस. त्याला माझ्याकडे पाठवून दे ! तसेच गाणगापूरच्या दत्ताला व श्री अक्कलकोट स्वामी समर्थांना मी तुझ्यासाठी प्रार्थना करणार आहे. तू लवकरात लवकर त्यांच्या दर्शनाला जा ! दोन्ही पैकी एका स्थानात गेलीस तरी चालेल. तुझे अगदी चांगले होणार आहे. काळजी करू नकोस. तुला पुन्हा सुखाचे दिवस येतील.'' माझ्या आश्वासनाने तिला धीर आला व ती निघून गेली. थोड्या वेळाने तिचा नवरा माझे जेवणाचे ताट घेऊन आला.

मी त्याला विचारले, ''कुठल्या साधूच्या दर्शनाला गेला होतास ?''

तो म्हणाला, ''हो एक मोठे महाराज आले होते. त्यांच्या दर्शनाला बरीच गर्दी झाली होती. मी पण त्यांच्या दर्शनाला गेलो होतो. लई भारी महाराज होते बघा !''

''त्यांनी तुला एखादी वस्तू नारळ वगैरे असे काहीतरी दिले असेल,'' मी विचारले.

तो म्हणाला, ''होय ! त्यांनी एक नारळ दिला व ढाब्यावर बांधून ठेव म्हणाले. तो बघा !'' असे म्हणून त्याने छताला बांधून ठेवलेला नारळ मला दाखविला.

मी म्हणालो, ''हा नारळ बांधून किती दिवस झाले?''

तो म्हणाला, ''सात महिने झाले !''

मी म्हणालो, ''बरं ! आता मी सांगतो तसे कर ! तो नारळ काढ आणि फडक्यासहित पाण्यात सोडून दे ! व दुसरा नारळ तेथे बांधून ठेव !''

तो म्हणाला, ''ठीक आहे ! आजच तसे करतो.''

थोड्या वेळाने त्याची पत्नी आली. मी तिला सांगितले. तुझा नवरा आता दारू पिणार नाही. त्याने मला तसे कबूल केले

आहे. तिला असे आश्वासन देऊन मी निघून गेलो.

त्यानंतर ६-७ महिन्यांनी पुन्हा जेव्हा माझी व त्यांची भेट झाली तेव्हा ते दोघेही आनंदात होते. त्यांची मुलेही आनंदात होती. मला बघून पती-पत्नीला अतिशय आनंद झाला. तिने मला सांगितले, ''तुम्ही आशीर्वाद देऊन गेलात. त्या दिवसापासून माझ्या नवऱ्याची दारू सुटली व दुसऱ्या दिवसापासून धंद्यामध्ये भरभराट सुरू झाली.'' नवरा म्हणाला, ''पूर्वीच्या साधूने दिलेला नारळ मी पाण्यात सोडला व दुसरा नारळ तेथे लावला. आमचे दारिद्र्य त्या दिवसापासून गेले व आम्ही आता सुखी आहोत.''

आक्काचा नवरा ज्या साधूच्या नादाला लागला होता तो साधू पिशाच्च साधना करणारा होता व त्याने नारळामधून बऱ्याच पिशाच्च शक्ती आक्काच्या नवऱ्याबरोबर पाठविल्या होत्या व या पिशाच्च शक्तीमुळेच धंदा बसला होता व नवऱ्याला दारूचे व्यसन लागले होते. नारळ तेथून काढून पाण्यात सोडताच सर्व परिस्थिती पालटली व ते कुटुंब सुखी झाले.

सर्वच साधू वाईट असतात असे नाही. जगात चांगले साधूही अनेक आहेत. परंतु त्यांना ओळखायचे कसे हे समजण्यास काहीही मार्ग अद्याप उपलब्ध झालेला नाही. म्हणून श्रद्धेने ईश्वरभक्ती करावी म्हणजे तोच मार्ग दाखवितो.

सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी मला एक सिद्धपुरुष भेटले होते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले होते की, तुझ्या हातून आध्यात्मावर खूप पुस्तके लिहिली जातील. सुरुवातीची बरीच वर्षे ही पुस्तके सामान्य जनांच्या गळी उतरणार नाहीत. परंतु १९८५ नंतर आध्यात्माचा शोध घेण्यासाठी असंख्य आत्मे जन्माला येणार आहेत. त्यांना तुझी पुस्तके दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील.

त्या दिव्य पुरुषाची भविष्यवाणी आठवली की, असे वाटते आपण फक्त कळसूत्री बाहुले असून, सारा खेळ ईश्वरच करत असतो.

एका घरासमोर एक साधू उभा राहिला. घरातील स्त्रिने त्या साधूला भिक्षा दिली. साधू म्हणाला, ''माई गंगेचे तीर्थ घ्या !'' असे म्हणून त्या साधूने आपल्या गळ्यातील रुद्राक्षाची माळ पिळल्यासारखे केले. त्या रुद्राक्षाच्या माळेतून पाण्याची धार सुरू झाली. त्या स्त्रीने तीर्थ घेतले. पुढे काय झाले ते तिचे तिलाच समजले नाही. घरातील सर्व पैसे व दागिने तिने त्या साधूला देऊन टाकले. या गोष्टींचा व देवयान पंथाचा काहीही संबंध नाही. सहज आठवल्या म्हणून लिहिले इतकेच !

# १०. अवस्थात्रय

**उच्चकोटीचे सिद्धपुरुष** बाल, उन्मत्त व पिशाच्च अशा तीन अवस्थांमध्ये राहतात. म्हणून यांना अवस्थात्रय म्हटले जाते. क्वचित् एखादा सिद्धपुरुष सहजावस्थेत राहतो. ही सहजावस्था मुख्य तीन अवस्थांच्या पलीकडील असल्याने तिला अवस्था म्हटले जात नाही. सहजावस्थेतील सिद्धपुरुष हा साधना करून सिद्ध झालेला नसतो. तो सहजसिद्ध असतो. नित्यसिद्ध असतो व ईश्वराचे कार्य करण्याकरिता त्याने पृथ्वीतलावर जन्म घेतलेला असतो. शंभरटक्के खरे सांगायचे ठरविले तर ईश्वराचे कार्य करण्याकरिता जे सिद्धपुरुष पृथ्वीवर अवतार घेतात ते मातृगर्भातून जन्म घेत नाहीत. आईच्या पोटातून एक बालक जन्माला येते. हे बालक अल्पायुषी असते. एक – दोन वर्षातच या बालकाच्या शरीरात असणारा आत्मा देह सोडून निघून जातो व त्या देहात एक नित्यसिद्ध असा सिद्धपुरुष प्रवेश करतो. याला

परकायाप्रवेश असे म्हणतात. ईश्वराने दिलेले कार्य पूर्ण करून सहजावस्थेतील हे सिद्धपुरुष चुपचाप निघून जातात. ते पृथ्वीतलावर रहात असताना त्यांना फारसे कोणी विचारत नाही. ते निजधामी गेल्यानंतर हजारो वर्षे पृथ्वीतलावरील लोक त्यांचे गुणगान गात राहतात.

बाल, उन्मत्त, पिशाच्च या तीन अवस्थांमध्ये राहिलेल्या असंख्य सिद्धपुरुषांपैकी काही सिद्धपुरुषांचे पुण्यस्मरण आपण येथे करू या ! बाल, उन्मत्त व पिशाच्च या तीन अवस्थांतील पिशाच्च या शब्दाचा अर्थ येथे **'वेडा'** असा घ्यायचा आहे. उन्मत्त या शब्दाचा अर्थ **'उग्र स्वभावाचा'** असा घ्यायचा आहे. या अवस्थांमध्ये राहणारे सिद्धपुरुष कसे वागत होते याची आपण येथे थोडक्यात माहिती घेऊ !

**श्रीब्रह्मेंद्रस्वामी**

श्रीब्रह्मेंद्रस्वामी हे सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वी होऊन गेले. हे सहजावस्थेत रहात असत. यांनी कालज्ञान नावाचा एक ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथामध्ये त्यांनी असे लिहिले आहे की, इ. स. १९०० नंतर कुठल्याही तीर्थस्थानामध्ये पवित्र दैवीशक्ती राहणार नाही. तीर्थस्थानांची अवस्था मासळी बाजारासारखी होईल. नद्यांचे पावित्र्य नष्ट होईल. गंगा नदी अपवित्र होईल. गंगा नदीचे पावित्र्य

फक्त गंगोत्री ते ऋषीकेशच्या वरपर्यंत राहील. ऋषीकेशपासून गंगा अपवित्र राहील. मोठमोठ्या तीर्थस्थानांमध्ये पुजारी, पंडे, बडवे यांचा फक्त व्यापार चालेल. दैवीशक्ती व पावित्र्य राहणार नाही. सैतानीशक्ती देवस्थानांचे पावित्र्य नष्ट करतील. काही ठिकाणी दृश्य स्वरूपात पावित्र्य नष्ट केले जाईल तर काही ठिकाणी अदृश्य स्वरूपात पावित्र्य नष्ट केले जाईल. एकंदरीत तीर्थस्थानांमध्ये, देवस्थानांमध्ये देवत्व राहणार नाही.

शेतामध्ये जसे कांद्याचे पीक येते तसे खोट्या साधूंचे पीक प्रचंड प्रमाणात येईल. आपल्या भक्तांमधील दैवीशक्ती, प्राणशक्ती व एनर्जी हे खोटे साधू खेचून घेतील. त्याच बळावर ते ऐश्वर्य भोगतील. असे सर्व प्रकार २०५० सालपर्यंत चालतील व नंतर फक्त खऱ्या साधू-संतांचेच पूजन केले जाईल. देव-देवतांचे पूजन करण्याचे प्रकार बंद होतील व लोक खऱ्या सत्पुरुषांची पूजा करतील. वेद, पुराणे, रामायण, महाभारत हे ग्रंथ लोक वाचणार नाहीत. त्याऐवजी सत्पुरुषांची चरित्रे व सत्पुरुषांनी लिहिलेले ग्रंथ समाजात मान्यता पावतील. २०५० पर्यंत धर्माधर्मातील भांडणे नष्ट झालेली असतील व लोक मानवतेने वागू लागतील.

**श्रीगोंदवलेकर महाराज**

श्रीगोंदवलेकर महाराजांच्या काळामध्ये समाजातील बराच

वर्ग अत्यंत मूढ अवस्थेत पोहोचलेला होता. श्रीगोंदवलेकर महाराजांनी लोकांना रामनामाची दीक्षा देऊन खूप मोठी जनजागृती केली. १९६६ साली श्रीगोंदवलेकर महाराजांच्या एका शिष्याची व माझी गाठ पडली होती. मी त्यावेळी गोंदवले, दहीवडी, वावरहिरे, शिखर शिंगणापूर या भागात फिरत होतो. श्रीगोंदवलेकर महाराजांचा शिष्य मला श्रीगोंदवलेकर महाराजांच्या गोष्टी सांगत असे.

''श्रीगोंदवलेकर महाराज चिडले की खूप लालबुंद होत असत, पायातील खडावा काढून भक्तांच्या डोक्यात सटासट मारत असत.'' या शिष्यानेही बऱ्याच वेळा श्रीगोंदवलेकर महाराजांच्या हातचा प्रसाद खाल्लेला होता. श्रीगोंदवलेकर महाराजांचे गुरु श्रीतुकामाई ऊर्फ श्रीतुकाराम चैतन्य हे सुद्धा अतिशय उग्र स्वरूपाचे होते. आपल्या भक्तांना ते चोपून काढत व त्यांचे प्रारब्ध शुद्ध करत. श्रीगोंदवलेकर महाराजांचाही त्यांनी खूप छळ केला. जन्मोजन्मींच्या कर्मांची शुद्धी होण्यासाठी सत्पुरुषांना अशा काही लीला कराव्या लागतात. त्याचप्रमाणे स्वार्थी समाजाला दूर ठेवण्यासाठी सत्पुरुष वेड्यासारखे वागतात. सत्पुरुषांच्या अशा वागण्याने भक्तांच्या श्रद्धेची कसोटी होते. परीक्षा पाहिली जाते. कच्च्या श्रद्धेचे भक्त सत्पुरुषाच्या अशा वागण्याला

कंटाळतात व दूर निघून जातात. पक्क्या श्रद्धेचे भक्त टिकून राहतात. श्रीगोंदवलेकर महाराजांच्या गुरुने श्रीगोंदवलेकर महाराजांना बराच त्रास दिला. त्यांच्या समर्पण बुद्धीची कसोटी पाहिली. सर्व परीक्षेत पास झाल्यानंतर त्यांना सिद्धावस्था प्रदान केली. श्रीगोंदवलेकर महाराजांनी आपले शिष्य ब्रह्मानंद यांच्यासुद्धा अतिशय कठोर परीक्षा घेतल्या. एकदा तर श्रीगोंदवलेकर महाराज घोड्यावर बसून दौडत निघाले व ब्रह्मानंद महाराजांना पाठीमागे पळत येण्यास सांगितले. अशा प्रकारे श्रीगोंदवलेकर महाराज आपल्या भक्तांच्या अतिशय कठोर परीक्षा घेत असत. सत्पुरुष जेव्हा उग्र रुपाने वागतात, शिव्या वगैरे देतात तेव्हा त्यांच्या या उग्र अवताराला नरसिंह अवतार असे म्हणतात.

**श्रीसाईबाबा**

श्रीसाईबाबांच्या चरित्रामध्ये अनेक वेळा श्रीसाईबाबांनी उग्र नरसिंहाचा अवतार धारण केला असे लिहिलेले आहे. श्रीसाईबाबा एकदा चिडले की, त्यांच्या समोर जमलेली सर्व माणसे पळून जात असत. या पळणाऱ्यांपैकी जो कोणी हाताला लागेल त्याच्या पाठीत श्री साईबाबांचे रट्टे बसत असत. मशिदीच्या समोर सभामंडपाचे काम चालू होते. गवंड्यांनी रोज काम करावे व श्री साईबाबांनी रोज पाडून टाकावे असा प्रकार घडत असे. श्री

साईबाबा लेंडीबागेत किंवा इतर कोठे फिरायला गेले की, भक्तलोक भराभरा काम संपवत असत व ते येताना दिसताच काम थांबवत असत. श्रीगोंदवलेकर महाराजांचे भक्त पाण्यासाठी पाईपलाईन टाकायचे व श्री गोंदवलेकर महाराज भक्तांनी टाकलेली पाईपलाईन उखडून टाकायचे.

शिर्डीच्या साईबाबांनी अनेक वेळा असेच प्रकार केलेले आहेत. या त्यांच्या वागण्याचे अर्थ त्यांचे त्यांनाच माहीत. पण बालोन्मत्त पिशाच्च अवस्थेत राहणारे सिद्धपुरुष नेहमीच असे चित्रविचित्र प्रकार करत असतात. हे त्यांची चरित्रे वाचल्यानंतर लक्षात येते व त्याचा अर्थ फक्त त्यांनाच कळत असतो. विद्वान माणसांनाही याचे अर्थ कळत नाहीत.

**श्रीस्वामी समर्थ**

श्रीस्वामी समर्थांनी तर अक्कलकोटच्या राजाच्याही श्रीमुखात लावून दिली होती. श्रीबीडकर महाराजांच्या मुस्कटात त्यांनी इतकी जोरात मारली होती की, श्रीबीडकर महाराज चार तास बेशुद्ध पडले होते. या बेशुद्ध अवस्थेमध्येच त्यांना आत्मसुख प्राप्त झाले. विविध प्रकारे ते आपल्या भक्तांची कसोटी पहात असत व एकदा चिडले की, तीन तीन दिवस कोणाला फिरकू देत नसत.

**श्रीसाटम महाराज**

हे कधी एखाद्या स्त्रिच्या कडेवर बसून रानोमाळ भटकत असत (बाल) तर कधी भरपूर दारू पिऊन तोडफोड करत असत (उन्मत्त) तर कधी वेड्यासारखे चाळे करत व लोकांवर दगड वगैरे मारत. (पिशाच्च) ज्याला दगड लागत असे त्याचे भाग्य उदयाला येत असे. एकदा ते वेडाच्या भरामध्ये आपल्या झोपडीवर चढून बसले व झोपडीला आग लावली. ते कोणालाही आग विझवू देत नव्हते. एका माणसाच्या अंगावर त्यांनी जळते लाकूड फेकून मारले. त्याने ते लाकूड आपल्या धोतरात झेलले व प्रसाद म्हणून आपल्या घरी घेऊन गेला. त्या जळक्या लाकडाचे शिवलिंग झालेले होते. श्रद्धेने त्या भक्ताने शिवलिंगाची पूजा केली व या पुजेमुळे त्याच्या आयुष्याचे कल्याण झाले. खऱ्या सत्पुरुषांजवळ गर्दी नसते. ते जर सहजावस्थेमध्ये रहात असतील तर एकांतवासात राहतात व बालोन्मत्त पिशाच्च अवस्थेत रहात असतील तर आपल्याजवळ कोणाला टिकू देत नाहीत, वेड्यासारखे चाळे करून लोकांना पळवून लावतात.

**श्रीकाळबुवा**

हे स्वामी समर्थांचे शिष्य ! नेहमी वेड्यासारखे वागायचे. दगड मारुन लोकांना पळवून लावायचे, तोंडाने सतत शिव्यांचा

पट्टा सुरू असायचा. त्यामुळे कोणीही त्यांच्याकडे जात नसत.

एकदा ते आपल्याकडे आलेल्या दर्शनार्थी लोकांच्या अंगावर दगड मारत होते. शिव्या घालून त्यांना हाकलून लावत होते. त्यांनी भिरकावलेला असाच एक दगड पोलिओने पांगळी झालेल्या एका मुलीला लागला व ती चक्क पळू लागली. तिला घेऊन आलेल्या लोकांना त्याचे खूप मोठे आश्चर्य वाटले.

बालोन्मत्त पिशाच्च अवस्थेत राहणाऱ्या सिद्धपुरुषांच्या लीला या अशा असतात. त्यांच्या लीलांचे अर्थ त्यांनाच माहीत असतात. प्रत्येक व्यक्तीच्या आत्म्याला ते चांगल्या पद्धतीने ओळखत असतात व प्रत्येक व्यक्तीचे जन्मोजन्मींचे प्रारब्धही त्यांना माहीत असते. ते ओरडतात, शिव्या घालतात ते भक्ताच्या प्रारब्धाला ! भक्ताचे प्रारब्ध शुद्ध करण्यासाठी व भक्ताचे प्रारब्ध जाळून टाकण्यासाठी त्यांना अशा गोष्टी कराव्या लागतात.

श्रीस्वामी समर्थ, शिर्डीचे श्रीसाईबाबा, श्रीगजानन महाराज (शेगाव), श्रीकाळबुवा, श्रीसाटम महाराज यांच्या सारखे सिद्धपुरुष आजकाल दिसून येत नाहीत व असे सिद्धपुरुष ज्या काळात होते त्या काळातील लोकांच्या मनात जसा भक्तिभाव होता तसा भक्तिभावही दिसून येत नाही. सध्या जे काही दिसत आहे त्याविषयी न बोलणे चांगले !

## श्रीदत्तावधूत

श्रीदत्तावधूतांनीसुद्धा सौ. वनिता दीक्षित यांना जवळजवळ वीस वर्षे खूप त्रास दिला व त्यांच्यामध्ये सुईच्या टोकाएवढा तरी अहंकार शिल्लक आहे का हे पाहिले. हजारो वेळा अनेकांच्या समोर त्यांना अपमानित करून त्यांचा अहंकार दुखावला जातो का ? त्यांच्या मनाला दु:ख होते का ? त्या रुसून-फुगून बसतात का ? किंवा त्यांच्यातील भक्तीभाव कमी होतो का ? हे पाहिले. शेकडो वेळा त्यांना पंधरा पंधरा किलोमीटर दर्शनासाठी चालत येण्यास लावले. स्वत:कडे अनेक गाड्या असूनही त्या आपल्या गुरुच्या दर्शनार्थ पंधरा पंधरा किलोमीटर चालत जात असत. हिमालयाच्या दुर्गम भागांमध्ये सुद्धा शेकडो मैल त्यांना पायवाटेने चालायला लावले व गुफांमध्ये बसून ध्यान धारणा करून घेतली. तामिळनाडूतील पापनाशम्, निलगिरी पर्वतातील दुर्गम स्थानामध्येही त्यांच्याकडून साधना करून घेतली. सह्याद्री पर्वतामध्ये एकदा त्या साधना करत असताना आकाशातून कुंकूमाचा वर्षाव त्यांच्यावर होत होता. सुमारे एक तासभर कुंकूमाचा वर्षाव त्यांच्यावर होत होता व हे कुंकू कुठून पडते आहे हे कळत नव्हते. याशिवाय देवतांची दर्शने व इतरही असंख्य अनुभव त्यांना मिळाले.

वेगवेगळ्या प्रकाराने परीक्षा पहात असतानाच त्यांच्याकडून प्रचंड दानधर्म करून घेतला. अनेक लोकांची सेवा त्यांच्याकडून करून घेतली. आपल्या पाठीमागे त्या कशा वागतात याचे अचूक वर्णन त्यांनी त्यांना करून दाखविले व त्यांचे कौतुकही केले. अशाप्रकारे पूर्ण वीस वर्षे त्यांची पारख केल्यानंतर त्यांना देवयान पंथातील सर्वोच्च अवस्था प्रदान केली.

श्री स्वामी दत्तावधूत सौ. वनिता दीक्षित यांना नेहमी म्हणत माझ्या पाठीमागे लोक कसे वागतात यावर माझे अतिशय बारकाईने लक्ष असते. मी आकाशातून पाहतो. याशिवाय वातावरणातील देव-देवताही भक्तांच्या आचरणाविषयी, स्वभावाविषयी मला मार्गदर्शन करतात.

श्री स्वामी दत्तावधूत, सौ. वनिता दीक्षित यांना एकदा म्हणाले, ''तुमच्यामधील गुरुभक्ती, समर्पणवृत्ती, दानी व परोपकारी स्वभाव, कष्ट करण्याची जिद्द, चिकाटी व इतर अनेक सद्‌गुणांमुळे तुम्हाला ही सर्वोच्च अवस्था प्राप्त झाली आहे ! तुम्ही आतून बाहेरून सारख्या आहात. तुमच्यामध्ये प्रचंड तेजस्विता आहे. पण सुईच्या टोकाएवढासुद्धा अहंकार नाही. त्यामुळे श्रीगुरुने दिलेले कष्ट तुम्ही सहन करू शकलात व तुम्हाला अशी अवस्था प्राप्त झाली आहे की, ही अवस्था

प्राप्त होण्यासाठी मोठ-मोठ्या साधकांनाही हजारो वर्षे पुरत नाहीत !''

स्वच्छ व सरळ मनाच्या माणसांना जर त्यांच्याकडे भक्ती, निष्ठा व चिकाटी असेल तर सत्पुरुष कष्ट व त्रास देतात व त्यांना आध्यात्मातील अत्युच्च अवस्था प्राप्त करून देतात. कारण अलंकार हा सोन्याचाच बनविला जातो. चिखलाच्या गोळ्यांना त्यांच्या प्रारब्धावर सोडले जाते. आजकाल काही लोक सत्पुरुषांचा वापर फक्त स्वत:च्या फायद्याकरिता करून घेतात. इतर बाबतीत ते सत्पुरुषाचे मुळीच ऐकत नाहीत. असे लोक बाह्यदर्शनी जरी सुखी दिसत असले तरी अशा लोकांची मृत्यूनंतरची अवस्था फारच कठीण असते.

# ११. ईश्वर असिद्धे

**ईश्वर असिद्धे** म्हणजे ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही असे कपिल महामुनींनी म्हटले आहे, असे जुन्या काळातील नास्तिकांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की, कपिल महामुनींसारखी ज्ञानी व्यक्ती कधीही असे म्हणणार नाही. हजारो वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या कपिल महामुनींच्या नावावर कोणीतरी थाप मारलेली आहे. कपिल महामुनी किती महान होते हे पुढील गोष्टीवरून दिसून येते.

माता देवहुती व पिता कर्दम यांना आपल्या पोटी महाविष्णूचा अवतार जन्माला येणार हे माहीत होते. या अवतारी बालकाचे नाव कपिल महामुनी. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांनी आपल्या मातेला आत्मज्ञानाचा उपदेश केला व तेव्हापासून ते लोकांना आत्मज्ञानाचा उपदेश करत आले. भागवताच्या तृतीय स्कंधामध्ये कपिल महामुनींचे आख्यान आहे.

सद्‌गुणांचे आचरण करून चित्त शुद्धी साधावी व अखंड समाधान वृत्तीचा अभ्यास करून सुख व दुःख यांच्या पलीकडे जावे. अशा प्रकारे चित्ताची शुद्धता साध्य झाल्यानंतर स्वयंप्रकाश परमात्मा आपणच आहोत असा अनुभव येतो असा कपिल महामुनींनी त्या काळातील लोकांना उपदेश केला. एवढी उच्च कोटीची धारणा ज्यांना जमत नसेल त्यांनी ईश्वरभक्ती करावी व सर्व प्रकारची आसक्ती सोडून द्यावी म्हणजे मोक्षाचे महाद्वार त्यांच्यासाठी उघडेल, असे ते लोकांना सांगत.

करुणा व सहनशीलता हे दोन सद्‌गुण मानवाला सर्व तापापासून मुक्त करतात व महामानव बनवितात असा उपदेश कपिल महामुनींनी आपल्या आईला केला. आत्मज्ञान झाल्यानंतर इतर काही जाणायचे शिल्लक रहात नाही. म्हणून आत्मज्ञानच सर्वश्रेष्ठ आहे, असे कपिल महामुनींनी सांगितले आहे.

फक्त स्थूल शरीर म्हणजेच सर्व काही नसून या स्थूल शरीराची तत्त्वे व सूक्ष्म शरीराची तत्त्वे यांचे ज्ञान कपिल मुनींनी समाजाला दिले. या ज्ञानाला पंचीकरण असे म्हणतात. या पंचीकरणाचे ज्ञान कपिल महामुनींनी लोकांना दिले. स्थूलदेहातील तत्त्वांची संख्या, सूक्ष्मदेहातील तत्त्वांची संख्या त्यांनी लोकांना सांगितली म्हणून त्यांना सांख्ययोगी म्हटले जाऊ लागले. त्यांनी कोठेही ईश्वराचा निषेध केलेला नाही. तरीपण कपिल महामुनी

ईश्वराचे अस्तित्व मानत नव्हते, असे का म्हटले जाते हेच कळत नाही. प्राचीन ग्रंथांमध्ये मात्र कपिल महामुनींविषयी योगमार्गाचे प्रवर्तक ऋषी असा उल्लेख आहे. सगुण भक्तिपेक्षा, भजन पूजनापेक्षा चित्तशुद्धी, सद्गुणांचे आचरण, आत्मज्ञान व समाधी या गोष्टींवर कपिल महामुनींनी भर दिलेला होता. अशा महान कपिल मुनींना काही लोक नास्तिक समजतात व कपिल महामुनींनी ईश्वर असिद्धे असे म्हटले आहे, असे म्हणतात.

''खरे पाहता ईश्वर असिद्धे म्हणजे ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करता येत नाही. याचा खरा अर्थ असा की, तो ईश्वर आहे, असे बोटाने दाखविता येत नाही, जेव्हा आपण ईश्वराला पाहायला जातो तेव्हा आपले वेगळे अस्तित्व उरत नाही. आपण त्याच्याशी तादात्म्य पावतो.'' असे कपिल महामुनींना म्हणायचे आहे.

ईश्वराचे अस्तित्व नाकारणारे महाभाग आजही आहेत व ते नेहमी असे म्हणत असतात की, जर ईश्वर आहे तर तो दिसत का नाही ? मोठमोठ्या शास्त्री, पंडितांना, योग्यांना त्याचे अस्तित्व पुराव्यानिशी सिद्ध का करता येत नाही. हे लोक परमेश्वरावर विश्वास ठेवू नका असे कानीकपाळी ओरडून सांगत असतात.

ज्याप्रमाणे सरकार म्हणजे काय ? हे बोटाने दाखविता येत नाही. लाखो कर्मचारी, हजारो लोकनियुक्त प्रतिनिधी या सर्वांचे

अनेक प्रमुख, असंख्य प्रमुखांचा एक प्रमुख, अध्यक्ष (प्रेसिडेंट किंवा पंतप्रधान) या सर्वांना मिळून सरकार म्हटले जाते. तसेच कोट्यावधी देव-देवता, असंख्य महात्मे, सृष्टीवर नियंत्रण करणाऱ्या शक्ती या सर्वांना मिळून ईश्वर असे म्हटले जाते. येथे असंख्य अधिकारी आत्मे असतात व विशिष्ट काळानंतर ते वरच्या लोकात जातात व त्यांची जागा दुसरा अधिकारी घेतो. कोट्यावधी वर्षांनंतर सर्वांचा प्रमुख ईश्वर हाही आणखी वरच्या लोकात जातो व परमेश्वराचे स्थान ग्रहण करतो. हे सर्व आत्मे कोट्यावधी वर्षांपूर्वी पृथ्वीतलावरूनच वर गेलेले असतात. पृथ्वीतलाप्रमाणे इतर ग्रहांवरती वस्ती आहे. चर्मचक्षूंना हे लोक दिसत नाहीत. ज्यांना मन असते त्यांना माणसे किंवा मनुष्य असे म्हटले जाते. परग्रहावरील काही ठिकाणी मनाचे अस्तित्व नसलेले आत्मे राहतात, तर काही ठिकाणी शब्दांच्या ध्वनीलहरींवरून प्रवास करणारे आत्मे राहतात. अशा प्रकारे हे सर्व विश्व गूढ व रहस्यमय आहे.

ज्याप्रमाणे कलेक्टरने आपल्याला सर्टिफिकेट दिले की, आपण म्हणतो सरकारने माझा सन्मान केला परंतु ज्या सरकारने सन्मान केला ते सरकार डोळ्यांना दिसत नसते. एखाद्या गुन्हेगाराला न्यायाधीशांनी शिक्षा केली तर आपण म्हणतो सरकारने गुन्हेगाराला शिक्षा केली. त्याचप्रमाणे आपल्या प्रार्थनेला प्रतिसाद मिळाला की, आपण म्हणतो ईश्वराने माझी प्रार्थना ऐकली व आपल्याला

काही त्रास झाला की, आपण म्हणतो ईश्वराने मला शिक्षा केली. परमेश्वराचे अस्तित्व हे अशाप्रकारे सहजसिद्ध आहे. तरीही आज असंख्य बुद्धीवादी माणसे या जगात ईश्वर नाही असे म्हणत असतात. त्यांच्याकरिता मी काही मुद्दे लिहीत आहे.

ईश्वराचे अस्तित्व नाकारणे म्हणजे सूर्यामध्ये अल्फा, बीटा, गामा, इन्फ्रा रेड, अल्ट्राव्हॉयलेट, एक्स-रे इत्यादी किरणे नाहीत असे म्हणणे ! चंद्रावर खड्डे नाहीत, असे म्हणणे !

चंद्रावरील खड्डे पाहण्यासाठी अतिशय प्रभावी दुर्बिणीची आवश्यकता असते. कोणाकडे तरी अशी दुर्बिण असते व तो म्हणतो चंद्रावर खड्डे आहेत. आपण ते मान्य करणे हे सामंजस्याचे लक्षण आहे. परंतु माझ्याकडे दुर्बिण नाही असे म्हणण्याऐवजी समजूतदारपणा सोडून चंद्रावर खड्डेच नाहीत असे म्हणणे मूर्खपणाचे लक्षण आहे व अशा लोकांकडे दुर्लक्ष करणे हेच योग्य ठरते.

लाखो वर्षांपासून सूर्यामध्ये अल्फा, बीटा, गामा, इन्फ्रा रेड, अल्ट्राव्हॉयलेट, एक्स-रे इत्यादी किरणे आहेत. दोनशे वर्षांपूर्वी सामान्य जनांना जर हे कोणी सांगितले असते तर ते पटले नसते. असे सांगणाऱ्याला लोकांनी वेडा ठरविले असते. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी शास्त्रज्ञांनी या किरणांचा शोध लावला. आज आपण सर्वजण या किरणांचा जीवनामध्ये वापर करत आहोत.

आजपर्यंत झालेल्या हजारो सिद्धमहात्म्यांनी ईश्वराला पाहिले

व तो आहे म्हणून लोकांना सांगितले. ईश्वराला पाहण्यासाठी मनाचे अस्तित्व नष्ट करावे लागते. बुद्धीचा प्रचंड विकास व्हावा लागतो. आत्मा आकाशाएवढा मोठा व्हावा लागतो. अंगी सद्गुण यावे लागतात. पराकोटीची पवित्रता व तेजस्विता यावी लागते असे संतांनी सांगितले. परंतु यातील काहीही न करता ईश्वर अस्तित्वात नाही असे म्हणणाऱ्या सर्व लोकांना मी एकच प्रश्न विचारू इच्छितो तुम्ही तुमच्या मनाचा, बुद्धीचा विकास केला आहे का ? याचा आधी विचार करा व मगच ईश्वराविषयी मत व्यक्त करा !

ईश्वर आहे हे निर्विवाद सत्य आहे. परंतु फक्त ईश्वरच आहे असे नव्हे तर ईश्वराच्या आधीन राहून कार्य करणारे कोट्यावधी आत्मे, देव-देवता, महात्मे असून कर्माच्या नियमाप्रमाणे सर्वजण कार्य करत असतात. प्रार्थनेला प्रतिसाद देत असतात. उपासनेचे फळ देत असतात. प्रत्येकाच्या सत्कर्माचे, दुष्कर्माचे परिणाम भोगायला लावत असतात. संकटे व त्रास हा माणसांच्या दुष्कर्मांचा परिणाम असतो. हा त्रास भोगत असताना जर ईश्वराची प्रार्थना केली अथवा ईश्वराला शरण गेले असता त्रास खूपच कमी होतो असा कोट्यावधी लोकांचा अनुभव आहे.

माझ्या अनुभवाप्रमाणे मी तर असे म्हणेन की, ईश्वर किंवा परमेश्वर हा जरी सर्वनियंता असला, सर्व जग त्याच्या आधीन

असले, एक ते नऊ मितीपर्यंतच्या सर्व विश्वावर त्याचा अधिकार चालत असला तरी ईश्वरापलीकडे किंवा परमेश्वरापलीकडे बरेच काही आहे.

ईश्वर म्हणजे '**इलेक्ट्रीसिटी !**' टी. व्ही., फॅन, ट्यूब, बल्ब, फ्रीज विविध प्रकारची मशिन्स ही त्या इलेक्ट्रीसिटी ईश्वराची अभिव्यक्ती, शॉक देऊन वेड्याला ठीक करणे हा त्या वीजरूपी ईश्वरीशक्तीचा परिणाम व शॉक लागून धडधाकट मनुष्य मरणे हा त्या वीजरुपी ईश्वरीशक्तीचा दुष्परिणाम, ईश्वर हा सर्व चांगल्या वाईट रूपांनी संपन्न आहे. वादळे, भूकंप, युद्ध इत्यादी रुपांनी प्रलय घडविणे हे त्याचे क्रोधपूर्ण रुप व जे जे काही चांगले दिसत आहे हे त्याचे सच्चिदानंद रुप ! तो सर्वांच्या हृदयात राहतो. दुष्ट बुद्धीने वागणाऱ्यांना हजारो वर्षे त्यांच्या कर्माचे परिणाम भोगायला लावतो. दु:ख व त्रास भोगायला लावून मानवाला तो ईश्वरभक्ती करायला लावतो. सज्जनांना सद्गुणी बनविण्याचा प्रयत्न करतो व जे सद्गुणी असतात त्यांना परमानंद प्राप्त करून देतो. सारे काही करणारा ईश्वरच ! मी असे हजारो लोक पाहिलेले आहेत. ज्यांच्याकडे कोट्यावधी रुपये आहेत, सर्व सुखे आहेत परंतु मन:शांती व आनंद नाही. आनंद कोणी देईल का ? याच्या शोधात ते असतात. त्यासाठी पैसा खर्च करायला ते तयार असतात. पण आनंद देणारा कोणी भेटत नाही. ईश्वर आहे हे

निर्विवाद सत्य आहे. त्याची एक नव्हे तर असंख्य रूपे मी पाहिलेली आहेत. हे मी छातीठोकपणे सांगू शकतो. इतकेच नव्हे तर ईश्वराच्या पलीकडे बरेच काही आहे. त्याचे वर्णन शब्दाने करता येणार नाही व या पुस्तकाचा तो विषय नव्हे.

हजार वर्षांपूर्वीचे पंडित, विद्वान लोक म्हणत, ईश्वर असिद्धे याचा अर्थ ईश्वर नाही, असा नसून ईश्वराचे अस्तित्व त्यांना सिद्ध करून दाखविता येत नव्हते, एवढाच घ्यायचा आहे. ईश्वराची महनियता अशी आहे की, तो विद्वानांना कधीच सापडत नाही. परंतु सरळ मनाच्या माणसाला तो आपली अनेक रूपे दाखवितो.

थोडेसे अंतर्मुख होऊन जीवनाकडे पाहिले तर असे दिसून येते की, कोणीतरी अतिशय बारकाईने आपल्यावर लक्ष ठेवून आहे. आपल्यावर इतक्या बारकाईने लक्ष ठेवलेले आहे की, आपण गाढ झोपेत असतानासुद्धा कोणीतरी बारकाईने आपल्यावर लक्ष ठेवून असते. हा जो कोणी आपल्यावर लक्ष ठेवून आहे तो सेकंदाच्या हजाराव्या भागाचीसुद्धा चूक करत नाही. त्याचे सर्वत्र लक्ष असते. अगदी सर्व विश्वभर लक्ष असते. तो बरेच काही करत असतो. अशा या अस्तित्वाला आपण परमेश्वर म्हणतो. दुसरे काय म्हणणार ! त्या सर्वव्यापी ईश्वराच्या अनेक गोष्टी मला माहीत आहेत. त्यापैकी काही पुढे देत आहे.

कॅलिफोर्निया, अमेरिका येथे मानसी नावाची एक मुलगी रहात होती. ती दररोज ध्यान व प्राणायाम करत असे. ध्यानमार्गात तिने बरीच प्रगती केली होती. आपल्याबरोबर कोणीतरी सतत आहे, असा नेहमी तिला अनुभव येत असे. तिला हवी असलेली प्रत्येक गोष्ट आपोआप मिळत असे, मनांत धरलेल्या इच्छा पूर्ण होत असत. तिला पुष्कळवेळा देव-देवता, ग्रह, नक्षत्र ध्यानामध्ये दिसत असत. बऱ्याच वेळा मारुती व गणपतीचे दर्शनही तिला ध्यानामध्ये होत असे. एकदा तिला ध्यानामध्ये भ्रूमध्याच्या ठिकाणी प्रखर ज्योत दिसली. ध्यान विसर्जन करून उठल्यानंतरही बराच वेळ ही प्रखर ज्योत दिसत होती. हळूहळू तिला प्रत्येक माणसाच्या मागे असणाऱ्या चांगल्या वाईट शक्ती दिसू लागल्या व त्यानुसार ती लोकांना मार्गदर्शन करू लागली.

आमोद नावाचा तिचा एक मित्र होता. हा तिचा मित्र मनाने अतिशय चांगला होता. परंतु तो अतिशय नास्तिक होता. देव, ग्रह, नक्षत्र सगळे खोटे आहे असे म्हणायचा.

एकदा एका देवतेने मानसीला सांगितले, ''आमोद हा मुलगा अतिशय चांगला आहे. त्याला तू मार्गदर्शन कर व दररोज थोडे नामस्मरण, भक्ती, स्तोत्रवाचन करायला सांग !''

देवतेच्या आदेशाप्रमाणे मानसीने आपल्या मित्राला ईश्वराची भक्ती करण्यासाठी परोपरीने समजावून सांगितले. परंतु त्याला

काही ते पटले नाही. मानसीचा निरोप घेऊन आमोद घरी गेला. तो पी एच. डी. करत होता. घरी जाऊन त्याने पाहिले त्याच्या कॉम्प्यूटरची हार्डडिस्क पूर्णपणे बाद झालेली होती. त्या हार्डडिस्कवर त्याने त्याच्या पी. एच. डी. चा थिसीस फीड केला होता व हार्ड डिस्क दुरुस्त करायला खूप खर्च येणार होता. दोन दिवसात त्याला पेपर प्रकाशित करायचा होता व आता दोन दिवसात पेपर प्रकाशित करणे त्याला शक्य नव्हते. कॉलेजमध्ये जाऊन यावर काही उपाय निघतो का ते पाहावे म्हणून तो कॉलेजमध्ये गेला. जो पेपर तो प्रसिद्ध करणार होता तो पेपर दुसऱ्या एका विद्यार्थ्याने अगोदरच प्रसिद्ध केलेला होता. या विद्यार्थ्याने म्हणजे आमोदने दोन तीन वर्षे केलेली सगळी मेहनत फुकट गेलेली होती.

हळूहळू त्याला मानसीने जे सांगितले त्याची आठवण होऊ लागली. ''**आपण जे काही सर्व प्रकारचे सुखाचे व आनंदाचे क्षण उपभोगतो ते उपभोगत असताना प्रत्येक क्षणा क्षणाला आपली पुण्याई खर्च होत असते व पुण्याई संपून गेली की मग रडायची व पश्चात्ताप करायची पाळी येते.**'' मानसी असे म्हणाली होती याची त्याला आठवण झाली. ईश्वराची उपासना, ध्यान, स्तोत्रपठण व दान करून सतत पुण्याई वाढवत राहायला पाहिजे. हे मानसीने सांगितले होते व आपल्याला पटले नव्हते हे त्याला आठवले.

पुन्हा पहिल्यापासून पी एच. डी. चा अभ्यास करायला लागणार या विचाराने तो हैराण झाला होता. मनाला थोडा विरंगुळा मिळावा म्हणून तो निसर्गाच्या सान्निध्यात गेला. निसर्गाच्या सान्निध्यात गेल्यावर मन ताजेतवाने होईल, नीट झोप लागेल असे त्याला वाटले. निसर्गाच्या सान्निध्यात फिरत असताना एके ठिकाणी एक ओढा वाहत होता. त्या ओढ्याजवळ आमोद उभा होता. अचानक त्याच्या हातातील गॉगल पाण्यात पडला. तो गॉगल उचलण्यासाठी आमोद झटकन वाकला तर खिशातील मोबाईल पाण्यात पडला. एकावर एक धक्के बसत होते व आमोदला काय करावे ते सुचत नव्हते. नक्कीच माझे ग्रह फिरले असावेत. माझ्या मागे शनीची साडेसाती लागली असावी. मानसी म्हणाली होती, जोपर्यंत ग्रहमान चांगले असतात तोपर्यंत सर्व ठीक असते. पण ईश्वराची भक्ती केली असता वाईट ग्रहमान असतानासुद्धा फारसा त्रास होत नाही. आमोदने आता मानसीची भेट घेण्याचे ठरविले.

मानसीची भेट घेऊन त्याने सर्व हकिकत तिला सांगितली. मानसीने त्याला ईश्वरभक्ती करण्यासाठी मार्गदर्शन केले व नास्तिक आमोद आस्तिक झाला. या हकिकतीवरून एक गोष्ट सिद्ध होते की, अशी एक शक्ती होती, त्या शक्तीला मानसीच्या मित्राने आस्तिक व्हावे, असे वाटत होते. म्हणून त्या दैवी शक्तीने प्रथम मानसीचा वापर करून त्याला प्रेमाने आस्तिक बनविण्याचा

प्रयत्न केला. यात त्या दैवीशक्तीला अपशय आल्यानंतर त्याला चांगले फटके मारून ताळ्यावर आणले. यावरून ईश्वरी सत्ता (Divine Administration) कसे काम करते हे सिद्ध होते. तसेच ईश्वर आहे व तो प्रथम प्रेमाने शिकवितो; न शिकल्यास फटके मारुन शिकवितो हे सिद्ध होते.

जे लोक मनाने सरळ असतात व ईश्वराची भक्ती करतात अशा सद्भक्तांना ईश्वर सदैव सांभाळत असतो हे पुढील प्रसंगावरून लक्षात येईल.

१९६६-६७ मध्ये मी गाणगापूर येथे अनुष्ठान करत होतो. गाणगापूर ते संगम हे अंतर सुमारे तीन किलोमीटर आहे. त्या काळामध्ये संगमावर जाण्यासाठी रस्ता नव्हता. पायवाटेने संगमावर जावे लागत असे. मी कधी गाणगापूरमध्ये तर कधी संगमावर अनुष्ठान करत असे. असेच एकदा मी संगमावर अनुष्ठान करत होतो. माझे अनुष्ठान आटोपले होते. व दुसऱ्या दिवशी सकाळी मी गाणगापूरला जाणार होतो.

रात्री सुमारे अकरा वाजता माझ्या ओळखीची दोन माणसे माझ्याकडे आली व मला म्हणाली, ''चला आपण आत्ताच गाणगापूरला जाऊ या !'' मी ठीक म्हणालो व आम्ही तिघांनी गाणगापूरच्या दिशेने चालायला सुरुवात केली.

आम्ही सुमारे दहा मिनिटे चाललो असू इतक्यात प्रखर बॅटरीच्या प्रकाशाचा झोत आमच्या डोळ्यांवर पडला व शब्द ऐकू आला 'थांबा !'

आम्ही तिघेही अचानक जागच्या जागी थांबलो. सुमारे सहा फूट उंचीचा एक साधू आमच्या डोळ्यांवर बॅटरीचा प्रखर झोत टाकत होता. त्याच्या हातात पाच सेलची बॅटरी होती. आमच्या डोळ्यांवरून त्याने बॅटरी हळूहळू आमच्या पायाकडे नेली. तेव्हा आम्ही पुढील दृश्य पाहून अगदी थरथरून गेलो, अंगावर काटा उभा राहिला.

आम्ही जेथे उभे होतो अगदी तेथूनच सुमारे तीन–चार फूट रुंदीचा एक चर गेला होता व त्या चरामध्ये बाभळीच्या काट्यांचे भारे टाकलेले होते. त्या दिव्यात्म्याने जर आमच्या डोळ्यांवर प्रखर प्रकाश टाकला नसता तर आमचे पुढचे पाऊल चरामध्ये पडले असते व आम्ही तिघेही बाभळीच्या काट्यांमध्ये पडलो असतो.

आम्हाला वाचविणारा तो साधू कोण होता ? जर तो गाणगापूराहून संगमाकडे जाणारा कोणी वाटसरू साधू होता तर त्याच्या बॅटरीचा प्रकाश आम्हाला अगोदर का दिसला नाही. अचानक आमच्या डोळ्यांवर प्रकाशाचा झोत का पडला. या सर्वांचे उत्तर एकच; आमच्या प्राणांचे रक्षण करणारा तो ईश्वरच

होता ! आम्हाला त्याने सुखरूप चरातून बाहेर काढले . गाणगापूरची वाट दाखविली व नंतर तो काळोखात कोठे अदृश्य झाला ते कळले नाही.

आंध्रप्रदेशातील खेडेगावांमध्ये खासगी बसेस प्रवाशांची वाहतूक करतात. या बसेस अगदी रद्दी असतात. जेमतेम दोन माणसे बसतील अशा सीटस् असतात. त्याही अरुंद व फाटक्या असतात.

१९७१-७२ साली अशाच एका बसने प्रवास करत होतो. सुदैवाने बसला मुळीच गर्दी नव्हती. त्यामुळे एका सीटवर झोपी गेलो. बऱ्याच तासानंतर उठलो तेव्हा माझ्या लक्षात आले की सीटला जे हॅन्डरेस्ट (हात ठेवण्याची पट्टी) असतात त्या हॅन्ड रेस्टला दोन नटबोल्ट असतात. दोन नटबोल्टस्च्या मध्ये माझे डोके होते व गाडी खड्ड्यांच्या रस्त्यातून दणकत दणकत चाललेली होती व दोन नटबोल्टस्च्या मध्ये मी दोन-तीन तास आरामात झोपलो होतो. एवढ्या अवधीमध्ये त्या दोन नटबोल्टस् मधील एक तरी माझ्या डोक्याला, डोळ्याला, गालाला कोठेतरी लागायला हवा होता परंतु असे घडले नाही. त्या गाढ झोपेमध्ये माझे संरक्षण कोण करत होते. अर्थातच परमेश्वर !

अरण्यातून फिरत असताना एकदा सुमारे पंचवीस फूट उंच असलेल्या एका शिळेवर चढून ध्यान करत बसलो. त्या शिळेच्या

चारही बाजूने खूप खोल पाणी होते. पाण्यामध्ये खूप मोठ–मोठे निसरडे, शेवाळ साचलेले दगड होते. पाण्याच्या पलीकडे सुमारे आठ फूट उंचीचे दर्भाचे जंगल होते. ते दर्भाचे जंगल पार करून कंबरभर पाण्यातून शिळेपर्यंत येऊन महत् प्रयासाने मी त्या शिळेवर चढलो व तेथे ध्यान करत बसलो. शिळेवर चढून गेल्यावर माझ्या लक्षात आले की, शिळेवर बसण्यापुरती जागा आहे. परंतु झोपण्यास पुरेशी जागा नाही. पुन्हा शिळेच्या खाली उतरुन जाणे खूप कष्टाचे होते म्हणून मी तेथेच ध्यान करत बसलो. हळूहळू रात्र झाली. मला झोप येऊ लागली. थोडेसे शरीर आखडून घेतले व तेथेच झोपलो. अतिशय गाढ झोप लागली. सकाळी जेव्हा जाग आली तेव्हा माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. ''मी झोपलेल्या जागेपासून सुमारे शंभर फूट दूर अंतरावर एका शिळेवर बसलेल्या अवस्थेत होतो. माझ्या उजव्या बाजूला माझी सामानाची झोळी होती व डाव्या बाजूला माझी चप्पल ठेवलेली होती!''

हे सर्व कोणी केले ? झोपेमध्ये मी जर पडलो असतो तर पाण्यामध्ये असणाऱ्या दगडांवर खूप जोराने आपटलो असतो. म्हणून माझे संरक्षण करणाऱ्या देवतांनी किंवा ईश्वराने मला हवेतून नेऊन सुरक्षित स्थळी ठेवले.

ईश्वर ही अनुभव घेण्याची गोष्ट आहे. '**आपण जो श्वास घेतो तो दिसत नाही !**' परंतु आपल्याला त्याचा अनुभव येतो.

आपल्या श्वासापेक्षा करोडो पटीने चैतन्य सूक्ष्म आहे व हे सूक्ष्म चैतन्य म्हणजेच ईश्वर !

सूक्ष्म विश्वामध्ये कोट्यावधी देव-देवता राहतात. त्या अतिशय तेजस्वी असतात व सद्भक्तांचे रक्षण करतात. परंतु आमच्या पूर्वजांनी देव-देवतांची जी चित्रे काढली आहेत, खऱ्या देव-देवता तशा नसतात. कारण चित्रे ही समाजाला ज्ञान देण्यासाठी रूपकात्मक काढलेली असतात. त्याचा प्रत्यक्षाशी काही संबंध नसतो. मात्र काही चित्रे खरी असतात. जी चित्रे खरी आहेत ती देवतांची नसून शक्तींची आहेत. परंतु या पुस्तकाचा तो विषय नव्हे.

अरण्यात फिरणे व गुफांमध्ये बसून ध्यान करणे हा माझा अतिशय आवडता छंद आहे. या छंदापायी मी भारतातील अनेक जंगले फिरलो. सुमारे तीस वर्षांपूर्वी बाणालोद्दी नावाची एक गुफा पाहण्यासाठी मी अरण्यात शिरलो. दोन-तीन दिवस अरण्यातून प्रवास केल्यानंतर मला असे वाटले आपण गुहेच्या जवळ येऊन पोहोचलो आहोत. म्हणून मी पायातील चप्पल काढल्या व चालायला सुरुवात केली. परंतु गुहा जवळजवळ दीड किलोमीटर दूर होती. सुमारे अर्धा तास चालल्यानंतर गुहेच्या जवळ आलो. ‘उद्या सकाळी चप्पल घेऊन येऊ !’ असा विचार करून तेथेच ध्यान करत बसलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान, ध्यान वगैरे सर्व उरकून दहाच्च्या सुमारास मी चप्पल आणण्यासाठी निघालो. गुहेच्या बाहेर पडून पाहतो तो माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाही. गुहेच्या दारात माझी चप्पल कोणीतरी आणून ठेवलेली होती.

मी ज्या गुहेत रहात होतो तेथून चाळीस मैल परिसरात मनुष्य वस्ती नव्हती. असे असताना माझी चप्पल गुहेसमोर कोणी आणून ठेवली?

या घटनेतून एकच अर्थ निघू शकतो. जर आपले अंत:करण निर्मळ असेल, मन साफ असेल, ईश्वरावर आपली श्रद्धा असेल तर वातावरणातील आत्मे, देव-देवता आपली सर्वतोपरी काळजी घेतात. अशा प्रकारे अदृश्यसृष्टीतून जेव्हा आपली काळजी घेतली जाते तेव्हा त्याला ईश्वरीकृपा असे म्हटले जाते. यावरून अदृश्यसृष्टीमध्ये दैवीसत्ता (Divine Administration) सतत कार्यशील असते हे सिद्ध होते. पुष्कळवेळा अरण्यामध्ये मला आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तू व खाद्यपदार्थ आपोआप मिळत असत. या वस्तू व खाद्यपदार्थ कोठून येत असत हे मला आजतागायत कळलेले नाही.

यतिपोतला (यति तप स्थल:) येथील गुहेमध्ये मी अकरा महिने साधना करत होतो. हळूहळू लोकांना गुहेत कोणीतरी

साधना करत आहे हे कळले व लोक माझ्याकडे येऊ लागले. दररोज सुमारे तीन-चारशे लोक आपली गाऱ्हाणी घेऊन माझ्याकडे येत व ईश्वराच्या कृपेने येणाऱ्या प्रत्येकाला चांगले अनुभव येत.

मी कोणाकडून काहीही घेत नसे त्यामुळे लोक माझ्यावर खूप खुश असत. रोज सकाळी सात वाजल्यापासून संध्याकाळी पाच-साडेपाच वाजेपर्यंत मी लोकांचे प्रश्न सोडवत असे. त्यांच्या समस्यांवर उपाय सुचवत असे. संध्याकाळी पाच-साडेपाच वाजल्यानंतर तासभर नदीमध्ये डुंबत असे व नंतर ध्यानधारणा करत असे. या गुहा दरीमध्ये असल्याकारणाने श्वापदांच्या भीतीने संध्याकाळी सहा वाजल्यानंतर कोणी तेथे थांबत नसे.

नेहमीप्रमाणे त्या दिवशी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास मी शेवटच्या माणसाच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्याच्या मनाला खूप आनंद झाला. तो गरीब होता व तो मला एक रुपया देऊ लागला.

मी म्हणालो, ''मी कोणाकडून काही घेत नाही.''

तो म्हणाला, ''मी प्रेमाने देत आहे अगदी अंत:करण पूर्वक देत आहे. एवढा घ्याच नाही म्हणू नका !''

त्याचा भाव बघून मी म्हणालो, ''ठीक आहे. देवाजवळ ठेव!'' असे सांगून मी समोरच्या नदीवर स्नान करण्यासाठी गेलो.

तो सद्भक्त दत्ताच्या फोटोसमोर एक रुपयाची नोट ठेवायला गेला. तेथे त्याला शंभर रुपयाची एक नोट दिसली. शंभर रुपयाच्या नोटेवर त्याने आपला एक रुपया ठेवला व त्या दरीतून तो आपल्या गावाकडे जायला निघाला.

सुमारे एक किलोमीटर दरीतून चालत गेल्यानंतर पुढे कच्च्या रस्त्याने तीन किलोमीटर चालत गेल्यावर मुख्य रस्ता लागतो व तेथे गेल्यावर गाडीत बसून लोक आपआपल्या गावी जात असत. हा सद्भक्तही दरीतून जात होता. अचानक त्याच्या मनात विचार येऊ लागले.

स्वामीजींच्या जवळून निघणारा मी शेवटचा मनुष्य. दत्ताच्या फोटोसमोर शंभर रुपयांची नोट होती. त्या नोटेची जर कोणी चोरी केली तर चोरीचा आळ माझ्यावर येईल. असा विचार करत त्याने दरी पार केली व पुढे कच्च्या रस्त्याने तो चालू लागला. इतक्यात त्याला मस्तान नावाचा फॉरेस्ट गार्ड भेटला. तो त्याला म्हणाला, ''तू ताबडतोब दरीत जा स्वामीजींच्या देवासमोर शंभर रुपयांची नोट आहे. त्यावर मी एक रुपयाची नोट ठेवली आहे. दोन्ही नोटा उचलून तू सुरक्षित जागी ठेव व स्वामीजींना सांग कारण नोटेची चोरी झाल्यास आळ माझ्यावर येईल.''

त्या सद्गृहस्थाने सांगितल्याप्रमाणे मस्तान धावतच दरीत

आला व गुहेत जाऊन पाहिले तेथे फक्त एक रुपयाची नोट होती. शंभर रुपयांची नोट नव्हती. तो अतिशय घाबरला. ही गोष्ट १९७४ सालची आहे व त्या काळात गरीबासाठी शंभर रुपये म्हणजे खूप मोठी गोष्ट होती. तो धावतच नदीच्या किनारी आला. मी नदीत मनसोक्त डुंबत होतो.

नदीच्या किनारी येऊन तो, ''स्वामीजी आधी इकडे या ! स्वामीजी आधी इकडे या !'' असे जोरजोरात ओरडू लागला.

काय झाले मला कळेना. मी किनाऱ्यावर आलो व विचारले, ''काय झाले ?''

मस्तान म्हणाला, ''तुम्ही शंभर रुपयाची नोट उचलली काय ?''

मी म्हणालो, ''गेल्या कित्येक वर्षात मी शंभराची नोट पाहिलेली नाही व माझ्याजवळ शंभर रुपयाची नोट येणार कुठून व मी उचलून ठेवणार कुठे ?'' माझे उत्तर ऐकून मस्तानने सर्व हकिकत मला सांगितली. त्यावर मी म्हणालो, ''या गोष्टीद्वारे ईश्वराने एकच संदेश सद्भक्तांना दिला आहे. एखाद्या खऱ्या सत्पुरुषाची जर तुम्ही सेवा केली, त्याला एक रुपया जरी दिला तरी ईश्वर त्याची परतफेड अनेक पटीने करेल.''

आजही या गोष्टीचा प्रत्यय माझे असंख्य अनुयायी घेत आहेत. जे लोक माझ्या सरळ साध्या स्वभावाचा गैरफायदा

घेऊ इच्छितात त्यांना विविध मार्गाने फटके बसत आहेत व जे स्वच्छ मनाने व निर्मळ अंत:करणाने सेवा करतात, त्यांची आध्यात्म मार्गामध्ये पराकोटीची प्रगती होत आहे व त्यांना दिव्य अनुभव येत आहेत व जे कोणी थोडीफार धनसेवा करतात त्यांना त्यांनी केलेल्या सेवेच्या कितीतरी पटीने ईश्वर परत करत आहे व केवळ श्रद्धा ठेवून प्रार्थना करणाऱ्या गोरगरिबांचे दाही दिशांनी संरक्षण होत आहे व ईश्वर आपल्या बरोबर आहे याचा अनुभव अनेकांना येत आहे.

विशाखापट्टणम येथे नागेश्वर राव नावाचा एक मनुष्य रहात होता. वीस वर्षांपूर्वी तो माझ्याकडे येत असे. त्याची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. मी त्याला काही उपासना सांगितली होती; ती करू लागल्यानंतर त्याच्या आर्थिक परिस्थितीत बरीच सुधारणा झाली होती. एकदा त्याला स्वप्न पडले. स्वप्नामध्ये त्याला माझ्या रूपात कोणीतरी सांगितले, ''उद्या तुला धोका आहे उद्याचा दिवस तू कामावर जाऊ नकोस !''

तो जेव्हा सकाळी उठला तेव्हा त्याला स्वप्न चांगले आठवत होते. त्याने स्नान केले. माझ्या फोटोसमोर अगरबत्ती दाखवून प्रार्थना केली की, ''संध्याकाळी जर जिवंत घरी परत आलो तर देवा तुला एक नारळ देईन.'' असे म्हणून तो कामावर गेला.

ऐंशी फूट उंचावर नागेश्वर काम करत होता व तो जेथे काम

करत होता त्या जमिनीवर सर्वत्र स्क्रॅप मटेरियलचे ढीग पडलेले होते. लोखंडी खिळ्यांचे ढीग, काचांच्या तुकड्यांचे ढीग, गंजलेल्या सळ्यांच्या तुकड्यांचे ढीग अशा प्रकारे सर्व प्रकारच्या स्क्रॅप मटेरियलचे ढीग तेथे सर्वत्र पसरलेले होते व तेथेच ऐंशी फूट उंचावर तो एका टॉवरवर उभा राहून काम करत होता. अचानक तो टॉवर कोसळला व गॅसच्या फुग्याला लटकल्याप्रमाणे नागेश्वर हळूहळू खाली येऊ लागला. वरुन कोसळलेल्या टॉवरचे तुकडे पडत होते. त्या प्रत्येक तुकड्याकडे पाहत नागेश्वर मनात म्हणत होता, ''ही लोखंडाची पट्टी जर मला लागली तर मी खलास होईन.'' ''हा लोखंडाचा रॉड मला लागला तर मी खलास होईन.'' त्याला आश्चर्य वाटत होते. त्या टॉवरचे असंख्य सुटे भाग त्याच्या जवळून खाली जमिनीवर पडले पण एकही त्याला लागला नाही. हवेमध्ये तरंगत अगदी हळूहळू नागेश्वर येत होता. लोखंडी पट्ट्यांचा व सळ्यांचा पाऊस थांबला व मग त्याने खाली पाहिले व तो मनात विचार करु लागला. काचांच्या ढिगावर पडलो तर काचा अंगात घुसतील व लोखंडी तुकड्यांवर पडलो तर ते सर्व अंगात घुसतील. असा विचार करत हवेतून तरंगत तरंगत तो हळूहळू खाली येत होता. परमेश्वराच्या अदृश्य हातांनी त्याला धरलेले होते. कित्येक एकर मध्ये पसरलेल्या त्या सर्व स्क्रॅप मटेरियलच्या ढिगाऱ्यावर पडण्या ऐवजी परमेश्वराच्या अदृश्य

हातांनी जेमतेम एक-दीड फूट मोकळ्या जागेवर नागेश्वरला अलगद उतरविले. त्याला काहीही झाले नाही. साधा ओरखडासुद्धा अंगावर उठला नाही.

ही घटना घडून गेल्यानंतर दोन महिन्यांनी तो मला भेटला व त्याने सर्व हकिकत मला सांगितली. त्याने केलेले वर्णन अंगावर शहारे आणणारे होते. त्याने माझे आभार मानले. तेव्हा मी त्याला म्हणालो, ''या घटनेमध्ये ईश्वराने मला फुकटचा मोठेपणा दिलेला आहे. तू ईश्वराचेच आभार मान !'' माझ्या रूपाने तुझ्या स्वप्नात आला तो ईश्वरच. ईश्वराच्या अदृश्य हातांनी तुला धरून ठेवले व अलगद खाली आणले. आपण दोघांनीही ईश्वराचे आभार मानायला पाहिजे. तू ईश्वराचे आभार मानायला पाहिजेत कारण तुझ्या प्राणाचे संरक्षण ईश्वराने केले म्हणून व मी ईश्वराचे डबल आभार मानायला पाहिजेत कारण, ''माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या एका गरिबाचे प्राण ईश्वराने वाचविले म्हणून व मला फुकटचा मोठेपणा दिला म्हणून !''

**श्रद्धावान लभते ज्ञानम् ।** श्रद्धा असणाऱ्या माणसालाच दैवी सत्तेचे अनुभव येतात. ईश्वराची सत्ता संपूर्ण विश्वभर कशी कार्य करत असते हे वरील गोष्टीवरून चांगल्या प्रकारे सिद्ध होते. माझ्या जीवनामध्ये मला असे असंख्य अनुभव आलेले आहेत. इतकेच नव्हे तर माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांनाही ईश्वर चराचरात

भरून राहिला आहे व आपले संरक्षण करत आहे, असे अनुभव येत आहेत. अशा असंख्य अनुभवांपैकी आणखी दोन-तीन अनुभव सांगून हे प्रकरण आटोपते घेतो.

एका अरण्यामध्ये मी सुमारे सहा-सात वर्षे साधना करत होतो. त्या काळामध्ये अनेक घटना घडल्या. त्यातील काही जरी सांगायच्या ठरविल्या तरी अनेक पुस्तके लिहावी लागतील. मला येथे फक्त ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांचे ईश्वर कसे संरक्षण करीत असतो, अदृश्यसृष्टीतून सद्भक्तांना कशी मदत मिळत असते एवढेच सांगायचे आहे. पुष्कळवेळा आध्यात्माची अनेक पुस्तके वाचणाऱ्या विद्वानांपेक्षा खेडेगावातील अशिक्षित खेडूत लोकांचा भोळा भाव अनेक चमत्कार घडवितो. मात्र या भोळ्या भावाला खरा सतपुरुष भेटावा लागतो. म्हणून म्हणतात, श्रद्धाळू सद्भक्ताला दिव्य अनुभव येत असतात किंवा **श्रद्धावान लभते ज्ञानम् !**

मी अरण्यात सुमारे सहा-सात वर्षे साधना करत होतो. त्या काळात माझा आहार फक्त दूध व फळे असा होता. परंतु माझ्याकडे येणाऱ्याला पोटभर जेवण, चहा अशी सर्व सोय होती. येणाऱ्या सर्व लोकांना याचे आश्चर्य वाटायचे की, स्वामीजींच्याकडे पैसे येतात कुठून ? किंवा अन्न धान्य येते कुठून? माझ्याकडे अनेक लोक वेगवेगळी मदत मागण्याकरिता यायचे व ईश्वराच्या कृपेने प्रत्येकजण तृप्त होऊन जायचा.

एकदा जाधव नावाचे एक अशिक्षित गृहस्थ आले. त्यांना मुळीच लिहिता-वाचता येत नव्हते. अगदी अक्षर ओळखसुद्धा नव्हती. ते मला म्हणाले, ''स्वामीजी भावाची तार आलेली आहे व मला मुंबईला बोलावले आहे. मी आजपर्यंत कधीही मुंबईला गेलेलो नाही. शिवाय मला अक्षर ओळखही नाही. एखाद्या शिकलेल्या माणसाला बरोबर घेऊन जायचे ठरविले तर माझी तेवढी ऐपत नाही. मी काय करू ते सांगा.''

मी म्हणालो, ''जाधव काहीही काळजी करू नका. ईश्वरावर श्रद्धा ठेवा, देव तुम्हाला व्यवस्थितरित्या तुमच्या भावाच्या घरी पोहोचवेल !''

ईश्वरावर श्रद्धा ठेवून जाधव मुंबईच्या गाडीत बसले. त्यांना परळ येथे उतरायचे होते. त्यांनी कंडक्टरला सांगितले. परळ आले की मला सांगा. त्याप्रमाणे कंडक्टरने परळ येताच जाधवांना बसमधून उतरण्यास सांगितले.

जाधव बसमधून खाली उतरले. मुंबईच्या उंच उंच इमारती, रस्त्यावर धावणाऱ्या गाड्यांची रांग, हजारो माणसे हे सर्व पाहून ते हबकून गेले. त्यांना काही सुचेना, त्यांनी खिशातून तंबाखूची चंची (तंबाखू ठेवण्याची छोटी पिशवी) काढली व तंबाखू डाव्या हातावर घेऊन मळू लागले. इतक्यात -

एक मनुष्य त्यांच्याजवळ आला व त्याने जाधवांच्याकडे तंबाखू मागितला. जाधवांनी त्याला चिमूटभर तंबाखू दिला. त्याने विचारले, ''तुम्हाला कोठे जायचे आहे ?'' जाधवांनी खिशातून पत्त्याचा कागद काढून त्याच्या हातात दिला व म्हणाले, ''माझा भाऊ या पत्त्यावर राहतो त्याच्याकडे मला जायचे आहे.'' तो पत्ता वाचून तो गृहस्थ म्हणाला, ''चला मी तुम्हाला सोडतो!'' असे म्हणून त्याने टॅक्सी थांबविली व जाधवांना घेऊन जाधवांच्या भावाच्या घरी गेला. जाधवांना त्यांच्या भावाच्या घरी सोडले व जाधवांनी आभार मानण्यापूर्वीच तो मानवरूपी परमेश्वर अदृश्य झाला. तो कोठे गेला हे कोणालाच कळले नाही. विशेष म्हणजे जाधवांनी त्याला जेव्हा पत्त्याचा कागद दाखविला तेव्हा त्या पत्त्याच्या कागदावर फक्त नजर फिरवून त्याने पत्त्याचा कागद जाधवांच्याकडे परत दिला होता. जाधवांना त्यांच्या भावाच्या घरात सोडून तो लगेच टॅक्सीमध्ये बसून निघून गेला असावा असे सगळ्यांना वाटले त्याने जाधवांकडून टॅक्सीच्या भाड्याचे पैसेही घेतले नाहीत.

मुंबईसारख्या ठिकाणी जेथे प्रतिक्षण माणसाच्या जीवाला धोका असतो. प्रतिक्षण कोणीतरी कोणाला तरी फसवत असते, अशा त्या महामोह नगरीत जाधवांसारख्या अशिक्षिताला जो भेटला तो परमेश्वरच होता.

ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या माणसाची डिव्हाईन ॲडमिनिस्ट्रेशन किती काळजी घेते हे यावरून सिद्ध होते.

एक दिवस एक शिक्षक माझ्याकडे आला व म्हणाला स्वामीजी तुमच्या कृपेमुळे माझा मुलगा वाचला असे म्हणून त्याने मला पुढील हकिकत सांगितली.

माझा मुलगा विहिरीवर पाणी काढत होता. रहाट ठेवण्यासाठी जे दोन लाकडी खांब असतात, त्यातील एक खांब तुटला व मुलगा रहाट, खांबासहीत साठ फूट खोल विहिरीत पडला. परंतु त्याला ओरखडासुद्धा आला नाही. आम्ही सगळे धावत धावत विहिरीजवळ गेलो त्याने खालून ओरडून सांगितले.

''बाबा काळजी करू नका. मी अगदी सुखरूप आहे. पाळणा दोरीला बांधून खाली सोडा मी त्या पाळण्यात बसून वर येईन !''

''आठ वर्षांच्या त्या मुलाचे हे उद्‌गार ऐकून आम्ही अगदी थक्क झालो. ईश्वराच्या अगाध लीलेचे आम्हाला कौतुक वाटले. साठ फूट खोल विहिरीत पडूनसुद्धा आठ वर्षांच्या त्या मुलाने आम्हाला पाळणा सोडण्यास सांगितले व आम्ही मात्र विहिरीच्या काठावर बसून मुलाला काढायचे कसे याचा विचार करत बसलो होतो.''

आम्ही पाळणा सोडला व मुलाला वर काढले. वर आल्यानंतर मुलाने सांगितले, ''गॅसच्या फुग्याप्रमाणे अगदी हळूवारपणे मी तरंगत तरंगत खाली गेलो, मला जरासुद्धा कोठे लागले नाही ! ''

''ईश्वराच्या अगाध लीलेचे आम्हाला अतिशय आश्चर्य वाटले. स्वामीजी ही सर्व तुमची कृपा, नाहीतर आजकालच्या जमान्यामध्ये लोक ठेच लागून पडतात व मरतात. केवळ तुमच्यावर श्रद्धा ठेवल्याकारणाने ईश्वराने एवढा मोठा अनुभव आम्हाला दिला.''

मी त्या गृहस्थाला म्हणालो, ''**तुम्ही ईश्वरावर श्रद्धा ठेवली, आयुष्यभर सरळ मनाने वागला, कोणाला फसविले नाही, पाच रुपयालासुद्धा तुम्ही कोणाला लुबाडले नाही, आत एक बाहेर एक असे वागला नाही, स्वत:चा स्वार्थ साधायचा अशा वृत्ती जोपासल्या नाहीत, कोणाला चुकीचे मार्गदर्शन** (misguide) **केले नाही. या सर्व चांगल्या वागण्याचा परिणाम म्हणून तुमचा एकुलता एक आठ वर्षांचा मुलगा वाचला. नाहीतर फेकलेला छोटासा दगड लागला व मनुष्य मृत्यू पावला, अशा घटना आपल्या देशात रोजच घडत आहेत आणि पुन्हा एकदा तुम्हाला सांगतो तुमचा मुलगा वाचला तो केवळ तुमच्या सात्त्विक आचरणामुळे यात माझा काही संबंध नाही !** ''

आपल्या जीवनामध्ये जे काही घडत असते ते आपल्या चांगल्या वागण्याचे अथवा वाईट वागण्याचे **फळ** असते. ईश्वरीय न्याय व्यवस्थेमध्ये थोडीशीसुद्धा कधी चूक होत नाही. मात्र कधी कधी एखाद्या व्यक्तीला एखाद्या सत्पुरुषाच्या कृपेमुळे अनेक वेळा सुधारण्याची संधी दिली जाते व अनेक वेळा सुधारण्याची संधी देऊनही जर तो सुधारला नाही तर मग खूप मोठ्या शिक्षा होतात.

ईश्वराचे कृपा करण्याचे डिपार्टमेंट वेगळे आहे व शिक्षा करण्याचे डिपार्टमेंट वेगळे आहे. हे ऐकताना जरी हास्यास्पद वाटत असले तरीही हे सत्य आहे. अशा प्रकारच्या काही घटना मला माहीत आहेत त्यातील एक-दोन येथे सांगतो.

एकदा एक मनुष्य विहिरीत पडला. त्याला काहीही झाले नाही. लोकांनी त्याला वर काढले. दोन दिवसानंतर त्याला एक व्यक्ती भेटली. त्या व्यक्तीने त्याला सांगितले, ''तू जेथे राहतोस... तेथे पूर्वी स्वामी दत्तावधूत रहात होते. त्यामुळे तू विहिरीत पडूनही तुला काही झाले नाही. या पुढे नीट वागत जा तरच तुझे संरक्षण होईल.''

वृक्षाचे बीज जमिनीच्या आत असते पण त्या वृक्षाचे फळ खूप उंच झाडाच्या शेंड्यावर असते. त्याप्रमाणे मनुष्य सत्कर्मे किंवा दुष्कर्मे करतो व त्याचे फळ अनेक वर्षांनी कुठेतरी खूप

दूर अंतरावर त्याला प्राप्त होते.

एका माणसाला वातावरणातील काही दुष्ट शक्ती आत्महत्या करण्यासाठी प्रेरित करत होत्या. आत्महत्या करण्यासाठी तो धरणाच्या कठड्यावर जाई, तेथे त्याला आकाशामध्ये श्री स्वामी दत्तावधूतांचा चेहरा दिसे, ते त्याला हात दाखवित व आत्महत्या करण्यापासून परावृत्त करीत. असे सात -आठ वेळा झाले. श्री स्वामी दत्तावधूत तेव्हा त्या परिसरात नव्हते. जेव्हा ते त्या परिसरात आले, तेव्हा हा मनुष्य त्यांच्या दर्शनास आला. श्री स्वामी दत्तावधूतांचे दर्शन घेताच त्याच्या मनावर असणारे दडपण दूर झाले. आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या दुष्ट शक्ती दूर पळून गेल्या व त्याने सर्व हकिकत स्वामी दत्तावधूतांना सांगितली.

श्री स्वामी त्याला म्हणाले, ''ईश्वराने तुझ्या प्राणांचे संरक्षण करून तुला एक चांगली संधी उपलब्ध करून दिली आहे. आता तू ईश्वरभक्ती करून स्वत:चा उद्धार करून घे !''

ही घटना १९७५ सालची आहे. तो नंतर पुन्हा कधीही स्वामीजींना भेटला नाही व त्याचे काय झाले ते समजण्यास मार्ग नाही.

मनुष्याच्या पूर्वजन्मातील कर्मानुसार चांगल्या, वाईट, मध्यम, मिश्र प्रकारच्या शक्ती त्याला खेचत असतात व तद्नुसार त्याचे जीवन घडत असते. या शक्तींच्या कमी-अधिकतेनुसार स्वभाव

बनत असतो, प्रवृत्ती निर्माण होत असतात. आपण या सर्व जंगलातून मार्ग काढायचा असतो. योग्य मार्ग मिळावा म्हणून एखाद्या चांगल्या सद्गुरुची गाठ पडावी लागते. आजकाल योग्य मार्गदर्शन करणारे गुरु मिळणे मुश्किल झाले आहे व त्याचे कारणही समाजच आहे.

सत्पुरुषाच्या सज्जनतेचा, सरळ स्वभावाचा समाज जेव्हा स्वत:च्या फायद्याकरिता, स्वत:च्या स्वार्थाकरिता वापर करू लागतो, तेव्हा चांगले सत्पुरुष निर्माण होणे बंद होते व समाजाची दिशाभूल करणारे साधू समाजात निर्माण होतात.

''सत्पुरुषाचे मुळीच ऐकायचे नाही, तो सांगतो तसे वागायचे नाही, फक्त गोड बोलून स्वत:ची कामे मात्र सत्पुरुषाकडून करून घ्यायची, जास्तीत जास्त स्वार्थ साधायचा. अशा कावेबाज वृत्तीने जे लोक सत्पुरुषाबरोबर वागतात ते आपले सर्व भविष्य बिघडवून टाकतात. आपले पुढील अनेक जन्मांचे नुकसान करतात. याची त्यांना जाणीव नसते. मृत्यूनंतर अशा लोकांना बरीच वर्षे एखाद्या झाडावर अथवा शिळेमध्ये रहावे लागते. नंतर पशुयोनीमध्ये काही जन्म घ्यावे लागतात. तद्नंतर जेव्हा मनुष्यजन्म मिळतो तेव्हा चांगला सत्पुरुष भेटत नाही.''

आजचा समाजच असा आहे की, या समाजात एखाद्या

चांगल्या सत्पुरुषाचा टिकाव लागणे कठीण आहे. म्हणून चांगल्या सत्पुरुषांना ईश्वराने समाजापासून दूर ठेवले आहे व समाजातील दुष्टप्रवृत्तींना पुरून उरतील अशा सत्पुरुषांना समाजात ठेवले आहे.

माझ्या ओळखीचा एक मनुष्य लोकांना टोप्या घालण्याचा धंदा करत असे. मी त्याला अनेक वेळा या दुष्कर्मापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु काहीच उपयोग झाला नाही. हळूहळू लोक त्याला टाळू लागले. प्रत्येक गोष्टीत त्याला अपयश येऊ लागले. त्याला अनेक रोग झाले व त्यातच त्याचा अंत झाला.

चांगल्या कर्माचे परिणाम चांगले होतात. पूर्वजन्मातील सत्कर्मामुळेच सुखाची प्राप्ती होते व दुष्कर्मामुळे विविध प्रकारच्या समस्यांना संकटांना तोंड द्यावे लागते. पूर्वजन्मातील सत्कर्मामुळे सुखाची प्राप्ती झाली तर ईश्वरभक्ती व सत्प्रवृत्ती यांची कास घट्ट धरावी लागते. विवेकबुद्धी जागृत ठेवावी लागते. परोपकार व दान करून आत्मा सचेतन ठेवावा लागतो. दुष्ट शक्तींपासून स्वत:चे संरक्षण करावे लागते. सद्गुणांचा अभ्यास करावा लागतो. ध्यान-धारणा करावी लागते. सत्पुरुषाबरोबर प्रामाणिकपणे वागावे लागते. ध्यान धारणा व प्राणायाम इत्यादी करून आत्मा शुद्ध करावा लागतो. नि:स्वार्थ बुद्धीची कास धरावी लागते. तरच सुखी जीवन सार्थक होते व अशा जीवनामध्ये जर एखादा चांगला सद्गुरु भेटला तर आपली विद्वत्ता, आपल्यातील अहंकार व

आपले सर्व शहाणपण बाजूला ठेवून नम्र भावाने त्या सद्गुरुची इतकी काही सेवा करावी लागते की, त्या सेवेने जन्मोजन्मींचे प्रारब्ध शुद्ध होऊन जाईल. अनेक जन्मांचे प्रारब्ध शुद्ध झाल्यानंतर साधन मार्गामध्ये गती प्राप्त होते व परमानंदाचा लाभ होतो. परमेश्वराचे साक्षात् दर्शन होते. जीवनमुक्तीचा अनुभव येतो. परमेश्वराच्या दर्शनाने मन असे काही तृप्त होते की, मनाच्या समाधानासाठी, मनाला आनंद मिळावा म्हणून बाह्य साधनांची काही गरज पडत नाही. खऱ्या अर्थाने येथे मानवी जीवन धन्य होते व जगात ईश्वर आहे याची शंभर टक्के खात्री होते.

पूर्वजन्मातील दुष्कर्मांमुळे विविध प्रकारच्या समस्यांना, त्रासांना व संकटांना तोंड द्यावे लागते. अशा वेळी धैर्य न सोडता सतत ईश्वराचे नामस्मरण करावे. जमेल तसा परोपकार करावा. आपण पूर्वजन्मात बरीच दुष्कर्मे केलेली आहेत म्हणून विविध प्रकारच्या त्रासांना तोंड द्यावे लागत आहे याची जाणीव वारंवार मनाला करून द्यावी व जास्तीत जास्त सत्कर्मे करण्याचा प्रयत्न करावा. कोणालाही काया-वाचा मनाने फसवू नये. स्वत:शी व ईश्वराशी प्रामाणिक राहावे. जमेल तसे दान व परोपकार करत राहावे.

ईश्वराच्या स्तोत्रांचे हजारो पाठ करावेत. एखाद्या चांगल्या सत्पुरुषाची मनोभावे सेवा करावी, सत्पुरुषाची सेवा करताना

कुठल्याही प्रकारचा अहंकार, दुराग्रह किंवा स्वत:चे मत ठेवू नये. तरच सत्पुरुषांकडून मिळणारे पुण्य टिकून राहते.

सत्पुरुष भरभरून पुण्य देत असतात. परंतु पूर्वजन्मात दुष्टपणा केलेल्या माणसांजवळ किंवा या जन्मी ज्यांच्या मनामध्ये दुष्ट प्रवृत्ती आहेत, अशा माणसांजवळ पुण्य टिकून राहत नाही. वातावरणातील दुष्टशक्ती या मनाने दुष्ट असलेल्या माणसांजवळ पुण्य टिकून राहणार नाही अशी व्यवस्था करतात. मनाने दुष्ट असलेल्या माणसांच्या मनामध्ये सतत वाईट विचार व स्वार्थी प्रवृत्ती निर्माण होत राहतात व मनाच्या प्रवाहाबरोबर हे वाहत जातात. एखादा चांगला सत्पुरुष भेटला तरी त्याचा वापर स्वत:च्या स्वार्थाकरता करतात व यामुळे अशा लोकांजवळ पुण्य टिकून राहत नाही. म्हणून ज्यांना मानसिक दु:ख, मानसिक त्रास, संकटे अशा गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे, अशा लोकांनी स्वत:मध्ये जे काही वाईट आहे ते सर्व काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे तरच त्यांच्यावर ईश्वराची कृपा होऊ शकेल व ईश्वराने केलेली कृपाही टिकून राहू शकेल.

बऱ्याच वेळा असेही घडते की, संसारिक तापत्रयाने तापलेले लोक थोडाफार आध्यात्माचा आसरा मिळताच आध्यात्मात प्रगती करण्याचे सोडून व आध्यात्मात प्रगती होण्यासाठी कष्ट करण्याचे सोडून प्रवचने करू लागतात. यामुळे परमेश्वराने दिलेली

संधी असे लोक गमावून बसतात व एकदा संधी गेली की मग शेकडो वर्षे पुन्हा परमेश्वर संधी देत नाही.

या प्रकरणामध्ये ईश्वराचे तारणहार रूप सद्‌भक्तांचे कसे तारण करत असते हे आपण पाहिले. ईश्वर दोन प्रकारे शिकवितो. प्रथम तो प्रेमाने शिकवितो. ईश्वराच्या या प्रेममय रूपाला विष्णू असे म्हणतात. विष्णू या शब्दाचा अर्थ पालन करणे असा आहे. ईश्वराचे हे रूप पालन करते, तारण करते, प्रेमाने शिकविते. जेव्हा ईश्वर प्रेमाने शिकवित असतो, तेव्हा जे लोक शिकत नाहीत, त्यांना नंतर ईश्वर फटके मारुन शिकवितो. ईश्वर फटके मारून कसे शिकवितो, ईश्वराच्या त्या रूपाला काय म्हणतात, तेथे ईश्वरीसत्ता कशा प्रकारे कार्य करते, या सर्व गोष्टींचा विचार आपण पुढील अध्यायात करू !

# १२. रडविणारी शक्ती-रुद्र

**रुद्र या शब्दाचा** अर्थ रडविणे ! या रुद्र शक्तीचा आमच्या पूर्वजांनी इतका काही धसका घेतला की रुद्राला रुद्र म्हणणे बंद करून त्यांनी महेश म्हणजे महा ईश असे म्हणण्यास सुरुवात केली. आमच्या पूर्वजांना असे वाटले की, रुद्राला महेश म्हणाल्याने तो खुश होईल व आम्हाला रडविणार नाही. तरीपण रुद्राने आपले रडविण्याचे कार्य थांबविले नाही. म्हणून आमच्या पूर्वजांनी रूद्रसूक्त निर्माण केले व तुझ्या चोर रूपाला नमस्कार, तुझ्या डाकू रूपाला नमस्कार, तुझ्या सेनाधिपती रूपाला नमस्कार, शिपायांच्या अधिपती रूपाला नमस्कार. अशा प्रकारे त्याच्या विविध रूपांना नमस्कार करून पाहिले. त्याच्या नावाने लघुरुद्र, महारुद्र केले परंतु रुद्राने आपला रडविण्याचा कार्यक्रम काही थांबविला नाही. अनादि काळापासून रुद्र मानवांना रडवित आहे व पुढे अनंत कालापर्यंत तो रडवितच राहणार आहे,

कारण तेच त्याचे कार्य आहे.

परमेश्वर तीन रूपांनी कार्य करतो. खरे म्हणजे तो तीन प्रकारे कार्य करतो. तो उत्पन्न करतो, निर्माण करतो म्हणून त्याला ब्रह्मा असे म्हणतात. ईश्वर कशा प्रकारे पालन पोषण करतो हे आपण मागील अध्यायात पाहिले आहे. ईश्वराच्या या रूपाला विष्णू असे म्हणतात. विष्णू या शब्दाचा अर्थ पालन करणे किंवा पोषण करणे. ईश्वराचे तिसरे रूप हे रुद्र रूप आहे. या रुद्र रूपालाच महेश म्हटले जाते. या रुद्र रूपाची आपण या प्रकरणात माहिती करून घेणार आहोत. दुर्दैवाने ईश्वराच्या या रुद्र रूपाची माहिती करून घेऊन कसे वागले असता या रुद्र रूपाचीही आपल्यावर कृपा होईल याचा विचार न करता आम्ही लघुरुद्र व महारुद्र करत राहिलो व त्याच्या नावाने धंदा सुरू केला. अशा प्रकारे वागल्याने त्याची कृपा होणे तर दूरच पण त्याचा कोप आपण ओढवून घेत असतो हे कोणाच्याही लक्षात येत नाही व गेली अनेक शतके किंवा सहस्त्रके आम्ही रुद्राला आवडणार नाही अशाच प्रकारे वागत आहोत.

भैरवापासून वेताळपर्यंतचे सर्व अधिपती रुद्राच्या आधीन राहून कार्य करत असतात, म्हणून शंकराला भूतनाथ असेही म्हटले जाते. सर्व समाजावर रुद्र व त्याचे गण प्रतिक्षण आपले आधिपत्य

गाजवित असतात. त्यांच्या कचाट्यातून लाखातील एखादाच मनुष्य सुटू शकतो, अन्यथा हा रुद्र सर्वांनाच रडवित राहतो.

सद्‌गुरुंच्या आदेशाचे पालन करून आध्यात्माच्या मार्गामध्ये प्रगती करणारा, सद्‌गुणी, निष्पाप मनाचा, सरळ मनाचा असा एखादाच मनुष्य रुद्राच्या कचाट्यातून सुटतो. बाकी सगळ्यांना रुद्र विविध मार्गाने रडवित राहतो. सरळ मनाच्या माणसांवर, स्वच्छ मनाच्या माणसांवर, नि:स्वार्थ माणसांवर रुद्र कृपा करतो. त्यांचे संरक्षण करतो. प्रकाशमय मार्गाने पुढे जाण्यास त्यांना मदत करतो. परंतु स्वार्थी बुद्धीच्या माणसांना, दुर्गुणी माणसांना, दुष्टबुद्धी करणाऱ्यांना तो विविध मार्गांनी रडवितो, त्रास देतो. अंध:कारमय लोकात त्यांची रवानगी करतो व त्यांच्या कर्माप्रमाणे त्यांना भोग भोगण्यास भाग पाडतो.

विविध मार्गांनी मानवांना त्रास देण्याचे कार्य रुद्राचे गण म्हणजे रुद्राचे नोकर भूत, भैरव, वेताळ इत्यादी काळ्या शक्ती करतात व त्यांचे कार्य पूर्ण विश्वभर एक सेकंदही न थांबता चालू असते. त्यांची कार्य करण्याची पद्धत पाहिली की, अतिशय आश्चर्य वाटते. त्यांची न्याय व्यवस्था अचूक कार्य करते. फक्त सद्‌गुणी माणसांच्या ते वाटेला जात नाहीत. सद्‌गुणी माणसाला आशीर्वाद देऊन ते एखाद्या चांगल्या गुरुच्या आश्रयाखाली

ठेवतात व सद्‌गुणी माणसाचे रक्षण करतात.

रुद्राला सद्‌गुण आवडतात. सद्‌गुणी माणसाच्या तो वाटेला जात नाही. उलट तो त्याच्यावर कृपा करतो हे माहीत नसल्याकारणाने गेल्या दोन हजार वर्षांमध्ये भारतीयांनी सद्‌गुणी बनण्याऐवजी रुद्राची म्हणजे शंकराची जागोजागी मंदिरे बांधली आहेत व त्याला प्रसन्न करण्यासाठी असंख्य वेळा लघुरुद्र, महारुद्र, अतिरुद्र केले आहेत.

हा भगवान् रुद्र अशा गोष्टींनी प्रसन्न होत नाही. ढोंग करणाऱ्या लोकांचा त्याला खूप राग येतो. फसवेगिरी, लबाडी, दुर्बुद्धीने वागणाऱ्या लोकांचाही त्याला खूप राग येतो. प्रजेला पिडणाऱ्या राज्यकर्त्यांना तो हजारो वर्षे सतावत राहतो. चुकीचे वागणाऱ्यांना त्रास देणे, रडविणे हे कार्य रुद्र करतो. धनसंचय करणाऱ्या लोकांना, कंजूष लोकांना, दान न करणाऱ्या लोकांना रुद्र चोपून काढतो, त्यांचे धन नष्ट करतो. कृत्रिम महागाई, काळा बाजार व प्रजेला लुटणाऱ्या लोकांना शेकडो वर्षे रुद्र त्रास देत राहतो.

देवपूजेचे, व्रतवैकल्याचे, चुकीच्या रुढी व परंपरा कायम करणाऱ्या समाज प्रमुखांना, पुजाऱ्यांना, समाजाला चुकीचा मार्ग दाखविणाऱ्या साधूंना रुद्र चोपून काढतो. रुद्राच्या शिक्षा शेकडो वर्षे चालतात. धनसंचय करणाऱ्या व दान न करणाऱ्या धनलोभी

माणसाचे धन विविध मार्गाने नष्ट होईल, अशी रुद्र व्यवस्था करतो. अहंकारी माणसाचा अहंकार योग्य वेळ येताच नष्ट करतो व अहंकारी माणसाला सन्मार्गाला लावण्यासाठी विविध उपाययोजना करतो. विष्णू प्रेमाने शिकवितो, तर रुद्र फटके मारून शिकवतो. फटके मारल्याशिवाय रुद्राला शिकविता येत नाही. फटके मारून आपत्ती व संकटे आणून, समस्या निर्माण करून रुद्र माणसाला सन्मार्गाने नेण्याचा प्रयत्न करतो.

आपल्यावर संकटे, आपत्ती, त्रास, दु:ख, चिंता व समस्या यांचे डोंगर कोसळू नये असे वाटत असेल तर परोपकार, दान, सिद्धपुरुषांची सेवा, नि:स्वार्थ बुद्धी व ईश्वराला आवडेल असे वागणे या गोष्टी करायला पाहिजेत. यानेच रुद्राची कृपा होईल. परंतु असे वागण्याऐवजी लोक रुद्राची स्तुती करून रुद्राला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतात. परंतु खोट्या स्तुतीने रुद्र प्रसन्न होत नाही. तो उलटा जास्त चिडतो. हे कोणाच्याही लक्षात येत नाही.

संपूर्ण सृष्टीवर रुद्राची सत्ता चालते. फक्त सद्‌गुणी लोकांना रुद्राचा त्रास होत नाही. सद्‌गुणी लोकांना रुद्राचे प्रेम प्राप्त होते. अर्थात रुद्राचे प्रेम किंवा कृपा प्राप्त होण्याची पात्रता असणारा मनुष्य लाखातील एखादाच असतो. त्यामुळे संपूर्ण सृष्टीमध्ये रुद्राचीच सत्ता चालते, असे म्हणणे संयुक्तिक ठरते.

पृथ्वीतलावरील लोक ज्या पद्धतीने वागतात, त्यांची वागण्याची पद्धत रुद्राला आवडत नाही. समाजात सर्वत्र जेव्हा स्वार्थ बोकाळतो, राज्यकर्ते जेव्हा प्रजेला पिळू लागतात, भ्रष्टाचार जेव्हा सर्वत्र फैलावतो, लोक सतत खोटे बोलू लागतात, लोक जेव्हा लोभी, स्वार्थी होतात अशा वेळी समाजावर विविध प्रकारच्या आपत्ती रुद्राच्या सत्तेने येतात. अग्नि प्रलय, जल प्रलय, भूकंप, युद्ध, सामूहिक नरसंहार, अपघात, भयंकर समुद्र प्रलय, दुष्काळ या सर्व आपत्ती रुद्र शक्तीने येत असतात. चोपून काढून, यातना देऊन रुद्र माणसांना चांगले वागण्यास भाग पाडतो.

दुष्टपणाने वागणाऱ्या राज्यकर्त्यांना, अधिकाऱ्यांना रुद्र हजारो वर्षे यातना देत राहतो. या यातना भोगत असताना या राज्यकर्त्यांना व प्रजापीडक अधिकाऱ्यांना सारखे असे वाटत राहते की, पृथ्वीतलावर आम्ही तीस-चाळीस वर्षे प्रजेला दु:ख दिले, प्रजेला पिळून खाल्ले, पैसा खाल्ला, परंतु त्याचे इतके भयंकर दुष्परिणाम होतील याची जर कल्पना आम्हाला कोणी दिली असती तर फार बरे झाले असते. ही जाणीव किंवा ही मानसिक जागृती आत्म्यामध्ये सुधारणा घडवून आणते. माणसाला सज्जन बनविते व हेच कार्य रुद्र करतो. फटके मारून मारून तो माणसाला सुधारतो. दुष्ट

बुद्धीच्या लोकांना रुद्र जराही दया दाखवत नाही. तो अतिशय न्याय निष्ठूर आहे. त्याच्या शिक्षा हजारो वर्षे चालतात. अनेक मार्गांनी तो छळत असतो.

रुद्राची ही उग्रता लक्षात आल्याने आमच्या पूर्वजांनी रुद्राला महेश, शंकर, शिव अशी नावे देऊन प्रत्येक गावामध्ये एक शिवमंदिर असलेच पाहिजे असा दंडक घातला व रुद्राची उपासना करण्यास लोकांना सांगितले. पण रुद्र तुम्ही किती उपासना करता इकडे फारसे पहात नाही परंतु तुम्ही कसे वागता इकडे त्याचे लक्ष असते. तुम्ही मनाने कसे आहात हे तो पाहतो. तुम्ही जर मनाने चांगले असाल तर रुद्र तुमच्या सर्व इच्छा पूर्ण करतो व तुम्ही जर मनाने वाईट असाल तर तुमचे प्रत्येक पाऊल खड्यात पडेल, अशी व्यवस्था करतो. प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणात राहून ती व्यक्ती कशी वागते इकडे त्याचे बारकाईने लक्ष असते व त्यामुळे सहाजिकच समाज कसा वागतो इकडेही त्याचे लक्ष असते. अनेक लोकांच्या स्वार्थाचे, वाईट वागण्याचे, दुष्टपणाचे एक सामूहिक प्रारब्ध तयार होते. योग्य वेळ येताच या सामूहिक प्रारब्धाचा फुगा रुद्र फोडतो; मग एकाच वेळी शेकडो लोक मरण पावतात.

रुद्र हा संपूर्ण जगाचा शासक आहे. त्याला शिव, शंकर

म्हणून तो खुश होणारा नाही. त्याच्या नावाने हजारो मंदिरे बांधून तो खुश होणारा नाही कारण तो कर्तव्य कठोर आहे. त्याच्या नावाने लघुरुद्र, महारुद्र करून त्याची शांती होण्याऐवजी तो लघुरुद्र, महारुद्र करणाऱ्यांवर जास्त भडकतो, असे माझ्या लक्षात आले आहे. कारण लघुरुद्र, महारुद्र करणारे पुजारी खूप संकुचित मनाचे व स्वार्थी असतात. त्यांनी रुद्राला समजून घेतलेले नसते. स्वत: रुद्र चिडखोर स्वभावाचा असल्याने, भाव भक्तिहीन केवळ पैशासाठी केलेली स्तुती त्याला अजिबात आवडत नाही. अशी स्तुती करणाऱ्या ब्राह्मणांवर भडकतो व त्यांच्या मागे शुक्लकाष्ट लावतो. तर अशा लोभी, स्वार्थी ब्राह्मणांकडून लघुरुद्र करून घेणारे यजमान प्रजापीडक असतात किंवा पराकोटीचे स्वार्थी असतात. रुद्राला असले यजमान अजिबात आवडत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारे रुद्रोपासना करणाऱ्या लोकांना फटके बसतात.

असा हा रुद्र समाजाला हजारो वर्षांपासून रडवित आहे व पुढेही रडवित राहणार आहे. जोपर्यंत प्रत्येक मनुष्य सद्‌गुणी बनत नाही, तोपर्यंत तो रडविणार आहे .

# १३. समाज व देशाचे प्रारब्ध

**मागील प्रकरणामध्ये** संपूर्ण समाजावर रुद्राची सत्ता कशी चालते हे पाहिले. हा रुद्र समाजाचे व देशाचे प्रारब्ध ठरवित असतो.

जेव्हा एखाद्या देशामध्ये मूठभर लोक संपूर्ण समाजाला आपल्या मनाप्रमाणे वागवितात, समाजाची पिळवणूक करतात, चुकीचे कायदे बनविले जातात, चुकीच्या प्रथा पाडल्या जातात, ईश्वराला आवडणार नाही असे ग्रंथ लिहिले जातात, धर्माच्या नावाखाली संपूर्ण समाजाला चुकीच्या दिशेने नेले जाते, राजसत्ता व धर्मसत्ता एकत्र येऊन संपूर्ण समाजाला चुकीचा मार्ग दाखवितात, अशा वेळी या सर्व कर्मांचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला व देशालाही भोगावे लागतात.

राज्यकर्ते व अधिकारी देशाला लुबाडण्याचे मार्ग अवलंबितात, समाजाची फसवणूक करतात. अशा वेळी या

राज्यकर्त्यांच्या पापाचा एक मोठा घडा तयार होतो व केव्हातरी तो फुटतो व त्याचे दुष्परिणाम संपूर्ण देशाला भोगावे लागतात.

समाज जेव्हा मानवता विसरतो, चुकीच्या चालीरितींचे आचरण करतो, स्वार्थी बनतो तेव्हा समाजाच्या या कर्माचा एक मोठा फुगा तयार होतो व केव्हातरी तो फुटतो व त्याचे दुष्परिणाम समाजालाच भोगावे लागतात. समाजाने मानवतेचे आचरण करावे.; प्रेम, परोपकार, दान या मानव धर्माचे आचरण करावे अशी ईश्वराची अपेक्षा असते. अशा प्रकारे न वागता समाज जेव्हा स्वार्थी व संकुचित बनतो, वाईट मार्गाने धन प्राप्त करू लागतो, सत्याचा मार्ग सोडून देतो अशा वेळी समाजाच्या कर्मांचा एक घडा तयार होतो व योग्य वेळ येताच तो फुटतो व त्याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागतात. अशा प्रकारे घराचे प्रारब्ध, घराण्याचे प्रारब्ध, गावाचे प्रारब्ध व देशाचे प्रारब्ध तयार होते.

एखाद्या घरातील लोक जेव्हा चुकीचे वागतात तेव्हा त्या घरातील लोकांवर विविध प्रकारच्या आपत्ती येऊ लागतात. एखाद्या गावातील लोक जेव्हा चुकीचे वागू लागतात तेव्हा त्या गावातील लोकांवर संकटे येतात व एखाद्या देशातील लोक जेव्हा अतिशय चुकीचे वागतात व देशातील राज्यकर्ते जेव्हा भयानक रितीने वागू लागतात तेव्हा त्या देशावर परकीयांचे आक्रमण होते

व तो देश गुलामगिरीत ढकलला जातो.

भारतीय समाजाने सुमारे तीन हजार वर्षांपूर्वी इतक्या काही महाभयंकर चुका केल्या की, संपूर्ण देश सुमारे साडेतेराशे वर्षे गुलामगिरीच्या खाईत लोटला गेला. तद्नंतर सुमारे दिडशे वर्षे इंग्रजांनी आमच्यावर राज्य केले. इंग्रजांच्या शासन काळामध्ये आमच्या नेत्यांनी व समाजानेही पुनश्च काही चुका केल्या त्याचे दुष्परिणाम आजपर्यंत आपण भोगत आहोत. गेली अनेक वर्षे भारतीय समाज, भारतीय राज्यकर्ते अशा काही भयानक गोष्टी करत आहेत, ज्याचे दुष्परिणाम संपूर्ण भारतीय समाजाला व देशाला भविष्यकाळात भोगावे लागणार आहेत.

भारताप्रमाणेच इतर अनेक देशांचे प्रारब्धही फारसे चांगले नाही. अनेक देश, अनेक धर्म व अनेक भाषा इतिहासात जमा होणार आहेत. चुकीच्या वागण्याचे दुष्परिणाम अनेक देशांना व अनेक देशातील समाजाला भोगावे लागणार आहेत. सत्तापिपासू राज्यकर्त्यांना इहलोकी व परलोकीचा काळ अतिशय कठीण जाणार आहे.

संपूर्ण समाज ढवळून निघणार आहे व जेवढे चांगले आहे तेवढेच शिल्लक राहणार आहे, वाईट सर्व नष्ट होणार आहे.

भविष्य काळातील भयानक आपत्तींपासून ज्या कोणाला आपले

संरक्षण व्हावे असे वाटत असेल त्याने स्वार्थीपणा पूर्णपणे सोडून देणे आवश्यक आहे. ईश्वरभक्ती व दानाची कास धरणे आवश्यक आहे. सर्व प्रकारचा संकुचितपणा सोडून दिला पाहिजे. राज्यकर्त्यांनी धन लोभ सोडला पाहिजे. सत्तापिपासू वृत्ती सोडली पाहिजे व जगातील सर्व राज्यकर्त्यांनी एकत्र येऊन सर्व मानव जातीसाठी एक अशी आचरण संहिता निर्माण करायला हवी की ज्या आचार संहितेने पृथ्वीतलावरील सर्व समाज शांततेने जगू शकेल.

घरभरू वृत्तीचे राज्यकर्ते स्वतःचे, समाजाचे व देशाचेही वाटोळे करतात. अशा राज्यकर्त्यांना, गुन्हेगारांना व कृत्रिम महागाई तयार करणाऱ्यांना जोपर्यंत समाजात स्थान आहे तोपर्यंत कुठल्याही देशाला चांगले दिवस येणे कठीण आहे. असे लोक संपूर्ण देशाचे व जगाचेही नुकसान करतात व मृत्यूनंतर हजारो वर्षे यातना भोगत राहतात.

या यातना भोगताना प्रजेला पीडणारे, अनेक मार्गांनी त्रास देणारे हे राज्यकर्ते म्हणतात, ''पृथ्वीतलावर आम्ही जेव्हा राज्य करत होतो, समाजाचे शोषण करत होतो, समाजाचे रक्त पीत होतो, तेव्हा आम्हाला काय माहीत की, या जगात मृत्यू नावाची कुठलीही गोष्ट नाही. शरीर असताना आपण जितके जिवंत असतो त्यापेक्षा कितीतरी अधिक पटीने शरीराच्या मृत्यूनंतर जिवंत असतो. हे आम्हाला त्याकाळी माहीत नव्हते. आता या यातना

भोगताना प्रतिक्षण असे वाटत आहे की, चाळीस वर्षे समाजाला लुबाडून खाल्ले नसते तर फार बरे झाले असते. कारण आता चार हजार वर्षे प्रतिक्षण असह्य यातना भोगाव्या लागल्या नसत्या !''

ध्यानामध्ये जेव्हा परलोकात ज्ञान प्राप्त करण्यासाठी योग्यांना नेले जाते; तेव्हा यातना लोकामध्ये यातना भोगणाऱ्या असंख्य राज्यकर्त्यांची व दुष्टांची भेट होते. त्यावेळी ते कसे बोलतात याचा नमुना वर दिला आहे.

वरच्या लोकातील कायदे इतके कडक आहेत की, पृथ्वीतलावर केलेल्या साध्या साध्या चुकांचेही तेथे भयंकर दुष्परिणाम भोगावे लागतात.

एक मनुष्य आपल्या सरळ स्वभावाच्या सद्‌गुरुला नेहमी फसवीत असे व त्याच्या स्वभावाचा प्रचंड प्रमाणात गैरफायदा घेत असे. आपल्याला यात काही विशेष वाटत नाही. परंतु एवढ्याशा गोष्टीचेही प्रचंड दुष्परिणाम होत असतात व त्याचे परिणाम अनेक शतके भोगावे लागतात.

मनुष्य, व्यक्ती, समाज व देश यांचे प्रारब्ध हे असे एकमेकांवर अवलंबून असते. वाईट गोष्टींचा त्याग करायचा व चांगल्या गोष्टींचे आचरण करायचे ठरविल्यास देशाचेच काय संपूर्ण जगाचे कल्याण होईल.

# १४. अदृश्यशक्तीचे जीवनावरील नियंत्रण

**वातावरणातील गूढ** अदृश्यशक्ती मानवी तसेच प्राण्यांच्या जीवनावर नियंत्रण करतात का ? यावर अजून संशोधन व्हायचे आहे. भूकंप किंवा चक्रीवादळ येणार असले तर प्राणी, पक्षी, गाई-गुरे, खूप चित्रविचित्र हालचाली करतात, असे शास्त्रज्ञांच्या लक्षात आलेले आहे.

आपल्या मालकावर काही संकट येणार असेल तर पाळीव प्राणी चित्रविचित्र हालचाली करतात, असे आढळून आले आहे. यावरून अदृश्यसृष्टीतून मानवी जीवन तसेच प्राण्यांचेही जीवन नियंत्रित केले जाते, असे मला वाटते. या प्रकरणामध्ये मानव व इतर प्राणी यांच्या बाबतीत घडलेल्या काही घटना पुढे देत आहे.

एक मनुष्य दररोज स्कूटरवरून कामावर जात असे. एक दिवस नेहमीप्रमाणे तो कामावर जाण्याची तयारी करत होता.

त्याने पॅन्ट शर्ट घालताच त्याचा आवडता कुत्रा सारखा पायात आडवा येऊ लागला. स्कूटरला किक मारतेवेळी तो सारखा पॅन्ट खेचू लागला. शेवटी त्याने कुत्र्याला बांधून ठेवले व स्कूटरवर बसून कामावर गेला. वाटेत त्याला अपघात झाला व त्यात त्याचा मृत्यू झाला.

माझ्या ओळखीचे एक गृहस्थ एकदा प्रेताला आडवे गेले, म्हणजे प्रेत येत असताना त्यांनी रस्ता ओलांडला. त्याच दिवशी संध्याकाळी ते आजारी पडले. आजारपणातच त्यांना भयानक चेहऱ्याची माणसे दिसू लागली. ही माणसे १०-१२ फूट उंच होती व भयानक होती. त्यांच्या पत्नीने ही गोष्ट मला सांगितली. मी म्हणालो, ''प्रत्येक आत्म्याचे संरक्षण करणारी एक शक्ती त्याच्या भोवती असते. देवतांच्या स्तोत्रांचे पाठ केल्याने ही संरक्षण शक्ती वाढते. म्हणून नेहमी देवतांच्या स्तोत्रांचे पाठ केले पाहिजेत. तरी तू आता देवी कवचाचे रोज चाळीस पाठ कर म्हणजे त्याला बरे वाटेल !''

मी सांगितल्याप्रमाणे तिने देवी कवचाचे रोज चाळीस पाठ करण्यास सुरुवात केली व आठ-दहा दिवसात तिचा नवरा बरा झाला.

आमच्या आश्रमामध्ये पूर्वी एक मोर होता. मी औदुंबराच्या

झाडाखाली बसलो की, तो मोर मला खेटून बसायचा. कधी कधी मी व औदुंबराचे झाड याच्यामध्ये जी काही थोडीफार जागा असायची त्या जागेत घुसून तो बसायचा. सारखा माझ्या आसपास राहायचा.

एकदा मुंबईहून सौ. वनिता दीक्षित आश्रमात आल्या. तो मार्च महिना होता. भयानक गर्मी होती. दुपारची वेळ होती.

सौ. वनिता दीक्षित आश्रमात येऊन बसल्यानंतर मोर अचानक त्यांच्या समोर आला. प्रथम तो त्यांच्या पायाला खेटून उभा राहिला. त्यांना एक प्रदक्षिणा घातली व नंतर त्यांच्या समोर नृत्य करायला सुरुवात केली. सुमारे दीड तास पिसारा फुलवून तो नृत्य करत होता.

मार्च महिना होता, कडकडीत ऊन होते व दुपारची वेळ होती असे असताना मोर नृत्य करत होता. यावरून सौ. वनिता दीक्षित यांच्या मागे असणाऱ्या दैवी शक्ती त्या मोराला दिसत होत्या व त्यांना पाहून मोर आनंदाने नृत्य करत होता हे सिद्ध होते. या घटनेचा याशिवाय दुसरा कुठलाही अर्थ लावता येत नाही. प्राण्यांनाही मनुष्यांमागच्या चांगल्या वाईट शक्ती कळतात हे सिद्ध होते.

यानंतर सुमारे वर्षा–दीड वर्षाने आमच्या आश्रमामध्ये एक स्त्री आली. ही स्त्री माझ्या समोर येऊन बसताच मोर एकदम

खवळला. या स्त्रीला आश्रमातून काढून टाका, असे तो मला सांगू लागला. मला तसे करणे शक्य नव्हते, कारण ती स्त्री हजार मैलांवरून मला भेटण्यास आली होती व दोन दिवसांनी जाणार होती. तिच्या मागे असलेल्या भयानक पिशाच्च शक्तींचा मला खूपच त्रास झाला व मोरालाही भयानक त्रास झाला. एका तासात त्याची सर्व पिसे गळून गेली व त्या स्त्रीची दृष्टी पडल्यापासून तीन तासांत मोर मृत्यू पावला.

आश्रमात असणारे हंसही आश्रमात येणाऱ्या दुष्टशक्तींमुळे मृत्युमुखी पडले. या घटना १३-१४ वर्षांपूर्वीच्या आहेत. तेव्हापासून परवानगीशिवाय कोणीही आश्रमात यायचे नाही असा नियम मी केला व येणाऱ्या व्यक्तीने किमान दहा हजार देवीसूक्ताचे किंवा दत्त स्तोत्राचे १६ हजार पाठ करून मगच यावे, असा दंडक घातला.

आपण प्राण्यांना खाऊ घालतो. परंतु माझ्या असे लक्षात आले आहे की, काही कारणाने माणसाने घातलेले खाद्यपदार्थ प्राणी खात नाहीत. याचे कारण काय हे समजण्यास मार्ग नाही. मी प्रत्यक्ष पाहिलेल्या काही घटना पुढे देत आहे. खाद्यपदार्थ खाण्यापासून या प्राण्यांना कोण परावृत्त करते ते समजत नाही अशा कितीतरी घटना मी पाहिलेल्या आहेत. या घटनांच्या

पाठीमागे काय रहस्य आहे ते समजण्यास मार्ग नाही.

नाशिकजवळ सोमेश्वर या ठिकाणी गोदावरी नदीच्या किनारी एकांतवासामध्ये मी साधना करीत होतो. एकदा औदुंबराखाली मी बसलेलो असताना चार-पाच कुत्रे खाण्यासाठी काहीतरी शोधत आहेत हे मी पाहिले. कुत्रे खूप भुकेलेले होते.

माझ्या एका सेवकाला मी सांगितले, ''कुत्र्यांना काहीतरी खायला आणून दे !'' माझ्या सेवकाने समोरच्या हॉटेलमधून भजी, वडा पाव असे बरेचसे पदार्थ आणून त्या कुत्र्यांच्या समोर ठेवले. परंतु कुत्र्यांनी या सर्व पदार्थांकडे मुळीच पाहिले नाही. खाद्यपदार्थ शोधण्याचा त्यांचा उपक्रम चालूच राहिला. इतकेच नव्हे तर खाद्यपदार्थांच्याकडे दुर्लक्ष करून कागद चाटणे, प्लास्टिक चाटणे असे उद्योग कुत्रे करत होते. बराचवेळ मी हा सर्व प्रकार पहात होतो. मला समजत नव्हते की किलोभर खाद्यपदार्थ समोर असताना कुत्रे तिकडे मुळीच का पहात नाही. शेवटी मी एक प्रयोग करायचे ठरविले. हातात विभूती घेऊन **ॐ द्राम् दत्तात्रेयाय नम:** या मंत्राचा पाच मिनिटे जप केला व ती विभूती त्या खाद्यपदार्थांवर टाकली.

तात्काळ ते कुत्रे त्या खाद्यपदार्थांवर तुटून पडले व अर्ध्या मिनिटात सर्व खाद्यपदार्थ फस्त करून टाकले. यावरून कुत्र्यांना

खाद्यपदार्थ कोणीतरी खाऊ देत नव्हते हे सिद्ध होते. विभूती टाकल्याबरोबर अडवणूक करणारी शक्ती दूर झाली व कुत्र्यांना त्यांची भूक भागविता आली, हेच खरे नाही काय ?

एका व्यक्तीला मी सांगितले दररोज गाईला खायला घालत जा ! माझ्या सांगण्याप्रमाणे तो दररोज गाईला भात, पोळी असे खायला घालत असे. परंतु गाय फक्त हुंगून पुढे निघून जात असे. कधीही खात नसे. जवळजवळ तीन-साडेतीन महिने दररोज गाईला गोग्रास देऊनही गाईने खाल्ले नाही. तीन साडेतीन महिन्यांनंतर एक दिवस गाईने तिला खायला दिलेले सर्व खाल्ले व त्या दिवसापासून या भक्ताच्या सर्व समस्या हळूहळू सुटू लागल्या.

यावरून पशु-पक्षी, प्राणी यांनाही नियंत्रित करणारी शक्ती वातावरणात आहे, हे सिद्ध होते.

नाशिकपासून सुमारे वीस किलोमीटरवर त्र्यंबकेश्वर हे मोठे तीर्थक्षेत्र आहे. नाशिकहून त्र्यंबकेश्वरला पोहोचण्यापूर्वी आंजनेरी नावाचे गाव लागते. या गावामध्ये आंजनेरी नावाचा पर्वत असून, या पर्वतावर अंजनी मातेने तपस्या केली व येथेच मारुतीचा जन्म झाला असे म्हणतात. या पर्वतावर खूप वानर आहेत.

चैत्र शुद्ध पौर्णिमा हा आंजनेय म्हणजे मारुतीचा जन्म दिवस. या दिवशी पर्वतावरील सर्व माकडे एकत्र येतात. त्यांच्या हातात

छोट्या छोट्या काटक्या असतात व या काटक्यांना फडकी गुंडाळलेली असतात. हनुमान जयंतीच्या दिवशी अशा प्रकारे गुढ्या उभारून माकडे व वानरे मारुतीरायाला आदरांजली तर व्यक्त करत नाहीत? १९६८ साली आंजनेरी पर्वतावर मी साधना करत होतो तेव्हा ही घटना मी पाहिली. सध्या परिस्थिती काय आहे हे समजण्यास मार्ग नाही.

आसाममध्ये एक असे ठिकाण आहे की, वर्षातील काही विशिष्ट दिवशी येथील लोक अग्नि पेटवितात. या अग्निला पाहून हजारोंच्या संख्येने पक्षी वेगाने उडत येतात व त्या अग्नित उडी टाकून आपले जीव गमावतात.

हे असे का घडते हे आजतागायत कोणालाही कळले नाही.

बिहारमधील समस्तीपूर जिल्ह्यात एक गाव आहे. गावाजवळून गंडकी नदी वाहते. नागपंचमीच्या दिवशी हजारोंच्या संख्येने लोक गंडकी नदीवर जातात, नदीत उतरतात व हजारोंच्या संख्येने साप बाहेर काढतात. यातील काही साप १२-१२ फूट लांब व अत्यंत विषारी असतात. एकेक मनुष्य पंचवीस-तीस साप आपल्या देहावर धारण करतो. अशा प्रकारे सर्व लोक नागपंचमी साजरी करतात.

जीवन हे अनेक रहस्यांनी भरलेले आहे. अनेक प्रश्नांची

उत्तरे कधीही मिळत नाहीत.

आज नागपंचमी आहे हे नागांना कसे कळते ?

फक्त नागपंचमीच्याच दिवशी गंडकी नदीमध्ये हजारोंच्या संख्येने नाग येतात कुठून ?

नागपंचमीच्या दिवशी या गंडकी नदीमधील नाग त्यांना पकडणाऱ्यांना चावत का नाहीत ?

या प्रश्नांची उत्तरे आजतागायत मिळालेली नाहीत.

नागपूर येथील श्री दत्तात्रेय आगे यांच्या घरातील कुत्री दर एकादशीला कडकडीत उपवास करीत असे.

''आज एकादशी आहे असे तिला कोण सांगत असे ?''

सोलापूर-हैद्राबाद रस्त्यावर कर्नाटकामध्ये अमृतकुंड म्हणून एक शंकराचे स्थान असून येथे मांसाहार करून गेल्यास मधमाशा हल्ला करून मांसाहार करून आलेल्या व्यक्तीला जखमी करतात असा अनेकांना अनुभव आलेला आहे.

''येथील मधमाशांना देवस्थानामध्ये दर्शनाला येणाऱ्या हजारो लोकांपैकी कोण मनुष्य मांसाहार करून आला आहे हे कसे कळते ?''

श्रीशैलच्या अरण्यामध्ये सलेश्वरम नावाचे एक स्थान आहे. तीन दिवस अरण्यात चालत प्रवास केल्यानंतर सलेश्वरम या स्थानात

जाता येते. हे सर्व अरण्य निर्मनुष्य असून प्रत्यक्ष सलेश्वरम या स्थानापासून २०-२२ मैलावर भिल्ल लोकांच्या २-३ झोपड्या आहेत.

सलेश्वरम येथे खूप उंचावरून पडणारा एक धबधबा असून या पाण्यात मोठमोठे मासे आहेत. परंतु येथील मासे मारण्याचा कोणी प्रयत्न केल्यास अरण्यातील वानर त्याच्यावर हल्ला करतात व त्याला जखमी करतात असा भिल्लांचा अनुभव आहे. अरण्यातील भिल्लांचे खाण्याचे खूप हाल वनवास असतात. जंगलातील प्राणी मारून किंवा नदीतील मासे मारून ते आपली कशीबशी गुजराण करत असतात. परंतु सलेश्वरम येथील मासे मारण्याचे धाडस कोणीही करत नाही.

''मासे मारणाऱ्या व्यक्तीवर अरण्यातील वानरे हल्ला का करतात ?''

''ही व्यक्ती मासे मारायला आली आहे हे त्या वानरांना कसे कळते ?''

मी या स्थानामध्ये २-३ वेळा गेलो परंतु आसपास मला एकही वानर दिसला नाही. असे असताना भिल्ल लोकांच्या म्हणण्याप्रमाणे मासे मारण्याच्या उद्देशाने तेथे जेव्हा कोणी जातात तेव्हा तेथील वानरांना ते आपोआप कळते, ''हे कसे घडते ?''

यावरून अदृश्यसृष्टीमधून प्राण्यांवरती लक्ष ठेवणारी काहीतरी व्यवस्था आहे हे सिद्ध होते.

काही स्थाने ही अशी असतात की, त्या स्थानांमध्ये काही विशिष्ट प्रकारची शक्ती असते, ही शक्ती म्हणजे काय याचा शोध अद्याप कोणालाही लागलेला नाही.

हिमालयामध्ये अनेक चमत्कारिक स्थाने आहेत. या स्थानांमध्ये असे का घडते याचे उत्तर आजही कोणाला सापडत नाही.

डेहराडूनच्याजवळ सुखी नावाचे गाव असून, त्या गावाच्या जवळ एका पर्वत शिखरावर लोक दररोज एक भांडे दूध ठेवून देतात. संध्याकाळी ठेवलेले दूध कोणीतरी पिऊन टाकते. दूधाचे पात्र सकाळी रिकामे झालेले असते.

दूध कोण पिते ? हे पाहण्यासाठी काही माणसांनी पहारा ठेवला. परंतु दूध कोण पिते हे अखेरपर्यंत कोणाला कळू शकले नाही. आळीपाळीने पहारा करणाऱ्या लोकांना कधी तेथे नाग दिसला तर कधी एक साधू त्या परिसरात फिरताना दिसला. परंतु दूध पिताना कोणीही दिसले नाही. साधूचा आत्मा नागरूपाने येऊन दूध पीतो असे लोकांना वाटते.

अमरनाथ गुफेमध्ये बर्फाचे शिवलिंग कसे तयार होते हे

आजही लोकांना कळत नाही. कधीकधी हे शिवलिंग अकरा फूट उंच असते.

हिमालयातील कुल्लू शहराच्या जवळ एक मथाण नावाचे गाव असून या गावात एक छोटेसे शंकराचे मंदिर आहे. या मंदिरावर दोन-तीन वर्षातून एकदा वीज पडते. वीज पडल्यावर या मंदिराचे कुठल्याही प्रकारचे नुकसान होत नाही. परंतु शिवलिंगाचे असंख्य तुकडे होतात व पुष्कळवेळा हे तुकडे एक - दोन मैल दूर जाऊन पडतात, मंदिराचा पुजारी भक्तांकरवी सर्व तुकड्यांना गोळा करून लोण्याने तुकड्यांना एकत्र जोडतो.

लोण्याने तुकडे जोडून झाल्यावर पुजारी शिवलिंग टोपलीने झाकतो. काही दिवसात तुकडे आपोआप जोडले जाऊन शिवलिंग तयार होते व टोपली आपोआप बाजूला जाऊन पडते. शिवलिंग व्यवस्थित तयार होईपर्यंत गावातील लोक व्रतस्थ राहतात.

शिवलिंगाचे तुकडे गोळा करताना अनेक चमत्कार घडतात. तुकडे कोठे पडले आहेत हे पुजाऱ्याला स्वप्नात दिसते. तसेच हे तुकडे कण्हत आहेत, असेही पुजाऱ्याला समजते. तुकड्यांच्या या कण्हण्याच्या आवाजावरून पुजारी तुकड्यांना शोधून काढतो व अशारितीने शिवलिंग तयार होते. ''हे कसे घडते हे आजतागायत कोणालाही कळले नाही !''

हिमालयातील कुशली नावाच्या गावात एक दिव्य तलाव आहे. उत्तरकाशी, भटवाडी, झाला, जसपूर या मार्गे कुशली गावी जाता येते. या दिव्य तलावाला लोक शंकर तलाव असेही म्हणतात. येथे पार्वती देवीने तपस्या केली होती. देवता येथे स्नानासाठी येतात. या तलावाच्या किनाऱ्यावर देवतांचा नित्य विहार असतो म्हणून याला दिव्य तलाव असेही म्हणतात.

या तलावात स्नान करणे, कपडे धुणे, भांडी धुणे या सर्व गोष्टींना मनाई आहे. या तलावाच्या तळाशी एक शिवमंदिर आहे. या तलावात पैसा टाकला तर तो पैसा पाण्यावरून तरंगत तरंगत जाऊन शिवमंदिरात पडतो.

नाणे पाण्यावरून तरंगत शिवमंदिराच्या दिशेने गेले की आपले काम होणार असे भाविक समजतात. जर काम होणार नसेल तर पाण्यावर तरंगणारे नाणे फेकणाऱ्याच्या पायावर येऊन पडते.

या तलावात जर दूध ओतले तर या दूधाची एक धार तयार होते व शिवलिंगावर जाऊन पडते. जर काम व्हायचे नसेल किंवा देवता नाराज असेल तर दूध किनाऱ्यावर परत येते.

''हे रहस्य काय आहे याचा अद्याप शोध लागलेला नाही !''

उज्जैन (मध्यप्रदेश) येथील भैरव मंदिरातील मूर्ती चक्क दारू पिते. पुजारी एका चांदीच्या प्लेटमध्ये दारू ओततो व मूर्तीच्या

तोंडाजवळ नेताच दारू गटागटा कोणीतरी पित आहे असे दिसते. एका क्षणात प्लेटमधील दारू अदृश्य होते.

वृक्षांमध्येसुद्धा आत्म्यांचा निवास असतो. हे आत्मे अनेक वेळा वृक्षातून बाहेर येतात व आपल्या नियतीनुसार पुन्हा वृक्षात वास्तव्य करतात. काही राक्षसी आत्म्यांना तर नियतीने वृक्षांमध्ये जखडून टाकलेले असते. त्यांना एका सेकंदासाठी सुद्धा आपले झाड सोडून बाहेर येता येत नाही. ज्या झाडात ते राहतात ते झाड हेच आपले शरीर स्वरूप असे त्यांना वाटते. आफ्रिकेत अनेक मांसाहारी झाडे आहेत. या झाडांपासून काही अंतरावर पक्षी किंवा कोंबड्या वगैरे घेऊन विक्रीसाठी लोक बसलेले असतात. पर्यटक पक्षी विकत घेतात व झाडाच्या दिशेने सोडतात. झाडाच्या फांद्या या पक्षांना पकडतात व खाऊन टाकतात.

''हे रहस्य काय आहे अद्यापही कोणाला कळलेले नाही!'' अशा प्रकारे वनस्पती, प्राणी, पशु व विशिष्ट स्थाने, जमीन, पाणी सर्वत्र अदृश्यसृष्टीतून नियंत्रण करण्यात येते. मानवी जीवनात तर अशा घटना नेहमी घडत असतात. कोणीतरी नियंता आहे याची जाणीव मानवाला नेहमी होत असते.

एक ऑफिसर होते. ते रोज ध्यान धारणा करत. त्यांचा एक मित्र होता. हा मित्रही खूप आध्यात्मिक होता. त्या मित्राने एक

आध्यात्मिक पुस्तक वाचले ते त्याला खूप आवडले. आपल्या ऑफिसरला हे पुस्तक वाचायला द्यावे म्हणून तो ऑफिसरच्या घरी गेला.

ऑफिसरची बायको कजाग होती. ऑफिसर घरात असूनही तिने साहेब घरात नाहीत असे सांगून हाकलून लावले. नवऱ्याकडून फुकट कामे करून घेण्यास येणाऱ्या लोकांचा तिला राग येत असे. आठ-दहा दिवसांनी तो मित्र परत गेला व परत त्या ऑफिसरच्या बायकोने साहेब घरात नाहीत असे सांगितले.

अशा प्रकारे शेकडो वेळा हा मित्र आध्यात्मिक पुस्तक घेऊन साहेबांच्या घरी गेला व 'साहेब घरात नाहीत' हे घोषवाक्य ऐकून परत आला '**अशी बारा वर्षे गेली.**'

बारा वर्षांनंतर तो असाच एकदा पुन्हा साहेबांच्या घरी गेला. साहेब त्याचवेळी गेट मधून बाहेर पडत होते. रस्त्यातच दोघांची गाठ पडली. मित्राने सर्व हकिकत सांगितली व पुस्तक दिले. या पुस्तकाच्या वाचनाने साहेबांचे जीवन परिपूर्ण आध्यात्मिक झाले व ते योगी झाले.

''**वातावरणातील कुठल्या शक्ती साहेबांच्या हातात पुस्तक पडू नये अशी इच्छा करत होत्या ?**'' मारणाऱ्यापेक्षा तारणारा श्रेष्ठ असतो ! मारकशक्ती साहेबांच्या हातात पुस्तक

पडू देत नव्हत्या; तर तारकशक्तीने बरोबर साहेबांच्या हातात पुस्तक पडेल अशी व्यवस्था केली. हे जरी खरे असले तरी तारकशक्तीला यासाठी बारा वर्षे वाट पाहावी लागली हे विसरून चालणार नाही. तसेच मारकशक्ती ऑफिसरच्या घरात रहात होत्या व ऑफिसरच्या बायकोच्या बुद्धीला नियंत्रित करीत होत्या, हे यावरून सिद्ध होते. मारकशक्तीचा जोर कमी होईपर्यंत दैवी शक्तीने वाट पाहिली व पुस्तक घराच्या बाहेर ऑफिसरच्या हातात दिले. एखाद्या व्यक्तीचे तारण करताना दैवीशक्तींना किती कष्ट पडत असतात हे यावरून सिद्ध होते.

एकांतवासात राहून गेली चाळीस – बेचाळीस वर्षे मी साधना करीत आहे. पूर्वी जरी मी अरण्यात रहात होतो. तरी लोकांना भेटत होतो. अनेक लोक मी जेथे असेन तेथे येऊन मला भेटत असत. यासाठी लोकांना दहा–दहा पंधरा–पंधरा किलोमीटर चालत यावे लागत असे. गेली पंधरा–सोळा वर्षे मात्र ईश्वरी इच्छेनुसार मी लोकांना भेटणे बंद केले असून जर '**वरून**' हुकुम आला तरच एखाद्याला भेटत असतो.

तारकशक्ती व मारकशक्तींचा अनुभव मलाही असंख्य वेळेला आला आहे. त्यातील दोन अनुभव पुढे देत आहे.

ईश्वराच्या आज्ञेवरून एका व्यक्तीला मी स्वत:हून भेटलो

व त्याला योगमार्ग व ध्यानमार्ग याची माहिती देऊन ''रोज ध्यान करत जा !'' असे सांगितले. ही व्यक्ती जरी सज्जन होती तरी या व्यक्तीच्या घरातील सर्व माणसे धनलोभी होती. त्यामुळे ही व्यक्ती चिखलात पडलेले रत्न होते.

मी सांगितल्याप्रमाणे या व्यक्तीने साधना सुरू करताच त्या व्यक्तीच्या घराण्यात असणाऱ्या मारकशक्तींना हा जीवात्मा आपल्या हातातून सुटणार असे वाटू लागले. मारकशक्तींनी त्या व्यक्तीला दुर्बुद्धी देण्यास सुरुवात केली व त्याचा त्रास मला होऊ लागला. ''मी काय करावे !'' असे मी ईश्वराला विचारले. ईश्वराने मला ''या व्यक्तीशी संबंध तोडून टाक व या व्यक्तीचे काय करायचे ते मी पाहतो !'' असे सांगितले. त्यामुळे या व्यक्तीबरोबरचे संबंध मी तोडले. एकंदरीत जे काही दृश्य समोर दिसत आहे त्यावरून या व्यक्तीला मृत्यूनंतर काही काळ अंध:कारमय लोकात मारकशक्तीचा मार खात राहावे लागणार असे वाटते.

माझे काही भक्त सेवा म्हणून माझी पुस्तके विकत घेतात व लोकांना देतात. जे लोक अशी सेवा करतात त्यांना बरेच अनुभव येतात. त्यामुळे असे अनेक भक्त आहेत की जे अनेक पुस्तके घेतात व लोकांना देतात. अशाप्रकारे सेवा करण्यामध्ये सद्‌भक्तांचे पुढील उद्देश असतात.

''आपल्या हातून ईश्वरसेवा घडावी व आपले प्रारब्ध शुद्ध व्हावे !''

शुद्ध सात्त्विक व आध्यात्मिक विचारांचा लाभ लोकांना व्हावा व लोकांचा उद्धार व्हावा ! ही सेवा करत असताना भक्तांना अनेक प्रकारचे अनुभव येतात.

हजारो लोक असे भेटले ''स्वामीजींची पुस्तके वाचून जीवनाकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोन बदलला. आम्ही ध्यान-धारणा करू लागलो आहोत.'' असे म्हणाले. काही लोकांना तर पुस्तके वाचता वाचताच ध्यानाचे अनुभव येऊ लागले. त्या सर्वांनी आपले ध्यानाचे अनुभव लिहून ठेवण्यास सुरुवात केली आहे. पोथ्या वाचल्याने ग्रहपीडा, भूतबाधा दूर झाल्या, संकटे दूर झाली, स्वप्नातून मार्गदर्शन मिळाले, आर्थिक समस्या दूर झाल्या, अडली कामे पूर्ण झाली असेही अनेक लोकांनी सांगितले. अशी पुस्तके तीन हजार वर्षांपूर्वी लिहिली गेली असती तर हिंदू समाजाचे चांगले झाले असते असेही काही लोक म्हणाले. अदृश्यसृष्टीतील एका आत्म्याने आम्ही जिवंत असताना जर अशी पुस्तके लिहिली गेली असती तर आमचाही उद्धार झाला असता, तर काही पिशाच्च शक्तींनी ''या पुस्तकांना हात लावू नका आमच्या अंगाची आग होत आहे !''असेही सांगितले.

एका स्त्रिने कळविले आहे, ''स्वामीजींची पुस्तके वाचल्याने माझे कल्याण झाले, माझ्या सर्व समस्या दूर झाल्या, सर्व संकटे दूर निघून गेली, जीवनाला मार्ग मिळाला, स्वामीजींनी लिहिलेली सर्व पुस्तके वाचली. नामस्मरण, जप सुरू आहे. परंतु स्वामीजींनी लिहिलेल्या पोथ्या मी वाचू शकत नाही. कुठलीतरी शक्ती मला पोथ्या वाचण्यापासून परावृत्त करत आहे. विशेष म्हणजे ज्यांना मी पोथ्या, पुस्तके दिली त्यांनाही खूप दिव्य अनुभव आले. परंतु मी पोथी वाचू शकत नाही, याचा खेद होतो ! ''

आमच्या सेवकांना काही लोकांनी पुढीलप्रमाणेही सांगितले.

''पुस्तके घरात येऊन तीन वर्षे झाली. परंतु अद्याप पुस्तके वाचली नाहीत, वाचायला वेळ मिळाला नाही, बऱ्याच वेळा पुस्तक हातात घेतले पण वाचायची बुद्धीच होत नाही !''

''काही लोकांना पुस्तके वाचण्यात अजिबात गोडी वाटत नाही.'' असेही म्हणतात. तर काही लोकांनी पुस्तकांवर टीका केली आहे व स्वामीजींना आध्यात्म कळत नाही असेही म्हटले आहे.

तारकशक्ती व मारकशक्ती मानवी जीवनावर कसे नियंत्रण करत असतात हे वाचकांना कळावे म्हणून या सर्व गोष्टी लिहिल्या आहेत. दैवी व आसुरी शक्तींचे युद्ध अनादिकाळापासून चालू असून, पुढे अनंतकालपर्यंत चालू राहणार आहे हेच खरे !

वातावरणातील अदृश्यशक्ती, चांगल्या व वाईट शक्ती मानवी जीवन नियंत्रित करतात याचे अनेक अनुभव डोळसपणे जीवनाकडे पाहाणाऱ्याला नक्कीच येत असतील. ज्यांना येत नसतील त्यांनी जीवनाकडे डोळसपणे पहाण्यास शिकावे.

ज्याच्या पाठीमागे दैवीशक्ती आहे अशा व्यक्तीच्या गाडीला कधीही अपघात होत नाही. कारण दैवीशक्ती संरक्षण करत असतात.

एका मुस्लीम (अमजद) तरुणाची माझ्यावर खूप श्रद्धा होती. मी सांगितल्याकारणाने त्याने कर्ज काढून सुमो घेतली व टूरिस्टचा धंदा सुरू केला. दोन वर्षात त्याचे सर्व कर्ज फिटले. अमजदने कर्ज फिटल्याची आनंदाची बातमी मला कळविली.

एक दिवस सकाळी साडेपाच वाजता अमजदने पाहिले की त्याच्या गाडीची चोरी झाली आहे. त्याचे हातपाय कापू लागले. तो कसाबसा घरात आला. गाडी चोरी झाल्याचे बायकोला कसेबसे सांगितले व अचानक त्याच्या तोंडातून शब्द फुटेनासा झाला. त्याच्या बायकोने प्रथम ईश्वराची प्रार्थना केली व तिला रडू आवरेनासे झाले. आजूबाजूची माणसे गोळा झाली इतक्यात, एक सात-आठ वर्षांचा मुलगा तेथे आला व तो सर्वांना सांगू लागला, ''अहो तुम्ही रडता कशाला ? तुमची गाडी अर्धा किलोमीटर

अंतरावर आहे. ती तुम्ही जाऊन घेऊन या !'' या मुलाच्या सांगण्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. परंतु त्या मुलाच्या तोंडून निघालेल्या वाक्याने अमजदचे हातपाय कापणे थांबले व त्याला बराच धीर आला.

अमजद व अमजदच्या बायकोने त्या मुलाकडे अधिक चौकशी केली तेव्हा तो मुलगा म्हणाला,

''चोराने तुमची गाडी चोरली. तो गाडी घेऊन शंभर ते दोनशे फूट गेला नसेल इतक्यात - गाडीच्या मागच्या सीटवर पांढरे कपडे घातलेले कोणीतरी स्वामीजी झोपलेले आहेत असे त्याने पाहिले व त्याच्या अंगाचा थरकाप उडाला. म्हणून त्याने गाडी तेथेच थांबविली व तो पळून गेला !''

हा मुलगा कोण ? कोठून आला ? सकाळी साडेपाच-पावणेसहाच्या सुमारास इतकी सविस्तर बातमी या सात-आठ वर्षाच्या मुलाजवळ कशी ?

''बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर आम्ही राहतो. पहाटे साडेपाच वाजल्यापासून गाडीविषयी चिंता करत आहोत हे या मुलाला कळले कसे ?'' हा मुलगा या परिसरात यापूर्वी कधीच दिसला नाही, देवासारखा अकस्मात प्रकट होऊन हा आम्हाला चोरी गेलेल्या गाडीसंबंधी इत्थंभूत माहिती कशी देत आहे ?

आणि ती ही सकाळी पावणे सहा वाजता ! इतक्या लवकर तर मुले उठतसुद्धा नाहीत !'' इत्यादी अनेक प्रश्न अमजदची बायको समीना हिच्या मनात तरळून गेले. परंतु यावर नंतर विचार करू असे ठरवून सर्वजण घरापासून पाचशे ते सातशे फूट अंतरावर गेले तेथे अमजदची गाडी उभी होती ती घेऊन आले. गाडीचे काहीही नुकसान झालेले नव्हते. गाडी एकदम व्यवस्थित होती.

मुलाचे तोंड गोड करण्यासाठी त्याचा अमजद व समीनाने शोध घेतला, परंतु तो मुलगा केव्हाच अदृश्य झालेला होता. त्या संपूर्ण परिसरामध्ये त्या मुलाचा कोठेही पत्ता लागला नाही.

यावरून खऱ्या श्रद्धेने ईश्वराची भक्ती केली असता अदृश्यसृष्टीतून भक्तांची काळजी घेतली जाते हे सिद्ध होते.

अदृश्यसृष्टीतून मानवी जीवनामध्ये सतत हस्तक्षेप होत असतात. श्रद्धा, भक्ती असणाऱ्याला अदृश्य सृष्टीतून कशी मदत मिळते हे आपण अमजदच्या गाडीच्या चोरीच्या उदाहरणावरून पाहिले. या घटनेमध्ये अमजदच्या गाडीमध्ये जरी श्री स्वामी दत्तावधूत झोपलेले चोराला दिसले तरी माझे म्हणणे असे आहे की........

''श्रद्धा, सेवा, भक्तीने माणसाजवळ पुण्य गोळा होते व ठराविक परिमाणाइतके पुण्य गोळा झाले की अदृश्यसृष्टीतून मदत

मिळू लागते. माझे रूप घेऊन अनेक वेळा अदृश्यसृष्टीतील पुण्यात्म्यांनी सद्भक्तांना सहाय्य केल्याच्या अनेक घटना आमच्या कानावर आलेल्या आहेत. या सर्व कथा भक्त विजय मधील कथांसारख्या आहेत. परंतु जर पुण्य नसेल तर मी स्वत: मदत करायची ठरविली तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही, हे सद्भक्तांनी लक्षात घ्यावे. याचे एक उत्तम उदाहरण दहा–बारा वर्षांपूर्वी घडले आहे. ते पुढे देत आहे.''

मी कोकणामध्ये साधना करत होतो. पासष्ट वर्षांच्या एका वृद्ध स्त्रिने मला विचारले, ''स्वामीजी आंध्रप्रदेशामध्ये कडुलिंबाची झाडे भरपूर असतात खरे ना ?''

मी म्हणालो, ''होय ! आमच्या जागेत पण खूप कडुलिंबाची झाडे आहेत !''

यावर ती वृद्ध स्त्री म्हणाली, ''मला थोडा कडूलिंबाचा पाला पाठवून द्याल का ?''

यावर मी म्हणालो, ''चांगला पोतभर पाला पाठवून देतो काळजी करू नका !''

आंध्रप्रदेशात गेल्यानंतर मी एक पोतभर कडूलिंबाचा पाला सेवकाकडे दिला व तो पाला कोकणात पोहोचविण्यास सांगितले.

माझ्या आज्ञेप्रमाणे कडूलिंबाच्या पाल्याचे पोते घेऊन सेवक

निघाला. हैद्राबादला पोहोचला. हैद्राबाद बसस्टँडवर पाल्याचे पोते चोरीला गेले की अदृश्य झाले हे सेवकाला समजलेच नाही. त्याने मला कळविले, ''मी हैद्राबाद बसस्टँडवर बसची वाट पहात बसलो होतो, पोते माझ्या जवळच ठेवलेले होते ते कोठे गेले, कोणी चोरले काहीच समजण्यास मार्ग नाही.''

काही दिवसानंतर सात-आठ माणसांचा एक ग्रुप महाराष्ट्रात चालला होता. त्यांच्याकडे मी कडूलिंबाच्या पाल्याची दोन पोती दिली व कोकणात पोहोचविण्यास सांगितले. दोन पोती देण्यामागे माझा उद्देश असा होता की एक पोते चोरीला गेले तरी दुसरे पोते कोकणात जाऊन पोहोचेल.

सात-आठ माणसांचा हा ग्रूप हैद्राबाद रेल्वे स्टेशनवर ट्रेनची वाट पहात बसला होता. दोन्ही पोत्यांवर सर्वांचे लक्ष होते. आणि असे असतानाही दोन्ही पोती अदृश्य झाली. सात-आठ माणसांच्या त्या ग्रूपने मला पोती कशी अदृश्य झाली हे कळविले.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ''पूर्वीच्या पोत्याची हकिकत सर्वांनाच माहीत असल्याकारणाने आम्ही सर्वजण या दोन्ही पोत्यांची व्यवस्थित काळजी घेत होतो. ट्रेन येईपर्यंत पोती होती. ट्रेनमध्ये चढण्याच्या गडबडीत पोती कशी कोठे गायब झाली ते कळले नाही.''

ही हकिकत कळल्यानंतर माझ्या लक्षात आले की, अदृश्यसृष्टीतून हस्तक्षेप केला जात आहे. म्हणून त्यांनी ध्यानमार्गाने याचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला पुढील प्रमाणे उत्तर मिळाले.

''आश्रमातील कडूलिंबाचा पाला जमिनीवर पडून जरी फुकट जात असला तरी तो त्या वृद्ध स्त्रिला मिळावा इतकी **पुण्याई** त्या वृद्ध स्त्रीकडे नाही. वातावरणात राहणाऱ्या महाकालीच्या अदृश्य गणांनी दोन्ही वेळा पोती गायब केली आहेत.''

वरीलप्रमाणे उत्तर मिळाल्यानंतर माझा नाईलाज झाला. ही गोष्ट सांगण्याचा हेतू इतकाच, माणसाने केलेली पुण्याईच कुठल्या ना कुठल्या रूपाने माणसाच्या उपयोगी येत असते व आपल्या जीवनात ज्या काही घटना घडत असतात त्या सर्वांचे मूळ कारण आपल्या अंतरंगातच असते. कुंभार ज्याप्रमाणे मडके बनवितो, सोनार ज्याप्रमाणे अलंकार बनवितो, मूर्तीकार ज्याप्रमाणे हातोड्याचे घाव घालून मूर्ती बनवितो, त्याप्रमाणे अदृश्यसृष्टीतील देवता व शक्ती आपल्याला घडवित असतात व आपल्या पात्रतेप्रमाणे आपल्याला अनुभव येत असतात.

# १५. प्रकाशयुग-अंधारयुग

**प्रकाशमय देवता** व अंध:कारमय शक्ती अशा दोन प्रकारच्या शक्ती वातावरणात असून समस्त पृथ्वीतलावर या दोन्ही शक्तींचे साम्राज्य आलटून-पालटून चालत असते. पृथ्वीतलावर कधी अंधारयुग चालू असते तर कधी प्रकाशाचे युग चालू असते. अंधारयुग संपले की प्रकाशाचे युग सुरू होते व प्रकाशाचे युग संपले की अंध:काराचे युग सुरू होते.

### अंध:कार युगात घडणाऱ्या घटना

अंध:कार युगाच्या सुरुवातीला समाज अत्यंत कष्ट भोगत असतो. गुहांमध्ये रहात असतो. अरण्यातील फळांवर व वन्य प्राण्यांच्या शिकारी करून तो जगत असतो. नदीतील मासे मारून तो खात असतो. हे सर्व पदार्थ तो अग्नीमध्ये भाजून खात असतो. मीठ, तिखट, हळद इत्यादी मसाल्याच्या पदार्थांची त्याची ओळख

व्हायची असते. या काळामध्ये गिधाडांची संख्या भरपूर असते व अरण्यामध्ये तरसांची संख्याही खूप असते.

हळूहळू मानव प्रगत होऊ लागतो. शेती करू लागतो. मसाल्याच्या पदार्थांचा व त्याचा परिचय होतो. अवजारे व भांडीकुंडी तो निर्माण करू लागतो. हळूहळू तो गाई म्हशींचे पालन सुरू करतो. कुंभाराचे चाक निर्माण करतो. बैलगाडी, घोडागाडी तयार करतो. वस्त्रे विणू लागतो. मानवाच्या प्रगतीला वेगाने सुरुवात झालेली असते. सुखसाधनांबरोबर प्रजाही वाढू लागते. प्रजेच्या नियंत्रणासाठी राजे व राजशासन निर्माण होते. समुद्र व नद्या यातून वाहतूक सुरू होते. व्यापार वाढू लागतो. बैलगाडी, घोडागाडी सारखी वाहने निर्माण होतात. नद्या, समुद्रातून वाहतूक करण्यासाठी होड्या, पडावे, गलबते, जहाजे निर्माण केली जातात. निरनिराळ्या धातूंचे शोध लागतात. सोन्या, चांदीचे दागिने निर्माण केले जातात. वेगवेगळ्या भाषा निर्माण केल्या जातात. समाज अतिशय वेगाने प्रगत होत असतो.

याच काळामध्ये समाजामध्ये काळ्याविद्येचा खूप प्रचार सुरू होतो. काळ्याविद्येचे प्रचार करणारे तांत्रिक, मांत्रिक लाखोंच्या संख्येने निर्माण होतात. संपूर्ण समाजावर व राज्यकर्त्यांवर त्यांची सत्ता चालते. अंध:कारमय युगाचा २१६० वर्षांचा टप्पा येथपर्यंत

संपलेला असतो.

अंध:कार युगाचा दुसरा टप्पा सुरू होतो. या काळामध्ये तांत्रिक, मांत्रिक, पुजारी, ब्लॅक मॅजिक करणाऱ्या लोकांचे प्राबल्य वाढते. सर्व समाजावर त्यांचे वर्चस्व चालू होते. वाट्टेल तसे कायदे कानून, प्रथा निर्माण केल्या जातात. समाजाला हे लोक मुठीत ठेवतात. त्यांच्या इच्छेप्रमाणे समाज चालतो.

याच काळामध्ये प्रेम, करुणा व परोपकार यांचा प्रसार करणारे महात्मे निर्माण होतात. परंतु समाजातील दुष्ट दुर्जनांकडून त्यांचा छळ होतो.

या काळामध्ये गिधाडांची संख्या थोडी कमी होते व कावळ्यांची संख्या भराभर वाढू लागते. अरण्यामध्ये तरसांची संख्या थोडी कमी होते व कोल्ह्यांची संख्या खूप वाढते. २१६० वर्षांच्या या दुसऱ्या टप्प्यामध्येही काही सिद्धयोगी अवतार धारण करतात व समाजाला अंध:कारमय अशा भयंकर युगातून थोडेसे बाहेर खेचण्यासाठी प्रयत्न करतात. यात त्यांना फारसे यश येत नाही कारण काळ्या शक्तींचा जोर जास्त असतो व तांत्रिक, मांत्रिक, पंडित व पुजारी यांचा समाजावर घट्ट विळखा असतो.

२१६० वर्षांच्या दुसऱ्या टप्प्यातील हजार वर्षे गेल्यानंतर अनेक सात्त्विक साधूसंत निर्माण होतात व समाजाला अंध:कार

युगाच्या बाहेर खेचण्याचा प्रयत्न करतात. साधू संतांच्या या प्रयत्नांमुळे काळ्या शक्तीचा प्रभाव पन्नास टक्क्यांनी कमी होतो. याच काळामध्ये निरनिराळ्या शस्त्रास्त्रांचा शोध लागतो. रुढी, परंपरा, पंडित व पुजारी यांचा प्रभाव काही टक्क्यांनी कमी होतो. अशी पाचशे वर्षे गेल्यानंतर पृथ्वीतलावर विज्ञानयुग सुरू होते. निरनिराळे शोध लागतात. इलेक्ट्रिसिटीपासून विमानापर्यंत, बोटींपासून पाणबुड्यांपर्यंत, मोटारीपासून रेल्वेपर्यंत, टेलीफोन पासून टी. व्ही., कॉम्प्युटरपर्यंत अशा नवनवीन शोधांनी व सुखसाधनांनी मनुष्य समृद्ध होतो. या काळात तांत्रिक, मांत्रिक, पुजारी, पंडित, साधू इत्यादी लोकांचा प्रभाव ९० टक्के कमी होतो. अंध:कार युगाला उतरती कळा लागते. अंध:कारमय युगाचा २१६० वर्षांचा दुसरा टप्पा येथे पूर्ण होतो. अंध:कारयुग संपू लागते. प्रकाश युगाची पहाट होते. अरण्यातील वन्य प्राण्यांची संख्या बऱ्याच प्रमाणात कमी होते. कावळ्यांची संख्या ९० टक्के घटते; बगळ्यांची संख्या वाढू लागते. पृथ्वीवर जेव्हा बगळ्यांची संख्या वाढू लागते तेव्हा सर्वत्र बगळे दिसू लागतात. पांढऱ्या पक्षांची संख्या वाढू लागली की प्रकाश युगाची पहाट झाली असे समजावे.

इसवीसन २००० साली अंधार युगाची समाप्ती झाली असून,

२००१ पासून प्रकाशयुगाची पहाट झाली आहे.

**प्रकाशयुग**

२६ मार्च २००१ पासून पृथ्वीतलावर प्रकाशयुगाची सुरुवात झालेली असून, हे प्रकाशयुग पृथ्वीतलावर ४३२० वर्षे राहील.

प्रकाशयुगाच्या पहिल्या २१६० वर्षांच्या टप्प्यामध्ये पुढील घटना घडतील.

जे वाईट आहे ते सर्व नष्ट होईल. स्वार्थी, कंजूष व गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे समाजातून नष्ट होतील. प्रकाशयुगाच्या पहिल्या पन्नास वर्षात या घटना घडतील.

मोठ्या मनाची, दानी व परोपकारी अशीच माणसे पृथ्वीतलावर शिल्लक राहतील. सर्वत्र शांतता व सुबत्ता राहील. सुख साधनांची रेलचेल होईल. लोकांची ध्यानधारणेत प्रगती होईल. सद्गुणांवर भर दिला जाईल.

अरण्यात वाघ, सिंह, हत्ती यांची संख्या वाढू लागेल. हंस, बगळे व पांढरे पक्षी सर्वत्र दिसू लागतील. काटेरी झाडे नष्ट होतील व चांगल्या झाडांची लागवड केली जाईल.

लोक पराकोटीचे सज्जन होतील. सन्मार्गाने पैसा मिळवतील. याच काळामध्ये समाजाला प्रकाशमय मार्गाने नेणारे अनेक सिद्धपुरुष निर्माण होतील. संपूर्ण पृथ्वीतलावर शांततेचे व आनंदाचे वातावरण

निर्माण होईल.

कुठलाही मनुष्य पृथ्वीतलावर कोठेही फिरू शकेल, पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणावर विजय मिळविला जाईल व हवेतून सहजगत्या जाणाऱ्या गाड्या निर्माण होतील. ताशी ५०० मैल वेगाने जाणाऱ्या गाड्या, २००० मैल वेगाने जाणाऱ्या ट्रेन्स व २५००० मैल वेगाने जाणारी विमाने तयार होतील. सर्व समाज सुखी व संपन्न असेल. समाजाची आध्यात्मात खूप प्रगती झाली असेल, इ. स. २२२२ पर्यंत या सर्व गोष्टी घडतील.

मानवाला विविध प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतील, आकाशगमन, सूक्ष्मदेहाने प्रवास करणे इत्यादी विविध प्रकारच्या योगसिद्धी मानवाला साध्य होतील. सदैव तरुण राहणे मानवाला जमेल. पृथ्वीतलावरील सर्व माणसे सुखी, आनंदी व योगी होतील. विविध प्रकारचे नवीन शोध लागतील. येत्या एक हजार वर्षांमध्ये म्हणजे इ. स. ३००० पर्यंत मानवाची प्रचंड आध्यात्मिक प्रगती होईल. मानव योगमार्गात इतका प्रविण होईल की, त्याचे मन चिंतामणीप्रमाणे प्रत्येक इच्छा पूर्ण करेल. त्याच्या कल्पना इतक्या प्रबळ होतील की कल्पतरूप्रमाणे त्याची प्रत्येक कल्पना साकार होईल. येत्या चारशे-पाचशे वर्षात सगुण भक्तीचे महत्त्व संपून जाईल व लोक निर्गुणोपासना करू लागतील. ध्यान धारणा,

समाधी या गोष्टी पृथ्वीतलावर सर्वत्र पसरतील. प्राथमिक शाळेतही यांचे शिक्षण दिले जाईल. सध्या अस्तित्वात असलेले सर्व धर्म नष्ट होतील. सध्या अस्तित्वात असलेल्या रुढी, परंपरा नष्ट होतील व पृथ्वीतलावर एक नवीन धर्म निर्माण होईल. पृथ्वीतलावरील सर्व लोक या एकाच धर्माचे अनुयायी असतील. अशाप्रकारे जगामध्ये आमूलाग्र बदल घडून येणार आहे. यापेक्षा जास्त काही लिहिण्यास ईश्वराची परवानगी नाही.

# १६. जीवन - मृत्यू

**पृथ्वीतलावर जन्माला** येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या कर्मानुसार त्याला मृत्यूनंतरची अवस्था प्राप्त होते. या विषयावर मी माझ्या अन्य पुस्तकांमध्ये लिहिलेले आहे. परंतु ज्या काही गोष्टी लिहायच्या राहून गेल्या आहेत तेवढ्याच येथे लिहितो.

मृतदेह जाळणे हे केव्हाही चांगले. मृतदेह चितेवर जाळण्यापेक्षा इलेक्ट्रीक क्रिमेशनमध्ये दाह संस्कार करणे अधिक चांगले. तद्‌नंतर अस्थिंचे विसर्जन वाहत्या नदीमध्ये करणे चांगले.

मृतदेहाला अग्नि देणे व त्याच्या अस्थि वाहत्या नदीच्या पाण्यात विसर्जन करणे हे जास्त चांगले. असे मी वर म्हटले आहे. याचे कारण –

मृतदेहाच्या नखापासून केसापर्यंतचा कुठलाही छोटासा भाग म्हणजे नख किंवा केस किंवा शरीराच्या कुठल्याही हाडाचा

बारीकसा तुकडा जर एखाद्या मांत्रिकाला मिळाला तर त्या आधाराने मांत्रिक त्या मरणाऱ्या व्यक्तीच्या आत्म्याला आपला गुलाम बनवू शकतो.

अतिसामान्य माणसे जेव्हा मरतात (हजारातील नऊशे नव्याण्णव माणसे अतिसामान्य असतात.) तेव्हा मृत्युच्या अगोदर असंख्य पिशाच्चे अतिसामान्य जिवात्म्याला घेरून टाकतात. एखाद्या सिद्धपुरुषाची कृपा असेल तरच या अवस्थेतून सुटका होते. मृतदेह जाळल्याने असंख्य आत्म्यांच्या बंधनामुळे आलेले जडत्व काही प्रमाणात दूर होते. अशा अनेक कारणांमुळे मृतदेहावर दाह संस्कार करणे हेच उचित ठरते. याशिवाय आत्म्याची आपल्या देहावर जी ममता असते ती ममता ज्वलन क्रिया पाहून नष्ट होते व आत्मा पुढील प्रवास करण्यास उद्युक्त होतो. जेथे मृतदेह पुरले जातात तेथे अनेक आत्मे घोटाळत राहतात असे आढळून आले आहे. पुष्कळवेळा तर शेकडो वर्षे आत्मे कबरीलाच आपले निवासस्थान बनवून राहतात, असेही आढळून आले आहे. अर्थात या गोष्टी फक्त सज्जन आत्म्यांच्या विषयी लिहिलेल्या आहेत.

कर्मानुसार मनुष्य अतिशय दाट अंध:कार लोकात जातो. तेथून त्याची लाखो वर्षे सुटका होत नाही; पृथ्वीला चिकटून राहतो व शेकडो वर्षे सुटकेची वाट पाहतो. वैतरणेच्या अलीकडच्या

लोकात मृतात्मा म्हणून वावरतो किंवा वैतरणेच्या पलीकडील लोकात दिव्यात्मा म्हणून वावरतो. याविषयीचे सविस्तर वर्णन मानवी जीवनातील गूढ रहस्ये भाग ४ तसेच भारतीय गूढ विद्या या दोन पुस्तकात दिलेले आहे.

आपल्या नातेवाईकाच्या मृत्युने दु:ख होणे हे साहजिकच आहे. परंतु अशावेळी मृताच्या नातेवाईकांपैकी एकाने तरी एखादी परमेश्वराची प्रार्थना म्हटली तर अधिक चांगले. कारण त्याने आत्म्याच्या प्रवासाला गती मिळते. मृतात्मा प्रार्थनेतील शब्दांच्या ध्वनीलहरींवर बसून प्रवास करतो. विशेष म्हणजे प्रार्थना कुठल्याही भाषेत जरी म्हटली तरी चालते. काही कारणांमुळे जर प्रार्थना मोठ्याने म्हणणे शक्य नसेल तर देवांच्या आरत्यांची किंवा गायत्री, गणपती, दत्त इत्यादी देवतांच्या मंत्रांची कॅसेट २-३ मिनिटे तरी लावावी. प्राण पूर्णपणे जाण्याच्या एक-दोन मिनिटे अगोदर जर अशाप्रकारे स्तोत्र, मंत्राच्या कॅसेट लावल्या किंवा प्रार्थना केली तर मृतात्म्याचा प्रवास सुखकर होतो.

**गहनोकर्मणागति:**

सुमारे २५ वर्षांपूर्वी एका अरण्यामध्ये मी साधना करीत होतो. ७५ वर्षांचे एक जोडपे मला भेटायला आले. पती-पत्नी उभयता खूप भक्तिमान होते. खूप जप-जाप्य करीत, स्वभावाने

खूप प्रेमळ होते. त्यांचा एकुलता एक मुलगा त्यांना दुःख सागरात लोटून बऱ्याच वर्षांपूर्वी परलोकात निघून गेला होता. माझ्याकडे बघून त्यांना आपल्या मुलाची आठवण येत असे. त्यांनी मला तसे बोलूनही दाखविले. ते माझ्याकडे सुमारे दहा-बारा दिवस राहिले होते. याकाळामध्ये मला त्यांच्याविषयी दोन गोष्टी कळल्या.

त्यांच्या मुलाच्या आत्म्याने मला सांगितले, माझ्या आई-वडिलांना सांगा, मी अगदी आनंदात आहे. माझ्या मृत्युसमयी माझ्या आईने एक इंग्लिश भाषेतील प्रार्थना गीत म्हटले होते. या प्रार्थना गीताच्या ध्वनीलहरींमुळे देहातून बाहेर पडताना मला काहीही त्रास झाला नाही. तसेच या प्रार्थना गीतांच्या ध्वनीलहरींवरती बसून मी स्वर्ग लोकापर्यंत विनासायास प्रवास केला. जर माझ्या आईने प्रार्थना गीत म्हटले नसते तर, माझा प्रवास इतका सुखकर झाला नसता.

मी दुसऱ्या दिवशी ही गोष्ट त्या वृद्ध पती-पत्नीला सांगितली. तेव्हा त्यांना खूप आश्चर्य वाटले. कारण त्यांनी खरेच इंग्रजी प्रार्थना गीत म्हटले होते. यावरून मृत्युसमयी प्रार्थना गीत, नाम-जप, देवाचे स्तोत्र अशाप्रकारे काही ईश्वरचिंतन केले असता आत्म्याला सद्‌गती मिळण्यास मदत होते हे सिद्ध होते. एकंदरीत

वियोग दुःखाला आवर घालून भगवंताची प्रार्थना करीत आत्म्याला निरोप देणे जास्त श्रेयस्कर नाही काय ?

अत्यंत धार्मिक व प्रेमळ अशा या पती-पत्नीला पुत्र वियोगाचे दुःख का सहन करावे लागले, अशी जिज्ञासा मला लागून राहिली होती. अदृश्यसृष्टीतून मला मार्गदर्शन करणाऱ्या एका सिद्ध आत्म्याने मला त्यांची पूर्वजन्मातील कहाणी सांगितली.

पती पूर्वजन्मामध्ये राघोबादादा पेशवे होते. तर पत्नी आनंदीबाई होती. या जन्मींचा त्यांचा मुलगा हा पूर्वजन्मी त्यांचा पुतण्या नारायणराव पेशवे होता. नारायणरावास धरावे (अटक करून कैदेत टाकावे) असा आदेश राघोबादादा पेशवे यांनी दिला. राघोबादादा पेशवे यांच्या पत्नी आनंदीबाईनी धरावेच्या ऐवजी मारावे असे आदेशात लिहिले व नारायणरावांचा खून झाला.

माझ्याकडे आलेले पती-पत्नी पूर्वजन्मींचे राघोबादादा व आनंदीबाई व त्यांचा मुलगा म्हणजे त्यांचा पूर्वजन्मीचा पुतण्या नारायणराव पेशवे. पुत्र वियोगाचे दुःख कसे असते याचा अनुभव कर्मगतीप्रमाणे त्यांना घ्यावा लागला. पूर्वजन्मामध्ये राघोबादादांनी अनेक पुण्याईची कामे केलेली होती. त्यामुळे या जन्मी त्यांचे जीवन प्रेमळ व धार्मिक राहिले. १९८९-९० या दोन वर्षांत या पती-पत्नींचा मृत्यू झाला. अर्थात तत्पूर्वी त्यांनी भरपूर ईश्वरसेवा

करून आपल्याला सद्‌गती प्राप्त होईल, अशी व्यवस्था केलेली होती व त्यांना मी त्यांच्या पूर्वजन्माची हकिकत सांगितली होती. त्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक ईश्वरसेवा करून स्वत:चा उद्धार करून घेतला. कर्माची गती गहन असते हेच खरे !

पुष्कळवेळा असेही घडते की ईश्वर या जन्मातील कर्माचे फळ याच जन्मी भोगायला लावतो. याविषयी मला अनेक अनुभव आहेत यातील एक अनुभव पुढे देत आहे. यावरून माणसानी कसे वागायचे ते ठरवावे.

**सासू**

सुनीताची सासू सुनीताला कधीही पोटभर जेवण देत नसे. सुनीताच्या गरोदरपणामध्ये तर तिने कहरच केला. सुनीताच्या वाटणीचे सर्व जेवण ती आपल्या नवऱ्याला आग्रह करून करून वाढत असे व संपवून टाकत असे. सासराही सर्व भांडी रिकामी होत आहेत व सुनेला उपाशी राहावे लागणार आहे, याचा विचार न करता जेवत असे. शेवटी सुनीतावर फळे खाऊन पोट भरण्याची वेळ येत असे. कालांतराने सासूने आपल्या सुनेला व मुलाला घराबाहेर काढले.

कालांतराने दुसऱ्या मुलाचे लग्न झाले. दुसरी सून घरात आली. तोपर्यंत सासू-सासऱ्यांचे वय झालेले होते. जसे सासू-

सासऱ्यांनी आपल्या पहिल्या सुनेला वागविले, अगदी तसेच दुसऱ्या सुनेने त्यांना वागवायला सुरुवात केली. History repeats itself अशी इंग्रजीत म्हण आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते.

मानवी जीवनामध्ये परमार्थ या शब्दाला अतिशय महत्त्व आहे. परंतु लोक त्याचा अर्थ वेगळा लावतात. टाळ कुटणे, भजन करणे, पंढरपूरच्या पायी वाऱ्या करणे याला लोक परमार्थ समजतात. तर हे सर्व थोतांड आहे, असे समजून सुशिक्षित लोक आयुष्यभर स्वतःचे पोट भरण्याचे काम करतात. अशा वागण्याने अनेक प्रकारच्या समस्या मानवी जीवनामध्ये निर्माण होतात.

तुम्ही दुसऱ्यांसाठी जे जे काही करता ते सर्व परमार्थ या शब्दात येत असते. दुसऱ्यासाठी काहीतरी करणे म्हणजे **परमार्थ!**

काही लोक परमार्थ समजून आयुष्यभर पोथ्या वाचतात व मंदिरात जाऊन नमस्कार करतात. परंतु याला परमार्थ म्हणत नाही. परमार्थाची सुरुवात परोपकारापासून होते व परोपकाराची सुरुवात स्वतःच्या घरातील सर्वांशी प्रेमाने वागण्याने होते. इतरांच्या उपयोगी पडणारा मनुष्य खरा परमार्थी असतो. परमार्थाचा हा परम अर्थ समजून घेऊन वागल्यास जीवनातील अनेक समस्या सुटतील.

नि:स्वार्थ बुद्धीने इतरांना मदत करणे, जीवन परोपकारी असणे म्हणजे परमार्थ ! अशा परोपकारी जीवनाला जेव्हा ईश्वरभक्ती, अखंड नामस्मरण व ध्यान साधना यांची जोड मिळते तेव्हा खऱ्या अर्थाने आध्यात्मिक जीवनाची सुरुवात होते व एकदा का आध्यात्मिक जीवनाची सुरुवात झाली की परमेश्वराच्या साम्राज्याचे दरवाजे उघडले जातात. अशी माणसे मृत्यूनंतर परमानंदमय अशा परमेश्वराच्या साम्राज्यात वास्तव्य करतात. तेथील आनंदाचे वर्णन करण्यास शब्दसंपत्ती अपुरी पडते.

# १७. चार प्रकारचे भक्त

**भक्तांचे जरी** असंख्य प्रकार असले तरी त्यांची मुख्य चार प्रकारात विभागणी केली जाते. हे चार प्रकार म्हणजे आर्त, अर्थार्थी, मुमुक्षु व साधक. चार प्रकारच्या या भक्तांची आपण या प्रकरणात माहिती करून घेऊ !

## आर्त

आर्त म्हणजे दु:खी, गांजलेला, पीडलेला, विविध प्रकारच्या यातना भोगत असलेला, ग्रहदशेच्या फेऱ्यांमध्ये सापडलेला, रोगी, पिशाच्च बाधेने पीडित, दारिद्र्याने गांजलेला, शत्रू ज्याला सतावत आहेत असा, निरपराध असून जेलमध्ये बंदिस्त, सासुरवास भोगणारी स्त्री. अशा प्रकारे अनेक प्रकारच्या दु:खांनी जे गांजलेले आहेत व दु:खाच्या निवृत्तीसाठी जे परमेश्वराची आराधना करतात अशा सर्व भक्तांना **आर्त म्हटले जाते.**

## अर्थार्थी

अर्थार्थी म्हणजे धन व सुखसंपदा यांची अपेक्षा करणारा मनुष्य! संसारामध्ये अनेक प्रकारच्या समस्या असतात. कधी पैसा पुरेसा पडत नाही तर कधी मिळविलेला पैसा जातो कोठे हे समजत नाही. बरकत नसते, समाधान नसते. भरपूर कष्ट करुनही पैसा कमी मिळतो व भरपूर पैसा मिळाला तरी पुन्हा कर्ज काढावे लागते. जे काम दोन दिवसात व्हायला पाहिजे ते दोन वर्षे झाले तरी होत नाही, धंद्यामध्ये अपयश येते. विविध प्रकारच्या चिंतांनी मनुष्य व्याकुळ होतो. कोर्ट कचेऱ्या कराव्या लागतात. सरकारी दरबारी कामे लवकर होत नाहीत. अशा प्रकारे संसारिक आपदांनी त्रस्त होऊन जे परमेश्वराची भक्ती करू लागतात अशा भक्तांना **अर्थार्थी** म्हटले जाते.

## मुमुक्षु

ईश्वरप्राप्तीची ओढ ज्याला लागली आहे, ईश्वरप्राप्ती सोडून अन्य कशातही ज्याचे मन रस घेत नाही, आध्यात्म मार्गात प्रगती व्हावी अशी तळमळ ज्याला लागली आहे, अशा माणसाला **मुमुक्षु** असे म्हणतात.

जन्म मरणाच्या चक्रातून सुटावे असे ज्याला वाटते, मुक्ती किंवा जीवनमुक्ती काहीतरी आपल्याला प्राप्त करायचे आहे,

असे ज्याच्या मनाने घेतले आहे, जो अखंड नामस्मरण करतो, ध्यान धारणा करतो, आपल्या मनाला ईश्वराच्या स्मरणामध्ये जो गुंतवून ठेवतो, सतत आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन करतो, ज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न करतो, अशा माणसाला **मुमुक्षु** म्हणतात.

**साधक**

एकाच आसनावर बसून न हलता न डुलता जो जप व ध्यान करतो त्याला **साधक** असे म्हणतात. काही साधक एखाद्या विशिष्ट मंत्राचा जप करून त्या मंत्रदेवतेला प्रसन्न करतात व तद्नंतर दुसऱ्या मंत्राचा जप करून दुसऱ्या देवतेला प्रसन्न करतात. अशा प्रकारे अनेक देव-देवतांना साधक प्रसन्न करतात. जीवनामध्ये एक जरी देवता प्रसन्न झाली तरी जीवन सफल होते. परंतु साधक अनेक देव-देवतांना प्रसन्न करतात व विविध प्रकारचे ज्ञान त्यांच्याकडून प्राप्त करतात. काही साधक विविध प्रकारच्या त्राटक साधना करतात व त्राटक साधनांद्वारे विविध प्रकारचे ज्ञान व सामर्थ्ये प्राप्त करतात. साधकांना एका गोष्टीचा खूप मोठा धोका असतो. सिद्धी सामर्थ्य मिळविण्याच्या नादामध्ये साधकाला परमात्म्याचा विसर पडतो व त्याची अवस्था-

**सांडोनिया आत्मसुख । सामर्थ्य वांछिती ते मूर्ख ।।**

अशी होते. म्हणून साधक ही अवस्था जरी चांगली असली

तरी या अवस्थेमध्ये खूप धोके असतात.

साधना ही परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी करायची असते. साधक स्टेज प्राप्त झाल्यानंतर या गोष्टींचा विसर पडतो व साधक परमात्म्याशी एकरूप होण्याऐवजी विविध प्रकारची सामर्थ्ये प्राप्त करण्याच्या मागे लागतो व येथे तो फसतो. एकदा का पाय घसरला की या अवस्थेमध्ये सांभाळणारा कोणीही नसतो. येथे स्वत:च स्वत:ला सांभाळायचे असते.

काही साधक तर परमेश्वराची उपासना भक्ती करणे सोडून देतात व **माँ भूतनी । बाप सैतान ।।** असे म्हणत अघोरी कापालिक साधना सुरू करतात. अशा लोकांची अवस्था मृत्यूनंतर अतिशय भयंकर होते. लाखो वर्षे त्यांना अंध:कारमय अशा पिशाच्च योनीत काढावे लागतात व खूप यातना भोगाव्या लागतात. परमेश्वराने दिलेल्या मानवी जीवनाचा त्यांनी दुरुपयोग केलेला असतो व त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागतात.

काही साधक भाग्यवान असतात. ते कुठल्याही प्रकारच्या सिद्धी सामर्थ्याच्या भानगडीत पडत नाहीत. ते फक्त आत्मस्वरूपाचे ध्यान करतात किंवा परमेश्वराची भक्ती करत राहतात. स्वत:तील अहंकार व दुर्गुण नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. हळूहळू त्यांच्यातील अहंकार नष्ट होतो. त्यांच्यातील दुर्गुण नष्ट

होतात. 'मनोलय' साध्य होऊ लागतो. परमशांती व परमानंद यांची प्राप्ती होते असे साधक जीवनमुक्त होतात. त्यांना सिद्धावस्था प्राप्त होते. अर्थात सिद्धावस्थाही एकदम येत नाही. प्रथम सद्सद्विवेकबुद्धी प्राप्त होते. आध्यात्म मार्गात धोके कोठे कोठे आहेत याचे ज्ञान होते. हे धोके कसे टाळायचे याचेही ज्ञान साधकाला आपोआप होऊ लागते. येथे त्याला **हंस** ही स्टेज प्राप्त होते.

साधन मार्गातील सर्व धोके समजून घेऊन ते टाळण्याची क्षमता प्राप्त झाली की हंस स्टेज प्राप्त होते. सर्व धोक्यांच्या पलीकडे गेल्यानंतर मनोलय अवस्थेमध्ये काही दिवस काढल्यानंतर **परमहंस** ही स्टेज प्राप्त होते. साधक हंस व परमहंस या अवस्थांचा एकांतामध्ये अनुभव घेतात व तेथे न थांबता पुढे वाटचाल करत राहतात व सहजावस्था म्हणजे सिद्धावस्था प्राप्त करतात. येथे आध्यात्माचा प्रवास काही काळापुरता थांबतो.

देह साधना करताना दिसत नाही. परंतु आत्मा आध्यात्मातील अनेक अवस्था प्राप्त करत राहतो व सतत पुढे जात राहतो. तो किती पुढे जातो हे आजतागायत कोणालाही कळलेले नाही.

# १८. दशावतार रहस्य

**व्यास महर्षींनी** अठरा पुराणे लिहिली. यातील दहा पुराणे महाविष्णूच्या दहा अवतारांवरती आहेत. महाविष्णूने एकूण दहा अवतार घेतले हे दहा अवतार अनुक्रमे पुढील प्रमाणे –

मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बुद्ध, कल्की अशा दहा अवतारांचे वर्णन पुराण ग्रंथात आहे. एक एक अवतारावर एक एक पुराण व्यास महर्षींनी लिहिलेले आहे. थोड्याफार फरकाने प्रत्येक पुराणातील इतिहास जवळजवळ सारखाच आहे. महाविष्णूच्या दहा अवतारांची चरित्रे वाचताना माझ्या एक गोष्ट लक्षात आली की व्यासांना काहीतरी वेगळेच म्हणायचे होते. त्यांनी ते आपल्या सद्शिष्यांना सांगितले असेलही, परंतु कालांतराने दशावतार रहस्याचा मानवाला विसर पडला व सध्या जी दशावतारांची चरित्रे आपल्या समोर आहेत ही सर्व

काल्पनिक कथांनी भरलेली आहेत. दशावतारांमध्ये मानवी उत्क्रांतीचे रहस्य तसेच मानवाच्या आध्यात्मिक प्रवासाचे रहस्य दडलेले आहे, असे मला वाटते. या रहस्यावर येथे प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करीत आहे.

**मत्स्य अवतार**

मत्स्य पुराणामध्ये मत्स्यावतार का व कसा झाला याचे वर्णन आहे. वैवस्वत मनु एकदा नदीमध्ये उभा राहून तर्पण करीत होता. त्याने ओंजळीमध्ये नदीचे पाणी घेतले. त्यात एक छोटासा मासा आला. त्या माशाने मनुष्यवाणीने मनुला आपले रक्षण करण्यास सांगितले. मनुने त्याला एका पाण्याच्या भांड्यात ठेवले. थोडा मोठा झाल्यानंतर त्याला एका पाण्याच्या टाकीत ठेवले. खूपच मोठा झाल्यानंतर त्याला विस्तीर्ण जलाशयात ठेवले. तो जलाशयही त्याला अपुरा पडायला लागला. मग त्याला समुद्रात ठेवले.

विशालकाय देवमासा समुद्रात राहू लागला. त्याच्या डोक्यावर एक शिंग आलेले होते. एक दिवस त्याने राजाला सांगितले. पृथ्वीवर **जलप्रलय** होणार आहे. एका विशालकाय नावेमध्ये तू माणसे, धान्यबीजे व खाद्यसामुग्री घेऊन माझ्या शिंगाला दोरीने ती नाव बांध मी तुझ्या नावेला खेचत-खेचत दूर घेऊन जाईन. मत्स्यरूपी भगवंताने अशाप्रकारे राजाला सांगितले. प्रलय झाला

पर्वताची शिखरेसुद्धा पाण्यात बुडून गेली. मत्स्यावताराने राजाची नौका हिमालय पर्वतापर्यंत खेचून नेली. हिमालयाच्या पर्वत शिखरावर जेथे मनु राजा नौकेतून उतरला व वस्ती केली त्या गावाला मनाली हे नाव पडले, अशा प्रकारे मत्स्यावताराचे वर्णन मत्स्य पुराणात आहे. भगवान् महाविष्णूचा हा पहिला अवतार **मत्स्यावतार !**

### उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे पाण्यात राहणारे जीव म्हणजे जलचर (मासा वगैरे) प्रथम तयार झाले.

### आध्यात्मिक अवस्था

मत्स्य ही आध्यात्मिक अवस्थांमधील पहिली अवस्था असून या अवस्थेतील साधक सरळ मनाचा, शुद्ध मनाचा परंतु चंचल बुद्धीचा असतो. त्याचे मन स्थिर नसते.

### कूर्म अवतार

कूर्म पुराणामध्ये देव व दानव यांनी मंदराचल पर्वताची रवी करून समुद्रमंथन करण्याचे ठरविले. शेषनागाची दोरी करून मंदराचलाभोवती ती गुंडाळून त्यांनी समुद्रमंथन करण्यास सुरुवात केली. शेषनागाच्या मुखाकडील भाग दानवाने धरलेला होता.

तर शेपटीकडील भाग देवाने धरलेला होता. समुद्रमंथन सुरू झाले तेव्हा मंदराचल पर्वत खाली खाली जाऊ लागला. तेव्हा भगवान् विष्णूने कूर्म म्हणजे कासवाचे रूप धारण करून मंदराचल पर्वताला आधार दिला. अशा प्रकारे **कूर्म अवतार** प्रकट झाला !

## उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे सर्व प्रथम जलचर जीव तयार झाले व तद्नंतर जमिनीवर व पाण्यामध्ये असे दोन्ही ठिकाणी वास्तव्य करतील असे जीव तयार झाले. यांना उभयचर (Amphibian) प्राणी असे म्हणतात. उदा: कासव व बेडूक.

## आध्यात्मिक अवस्था

मत्स्यावतारातील मनाची चंचलता सोडून देऊन कासव ज्याप्रमाणे आपली इंद्रिये खेचून घेते त्याप्रमाणे साधक आपली इंद्रिये व चित्तवृत्ती आवरून धरण्यास शिकतो. चित्तवृत्ती व इंद्रिये यांना कासवाप्रमाणे आवरून धरून समुद्राप्रमाणे अवखळ असणाऱ्या मनाचे तो मंथन करतो व सद्गुणरूपी रत्ने बाहेर काढतो. कूर्म अवस्था म्हणजे विषयाकडे धावणाऱ्या इंद्रियांना आवरून धरणे, म्हणजेच कूर्मावस्था !

## वराह अवतार

वराह पुराणात वर्णन केलेली वराह अवताराची कथा अगदीच दुर्बोध असल्याने तिच्या विषयी मी काही येथे लिहित नाही.

## उत्क्रांतीवाद

जीवाच्या उत्क्रांतीची ही तिसरी अवस्था असून, या तिसऱ्या अवस्थेत भूचर प्राणी निर्माण झाले म्हणजे जमिनीवर राहणारे प्राणी निर्माण झाले. उदा. वाघ, सिंह, डुक्कर, हरीण, चित्ता वगैरे जंगलात राहणारे प्राणी.

## आध्यात्मिक अवस्था

मन स्थिर करणे जमले. परंतु पशुभाव गेला नाही. दुर्गुण म्हणजे राक्षस मनातून गेले नाहीत. अशा वेळी साधक भूत-भैरवांच्या साधना करतो. मंत्र-तंत्राच्या नादी लागतो. विविध प्रकारचे चमत्कार करणाऱ्या साधना करतो, वातावरणातील पिशाच्चे वश करतो. अशा सर्व **विद्यांचा** अधिपती **शूकरदंत** भैरव असून, हा शूकरदंत भैरव डुक्कराच्या रूपात राहतो. यालाच वेताळ किंवा **रवळनाथ** असे म्हटले जाते. पृथ्वीतलावरील हजारापैकी **नऊशे नव्याण्णव** लोक याच्या आधीन राहतात. पशुभाव अथवा मूढभाव अवस्थेतील सर्व मानव या भैरवाच्या आधीन येतात.

अशा लोकांना स्वार्थापलीकडे दुसरे काही सुचत नाही. बुद्धीचा हे जास्तीत जास्त दुरुपयोग करतात. वातावरणातील वराह शक्ती त्यांना आध्यात्मात पुढे जाऊ देत नाही. मात्र मंत्र-तंत्र पिशाच्च साधनेत अशा लोकांना यश येते. मनुष्याचा देह पण वराहाची बुद्धी असा हा माणसाचा **वराह अवतार !**

## नरसिंह अवतार

हिरण्यकश्यपू व हिरण्याक्ष नावाचे दोन राक्षस भाऊ होते. यापैकी हिरण्याक्षाचा वध विष्णूने केला म्हणून हिरण्यकश्यपुने तपस्या केली व ब्रह्मदेवाकडून देव अथवा मानव यांच्याकडून आपला वध होणार नाही असा वर मिळविला. विष्णूने त्याचा वध करताना अर्ध मानवाचे रूप घेतले. डोके सिंहाचे व धड मानवाचे. अशा या नरसिंह अवताराने हिरण्यकश्यपूचा वध केला. कुठल्याही शस्त्राने मला मृत्यू येऊ नये असे वरदान हिरण्यकश्यपुने मागितले होते. त्यामुळे भगवान् नरसिंहाने त्याचा वध कुठलेही शस्त्र हाती न घेता नखाने त्याचे पोट फाडून केला अशाप्रकारे **नरसिंह अवतार प्रकट झाला !**

## उत्क्रांतीवाद

जीवाच्या उत्क्रांतीची ही चौथी अवस्था असून अर्धमानव, अर्धपशु अशी ही अवस्था आहे. सूक्ष्म सृष्टीतून प्रवास करताना

अर्धमानव, अर्धपशु असे कितीतरी आत्मे दिसून येतात. डुक्कराचे तोंड, माणसाचे धड, वाघ, सिंह, पशु, पक्षी, सर्प यांची तोंडे व माणसाचे धड अशी अविकसित आत्म्यांची रूपे पहावयास मिळतात. पृथ्वीतलावर ज्यांनी बरीच पापकर्मे केलेली आहेत अशा लोकांना अर्धपशु असे सूक्ष्मदेह प्राप्त होतात. त्याचा अर्थ असा की, त्या आत्म्यांना पुढील जन्म त्या प्राण्याचा प्राप्त होणार असतो. ही अर्धमानव, अर्धपशू अशी अवस्था मानली जाते. पृथ्वीवरील पशुबुद्धीची माणसे या अवस्थेमध्ये येतात. नरजन्म प्राप्त झाला आहे परंतु बुद्धीतील पशुता गेली नाही असा यांचा जन्म असतो.

## आध्यात्मिक अवस्था

कूर्म अवस्थेत असताना सद्गुण प्राप्त केले नाहीत. परंतु दुर्गुणासहीत साधना केली अशा अवस्थेतील लोक मंत्राच्या नादी लागतात. भूत पिशाच्चांना वश करत-करत आसुरी विद्या प्राप्त करण्यापर्यंत त्यांची मजल जाते. अशा साधना करताना जर मृत्यू आला तर असे लोक पुढील जन्मात राजकारणी होतात. नेते पुढारी होतात. लाखो लोक ते जसे सांगतील तसे वागतात. परंतु या अर्धमानव अवस्थेतील नेते पुढारी मात्र पराकोटीचे स्वार्थी असतात. यांच्यातील शौर्य स्वार्थावर आधारित असते. या

अवस्थेतील साधकांना वीर असे म्हटले जाते. हे लोक खूप साधना करतात. आसुरी शक्तींना वश करतात. कुणाचेही चांगले वाईट करू शकतात. हजारो पिशाच्च आत्मे, अनेक भैरव यांनी आपल्या आधीन केलेले असतात. त्याद्वारे ते कोणाचेही चांगले वाईट करू शकतात. ते शंभर वर्ष जगले तरी कोणीही त्यांच्या विरोधात एक शब्दही बोलू शकत नाही. लोकांना सिद्धी सामर्थ्य देऊ शकतात. परंतु सद्गुण देऊ शकत नाहीत. हे लोक खूप अहंकारी असतात.

नरसिंह ही अवस्था मानवाच्या जवळची आहे. अविकसित क्रोधी, कपटी, राजकारणी, इतरांचे वाईट व्हावे असे चिंतणारे, भूतबाधा उतरविणारे, करणी, भूतबाधा यांचा बंदोबस्त करणारे असे सर्व लोक नरसिंह या अवस्थेत येतात. नरसिंह अधिक वराह अशा दोन प्रवृत्तींचे मिश्रण झाल्यास चोर, डाकू, लुटेरे, बदमाश लोक निर्माण होतात. मनुष्याचा देह पण बुद्धी मात्र क्रूर पशुची अशी या आत्म्यांची अवस्था असते. वातावरणातील दुष्टशक्ती यांची आध्यात्मिक प्रगती होऊ देत नाहीत. असा असतो आत्म्याचा **नरसिंह अवतार !**

## वामन अवतार

महाविष्णूचा पाचवा अवतार वामन ! या वामनाने बळी राजाकडे तीन पावले भूमी दान मागितली. पहिल्या पावलामध्ये पृथ्वीलोक व्यापून दुसऱ्या पावलात स्वर्गलोक व्यापून तिसरे पाऊल बळीराजाच्या डोक्यावर ठेवले, अशी कथा आहे.

## उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे हे आत्म्याचे अतिविकसित मानव रूप आहे. आत्म्याला मानव देह प्राप्त झाला. परंतु तो बुद्धीने बुटका असल्याकारणाने त्याला वामन म्हणजे बुटका असे नाव दिले गेले. मत्स्यावतारापासून विकसित होत होत पाचव्या अवस्थेमध्ये जीवाला वामन म्हणजे बुटका मानव असे रूप प्राप्त झाले.

## आध्यात्मिक अवस्था

वामन म्हणजे बुटका किंवा अविकसित बुद्धीचा मानव. सद्गुण व सामर्थ्यहीन मानव. जो दुसऱ्यांच्या आधारावर जगत असतो. मेहनत अथवा कष्ट करण्याची ज्याच्याकडे पात्रता नसते. तो इतरांनी दिलेल्या दानावर जगत असतो. तो स्वच्छ व शुद्ध राहतो. मंत्रांचा जप करतो. परंतु पोटातील स्वार्थ गेलेला नसतो. लोकांकडून दान-दक्षिणा घेऊन तो लोकांसाठी पूजा पाठ करतो. लोकांकडून दान-दक्षिणा घेऊन आपण केलेल्या पूजापाठाने

लोकांचे चांगले होते यावर त्याचाच विश्वास नसतो. बुद्धीचा विकास जरी झालेला नसला तरी पाप लागेल असे कुठलेही कर्म तो करीत नाही. अशाप्रकारे जीवाने स्वत:चा विकास करून घेतलेला असतो व येथे तो मानव झालेला असतो. हा **वामन अवतार** म्हणजे मानव !

### परशुराम अवतार

परशुराम हा जमदग्नी व रेणूकेचा पुत्र ! परशुराम अतिशय पराक्रमी होता. हा चिरंजीव आहे. याने अनेक युद्धे केली.

### उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे जीव प्रथम मत्स्य होता. म्हणजे जलचर होता. मग तो कूर्म झाला, म्हणजे उभयचर झाला. नंतर तो भूचर झाला म्हणजे वराह झाला. या भूचरात अरण्यात राहणारे सर्व प्राणी येतात. पशु-पक्षी येतात. नंतर जीवाचा आणखी विकास झाला व तो अर्ध मानव झाला. अर्ध मानव म्हणजे नरसिंह, नंतर तो पूर्ण रूपाने मानव झाला. परंतु बुद्धी बुटकी असल्याकारणाने त्याला वामन म्हटले जाते. या वामन अवस्थेचा विकास होऊन परशुराम म्हणजे विकसित मानव तयार झाला. परशुराम म्हणजे पूर्ण मानव. हा मानव कष्ट करणारा आहे. युद्ध करणारा आहे. याला योग्य काय व अयोग्य काय या दोन्ही गोष्टी कळतात. तो

वीरपुरुष व पूर्ण मानव आहे.

### आध्यात्मिक अवस्था

परशुराम हे मानवाचे पूर्ण मानव रूप ! आता या मानवाला देव बनावयाचे असते. जोपर्यंत सज्जन, भक्तिमान, सरळ मनाच्या माणसामध्ये अहंकार शिल्लक असतो तोपर्यंत त्याला परशुराम असे म्हटले जाते. हा मानव असतो. सद्‌गुणांचा विकास होण्यास सुरुवात झालेली असते. सद्‌गुण पूर्णरूपाने विकसित झालेले नसतात. देवत्त्वाची ओढ लागलेली असते. अशी अवस्था म्हणजे **परशुराम**!

### राम अवतार

महाविष्णुचा हा सातवा अवतार ! रामावतार ! रामावतारामध्ये रामाने रावणाचा व अनेक राक्षसांचा वध केला.

### उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे राम या अवस्थेपर्यंत जीवाने खूपच मोठा टप्पा पार केला आहे. वामन अवतारात जीव मानव झाला. परंतु बुद्धी बुटकी होती. परशुराम अवतारात जीव एक पायरी वर चढला व तो खरा खुरा मानव बनला. भक्तिमान व शूरवीर बनला. राम अवतारामध्ये तो आणखी एक पायरी वर चढला व मर्यादा पुरुषोत्तम

झाला, महामानव झाला, देव झाला. अशा प्रकारे जीवाने माशापासून प्रवास करून देवापर्यंतचा प्रवास पूर्ण केला.

### आध्यात्मिक अवस्था

परशुराम अवस्थेपर्यंत पूर्ण मानव रूपाचा विकास झालेला होता. राम अवतारामध्ये अहंकाररूपी रावणाचा पूर्ण नाश केल्यानंतर मानवाला देवत्व प्राप्त होते. येथे मानव देव होतो.

मत्स्य अवतारापासून जीवाने एक-एक पायरी चढायला सुरुवात केली. वामन अवतारात तो मानव झाला. परशुराम अवतारात तो पूर्ण मानव झाला व अहंकाराचा नाश करुन राम अवतारात तो देव झाला. अशाप्रकारे जीवाचा देव कसा होतो आत्म्याचा परमात्मा कसा होतो, हे विष्णूच्या दहा अवतारात सांगितले आहे. येथे जीवात्म्याला सातवी पायरी चढल्यानंतर देवत्व प्राप्त होते. परंतु पूर्णत्व प्राप्त होण्यास अजून थोडा अवधी असतो.

### कृष्ण अवतार

राम अवतारामध्ये अहंकाररूपी रावणाचा नाश केल्याने रामाला देवत्व प्राप्त झाले. कृष्ण हा महाविष्णूचा आठवा अवतार. महाभारत व भागवत या दोन ग्रंथांमध्ये याचे समग्र चरित्र वर्णन केले आहे.

## उत्क्रांतीवाद

उत्क्रांतीवादाप्रमाणे जीवात्मा राम अवतारात परमात्मा झाला. उत्क्रांतीवाद येथे संपतो. परंतु आध्यात्मिक अवस्था ओलांडणे चालूच राहते.

## आध्यात्मिक अवस्था

राम अवतारामध्ये आत्मा परमात्मा झाला. कृष्ण अवतारामध्ये या परमात्मा तत्त्वाचा पराकोटीचा विकास झाला. मानवांचा उद्धार झाला व भक्तीचा महिमा इतका काही वाढला की हजारो वर्षे राम व कृष्ण या देवतांची भक्ती अद्याप चालू आहे.

प्रत्येक मानवाचा पशुत्वाकडून देवत्वाकडे प्रवास चालूच असतो. पशुत्वाकडून देवत्वाकडे चाललेल्या या प्रवासामध्ये मुख्य आठ टप्पे कोणते येतात हे आपण पाहिले. हे आठ टप्पेच प्रमुख असून, उरलेले दोन टप्पे नंतर जोडलेले आहेत. या आठ टप्प्यापर्यंत मानवाने आपला प्रवास पूर्ण केल्यास तो चालता-बोलता परमात्माच होईल. या आठ टप्प्यांना अष्ट अवतार मानून प्राचीन लोकांनी त्यांच्यावर कथा रचल्या आहेत. यातील आध्यात्म फक्त सत्य आहे. कथा व उपकथा अर्थहीन आहेत.

## बुद्ध अवतार

सुमारे दीड हजार  वर्षांपूर्वी बुद्धाचा वाढता प्रभाव पाहून हिंदू पंडितांनी बुद्धाला महाविष्णूचा नववा अवतार म्हटले परंतु बुद्धावर एकही पुराण ग्रंथ लिहिला नाही.

सिद्धार्थ गौतम याने अनेक वर्षे तपश्चर्या करून सिद्धावस्था प्राप्त करून घेतली. या सिद्धावस्थेला पाली भाषेमध्ये बुद्धावस्था असे म्हटले जाते. सिद्ध हा संस्कृत शब्द आहे तर बुद्ध हा पाली भाषेतील शब्द आहे.

## आध्यात्मिक  अवस्था

कृष्ण अवताराबरोबर उत्क्रांतीवाद संपला. आध्यात्मवाद मात्र चालूच राहिला. श्रीराम किंवा श्रीकृष्ण अवस्था ही सगुण परमात्म्याची अवस्था असून, बुद्धावस्था म्हणजे निर्गुण निराकार अवस्था किंवा **निर्वाण !**

येथे आत्मा निर्गुण निराकार अवस्थेपर्यंत जाऊन पोहोचतो, सिद्ध होतो, जीवनमुक्त होतो.

भारतामध्ये सिद्धावस्था किंवा बुद्धावस्था प्राप्त केलेले असंख्य योगी असून, लोकोद्धाराचे कार्य करत आहेत. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व कच्छपासून

कोलकात्यापर्यंत अनेक ठिकाणी बुद्धावस्थेतील किंवा सिद्धावस्थेतील महात्मे राहत असून, लोककल्याणाचे कार्य करीत आहेत. सिद्धपुरुषांची ही परंपरा भारतात गेली हजारो वर्षे सुरू असून, पुढे हजारो वर्षे चालू राहील, अशी आशा वाटते. मानवांना आध्यात्माच्या मार्गावरून पुढे-पुढे नेण्याचे कार्य हे सिद्धपुरुष करत असतात. हे कार्य अनादी कालापासून सुरू  असून, पुढे अनंत काल चालू राहणार आहे.

**कल्की अवतार**

कल्की अवतार अजून यायचा आहे. कलियुग सुरू होऊन पाच हजार एकशे पाच वर्षे पूर्ण झाली. सध्या पाच हजार एकशे सहावे वर्षे सुरू आहे. (२००४ पर्यंत) कलियुगाचे एकूण आयुष्य चार लक्ष बत्तीस हजार वर्षे. कलियुगाच्या अंती कल्की अवतार होईल, असे म्हणतात.

या कलियुगामध्ये उत्क्रांतीवाद पराकोटीला जाईल. मानव महामानव बनेल. कलियुगाच्या अंती पृथ्वीतलावर राहणारी माणसे जीवनमुक्त असतील. जुने सर्व नष्ट होईल व नवीन गोष्टींचा उदय होईल. विज्ञान पराकोटीला जाऊन पोहोचेल. परलोकातील आत्मे मानवांबरोबर विज्ञानाद्वारे बोलतील. अनेक आश्चर्यकारक शोध लागतील. सगुणभक्ती करण्याऐवजी लोक खऱ्या सत्पुरुषांची

उपासना करतील. कलियुगाचे अंती पृथ्वीतलावरील जास्तीत जास्त लोक योगी असतील. परग्रहावरील लोकांशी वार्तालाप करणे मानवाला शक्य होईल. मानवी देहातील संरचनेमध्ये विज्ञानाद्वारे अनेक बदल करण्यात येतील. या बदलांमुळे मानवास मलमूत्र त्यागाची आवश्यकता राहणार नाही. एक छोटीशी गोळी माणसाचे दोन्ही वेळचे जेवणाचे काम भागवेल. इ. स. २१५० पर्यंत अशी गोळी अस्तित्वात येईल. ध्यान धारणेमध्ये लोकांची रुची वाढत जाईल. लोकांमधील सद्‌गुण वाढीस लागतील.

कल्की अवतार कसा असेल याविषयी कुठल्याही ग्रंथात काहीही लिहिलेले नाही. परंतु भावी काळातील मानव कसा असेल हे मी या प्रकरणात सांगितले आहे.

# १९. दैवी जीवनाचे अठरा नियम

**शांत, समाधानी,** सद्‌गुणी, संपन्न, आध्यात्मिक, सुखी अशा जीवनाला दैवी जीवन असे म्हणतात. हे दैवी जीवन प्राप्त होण्यासाठी पुढील अठरा नियमांचे तंतोतंत पालन व्हावे लागते. हे अठरा नियम रक्तात भिनले असता ईश्वरी कृपेचा वर्षाव होतो.

१) सतत श्वासोच्छ्वासवर लक्ष ठेवावे व मनातल्या मनात परमेश्वराचे नामस्मरण करावे. योग्य वेळ येताच कोणीतरी पुढील मार्ग दाखविणारा भेटतो. ही योग्य वेळ येईपर्यंत सोऽहम् साधना, नामस्मरण, स्तोत्रपठण व एकाग्र चित्ताने ध्यान करण्याचा प्रयत्न करावा.

२) सतत दान करत राहावे. दानाने संपत्ती वाढते. दानाने पाप फिटते. दानाने शांती समाधान प्राप्त होते. दानाने आध्यात्मात प्रगती होते.

३) प्राप्त परिस्थितीत समाधानात राहण्यास शिकावे. समाधानात राहण्याची कला साध्य झाली असता कठीण परिस्थितीवर मात करता येते.

४) पूर्वजन्मातील कर्मानुसार सुख, दु:ख, लाभ, हानी, जय, अपजय, आरोग्य, अनारोग्य, यश, अपयश या गोष्टी प्राप्त होत असतात. दान व ईश्वरभक्ती या दोन गोष्टींनी यातील नकारात्मक गोष्टींवर विजय प्राप्त करता येतो, म्हणजे दु:ख, हानी, अपयश व अनारोग्य इत्यादी गोष्टींवर विजय मिळविता येतो. यासाठी सतत ईश्वरभक्ती, नामस्मरण, ध्यान व दान करीत राहावे.

५) स्वत: आनंदात राहावे, इतरांना आनंद देत राहावे, इतरांच्या उपयोगी पडत राहावे. तुमचा प्रत्येक परोपकार ईश्वराकडे नोंद होत असतो व आपल्याला आनंद प्राप्त होत असतो.

६) आहार, निद्रा, भय व मैथुन या गोष्टी प्राणीही करतात. त्यांचेही कुटुंब असते. समूह जीवन असते व त्यांनाही चिंता, काळजी असतात. मनुष्यात व प्राण्यात फरक इतकाच की मनुष्य परोपकार, दान व ईश्वरभक्ती करून परमेश्वराच्या साम्राज्यात प्रवेश प्राप्त करू शकतो. हे भाग्य प्राण्यांना प्राप्त होत नाही. परंतु पूर्वजन्मातील सत्कर्मामुळे जे प्राणी खऱ्या

सत्पुरुषांच्या सहवासात राहतात, त्या प्राण्यांना मरणोपरांत मनुष्य जन्म प्राप्त होतो.

७) नि:स्वार्थ असणे, परोपकारी असणे, प्रेमळ असणे हे ईश्वरीकृपेचे लक्षण समजावे.

**८) सर्व येथे राहणार । काही न येई बरोबर ।।**
**सत्कर्म आणि सदाचार । हेचि जीवाचे सांगाती ।।**

९) एकाच आसनावर स्थिर बसून श्वासावर लक्ष ठेवून दररोज थोडावेळ ध्यान करावे. हळूहळू तीन तासापर्यंत वेळ वाढवत जावे. अशाप्रकारे ईश्वर चिंतन जमले की साधक ही अवस्था प्राप्त होते.

१०) मन निर्विचार करण्याचा प्रयत्न करावा. कसलाही विचार न करता बराच वेळ राहता आले की, प्रकाश ब्रह्माचा साक्षात्कार होतो. मनात कुठलीही कल्पना अथवा विचार उठू देऊ नये. हे व्यवस्थितरित्या जमू लागले की, सिद्धसाधक अशी अवस्था प्राप्त होते.

११) खूप खोल व दीर्घ श्वास घ्यावा व सावकाश सोडावा. असे बराच वेळ करत बसावे. असे केल्याने मन निर्विचार होऊ लागते. मन एकाग्र होते व हळूहळू निर्विकल्प समाधी लागू

लागते. निर्विकल्प समाधी साध्य करण्याची ही सोपी पद्धत आहे. परंतु प्रारब्ध अशुद्ध असेल तर ही सोपी गोष्ट साध्य होण्यास असंख्य अडथळे निर्माण होतात. हे प्रारब्ध शुद्ध होण्यासाठी नामस्मरण, ईश्वरभक्ती, दान, परोपकार व एखाद्या खऱ्या सत्पुरुषाची सेवा करणे आवश्यक असते. प्रारब्ध अशुद्ध असेल, मन, बुद्धीवर दुष्ट शक्तींचा प्रभाव असेल तर एखादा खराखुरा सत्पुरुष भेटला तरी मनात शंका निर्माण होतात. वातावरणातील वाईट शक्ती सत्पुरुषांची सेवा करू देत नाहीत किंवा सेवा करून मिळविलेले पुण्य टिकणार नाही अशी व्यवस्था करतात व म्हणूनच आध्यात्मात प्रगती होण्यास अनेक जन्म घ्यावे लागतात. स्वत:तील शहाणपणा बाजूला ठेवून **नम्रतेने** एखाद्या सिद्धपुरुषाची सेवा करावी लागते, प्रारब्ध फारच अशुद्ध असेल तर विविध मार्गाने सत्पुरुष आपल्या भक्ताला त्रास देतात व सतावतात व त्याचे प्रारब्ध शुद्ध करतात. जे प्रारब्ध शुद्ध होण्यास अनेक वर्षे सेवा करावी लागते ते प्रारब्ध सत्पुरुष एखाद्या सद्भक्तावर अकारण आरडून ओरडून चुटकी सरशी शुद्ध करून टाकतात. खऱ्या व निष्ठावान भक्ताच्या बाबतीतच असे घडते. म्हणून सत्पुरुष

जेव्हा विनाकारण ओरडतात तेव्हा प्रारब्ध शुद्धीची क्रिया किंवा सूक्ष्म शरीर शुद्धीची क्रिया सुरू झाली आहे असे समजावे व प्रेमाने सारे सहन करावे. असे केल्याने प्रारब्ध खूप लवकर शुद्ध होते. एखाद्या अत्यंत पुण्यवान साधकाचे प्रारब्ध अतिशय शुद्ध असते. त्याची सेवा, भक्तीही चांगली असते परंतु सूक्ष्म शरीर अशुद्ध असते. कारण शरीरात काही अशुद्धतेची बीजे असतात. सूक्ष्म शरीर शुद्ध करण्यासाठी कारण शरीरातील अशुद्धतेची बीजे जाळून टाकण्यासाठी किंवा आपल्या भक्ताला तेज प्रदान करण्यासाठी सिद्धपुरुष आरडा ओरडा करतात. हे सर्व प्रेमाने सहन करावे लागते. येथे चूक झाल्यास आध्यात्मिक प्रगतीची वाटचाल थांबते व पुढे अनेक जन्म आध्यात्मिक प्रगतीसाठी घ्यावे लागतात. अहंकारी माणसाचा अहंकार येथे दुखावला जातो व तो खऱ्या सत्पुरुषाच्या विरोधात बोलू लागतो. असे केल्याने आध्यात्मिक प्रगतीचा मार्ग बंद होण्याची शक्यता निर्माण होते.

वातावरणातील दुष्टशक्ती एखाद्या चांगल्या सिद्धपुरुषाने लिहिलेली पुस्तके वाचण्याची बुद्धी होणार नाही अशी व्यवस्था करतात व वाचली तरी त्यातून काही बोध होणार

नाही, अशी व्यवस्था करतात.

आध्यात्मात प्रगती होऊ नये म्हणून आपलेच प्रारब्ध अशा प्रकारे विविध प्रकारचे खेळ खेळत असते. प्रारब्धाच्या या खेळाकडे लक्ष ठेवून या प्रारब्धावर मात करण्यासाठी चिकाटीने सिद्धपुरुषाची सेवा करावी लागते.सिद्धपुरुषांच्या कृपेने विहंगम मार्ग प्राप्त होतो व निर्विकल्प समाधी लागते.

गुरु अथवा सिद्धपुरुषाचा शोध घेण्याचा प्रयत्न करू नये. जेव्हा शिष्याची तयारी होते तेव्हा गुरु आपोआप भेटत असतो. म्हणून सद्गुणांची कास धरा म्हणजे सिद्धपुरुषांनी कृपा करावी एवढी पात्रता येईल व निर्विकल्प समाधीचा मार्ग सापडेल. पुष्कळवेळा असेही घडते की एखादा करुणासागर सिद्धपुरुष भक्तांना आपणहून भेटतो. परंतु भक्तांची पूर्वकर्मे जर दूषित असतील किंवा घराण्याचे प्रारब्ध जर अशुद्ध असेल तर ते अशुद्ध प्रारब्ध सत्पुरुषाची सेवा करू देत नाही किंवा सत्पुरुषाबरोबर अहंकाराने वागण्याची दुर्बुद्धी देते व शेकडो जन्मानंतर आलेली संधी भक्त गमावतो. एकदा का अशी संधी गमावली की पुढचे शेकडो जन्म ईश्वराचे फटके खाण्यात जातात.

१२) सिद्धपुरुषाबरोबर आत एक व बाहेर एक असे कधीही वागू नये. असे वागल्याने वातावरणातील देव-देवता नाराज होतात. देव-देवता अशा भक्तांची साथ सोडून देतात. वातावरणातील दुष्ट शक्ती अशा भक्तांच्या मन, बुद्धीवर ताबा मिळवितात. मग या भक्ताच्या हातून अशा काही गोष्टी घडतात की त्याची सर्व पुण्याई नष्ट होऊन जाते. त्याला काहीही चांगले दिसत नाही. सर्वत्र दोष, दुर्गुण त्याला दिसू लागतात. पराकोटीच्या सज्जनांमध्येसुद्धा त्याला दोष दिसू लागतात. त्यांना नावे ठेवण्यात त्याला आसुरी आनंद प्राप्त होतो. अशी माणसे मग सत्पुरुषांबरोबर व सज्जनांबरोबर आत एक व बाहेर एक अशा पद्धतीने वागू लागतात व खूप कष्टाने मिळवलेली पुण्याई नष्ट करतात.

यावरून एक गोष्ट लक्षात येईल की, **मनाचा सरळपणा** हा एक अत्यंत बहुमूल्य सद्गुण असून, हा सद्गुण ज्याच्याकडे आहे अशी माणसे अत्यंत सात्त्विक व खूप पुण्यवान असतात.

१३) मनुष्य जन्म म्हणजे ईश्वरप्राप्तीचे प्रवेशद्वार असून, या प्रवेशद्वारातून आत जाण्याचा मानवाने प्रयत्न करायला हवा. प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी.

१४) सद्‍गुणांनी मनुष्य देव बनतो. देवाला बाहेर शोधू नका सद्‍गुणांची कास धरा, देव तुमच्या हृदयात येऊन राहील.

१५) अनुलोम विलोम प्राणायाम करा, या प्राणायामाने शरीर व मन शुद्ध होण्यास मदत होते. आहार सात्त्विक हलका व सहज पचेल असा असावा. अंमली पदार्थांचे सेवन करू नये.

**१६) दया, क्षमा, शांती, करुणा, अहिंसा, प्रेम, मानवसेवा, ईश्वरभक्ती या सद्‍गुणांनी मानव महामानव बनतो. हे सद्‍गुण प्राप्त करण्यासाठीच ईश्वराने आत्म्याला मानवाचा जन्म दिलेला असतो.**

१७) पृथ्वी हे एक विश्वविद्यालय असून **मानवता** शिकण्यासाठी विविध योनीतील आत्म्यांना ईश्वर मानवरूपामध्ये जन्म देतो व पृथ्वीवर शिकण्यासाठी पाठवितो. येथे जे शिकत नाहीत त्यांना भयंकर शिक्षांना तोंड द्यावे लागते. येथे जे अहंकाराने वागतात, स्वार्थाने वागतात, दुष्टपणा करतात अशा सर्वांना खूप कडक शिक्षा होत असतात.

१८) सत्ता, संपत्ती व प्रसिद्धी यांच्या मागे माणसे धावत असतात. परंतु याच गोष्टी अशांती, अस्थिरता व भीती निर्माण करतात. या गोष्टी मानवाला ईश्वरापासून दूर नेतात. या गोष्टींपासून

माणसाने थोडे दूर रहावे. यांच्या मागून धावू नये. यांच्या मागून धावणारी माणसे स्वत:चे इतके नुकसान करतात की हजारो वर्षांनंतरसुद्धा हे नुकसान भरून येत नाही.

वरील अठरा नियमांचे जे लोक श्रद्धेने पालन करतील ते इहलोकी व परलोकी सुखी होतील. ज्या देशातील लोक या नियमांचे पालन करतील, त्या देशावर नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्ती येणार नाहीत. मात्र त्या देशातील राज्यकर्त्यांसहित सर्व लोकांनी या अठरा नियमांचे पालन करायला हवे.

# २०. चमत्काराचे शास्त्र

**पुष्कळ साधू** चमत्कार करतात व चमत्कार तेथे नमस्कार या न्यायाने त्यांच्याकडे गर्दीही खूप असते. पुष्कळ लोकांना असे वाटते की या साधूने कुठलीही तपश्चर्या केलेली नाही, भक्तीही केलेली नाही तरीसुद्धा हा साधू चमत्कार कसे करू शकतो. याचे उत्तर असे की काही वनस्पतींच्या आधारे चमत्कार करता येतात. वनस्पतींच्या आधाराने जे चमत्कार केले जातात तशा प्रकारचे चमत्कार करण्यासाठी कुठलीही साधना करावी लागत नाही. कुठलीही साधना न करता सामान्य माणूसही वनस्पतींच्या आधाराने अनेक चमत्कार करून समाजाला फसवू शकतो.

आंध्रप्रदेशामध्ये एक मनुष्य विविध प्रकारचे चमत्कार करत असे. त्याने हाक मारल्यानंतर जंगलातून वाघ येत असे. त्या वाघाकडून विविध प्रकारचे खेळ करून घेत असे व लोकांकडून

पैसे घेत असे. जमिनीवर सर्पाची आकृती काढत असे व या आकृतीवरून तो जसजसा हात फिरवत जाई, तसतसे त्या आकृतीचे सर्पात रूपांतर होत असे व तो सर्प अरण्यात निघून जात असे. अशा प्रकारचे विविध खेळ तो करत असे. हे सर्व खेळ तो एका वनस्पतीच्या आधाराने करत असे.

अरण्यामध्ये अशा काही वनस्पती असतात की, त्या वनस्पतीच्या आधाराने नजरबंदी करता येते व नजरबंदीचा संकल्प केल्यानंतर जादूगार जे म्हणेल तेच दृश्य प्रेक्षकांना दिसते. अशा प्रकारचे चमत्कार करण्यासाठी कुठल्याही प्रकारची साधना अथवा तपस्या करावी लागत नाही. जोपर्यंत वनस्पती जवळ आहे तोपर्यंत चमत्कार दिसत राहतात. मात्र चमत्कार करताना थोडेसे तारतम्य पाळावे लागते.

एक साधू आपले सर्व अवयव वेगळे करून दाखवित असे. पोटातील आतडी बाहेर काढून दाखवित असे. तोंडातून एक कपडा गिळत असे व गुद्द्वारातून बाहेर काढत असे. डोळा काढून तळहातावर घेत असे. बोटाने ऑपरेशन करत असे. त्याचे सर्व चमत्कार व्यवस्थितरित्या चालू होते. एक दिवस रजस्वला स्त्रिने नजरबंदी करणाऱ्या त्या वनस्पतीला चुकून स्पर्श केला. त्या दिवसापासून चमत्कार करण्याची त्याची विद्या

नष्ट झाली.

विविध प्रकारच्या वनस्पती व काही प्राण्यांची हाडे यांच्या आधाराने कुठलीही साधना न करता विविध प्रकारचे चमत्कार करता येतात. परंतु अशा लोकांची मृत्यूनंतर दुर्गती होते. समाजाला फसविणे म्हणजे ईश्वराला फसविणे. ईश्वराला फसविण्याचे फार मोठे पातक त्यांना लागते. एकंदरीत हा नजरबंदीचा मार्ग चांगला नाही. परंतु वाचकांना विविध प्रकारचे मायाजाल दाखविणाऱ्या वनस्पतींची माहिती व्हावी म्हणून काही वनस्पतींचे वर्णन पुढे करत आहे.

सगळ्याच वनस्पती वाईट असतात असे नाही. काही वनस्पतींनी आरोग्याचा लाभ होतो. त्यामुळे वनस्पती तंत्र वाईट नसून त्याचा वापर मनुष्य ज्या बुद्धीने करतो त्या बुद्धीचे चांगले अथवा वाईट परिणाम होत असतात. चमत्कार करणाऱ्या वनस्पतींचे वर्णन पुढे करत आहे. वाचकांनी ते फक्त मनोरंजन म्हणून वाचावे. वनस्पतींचा कुठलाही प्रयोग करण्याच्या भानगडीत पडू नये. आरोग्य देणाऱ्या काही वनस्पतींचे वर्णनही शेवटी करत आहे, त्याचा उपयोग करण्यास काहीच हरकत नाही.

## शिवलिंगी

शिवलिंगी वनस्पतींची फळे गोल असतात व या फळाच्या आत शिवलिंगाच्या आकाराच्या बिया असतात. प्राचीन काळी ज्या राक्षसांनी तंत्रसाधना केली अशा राक्षसांचे आत्मे शिवलिंगी झाडाच्या रुपाने जन्म घेत असल्याने या झाडामध्ये अनेक राक्षसांचे आत्मे असतात. तांत्रिक लोक या झाडाची मुळी घेऊन ती मुळी एका विशिष्ट मंत्राने सिद्ध करून जवळ ठेवतात व या मुळीच्या आधाराने अनेक चमत्कार करतात. एका जागी अदृश्य होऊन दुसऱ्या जागी प्रकट होणे, अतिशय वेगाने चालत जाणे इत्यादी चमत्कार या मुळीच्या आधाराने करता येतात.

## पळस

पळस या झाडाच्या आधारानेही अनेक चमत्कार करता येतात. सामान्य माणसाने या वनस्पती तंत्राच्या नादाला लागू नये. कारण वनस्पतींच्या आश्रयाने वातावरणातील असंख्य आत्मे रहात असतात. विशिष्ट प्रकारचे आत्मे विशिष्ट प्रकारच्या वनस्पतीत रहात असतात. त्यामुळे वनस्पती बदलली की मंत्र बदलतो. प्रत्येक वनस्पती सिद्ध करताना त्या वनस्पतीचा मंत्र माहीत असावा लागतो व त्या मंत्राचा विशिष्ट प्रकारे जप करून ती वनस्पती सिद्ध करावी लागते व नंतरच त्या वनस्पतीचा

चमत्कारासाठी उपयोग होतो. अर्थात या साधना कठीण नसतात. परंतु या सर्व साधना मायावी असतात. याने आध्यात्मिक उन्नती होत नाही.

पळसाच्या बियांचे तेल काढून तूप व मध यांच्याबरोबर त्या तेलाचे सेवन केले असता डोळ्यावर पट्टी बांधून पुस्तक वाचता येते. याच बियांवर आणखी वेगळ्या प्रकारचे काही संस्कार केल्यानंतर शेकडो मैलावर काय चालले आहे ते पाहण्याची दूरदर्शन ही सिद्धी प्राप्त होते. तसेच शेकडो वर्षे जगता येते. यावर विशिष्ट प्रकारचे आणखी संस्कार केले असता आकाशगमन सिद्धी मिळते. पळस वृक्षामध्ये अनेक सिद्धी राहतात. पळस वृक्षाचे साधन केले असता मनुष्य हजारो वर्षे जगू शकतो. जमिनीतील द्रव्याचे निधी त्याला दिसतात. आकाशातून संचार करण्याची विद्या त्याला प्राप्त होते. पळस वृक्षाच्या सेवनाने साधकाचा देह इतका काही बदलून जातो की त्याने लोखंडावर लघवी केली असता लोखंडाचे सोने होते. या एकाच गोष्टीवरून या वनस्पतीचे सेवन किती भयंकर असू शकेल हे लक्षात येते. याचा अर्थ हे सामान्य माणसाचे काम नव्हे. फक्त हे ज्ञान माझ्याबरोबर लुप्त होऊन जाऊ नये म्हणून हे लिहित आहे.

## शाल्मली

शाल्मली या वनस्पतीला मराठीमध्ये शेवरी म्हणतात. या वनस्पतीच्या एकूण चार जाती आहेत. पांढरी, काळी, लाल व हिरवी अशा चार रंगाची सावर असते. सावरीच्या झाडाला भोक पाडून त्या भोकामध्ये एक नळी घालतात व नळीच्या दुसऱ्या टोकाला एक भांडे ठेवतात. नळीतून रस त्या भांड्यामध्ये पडू लागतो. तो रस मधाबरोबर सेवन केला असता कामरूप विद्या प्राप्त होते. साधक त्याच्या इच्छेला येईल ते रूप धारण करून फिरू शकतो. याशिवाय या वनस्पतीच्या योगाने चिरतारुण्य व शेकडो वर्षे जगण्याची कला साध्य होते.

या वनस्पतीच्या आधाराने अनेक पिशाच्चे राहतात. विशिष्ट ग्रह, नक्षत्रांमध्ये या वनस्पतींची मुळी जवळ बाळगली असता अनेक पिशाच्चे आपल्या आधीन होतात व त्याद्वारे अनेक चमत्कार करता येतात. यासाठी कुठलीही साधना व जप करण्याची आवश्यकता नसते. विशिष्ट ग्रह, नक्षत्रांमध्ये या झाडाची मुळी जवळ बाळगली असता नजरबंदीचे अनेक चमत्कार करता येतात. भूत, भविष्य सांगता येते व हवेतून अनेक पदार्थ निर्माण करता येतात.

## अंकोल

ही एक प्रभावी वनस्पती असून, या वनस्पतीच्या आधाराने विविध प्रकारचे चमत्कार करता येतात. गारुडी विद्येचे चमत्कार करणारे लोक या वनस्पतीचा वापर करून अनेक चमत्कार करतात. विविध रूपे धारण करण्यासाठी तांत्रिक साधू या वनस्पतीचा वापर करतात. ही वनस्पती दुर्मिळ असून, श्री शैलच्या अरण्यात कुठे कुठे ही वनस्पती आढळते. ही वनस्पती खूप चमत्कार करणारी असून, कुठल्याही मंत्र-तंत्राशिवाय, साधने शिवाय केवळ या वनस्पतीच्या आधाराने नजरबंदी, विविध प्रकारचे जादूचे प्रयोग करता येतात. याशिवाय या वनस्पतीच्या आधाराने गुप्तधनाचा शोध घेता येतो.

## मालकांगणी

मालकांगणी या वनस्पतीला संस्कृतमध्ये ज्योतिष्मती असे म्हणतात. या वनस्पतीच्या आधारानेही अनेक सिद्धी प्राप्त करता येतात. मालकांगणीच्या बियांचे तेल काढतात. याचे एक थेंब तेल प्याले असता साधक बेशुद्ध होतो इतके हे तेल प्रभावी असते. ही बेशुद्धी गेल्यानंतर दूध व मध प्यावे लागते. नंतर साळीच्या तांदळाचा भात दूधाबरोबर खातात. अशा प्रकारे पथ्यकारक आहार करत दररोज मालकांगणीचे तेल सेवन केले

असता साधक अनेक सामर्थ्यांनी युक्त होतो. अनेक प्रकारचे चमत्कार त्याला करता येतात. अदृश्य सृष्टीतील आत्म्यांबरोबर संभाषण करणे, त्यांच्याकडून मदत मिळविणे, वृक्षामध्ये, दगडांमध्ये असणाऱ्या आत्म्यांबरोबर संवाद साधणे अशा गोष्टी या साधनेने साध्य होतात. अदृश्यसृष्टीतील आत्म्यांकडून विविध प्रकारच्या विद्या कशा साध्य कराव्या याचे ज्ञान होते. वातावरणातील यक्ष-यक्षिणी यांच्याशी संवाद साधून चौसष्ट यक्षिणींची विद्या, वेताळ सिद्धी अशा गोष्टी या वनस्पतींच्या आधाराने साध्य करता येतात. नजरबंदीद्वारे एखादी वस्तू गायब करता येते किंवा हवेतून विविध पदार्थ काढता येतात.

### कातरनिगडी

कोकणामध्ये ही वनस्पती सर्वत्र दिसून येते. सूज उतरविण्यासाठी या तेलाचा वापर करण्यात येतो. कातरनिगडीच्या मुळावरती काही प्रक्रिया करून कातरनिगडीचे मूळ चाळीस दिवस ताकाबरोबर खाल्ले असता मनुष्य आकाशगामी होतो. विशिष्ट ग्रह, नक्षत्रांच्या आधाराने ही क्रिया करावी लागते. आणखी एक विशिष्ट ग्रहयोग साधून कातरनिगडीची साल काढून सुकवावी व या सालीचे चूर्ण गोमूत्राबरोबर सेवन केले असता चाळीस दिवसांनंतर नखे, केस, दात गळून पडतात व नंतर नवीन नखे,

केस, दात येतात. याशिवाय या वनस्पतीच्या योगाने आत्मे दिसू लागतात व त्यांच्या आधाराने अनेक चमत्कार करता येतात.

## बाभूळ

बाभळीच्या झाडावर असंख्य पिशाच्चे राहतात. काही सोप्या साधनांनी निर्भय माणसे पंचेचाळीस दिवसात या पिशाच्चांना प्रसन्न करून घेतात व त्यांच्याद्वारे अनेक चमत्कार करून घेतात.

## बेहडा

या वृक्षाच्या आश्रयाने अनेक पिशाच्च शक्ती राहतात. या वृक्षाचे एक पान विशिष्ट मंत्राने मंत्रून जेवताना मांडीखाली ठेवले असता पंचवीस माणसांचे अन्न एकटा मनुष्य खाऊ शकतो व आणखी जेवायला मागतो. एका साधूने लग्नाच्या वऱ्हाडासाठी बनवलेले सर्व अन्न एकट्याने खाऊन दाखविले. त्याने बेहड्याचे पान मांडीखाली ठेवले होते. अघोरी साधक तरसाचे हाड जवळ बाळगतात व एका वेळेला दोनशेहून अधिक माणसांचे जेवण खाऊन फस्त करतात. कितीही खाल्ले तरी पोट भरत नाही. अशी पिशाच्च सिद्धी बेहड्याच्या पानामध्ये व तरसाच्या हाडांमध्ये असते. बेहडा या वृक्षामध्ये अनेक बुभुक्षित पिशाच्चे रहात असतात व फक्त एका तासाच्या साधनेने ती साधकांना वश होतात.

## रुई

रुई या वनस्पतीमध्ये अनेक चमत्कार करण्याचे सामर्थ्य आहे. पांढऱ्या रुईचे झाड एकवीस वर्षांचे झाल्यानंतर त्याच्या मुळाशी गणपतीचा आकार तयार होतो. एकवीस वर्षानंतर रुईच्या मुळाशी तयार झालेला हा गणपती काढून पुजेत ठेवला असता अनेक प्रकारे वैभव प्राप्त होते. या वनस्पतीच्या मुळाशी अनेक आत्मे रहात असतात. ही वनस्पती सर्वत्र दिसून येते. रस्त्याच्या कडेला तर नेहमीच असते. रजस्वला स्त्रीने कधीही या वनस्पतीच्या जवळ जाऊ नये तसेच पुरुषांनी कधीही या वनस्पतीच्या आसपास लघवी करू नये. या वनस्पतीचा आदर केल्याने सुख शांती प्राप्त होते व अनादर केल्याने त्रास होतो.

## कोहाळा

कोहाळा या वनस्पतीला संस्कृतमध्ये कूष्मांड असे म्हणतात. वातावरणामध्ये काही पिशाच्चे अशी असतात की ज्यांना फक्त मुंडके असते धड नसते. अशा पिशाच्चांना वश करण्यासाठी कूष्मांड पूजन नावाचा विधी तांत्रिक लोक करतात. या विधीने हे आत्मे वश होतात व त्यांच्याद्वारा अनेक चमत्कार करता येतात. लोकांचे भूत, भविष्य व वर्तमान सांगता येते.

## लाजाळू

लाजाळू ही वनस्पती सर्वांच्या परिचयाची आहे. ही वनस्पती अतिशय चांगली असून, खूप उपयोगी वनस्पती आहे. या वनस्पतीच्या आसपास कुठलीही वाईट शक्ती नाही. रागीट स्वभावाच्या माणसाने या वनस्पतीचा एक तुकडा रेशमी कापडामध्ये गुंडाळून जवळ ठेवावा, गळ्यात घालावा अथवा दंडाला बांधावा. या वनस्पतीच्या प्रभावाने राग शांत होतो व स्वभावात शालीनता येते.

## पुनर्नवा

पुनर्नवा ही वनस्पती सुद्धा एक चांगली वनस्पती असून, बाजारामध्ये पुनर्नवासव नावाचे आयुर्वेदिक औषध मिळते. वयाच्या चाळीसाव्या वर्षानंतर हे औषध नेहमी घेत राहावे. असे केले असता आरोग्य चांगले राहते.

## अश्वगंधा

ही सुद्धा एक आरोग्य देणारी वनस्पती आहे. बाजारामध्ये अश्वगंधारिष्ट मिळते. उतारवयामध्ये हे अधून-मधून घेत राहावे. याने आरोग्य चांगले राहते. अश्वगंधाचूर्णही बाजारात मिळते. हे चूर्णही नेहमी दूधाबरोबर अथवा पाण्याबरोबर घेण्यास हरकत

नाही. अश्वगंधा चूर्ण आणि तीळचूर्ण रोज घेतल्याने आरोग्य चांगले राहते व दृष्टी चांगली होते.

### हिरडा

**न माता यस्य । तस्य माता हरितकी ।।**

ज्याला आई नाही त्याने हिरड्याला आपली आई मानावे, असे म्हटले जाते. हिरड्याचे अनेक औषधी उपयोग असून, जाणकार माणसाकडून त्याची माहिती घेऊन हिरडा चूर्ण घेण्यास हरकत नाही.

### अजान वृक्ष

अजान वृक्ष हा एक दुर्मिळ वृक्ष असून या अजान वृक्षाच्या पंचांगामध्ये (मूळ, साल, पान, फूल, फळ) अनेक दिव्य शक्ती दडलेल्या आहेत.

### आवळा

आवळा हा सर्वांनाच माहीत आहे व आबालवृद्धांनी बाराही महिने आवळा खाण्यास हरकत नाही. याने अनेक प्रकारचे रोग दूर होतात व आरोग्य चांगले राहते.

विविध प्रकारच्या वनस्पतींच्या आधाराने चमत्कार करता येतात व आरोग्य लाभही करून घेता येतो. चमत्कार करणाऱ्या

वनस्पती पैसा व प्रतिष्ठा प्राप्त करून देतात. परंतु आध्यात्मात प्रगती होत नाही. आध्यात्मिक प्रगती व सद्गती या गोष्टी फक्त पुण्याईनेच प्राप्त होतात. यासाठी पुण्याई व सद्गुण यांची कास धरणे आवश्यक आहे.

# २१. मुक्तीचा मार्ग

**जीवन** हे परस्परावलंबी आहे. परस्परावलंबी जीवन जगत असताना मुक्तीचा मार्ग सापडणे म्हणजे 'वाळूच्या ढिगाऱ्यात हरवलेला एखादा खसखशीचा दाणा सापडणे !' इतके ते कठीण असते. म्हणून जीवन परस्परावलंबी कसे असते हे समजावून घेऊ !

जीवन जगताना नेहमी इतरांचे आशीर्वाद घेत जगावे, इतरांची सेवा करत जगावे, दान व ईश्वरभक्ती करत जगावे, फक्त या गोष्टी करणाऱ्यांनाच मुक्तीचा मार्ग सापडतो. इतर कोणासही मुक्तीचा मार्ग सापडत नाही. एखादा खरा सत्पुरुष किंवा प्रकाशमार्गीय सिद्धपुरुष भेटला तर त्याची जास्तीत जास्त सेवा करावी. कारण प्रकाशमार्गीय सिद्धपुरुष जर भेटला तर त्याच्या सेवेने पूर्वजांचाही उद्धार होतो.

वरील मुद्दा पटवून देण्यासाठी मी असंख्य उदाहरणे देऊ

शकेन परंतु अदृश्यसृष्टीची काही बंधने असल्याकारणाने काल्पनिक उदाहरणे देऊन मी माझे म्हणणे स्पष्ट करीत आहे. पुढील सर्व उदाहरणे काल्पनिक असून, फक्त लोकांनी वागावे कसे याचे ज्ञान व्हावे  म्हणून या गोष्टी लिहीत आहे.

एक सेवाभावी व परोपकारी स्वभावाची मुलगी होती. एका प्रकाशमार्गीय सिद्धपुरुषाचे दर्शन अधून-मधून ती घेत असे. तिची आजी आजारी पडली. खाणे पिणे बंद झाले. आजीने पंधरा-वीस दिवस काही खाल्ले नाही. तरीही तिचा प्राण जात नव्हता याचे कारण पूर्वजांना सद्गती मिळालेली नव्हती. आजीची नात प्रकाशमार्गीय सिद्धपुरुषाची अनुग्रहीत असल्याकारणाने त्या प्रकाशमार्गीय सिद्धपुरुषाची कृपा या नातीच्या मार्फत आम्हाला मिळेल व आम्हाला सद्गती मिळेल या आशेने अदृश्य सृष्टीतील अडीच ते तीन हजार भूतात्मे त्या आजीच्या शरीरात शिरून तिचे शरीर जिवंत ठेवत होते व तिला मरू देत नव्हते.

प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाने हजारो मैलावरुन कृपेचा एक किरण त्या आजीकडे पाठविला, सर्व मृतात्म्यांना स्वत:कडे खेचून सद्गती दिली व या मुलीच्या आजीलाही सद्गती दिली.

कुठल्याही प्रकारची प्रसिद्धी न करता प्रकाशमार्गीय सिद्धपुरुष चुपचापपणे असे काम करत असतात. प्रकाशमार्गीय सिद्धपुरुष

आजकाल कोठेही दिसत नाहीत व जे आहेत ते दुर्गम ठिकाणी गुप्तपणे रहात आहेत. कारण हे जग दर्शन देण्याच्या लायकीचे नाही.

एक सज्जन कुटुंब होते. त्यांच्या घरातील वृद्ध स्त्री मृत्युच्या घटका मोजत होती. काहीही खात-पित नव्हती. तरीपण प्राण जात नव्हता. असे पंधरा-वीस दिवस गेले. सर्व लोक तिच्या मरणाची वाट पहात होते.

या वृद्ध स्त्रिचा प्राण जात नव्हता याचे कारण या वृद्ध स्त्रिच्या मुलाला एका प्रकाशमार्गी सिद्धपुरुषाची माहिती होती. या सिद्धपुरुषाला त्याने कधी पाहिले नव्हते. या सिद्धपुरुषाची मुलाने सेवा करावी व आम्हाला सद्‌गती मिळवून द्यावी असे वातावरणातील असंख्य मृतात्म्यांना वाटत होते. परंतु प्रकाशमार्गीय सिद्धपुरुषांची सेवा करण्याइतकी ईश्वरीकृपा या मुलाकडे नव्हती. शेवटी त्याच्या आईचा प्राण गेला व तिला अडविणारे मृतात्मे ज्या लोकात होते त्या लोकात ती खेचली गेली.

मध्यप्रदेशातील एका सद्‌गृहस्थाच्या आईच्या आत्म्याला सद्‌गती मिळाली नव्हती. त्याच्या सुदैवाने त्याला एक प्रकाशमार्गी सतपुरुष भेटले व त्याच्या आईच्या आत्म्याला सद्‌गती प्राप्त

करून दिली तद्नंतर तो मनुष्य सुखी झाला.

पूर्वजांना सद्गती प्राप्त झालेली नसेल तर घरात भरपूर पैसा असूनही मन:शांती नाही असे होते. घरातील स्त्री-पुरुष व्यसनी होतात.

केलेल्या प्रयत्नांना यश येत नाही. घराण्याला दारिद्र्य येते. अनेक प्रकारचे रोग घरातील लोकांना होतात. घरात शांती नसते, कमावलेला पैसा पुरा पडत नाही, धंद्यात नुकसान होते, शिक्षणात अपयश येते.

**वरील सर्व गोष्टी पितरांना सद्गती मिळाली नाही हे दर्शवितात.**

जीवन हे परस्परावलंबी आहे. थोरामोठ्यांची सेवा करून जर त्यांचे आशीर्वाद मिळविले तर जीवन सुखी होते. थोरामोठ्यांचे आशीर्वाद न मिळविता यदाकदाचित थोरा मोठ्यांचे शाप पाठीशी लागले तर त्याचे खूप दुष्परिणाम होतात. हे दुष्परिणाम कसे होतात. याचे एक उदाहरण पुढे देत आहे.

पूर्वजन्मी योगसाधना केलेल्या एका साधकाने या जन्मी आपल्या हितचिंतक थोरामोठ्यांचे अपमान केले. याचा परिणाम असा झाला की, त्याला प्रकाशमार्गी सद्गुरु न भेटता स्मशानात राहून पिशाच्च सिद्धींच्या साधना करणारे हजारो अघोरी साधू

भेटले व त्यांच्या सहवासाने, संगतीने या योगसाधकाचे प्रचंड नुकसान झाले. म्हणून जेवढे जमेल तेवढे थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेत राहा. कारण थोरामोठ्यांचे आशीर्वाद न घेता जर त्यांचे तुम्ही अपमान केलेत तर या जन्मात किंवा पुढच्या जन्मात ज्यांचे तुम्ही अपमान केलेत त्यांच्यावर तुम्हाला अवलंबून रहावे लागते.

मी अशा कितीतरी घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या आहेत की, एखाद्या सज्जन व्यक्तीला अकारण अपमानजनक वागणूक दिल्यास अशी परिस्थिती निर्माण होते की, त्याच व्यक्तीवर आपल्याला काही काळ अवलंबून जगावे लागते, जीवन हे अतिशय गुंतागुंतीचे आहे. परस्परावलंबी आहे. एखाद्या सज्जनाचा अपमान केल्याने त्या सज्जनावर अवलंबून या जन्मी किंवा पुढच्या जन्मी जगावे लागते. अशी स्थिती निर्माण होते तर इतर वाईट कर्मे करणाऱ्या लोकांची परिस्थिती काय होत असेल याचा विचार वाचकांनीच करावा.

**प्रेमाने वागावे, परोपकार करीत राहावे, कोणी दु:ख दिल्यास सहन करावे, कोणाचाही तिरस्कार करू नये, अनादर करू नये. एवढ्या गोष्टी केल्यास प्रकाशमार्गी सिद्धपुरुषांची भेट होते व मुक्तीचा मार्ग मिळतो.**

# समाप्त

**''परोपकारार्थं इदं शरीरम् ।**

**ईश चिंतनार्थं इदं मनः ।**

**विवेकार्थं इदं बुद्धि ।**

**ब्रह्मज्ञानार्थ जीवनम् ।।''**

---

शरीर परोपकार करण्यासाठी आहे.

मन ईश्वर चिंतनासाठी आहे.

बुद्धी, चांगले - वाईट (विवेक)

यांचा विचार करण्यासाठी आहे.

जीवन हे ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आहे.

**- श्री स्वामी दत्तावधूत**

आता ह्दय हे आपुले ।
चौफाळोनिया भले ।।
वरी बैसवू पाऊले ।
समर्थ स्वामी सद्गुरुची ।।

प्रभू आपण शंकर ।
मी पूजितो पामर ।।
मम बोल अरण्यपत्र ।
बेल म्हणौनी स्विकारावे ।।

स्वामी दत्तावधूत